संपूर्ण आगरकर

भाग दुसरा



संपादक

प्रा. माधव दामोदर आळतेकर, एम्. ए.

मूल्य तीन रुपये

मॉडर्न बुक डेपो प्रकाशन

UNIVERSAL
LIBRARY
OU_184475
UNIVERSAL
LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M923.654 A26S Accession No. M719

Author आकलेकर, शिवराम गणेश

Title रायगडाचा राजकवि. भाग २.

This book should be returned on or before the date last marked below

OUP—391—29-4-72—10,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M923.654 A26S Accession No. M719

Author आकलेकर, माधव दामोदर

Title स्मृती आकलेकर. भाग 2.

This book should be returned on or before the date last marked below.

संपूर्ण आगरकर

भाग २

: संपादक :

प्रो. माधव दामोदर आळतेकर, एम. ए.

: प्रकाशक :

मॉडर्न बुक डेपो, आनंदाश्रमासमोर, पुणें २


१९४७

प्रकाशक :
ना. त्र्यं. भिडे, बी. ए.
मॉडर्न बुक डेपो, पुणें २.

[सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन]

मुद्रक :
रमाकांत चेलदे
सुदर्शन प्रिंटिंग प्रेस, नासिक

अनुक्रमणिका



	पृष्ठ
१ लोकशिक्षणावर गदा	१
२ देवता	६
३ देवतोत्पत्ति	११
४ अथ आचारप्रकरणं	१७
५ विजयलांछनें	२५
६ व्यवच्छेदन	३३
७ उपायन, कर व बलिदान	४२
८ भेटी, देवदर्शनें, यात्रा,	४८
९ पुण्याचे लोकांनो सावध व्हा, सावध व्हा	५४
१० आमची एक दुष्ट खोड–आळस	५७
११ ही दगलबाजी नव्हे काय ?	६३
१२ शनीदेव ऊर्फ साडेसातीचा देव	६४
१३ स्वयंवर	७०
१४ सामाजिक सुधारणा आणि कायदा	७५
१५ सामाजिक सुधारणा परिषदेचे निंदक	८६
१६ अजून तरी सावध व्हा	८९
१७ अनाथाचा वाली कोणी नाहीं !	९१
१८ न करत्याचा वार शनवार	९६
१९ हलवायाचे दुकानावर ब्रह्मार्पण	१०२
२० राजकीय संनिधानाचें अपायकारत्व	१०४
२१ सामाजिक घडामोड	१०९

२२ भारतीय कलांचें पुराणत्व	११६
२३ भारतीय कलांचें पुराणत्व नं. २	१२२
२४ भारतीय कलांचें पुराणत्व नं. ३	१२६
२५ भारतीय कलांचें पुराणत्व नं. ४	१३१
२६ हा कलंक कसा जाणार ?	१३७
२७ समजत नाहीं तें हें	१४१
२८ आमच्या स्त्रियांचा पेहराव	१४८
२९ आमच्या स्त्रियांचा पेहराव नं. २	१५४
३० अलंकारमीमांसा	१५९
३१ म्हणण्यासारखा उपयोग नाहीं	१६६
३२ कायदा मागतां ते जात कां करीत नाहीं ?	१७२
३३ हिच्या नांवानेंही तीच रड	१७९
३४ मूळ पाया चांगला पाहिजे	१८३
३५ हे तुमचे पुढारी नव्हत	१८७
३६ तर मग जुन्यांचे पुढारी असावे तरी कसे ?	१९३
३७ आम्हांला 'हलकट' कां म्हटलें ?	१९४
३८ बोलके सुधारक, वागते सुधारक व सुधारणानिंदक	१९६
३९ मि. अशबरनर आणि हिंदु विधवा	२००
४० आणखी एक शहाण्याचा कांदा	२०५
४१ संमतीचें वय आणि जुन्या लोकांचा खोटेपणा	२१२
४२ आतां मात्र खचित होणार	२१६
४३ विवाहकाल व संभोगकाल	२२३
४४ संमति बिलास धर्मशास्त्र बाधक नाहीं	२२९
४५ महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र	२३७
४६ माहितीच्या टीपा	२४३

संपूर्ण आगरकर

भाग दोन

लोकशिक्षणावर गदा : : १

"तुमच्या हायस्कुलावर होत असलेल्या खर्चापैकीं दोन तृतीयांश खर्च तुम्ही देण्यास तयार व्हा, नाहींतर तुमचें हायस्कूल बंद केलें जाईल," अशा अर्थाचीं पत्रें शाळाखात्याचे डायरेक्टर यांजकडून प्रत्येक जिल्ह्याचे म्युनिसिपालिटीस गेलीं आहेत; तसेंच येथील डेक्कन कॉलेजाची फी दहा रुपये केली आहे, असें म्हणतात. हा सर्व प्रकार खरा असेल, व त्याप्रमाणें आचरण करावयाचेंच, असा सरकारचा निश्चय झाला असेल, तर येथील लोकशिक्षणाची काय अवस्था होईल हें सांगतां येत नाहीं. आजपर्यंत आमच्या सरकारचा गर्व काय असे कीं, आम्हीं हिंदु लोकांसाठीं साऱ्या देशभर रस्ते केले, तारायंत्रें केलीं, आगगाड्या केल्या, न्यायाच्या कचेऱ्या स्थापिल्या; लोकांच्या मालमत्तेचें आणि जिवांचें उत्तम रीतीनें संरक्षण होईल अशा प्रकारचा पोलिसांचा बंदोबस्त केला; सैन्याची उत्तम व्यवस्था ठेवून परचक्राची भीति दूर केली; व्यापारास उत्तेजन दिलें; नाना तऱ्हेच्या धंद्यांची लोकांस ओळख करून दिली; सारांश, हिंदुस्थानास आजपर्यंत अनवगत अशी सुधारणा व शांतता त्यास दिली. पण या सर्वांपेक्षां सरकारास ज्या गोष्टीविषयीं विशेष अभिमान वाटत असे; जीमुळें आमचें पारतंत्र्य आम्हांस सह्य होऊन इंग्लिश लोकांचे प्रभुत्व येथें चिरकाल असावे असें वाटत असे; व

जिच्या मदतीनें कधीं तरी आम्हांस स्वातंत्र्याचा सुदिन प्राप्त होईल, अशी आशा आमच्या अंतःकरणांत कधीं कधीं उद्भवत असे त्या गोष्टींतून सरकार आज आपलें अंग काढून घेऊं पाहात आहे ! लोकशिक्षणाच्या कामाचा बोजा ब्रिटिश सरकारनें झुगारून दिल्यास, ब्रिटिश लोकांस आपल्या अंमलाचे पवाडे गाण्यास काय राहिलें, हें आम्हांस समजत नाहीं. " आम्ही तुमचें स्वातंत्र्य नाहींसें केलें, पण त्याबद्दल पाश्चिमात्य ज्ञानाचें सारें भांडार आम्हीं तुम्हांस अर्पण केलें " ही जी इंग्लिश लोकांची आजपर्यंतची गर्वोक्ति तिचें आतां काय होईल ? हिंदुस्थानांत आजमितीस बरेच लोक शिकून तयार झाले आहेत, व त्यांना शिक्षणाचें महत्त्व समजून आलें आहे; तेव्हां येथून पुढें जो विद्याप्रसार व्हावयाचा त्याचें काम त्यांच्या हातून करविण्याचा सरकारनें निश्चय केला असता, तर त्याबद्दल सरकारास विशेष दोष देण्यास जागा न सांपडती. लोकशिक्षणावर सध्यां होत असलेला खर्च कायम ठेवून शाळा व कॉलेजें चालविण्याची जबाबदारी सरकार लोकांवर टाकतें, आणि त्यांची देखरेख फक्त आपणांकडे ठेवतें तर " तुम्हीं सर्वथैव बावगी गोष्ट करतां. " असें आम्हांस म्हणतां न येतें. पण सध्यां सरकारानें जो क्रम आरंभिला आहे तो आमच्या मतें फारच दूषणीय आहे. ज्याप्रमाणें व्यसनी लोक आपल्या व्यसनांत तदनभिज्ञास घेरावयाचें असतां, कांहीं दिवस आपली पदरमोड करून त्यास आपल्या व्यसनाची चटक लावतात, व ती त्याच्या अंगीं पक्की खिळली असें दिसून येऊं लागलें, म्हणजे आपला हात आखडून धरतात इतकेंच नाहीं, तर आपल्या खर्चाचा बोजाहि त्यावर लादूं लागतात, तसा प्रकार या विद्याव्यसनाच्या संबंधानें सरकारानें आरंभिला आहे. प्रथम मोठ्या खर्चाचीं शाळाखातीं प्रत्येक इलाख्यांत स्थापलीं; कनिष्ठ, मध्यम, व वरिष्ठ प्रतीच्या शाळा घातल्या; त्यांत लोकांनीं आपलीं मुलें धाडावीं म्हणून कोठें त्यांस अगदीं फुकट व कोठें क्षुल्लक फीवर शिकविण्याचा प्रघात घातला; पगारी विद्यार्थ्यांच्या जागा निर्माण केल्या; बक्षिसें लाविलीं; परीक्षा घेण्यासाठीं युनिव्हर्सिट्या स्थापिल्या; ठिकठिकाणीं लहान लहान पुस्तकालयें केलीं;—याप्रमाणें लोकशिक्षणाची लोकांस गोडी लागण्यास्तव होण्यासारखे सारे उपाय करून ते त्याचा आस्वाद चाखूं

लागताहेत नाहीं तों त्यांतून आमचें सुधारलेलें सरकार आपलें अंग सर्वांशीं काढूं पाहात आहे इतकेंच नाहीं, तर त्याकडे होत असलेला बराच खर्चहि कमी करूं पाहात आहे, हें आमचें केवढें दुर्भाग्य होय ? व यामुळें सरकारास तरी केवढा धोका बसण्याचा संभव आहे ? वाचकहो, ही सर्व चलबिचल ब्रह्मदेशांत चालूं असलेल्या लढाईमुळें व वायव्यप्रांतावर अफगाणिस्थानाच्या बाजूनें परचक्र येऊं नये, म्हणून ब्रिटिश सैन्य वाढविण्यांत आल्यामुळें जो खर्च वाढला आहे, त्यामुळें होत आहे, असें समजणें जरूर आहे. कोणत्याहि खात्याचा खर्च कमी न करतां वरील गोष्टी करतां याव्या, म्हणून लॉर्ड डफरीन यांनीं इन्कमटॅक्स् (प्राप्तीवरील कर) पुनः बसविला, मिठावरील कर वाढविला, दुष्काळनिवारणार्थ बसविलेल्या कराचें सारें उत्पन्न वरील कृत्याकडे लावून दिलें, तरी त्यांचा खर्च भागत नसल्यामुळें, ही काटकसरीची धाड शाळाखात्यावर येऊं पाहात आहे, हें उघड आहे. ब्रह्मदेशावर स्वारी करून तो खालसा करण्याचा निश्चय झाला, तेव्हां सरकारनें जे लेख प्रसिद्ध केले त्यांत असें दाखविण्याचा प्रयत्न केला होता कीं, ब्रह्मदेश जिंकण्यास व खालसा करण्यास फार झालें तर तीस लाख रुपये लागतील ! पण तो एकदां खालसा होऊन ब्रिटिश राज्याचा घटकावयव झाला, म्हणजे त्यासंबंधानें हिंदुस्थानवर खर्चाचा भार पडणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर उलट हिंदुस्थानच्या खजिन्यास ब्रह्मदेशापासून मदत होऊं लागेल ! ही गोष्ट घडून येण्याची आशा आतां उरली नाहीं ! ब्रह्मदेशाशीं आरंभिलेला संग्राम, वायव्यदिशेला बंदोबस्त, आणि रुप्याचा उतरलेला भाव—यांमुळें हिंदुस्थानचा खर्च सहा कोटींनीं वाढला आहे. पैकीं सुमारें तीन साडेतीन कोटि रुपये इन्कमटॅक्स, मिठावरील वाढलेला कर, व इतर किरकोळ बाबी यांतून भागविला जात आहे. बाकी उरलेलें दोन अडीच कोटि रुपये कोठून काढावे, अशी पंचाईत पडल्यामुळें, प्रत्येक इलाख्यावर नवीन खंडणी बसवावी असा बेत करून, हिंदुस्थान सरकारनें मुंबई सरकारास असें पत्र लिहिलें आहे कीं, चालू वर्षांत " तुम्हांकडून मुख्य सरकारास एकोणीस लाख रुपये मिळाले पाहिजेत. हे उभे करण्यासाठीं तुम्ही पाहिजे ती काटकसर करा, नवीन कर बसवा, शाळांची फी वाढवा; सारांश, तुम्हांस वाटेल तें करा;

पण तुमच्याकडून एकोणीस लाखांची कुमक झालीच पाहिजे ! व तेथून पुढें इलाख्याच्या उत्पन्नाचा विवक्षित भाग तुम्हांकडे ठेवून बाकीचें सारें उत्पन्न मुख्य सरकार आपलें ताब्यांत घेईल; व तुमच्याकडे जो भाग ठेवायचा तो कमी अधिक करण्याचा अधिकारहि मुख्य सरकारकडे राहील. इंपीरियल उत्पन्न व इंपीरियल खर्च आणि प्रांतिक उत्पन्न व प्रांतिक खर्च-असा विभाग करणें बरोबर नाहीं. कसेंहि झालें तरी ज्या गोष्टींबद्दल मुख्य सरकार जबाबदार आहे त्यांचा खर्च कसा तरी भागविलाच पाहिजे. त्या अर्थी तो खर्च भागविल्यानंतर उरेल तेवढा पैसा प्रांतिकखर्चाकडे लावणें योग्य आहे. ज्या प्रांतिक सरकारास आपापल्या प्रांतांत विशेष सुधारणा करावीशी वाटत असेल त्यांनीं ती करण्यास्तव हवे तितके पैसे उत्पन्न करावे. पण त्या सर्वांनीं ही गोष्ट लक्षांत धरावी कीं, मुख्य सरकारास लागेल तेवढा पैसा पुरविणें हें त्यांचें मुख्य कर्तव्य आहे. हिंदुस्थानमुळें इंग्लंडांत होणारा सात-आठ कोटींचा खर्च, सैन्याचा खर्च, मोठमोठ्या व्यापारी कंपन्यांस जें व्याज पोहोंचविण्याचा सरकारनें पत्कर घेतला आहे त्याचा खर्च, आणि अशाच प्रकारचें इतर खर्च मुख्य सरकारकडून होतात; आणि तें केल्याशिवाय राज्यशकट सुरळित चालण्याचा संभव नाहीं. सबब हे खर्च भागविल्यावर जेवढी शिल्लक उरेल तेवढीच प्रांतिक सरकारच्या ताब्यांत ठेवतां येणार आहे." या नवीन तत्त्वाचा अर्थ असा होतो कीं, मुख्य सरकारनें पाहिजे तसा खर्च करावा; तो पुरविण्याचा मक्ता प्रांतिक सरकारांनीं आपणांकडे घ्यावा; आणि तो निभवण्यास्तव लोकांवर हवे तेवढे कर बसवून त्यांस असंतुष्ट करण्याचें अपयश मुख्य सरकारकडे न जाऊं देतां आपल्याकडे घेण्यास तयार असावें ! या अनियंत्रित व अप्रशस्त व्यवस्थेचा अथवा अव्यवस्थेचा आरंभ झाला नाहीं तोंच प्रांतिक सरकारांवर खर्चाच्या जबरदस्त गोण्या पडूं लागून अत्युपयोगी खात्यांचा खर्च कमी करण्यास सुरुवात झाली आहे. दुर्दैवानें ही व्यवस्था कायम होईल तर पुढें काय काय प्रकार पहावे लागतील, त्यांची आज कल्पनासुद्धां करवत नाहीं ! राज्यविस्तार शक्तीबाहेर गेला, आणि उत्पन्नाचा बहुतेक भाग लष्करी खात्याकडे अडला जाऊन, न्याय, लोकशिक्षण वगैरे अत्यावश्यक कामांकडे दुर्लक्ष होऊं लागले म्हणजे राज्यास उतरती कळा

लागल्याची चिन्हें दिसूं लागलीं असें आजपर्यंतच्या इतिहासावरून सिद्ध झालें आहे. अलीकडे सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत लोकशिक्षणाविषयीं पराकाष्ठेची आस्था दाखविली जाऊन, त्याच्यासाठीं अधिक अधिक खर्च करण्याची प्रवृत्ति पडूं लागली आहे. कनिष्ठ प्रतीचें शिक्षण तर सर्वांस फुकटच मिळावें, म्हणजे त्याचा सारा खर्च सरकारी उत्पन्नांतून व्हावा, असा वाद चालू आहे, आणि तो करणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ज्या देशांतील बहुतेक लोकांस लिहितां वाचतां येत आहे, त्या देशांत त्यासंबंधाने अशा हालचाली सुरूं आहेत. आमच्या देशांत दाट अज्ञानतिमिर जिकडे तिकडे पसरलें आहे. काँग्रेस ही लोकांचीं प्रतिनिधिसभा नव्हे, असें प्रतिपादणाऱ्यांचा मुख्य मुद्दा असा आहे कीं, ज्या देशांतील शेंकडा पंचाण्णव लोकांस लिहितां वाचतां येत नाहीं, त्यांना काँग्रेससारख्या सभांचें महत्व समजण्याचा मुळींच संभव नाहीं; म्हणून लोकांत शिक्षणाचा बराच प्रसार होईतोंपर्यंत असल्या काँग्रेस पासून फायदा न होतां नुकसान होण्याचा संभव आहे. तसेंच प्रांतिक कौन्सिलांत व गव्हर्नर-जनरलच्या कौन्सिलांत लोकनियुक्त सभासद असूं नयेत, असें ज्यांचें म्हणणें आहे तेहि तसें न करण्यास लोकांचें अज्ञान हेंच कारण दाखवितात. असें असून गरीब बिचाऱ्या शाळाखात्याचा खर्च अविचारानें कमी करणें हें अगदी उचित नाहीं. या खात्याचा खर्च कमी करणें म्हणजे उत्पन्नाचा झरा बंद करण्यासारखें होय, याचा सरकारनें नीट विचार करावा. काटकसर करणें जरूर असेल तर ती दुसऱ्या खात्यांत करावी. ती शाळाखात्यांत केल्यानें लोकांचें आणि सरकारचें पुढें पराकाष्ठेचें नुकसान होणार आहे. यासंबंधाची ओरड थेट पार्लमेंटपर्यंत पोंचवून सरकारी उत्पन्नाचा विवक्षित भाग लोकशिक्षणाकडे अव्याहत लाविला जाईल, असें पार्लमेंटनें हिंदुस्थान सरकारकडून बंधन करून घेतलें पाहिजे.

देवता : : २

"व्याघ्रादि हिंस्र पशूंस देवतांची कल्पना आहे किंवा नाहीं हें सांगवत नाहीं. पण असलीच तर त्यांच्या देवता पर्वतांच्या गुहांत दिवसां पडून राहणाऱ्या, रात्री भक्ष्य मिळविण्यासाठीं गोठ्यांवर, मेंढवाड्यांवर, कळपांतून चुकून मागें राहिलेल्या व इकडे तिकडे भटकणाऱ्या गैरसावध हरणावर व गाई म्हशींवर हल्ला करणाऱ्या तीव्र दाढांच्या, प्रचंड सामर्थ्याचा व प्रखर-नखायुधाच्या स्वप्रतिमा असतील," असें एका ग्रीस देशांतील मूर्तिपूजेचा तिरस्कार करणाऱ्या ग्रीक तत्ववेत्याचें म्हणणें आहे. प्रस्तुत लेखांत या तत्त्ववेत्याप्रमाणें या देशांतील विचित्र मूर्तिपूजेवर टीका करण्याचा इरादा नाहीं. मनुष्यास देवतांच्या कल्पना प्रथम कशा सुचूं लागतात; पुढें त्यांची अभिवृद्धि कशी होत जाते; आणि अखेरीस त्यांचा लय कसा होतो, हें मात्र येथें सांगावयाचें आहे. ज्याप्रमाणें व्यक्तिमात्रास बाल्यावस्थेत कित्येक विलक्षण कल्पना खऱ्याशा भासत असून, पुढें जसा त्यांचा लोप होत जातो, त्याप्रमाणें मनुष्यजातीच्या बाल्यावस्थेत कित्येक विलक्षण कल्पनांचा उद्भव होऊन पुढें ज्याप्रमाणें तींत ज्ञान आणि अनुभव यांची वृद्धि होत जाते, त्याप्रमाणें त्या मागें पडत जाऊन त्यांच्या ठिकाणी शुद्धतर कल्पनांचा संभव होतो. तात्पर्य, मनुष्यांच्या विवक्षित स्थितींत त्याला विवक्षित कल्पना सुचल्या पाहिजेत, हें तत्त्वदृष्ट्या कबूल करणें भाग आहे. आणि म्हणून जे एका स्थितींतून पार पडून दुसऱ्या स्थितींत गेलें असतील, त्यांनीं आपल्या पाहिल्या स्थितींत असलेल्या व्यक्तीस मूढ म्हणणें किंवा त्यांच्या कल्पनांची विटंबना करणें बरोबर नाहीं. एखाद्या वाटोळ्या दगडास शेंदूर फासून त्यापुढें बकरी मारणें; किंवा संगमरवरी सुंदर मनुष्याकृति करून तिला पीतांबर नेसाविणें, दागिनें घालणें, पंचपक्वान्नांचे प्रतिदिवशीं नैवेद्य दाखाविणें व रात्रीं निजण्यासाठीं शय्या करून ठेवणें, अथवा ज्या मंदिरांत कोणत्याहि प्रकारचा प्रत्यक्ष प्रार्थनाविषय पुढें ठेवण्यांत येत नाहीं अशा मंदिरांत मांड्या घालून किंवा गुडघे टेंकून आणि डोळे मिटून साक्षात् किंवा परंपरेनें निर्विकार व निर्गूढ अशा परब्रह्माची उपासना व चिंतन करणें; अथवा कोणत्याहि मंदिरांत पाय न

ठेवतां घरच्या घरीं एकांत स्थानीं विचारमग्न होऊन, विश्वाचा अफाट पसारा आणि आपलें संकुचित बुद्धिसामर्थ्य ही पुढें उभीं राहणें आणि आपणास विश्वाच्या दृश्य स्वरूपापलीकडे कधींहि जातां येण्याचा संभव नाहीं, विश्वाचें आदिकरण कांहीं तरी अमलें पाहिजे अशी खात्री झाली तरी जोंपर्यंत ज्ञानप्राप्ती इंद्रियावलंबी आहे तोंपर्यंत त्यांच्या द्वारें जेवढें व जसलें ज्ञान मिळेल तेवढ्यांतच समाधान करून घेतलें पाहिजे; त्यापलीकडे भरारी मारणें, व मला जगदादिकारणाचें खरें ज्ञान झालें आहे, असें म्हणणें हा बुद्धीचा भ्रम किंवा आग्रह आहे असें वाटणें;:—हे सारें निरनिराळ्या स्थितींत मनुष्यांच्या हातून घडणारे धर्माचार आणि त्याला सुचणारे धर्मविचार आहेत. कोणतीहि लहान मोठी जड वस्तु, वनस्पति, प्राणी, किंवा निराकार देवता यापैकीं कोणाचेंहि पूजन मनुष्य करीत असला, तरीं त्याच्या सर्व प्रकारच्या पूजनांत एक गोष्ट साधारण असतें ती ही कीं, ज्या वस्तूची तो पूजा करीत असतो ती वस्तु निदान त्या वेळीं तरी त्यास आपणहून विशेष प्रबळ आणि आपलें हित किंवा अहित करण्यास समर्थ अशी आहे, असें तो मानीत असतो, यांत शंका नाहीं. कोणत्याहि वस्तूस देवता कल्पून तिचें पूजन करण्यांत, तिनें केलेल्या उपकारांबद्दल आभार प्रदर्शित करावे, असा एक हेतु असावा व अमुक अपकार करूं नये, अशासाठीं तिची प्रार्थना करावी, असा दुसरा हेतु असावा. याहून कोणत्याहि पूजकास आपल्या उपासनेचा आधारभूत तिसरा हेतु दाखवितां येईल असें वाटत नाहीं. सारांश, 'देवता' आणि 'पूजा' या शब्दाबरोबर एका बाजूस सामर्थ्याधिक्य आणि दुसऱ्या बाजूस बलहीनता; एका पक्षी मनोरथ परिपूर्ण करण्याची शक्ति आणि दुसऱ्या पक्षीं उपकार करून घेण्याचें आणि अपकार टाळण्याचें औत्सुक्य दिसून येतात. हा सिद्धांत ज्यांनीं यासंबंधानें विशेष विचार केला नसेल त्यांस सहसा मान्य होण्यासारखा नाहीं. तथापि तो खरा अशी खात्री पुढील विस्तृत विवेचनावरून झाल्याशिवाय राहणार नाहीं.

देवता अनेक प्रकारच्या आहेत. जळीं, काष्टी, व पाषाणी देवता भरल्या आहेत. जिवंत झाडांत व जनावरांच्या शरीरांत अनेक देवतांचा संचार होत आहे. सारांश, अशी कोणतीहि वस्तु नाहीं कीं जी देवता होऊं

शकणार नाहीं, किंवा जिला कोणीतरी देवता करून सोडलेलें नाहीं. सृष्टींतील सचेतन व अचेतन पदार्थांचे ठाईं प्रबल पुरुषांचे गुण कल्पून त्यांस देवता मानूं लागणें हा देवतोत्पत्तीचा एक प्रकार; व प्रबल पुरुषांसच जिवंतपणीं आणि मरणोत्तर देव कल्पून त्यांचें पूजार्चन करणें हा देवतोत्पत्तीचा दुसरा प्रकार. नद्या, पर्वत, ग्रह, तारे, धान्यें, हत्यारें वगैरेंचा पूजा; तसेंच बेल, वड, उंबर, तुळस यांची पूजा; पुनः गाय, बैल, साप, हनुमंत व गरुड यांची पूजा या देवोत्पत्तीच्या पहिल्या प्रकारांत येतात; राम, कृष्ण, गणपति, ज्ञानदेव, देव मामलेदार, अक्कलकोटचे स्वामी, यांच्या पूजा देवतोत्पत्तीच्या दुसऱ्या प्रकारांत येतात. या दोन देवतोत्पत्ती एकापाठिमागून एक होतात असा नियम नाहीं, त्या समकालीनहि असतात. त्यांत मुख्य भेद हा आहे कीं, पहिल्या प्रकारच्या देवतोत्पत्तींत मनुष्यांच्या गुणाचा आरोप मनुष्येत्तर वस्तूवर होत असतो; दुसऱ्या प्रकारच्या देवतोत्पत्तींत मनुष्यच देव बनून जातो ! प्रस्तुत निबंधांत मनुष्यास देव बनविण्याची प्रवृत्ति कशी पडते, हें सांगावयाचे आहे. हें सांगतांना हिंदुस्थानांतील लोकांशिवाय इतर लोकांचीं उदाहरणेंहि देण्यांत येणार आहेत. त्यांवरून असें दिसून येईल कीं, धर्मसंबंधानें आमच्या लोकांत जशा विचित्र कल्पना आहेत तशा इतर लोकांतहि आहेत; व ज्याप्रमाणें उत्तरोत्तर आमच्या धर्मकल्पना शुद्ध होत गेल्या त्याप्रमाणें इतरांच्याहि होत गेल्या व चालल्या आहेत.

प्रथम ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे, कीं मनुष्य आपल्या वन्यावस्थेंत किंवा प्रथमावस्थेंत बऱ्याच अंशीं अप्रबुद्ध पशुसारखा असतो. ज्याप्रमाणें परिचयांत नसलेली एखादी विलक्षण वस्तु या पशूंनीं पाहिली म्हणजे ते बुजतात, आणि घाबरून जातात, त्याप्रमाणेंच असाधारण वस्तूच्या दर्शनानें वन्य मनुष्याची स्थिति होते. त्याला ती वस्तु अमानुष किंवा दैविक वाटूं लागते. रानटी लोक आपल्याहून बुद्धीनें चातुर्यानें व बलानें श्रेष्ट अशा मनुष्यासच देव म्हणतात असें नाहीं; अपरिचित पण विलक्षण निर्जीव वस्तूसहि देव मानणें, ही त्यांच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति असते. उत्तर अमेरिकेंतील इंडियन लोकांनीं कांहीं विलक्षण वस्तु किंवा पुरुष पाहिला, कीं तिला किंवा त्याला ते देव किंवा पिशाच्च म्हणतात ! बेचुआना जातीच्या

लोकांनीं जहाज कधीं पाहिलें नसल्यामुळें, जेव्हां त्यापैकीं दोघांस कांहीं इंग्रजांनीं आपल्या गलबतावर नेलें, तेव्हां ते आश्चर्यानें थक्क होऊन असें म्हणूं लागले कीं "ही वस्तु मनुष्यकृत नसावी, ही स्वयंभू असावी, ही खचित देव आहे!" रानटी लोकांत 'देव' ही संज्ञा त्यांस न समजणाऱ्या वस्तूस, व ज्या पुरुषाच्या शक्तीचा त्यांस तर्क होऊं शकत नाहीं अशा पुरुषास, लावण्यांत येतें. **फिजियन** लोकांचा आणि **युरोपियन** लोकांचा प्रथम समागम झाला तेव्हां **फिजियन** लोक छापण्याच्या यंत्रांस आणि तीं चालविणाऱ्या युरोपियन लोकांस देव म्हणूं लागले! राजाला देव म्हणणें हा प्रघात सर्वत्र अवगत आहेच. **शिवाजी** शिवावतार होता, असें मानणारे गृहस्थ आपणांस या क्षणीं पाहिजे तितके सांपडतील! **मालगासकी** लोकांस जी नवीन व उपयोगी गोष्ट दिसेल तींस ते देव म्हणतात. रेशीम, तांदूळ, नाणीं, गडगडाट, वीज, भूकंप हे सारे त्यांचे देव होत! पूर्वज व नुकताच मेलेला राजा हेहि त्याच कोटींत येतात! पोथ्यांला नमस्कार घालण्याचा मक्ता आमच्याकडेच आहे असें नाहीं; हे लोकहि पुस्तकांस देवाप्रमाणें भजतात! मंखमलीस हे लोक ईशतनय मानतात! याप्रमाणें असाधारण वस्तूस व मनुष्यास देव मानणाऱ्या लोकांचीं अनेक उदाहरणें देतां येतील, पण तसें करण्यास येथें जागा नाहीं. ज्यांना तीं हवीं असतील त्यांनीं प्रसिद्ध इंग्लिश तत्त्ववेत्ता जो हर्बर्ट स्पेन्सर त्याचा **प्रिंसिपल्स ऑफ सोशिऑलजी** नामक ग्रंथ पहावा. या तत्त्ववेत्त्याच्या इतर ग्रंथाप्रमाणें हा ग्रंथही विद्वत्तेची आणि विचाराची अनुपम खाण आहे, व सुधारकाच्या द्वारें त्याची ओळख आमच्या लोकांस करून द्यावी, असा आमचा मानस आहे. प्रस्तुत निबंध वरील ग्रंथाच्या एका अध्यायाच्या आधारानें लिहिण्यास आरंभ केला आहे.

असो; वर जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून काय दिसून येईल कीं, रानटी लोक आपल्याहून श्रेष्ठ असा मनुष्य दिसला कीं त्याला देव म्हणूं लागतात. हें श्रेष्ठत्व अगदीं स्वल्प असलें तरी चालतें. **तोडा** जातीच्या लोकांत बहुधा गवळ्यांकडे उपाध्यायत्व किंवा धर्माधिकारित्व असतें; तेव्हां अर्थातच ते आपणांस देव समजतात. जर यापैकीं एखाद्या पवित्र गवळ्यास कोणी असें विचारील कीं, "काहो, उपाध्यायबुवा, तुम्हीं सूर्याची पूजा

करीत असतां काय ? " तर त्यावर तो छातीला हात लावून असें उत्तर देईल कीं, " अस्मादिक त्या सूर्याची पूजा कशासाठीं करतील ? इतर गरीब लोकांनीं पाहिजे तर ती करावी. सूर्यासारखेंच आम्ही देव आहोंत; व सूर्याप्रमाणें इतरांनीं आमची पूजा केली पाहिजे ! " तेव्हां ' ब्राम्हणं कुलदैवतं ' या सूत्रांत ब्राम्हणांच्या जागीं ' दोहक ' असा शब्द घातल्यास, तें सूत्र तोडा लोकांस अत्यंत स्वीकरणीय होईल असें वाटतें. मध्य अमेरिकेंतील टाआटिक प्रांतातल्या इंडियन लोकांविषयीं **मॉटगोमरी** असें लिहितो कीं, हे लोक आपल्या देव मानलेल्या वृद्ध मनुष्यावर एका तऱ्हेचा पोषाख चढवून त्याची एका खोपट्यांत स्थापना करतात, व त्या ठिकाणीं जाऊन ते त्याची पूजा करतात; आपापल्या शेतांतील फळ वगैरे नैवेद्य म्हणून त्याला अर्पितात आणि त्याच्यासमोर आपल्या पूर्व संप्रदायाप्रमाणें एका प्रकारचें धर्मविधी करतात !

यावरून काय झालें कीं अज्ञानावस्थेंत मनुष्यास आपल्यापेक्षां किंचित् श्रेष्ठ अशा व्यक्तिविषयीं येवढी भीति उत्पन्न होऊन त्याची पूजा आरंभावी असें वाटूं लागलें तर तो मेला असतां त्याचें पिशाच अधिक भीतिप्रद वाटून त्याला देऊळ बांधावें; प्रति दिवशीं, प्रति मासी, किंवा प्रति वर्षी त्याला देणें द्यावें आणि जेणेंकरून त्याची मर्जी आपणांवर सुप्रसन्न राहिल अशा प्रकारचें उपाय करावें असें वाटणें, हें किती साहजिक आहे बरें ? आपणांमध्यें जो प्रचंड श्राद्धविधी माजला आहे त्याचें सर्व बीज या वृत्तींतच आहे. गतासु झालेल्या आप्तांच्या पिशाचांनीं आपणांवर कुपित न होतां, आपली कृपादृष्टि सदैव चालूं ठेवावी, आणि पोरांबाळांस त्रास देऊं नये, हें सारें श्राद्धविधीच्या आणि पितृतर्पणाच्या बऱ्याच भागाचें गुह्य आहे. तेव्हां आजच्या निबंधांपासून ही गोष्ट लक्षांत ठेवावयाची कीं, देवतात्वाचें पहिलें पितृकत्व श्रेष्ठ मनुष्याकडे येतें; म्हणजे श्रेष्ठ मनुष्य देवता बनतो.

देवतोत्पत्ति : : ३

तेविसाव्या अंकांत प्रबल मनुष्य हयातींत असतां व मरणोत्तर देवतात्वाप्रत कसा पावतो, हें दाखविलें आहे. आज सामान्य प्रबल मनुष्याशिवाय दुसऱ्या कोणत्या प्रकारचे पुरुष जिवंत असतां व मेल्यावर देवाप्रमाणें गणलें जातात, हें दाखवावयाचें आहे.

हा किंवा अशा प्रकारचें दुसरे लेख वाचतांना वाचकांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, आजमित्तीस सुधारलेल्या राष्ट्रांतील अत्यंत बुद्धिवान् व सुशिक्षित मनुष्यांमध्यें परमेश्वरविषयीं जी कल्पना दृढ होऊन बसली आहे ती मनुष्यांच्या सर्व प्रकारच्या स्थितींत त्यांना असतें, किंवा होती, असें सिद्ध करून देण्यास पुरावा नाहीं. उलट ही कल्पना हळूं हळूं अस्तित्वांत आली आहे, असें दाखविण्यास पुष्कळ प्रमाणें आहेत. जो अनादि, जो अनंत, जो सृष्टीचें आदिकरण, जो सर्वगामी व सर्वज्ञ, जो निर्गुण व निराकार, ज्याच्या इच्छामात्रेकरून कोट्यावधि ब्राम्हांडें उत्पन्न होतात आणि लयास जातात; जो सर्व सूक्ष्म वस्तूंहून सूक्ष्म व स्थूल वस्तूंहून स्थूल जो अग्नीनें दग्ध होत नाहीं, शस्त्रानें तुटत नाहीं, वायूनें शोषत नाहीं आणि बुद्धीस ज्याचें खरें स्वरूप गम्य होण्याचा संभव नाहीं-अशा एका सृष्टिचालक जगदात्म्याची कल्पना मनुष्यास फार काळानें व पुष्कळ विचारानंतर प्राप्त झाली आहे. व अजूनहि ज्या देशांत व ज्या लोकांत जगदादिकारणाचें अशा प्रकारचें स्वरूप ग्राह्य झालें आहे, त्या देशांत व त्या लोकांतहि अशा देवास देवाधिदेव किंवा अशा ईशास परमेश मानण्याचा प्रघात आहे. तात्पर्य काय कीं, जे आपणास एकेश्वरवादी म्हणवितात त्यांच्या मनांतून सुद्धां अनेक देवतांची कल्पना अद्यापि समूळ नाहींशी झालेली नाहीं. विचारदृष्ट्या ज्यांना अशा प्रकारचें एकेश्वरी मत पसंत झालें आहे, पण देशांतील अनेक देवतांवरील ज्यांचा भरंवसा उडालेला नाहीं, व मूर्तिपूजेचें वैरूप्य ज्यांच्या मनांत पूर्णपणें बिंबलेलें नाहीं, ते असें म्हणतात कीं, ज्या अनेक देवतांचें सामान्य लोक पूजार्चन व उपासना करतात त्या देवता मुख्य देवाच्या किंवा परमेश्वराच्या विभूति किंवा अंश होत. ज्याप्रमाणें नद्यांचें

उदक परंपरेनें समुद्रास जाऊन मिळतें, त्याप्रमाणें या अनेक देवतांची उपासना मुख्य देवाप्रत जाऊन पोहोंचते—किंबहुना चंचल मनास स्थैर्य उत्पन्न करण्यासाठीं निर्गुण परमेश्वराचीं हीं सगुण रूपें कल्पून त्यांची आराधना करण्याचा प्रघात पडला आहे. ही व्यवस्था मूढ जनासाठीं आहे. पण ज्या अर्थी तींत दूषणीय असे कांहीं नाहीं, त्या अर्थी विद्वानांनीं सुद्धां तिचें अवलंबन करण्यास कांहीं हरकत नाहीं. त्यांनीं तसें न केलें तरी चालणार आहे; कारण खऱ्या ईशस्वरूपाचें ज्ञान त्यांना झालेलें असतें. पण तसें असलें तरी मूर्तिपूजेनें त्यांस कोणत्याहि प्रकारचा कमीपणा येतो असें नाहीं. बुद्धि प्रसन्न असेल तेव्हां निर्गुण परमेश्वराची आराधना करावी; कोणत्याहि कारणानें ती व्यग्र झाली असेल तेव्हां, किंवा सामान्य लोकांस उदाहरण घालून द्यावयाचें असेल तेव्हां, निर्गुण परमेश्वराची एखादी सगुण मूर्ती पुढें ठेवून तिची उपासना करावी. या प्रकारें विद्वानांनीं द्विप्रकारक उपासनाक्रम ठेविला असतां अविद्वानांस चांगलें वळण लागत राहून विद्वानांची धर्मश्रद्धाहि क्षीण होण्याचा संभव राहणार नाहीं. अशा प्रकारचें मूर्तिपूजेचें मंडन अनेकांस नापसंत होऊन, त्यांनीं थेट निराकार परमेश्वराशिवाय दुसऱ्या कोणासहि भजावयाचें नाहीं, व अन्य देवतांच्या अंगी देवतात्व मानायाचें नाहीं असा निर्धार करून तदनुरूप धर्मस्थापना करण्याचा यत्न केला आहे, पण अद्यापि तो कोणत्याहि देशांत पूर्णपणें तडीस गेलेला नाहीं, असें मानण्यास अनेक आधार आहेत. ख्रिस्ती धर्मांत, मुसलमानी धर्मांत, बौद्ध धर्मांत, सारांश एकेश्वरीपर्यंत जाऊन धडकलेल्या कोणत्याहि प्राचीन किंवा अर्वाचीन लोकांच्या धर्मांत कशा तरी प्रकारची मूर्तिपूजा अद्यापि थोडीबहुत तरी दृष्टीस पडतें! तात्पर्य काय कीं, पुष्कळांचा विचार जरी निराकार परमेश्वरापर्यंत जाऊन पोहोंचला आहे, तरी तो अद्यापि हवा तितका दृढ झाला नसल्यामुळें, त्यांच्या धर्माचारांतून मूर्तिपूजा पुरतेपणीं निघत नाहीं! यावरून काय सिद्ध होतें कीं, मनुष्यास, साकार देवाची कल्पना आधीं सूचते, आणि निराकार देवाचा कल्पना मागून येतें; अगोदर पुष्कळ देवतांवर विश्वास असतो; पुढें तो एकीवर गोळा होतो, प्रथम जड पूजाद्रव्यांनींच देवता प्रसन्न करून घेतां येतील असें वाटत

असतें; पुढें मानसिक पूजा पुरे आहे असें वाटूं लागतें. सारांश, अनेकत्वानंतर एकत्वाची, स्थूलानंतर सूक्ष्माची, जडानंतर चिद्रूपाची, साकारानंतर निराकाराची, इंद्रियगोचरानंतर अतींद्रियज्ञानाची, व्यक्तानंतर अव्यक्ताची, व गम्यानंतर अगम्याची कल्पना, मनुष्याच्या अधिकाधिक विकास पावत जाणाऱ्या बुद्धीस येणें, हेंच अत्यंत स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणें लहानमोठ्या भोंकांच्या चाळणी घेऊन धान्य पुनः पुन्हां चाळलें असतां, अगदीं निवडक दाणे मात्र शेवटच्या चाळणींत राहतात; किंवा सोन्यारुप्याची अगदीं बारीक तार काढावयाची असली तर ती एकाहून एक लहान अशा भोंकांतून निघते. त्याप्रमाणें मनुष्याच्या विचाररूप चाळणींत तेहतीस कोटि देव आणि त्यांविषयीं अगणित कल्पना हजारों वर्षें चाळण्यास घातल्या असल्यामुळें त्याचा अखेर परिणाम असा झाला आहे कीं, तेहतीस कोटि देवता आणि त्या संख्येच्या वर्गाइतक्या त्यांविषयीं कल्पना यांपैकीं फक्त एकीशिवाय बाकीच्या साऱ्या चाळांत सांपडून गेल्या आहेत ! ज्या एकीची अशी दुर्दशा झाली नाहीं ती निर्गुणनिराकारादि विशेषणांनीं वर वर्णिलेली परमेश्वराची कल्पना होय. विचारवृद्धीबरोबर मनुष्यांच्या धर्मकल्पना जशा बदलत जातात तशा त्यांच्या अन्यविषयक कल्पनाहि फिरत जातात. पदार्थविज्ञान, रसायन, वैद्यक, वनस्पतिशारीरक, प्राणिशारीरक, न्याय वगैरे सर्व शास्त्रांत असेच फेरफार होत गेले आहेत. मनुष्यांची विचारशक्ति विशेष विकास पावलेली नसते तोंपर्यंत त्यांस कार्यकारणांचा बिनचूक निश्चय करतां येत नाहीं. कोणत्याहि दोन संलग्न किंवा पूर्वोत्तर गोष्टींपैकीं पहिलीस दुसरीचें कारण आणि दुसरीस पहिलीचें कार्य, असें मानण्याची त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति असते. पालींचें कुचकुचणें, घुबडाचें रडणें, मांजरांचें आडवें येणें, विधवांचें दर्शन होणें, ताऱ्यांचें पडणें, चंद्राभोंवती खळे होणें, इंद्रधनुष्य दिसणें वगैरे गोष्टींचें अनिष्टत्व, आणि स्वप्नांत साप दिसणें, सवत्स स्त्री किंवा गाय समोर येणें, भारद्वाजाचें दर्शन होणें, व्यक्तिभेदाप्रमाणें उजवा किंवा डावा डोळा लवणें, कोणाचें आकस्मिक येणें आणि त्याच वेळीं येणाऱ्याचें नांव निघत असणें वगैरे गोष्टींचें इष्टत्व–हीं भोंठ्या विचारानें स्थापित झाली आहेत, असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. तथापि सर्व ठिकाणच्या अज्ञान

लोकांत अशा प्रकारचें चांगलेवाईट ग्रह विशेष स्थितींत होत असतात, आणि अनेक वर्षें त्यांचा अंमल चालत असतो, अशा प्रकारचे खोटे कार्यकारण-संबंध नाहींसे होऊन त्यांच्या जागी खरे संबंध स्थापित होणें हें ज्ञानवृद्धीचें फल होय. न्यूटननें यच्चयावत् परमाणूंस लागणारा गुरुत्वाकर्षणाचा धर्म स्थापित केल्याबरोबर सर्व ज्योतिःशास्त्रावर एकदम उजेड पडल्यासारखा झाला. घन, द्रव, आणि वायु या तीन स्थिति प्रत्येक जड पदार्थास भार आणि शीतोष्ण यांच्या साहाय्यानें आणितां येणार आहेत, येवढा सिद्धांत प्रस्थापित झाल्यापासून पदार्थविज्ञानांत केवढी क्रांति झाली आहे! रसशोषक असे एक प्रकारचें अत्यंत सूक्ष्म कोष प्रत्येक वनस्पतीचें व प्राण्याचें आद्य घटक आहेत, असें दिसून आल्यापासून वनस्पतिशारीरकांत व प्राणिशारीरकांत केवढा फेरफार झाला आहे! आपल्या जुन्या वैद्यांनीं सर्व रोगांची कारणें त्रिदोषांपासून उत्पन्न होतात, असें सिद्ध करण्याचा केलेला प्रयत्नहि अशा प्रकारचाच होता. या सर्व उदाहरणांवरून काय दिसतें कीं, प्रत्येक शास्त्रांत कारणें निश्चित करून त्यांची संख्या होईल तितकी कमी करावी, व त्यांपासून पुढील सर्व कार्यें ठरीव नियमांप्रमाणें घडून येतात, असें स्थापित करावें अशा व्यासंगांत मनुष्याची बुद्धि आज हजारो वर्षें गढून गेली आहे; आणि या परिश्रमाचें फळ जसें इतर विषयांत तसें धर्मविषयांतहि तिला आलें आहे. ज्याप्रमाणें अलीकडे जड सृष्टीच्या शास्त्रीय विचारांत गुरुत्वाकर्षण ठाम होऊन गेले आहे, त्याप्रमाणें धर्मविचारांत सर्वशक्तिमान व सर्वज्ञ अशा एका परमेश्वराची कल्पना दृढ होऊन गेली आहे किंवा जात आहे.

यावरून असें दिसून येईल कीं, अनादि कालापासून मनुष्यमात्रास अशा प्रकारच्या ईशशक्तीचें यथार्थ ज्ञान आहे, असें जें अनेक श्रद्धाळूंचें फार जुनें व आग्रहाचें म्हणणें आहे तें साधार नाहीं. मनुष्यांनीं निरानिराळ्या स्थितींत अनेक प्रकारच्या देवतांवर भरंवसा ठेविला आहे, आणि सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् परमेश्वराची जी कल्पना त्यांनीं केली आहे, ती अखेरची आहे. ही कल्पना त्यांच्या मनांत येण्यापूर्वी ज्या अनेक देवतांस ते भजत होते त्यांपैकीं कांहींची कल्पना त्यांना पराक्रमी पुरुषांपासून करतां आली. या पराक्रमी पुरुषांत पूर्वकाली राजेलोक विशेष पराक्रमी असत. रानटी लोकांचे धुरीणत्व

किंवा नृपतित्व ज्याच्या अंगी असाधारण धैर्य, निश्चय, चातुर्य व कष्टालुत्व असतें त्यासच प्राप्त होऊं शकतें. यामुळें व एकदां राज्यपद प्राप्त होऊन बरीच सत्ता हातीं आल्यामुळें, अशा स्थितींतला राजा इतरांपेक्षां हरएक गुणांनीं फारच मोठा दिसूं लागतों. असें होऊन एकदां एका पक्षांस प्रतिष्ठा मिरविण्याची, आणि दुसऱ्या पक्षांस लीनतेनें वागण्याची खोड लागली म्हणजे पहिला पक्ष कोणत्या गुणांस हक्क सांगेल, व दुसरा कोणत्या प्रकारच्या दास्याचरणास तयार होईल, हें सांगतां येणार नाहीं. अज्ञान, अविचारी, व भेकड लोकांनीं राजास मातापितरांहून अधिक मान द्यावा यांत कांहिंच नवल नाहीं. आजमितीस युरोपांतील सुधारलेल्या कांहीं देशांत असा प्रकार घडत आहे. राजास मातापितराइतका मान देणें हें अज्ञान लोकांच्या राजानिष्टेचें अगदीं पहिलें कलम होय ! यापुढें त्यांची मजल फार जाते. अज्ञान लोक आणि स्वार्थसाधू स्तुतिपाठक राजासारख्या अद्वितीय व्यक्तीची स्तुति करूं लागले म्हणजे कोठपर्यंत जातील, हें सहसा सांगतां येणार नाहीं. हे लोक राजास देवाचा अंश, देवाचा मुलगा, देवाचा लाडका आप्त, देवाचा पिता, आणि साक्षात् देव करून टाकतात ! राजा पाऊस पाडतो, राजा विजा चमकवितो, राजा समुद्र अटवितो, राजा चंद्रसूर्यास ग्रहण लावतो, राजा रोगांच्या साथी आणतो आणि त्या नाहींशा करतो; राजा सांगेल ते केलें पाहिजे व मागेल तें दिलें पाहिजे; राजाबरोबर सती जाणें यातच जीवनसाफल्य व परमार्थसाधन आहे; राजासाठीं आत्महत्या करून घेतली असतां देवयोनि प्राप्त होऊन स्वर्गलोकी देवसमुदायांत देवांगनाबरोबर निरंतर विवाह करतां येतो, व अमृतसेवनानें अमरत्व संपादितां येतें–अशा प्रकारच्या विलक्षण कल्पना अल्प काळांत रूढ होऊन जातात ! जिवंतपणीं राजास नवस करूं लागतात; त्यांच्या दर्शनास येऊं लागत; रोग दूर होण्यासाठीं त्याच्या पादांघ्रिस्पर्शाविषयीं आतुर होतात; त्याला कौल लावतात; त्याला देवऋषि समजतात; आणि त्याचें स्नानोदक तीर्थ समजून शुद्ध होण्यासाठीं तें प्राशन करण्याविषयीं उत्कंठ होतात ! जिवंत राजाविषयीं अशा कल्पना झाल्या असल्या, आणि त्यांतल्या त्यांत तो बराच पराक्रमी असला म्हणजे

मग तो मेल्यावर त्याला किती भ्यावें, त्याविषयीं आपली दृढ निष्ठा प्रदर्शित करण्याबद्दल काय करावें, आणि त्याला किती भजावें, असें मुग्ध लोकांस होऊन जातें ! त्यांच्या समजुतीप्रमाणें जो जिवंतपणीं देव असतो, तो मरणोत्तर महादेव होतो ! मग काय विचारतां ? जिवंत राजापेक्षां मेलेल्या राजाची विशेष आराधना करण्याचा प्रघात पडूं लागतो ! वरिष्ठ योनीप्रत पावलेल्या राजांचीं देवळें बांधलींच पाहिजेत; प्रत्येक दिवशीं त्यांची पूजा करून त्यांस नैवेद्य अर्पण केलेच पाहिजेत; कोणतेंहि महत्कृत्य करणें झालें कीं त्यांचें स्मरण केलेंच पाहिजे; विवाहादि मंगलकार्यें निर्विघ्नपणें तडीस जाण्यासाठीं त्यांची प्रार्थना करून त्यांस खुष राखण्यासाठीं आपल्या समजुतीप्रमाणें मनुष्याचे, जनावराचे, शिजविलेल्या अन्नाचे, किंवा कोरड्या धान्याचे आणि नारळाचे तरी बळी दिलेच पाहिजेत-सारांश, कोणतेंहि महत्कृत्य करावयाचें झालें तरी अशा रीतीनें अस्तित्वांत आलेल्या देवांचें साहाय्य मागितल्याशिवाय व त्यांची प्रार्थना केल्याशिवाय तें करूं लागण्याचा संभव नाहींसा होतो ! पुढें जो जो श्रद्धा अधिकाधिक होत जाते तों तों बारिक सारिक गोष्टींतहि देवाचे स्मरण व चिंतन करण्याचा प्रघात पडूं लागतो. निजतांना, उठतांना, बसतांना, जेवतांना, ढेकर आला असतां, शिंक आली असतां, जांभई आली असतां, पागोटें पडलें तर, कांस सुटली तर, ठेंच लागली तर, मुलें उपजल्यावर, स्त्रिया उपवर झाल्यावर, लग्न किंवा थोर पुरुष अथवा स्त्री मेल्यावर, शेताची कापणी करणें झाल्यास, मुलास पाटीवर बसविणें झाल्यास, घरांतून बाहेर पडावयाचें असल्यास सारांश, कांहींहि झालें असतां किंवा करावयाचें असतां खऱ्या भाविकाला देवास नमस्कार करून त्याची कृपा संपादिल्याखेरीज पाऊल टाकण्याची सोय नाहींशी होते ! अशा प्रकारच्या देवांच्या प्रकृतींत आणि मनुष्याच्या प्रकृतींत म्हणण्यासारखें अंतर नसतें ! देवांस सुख दुःख होत असतें, कामक्रोधादि वासनांचा मनुष्याप्रमाणें त्यांचे ठाईंहि वास असतो. मनुष्याप्रमाणें तेहि युद्धें करतात, स्त्रीसक्त असतात, विश्वासघात करतात, खून करतात, ऐषआराम भोगतात, सोमरस पितात, लुगडीं नेसतात, नथा घालतात; दुखणेकरी होतात, वैद्यांचे घरीं जातात आणि काढे घेतात; त्यांना जखमा लागतात; आणि अमर असून कधीं कधीं

ते मरतात, किंवा निजधामास जातात ! त्यांपैकीं कांहीं उदार, कांहीं परोपकारी, कांहीं दांडगे, कांहीं करूर, कांहीं खोडकर, कांहीं 'शिनळ', कांहीं एकस्त्री-व्रत, कांहीं बहुपत्नीक, कांहीं दासीपुत्र आणि कांहीं कोष्टी, सोनार, सुतार, शिल्पि, चितारी, गवयी, झाडू, मोतद्दार, गाडीवान व बागवान असतात ! सारांश, ज्याप्रमाणें या मर्त्य लोकांत त्याप्रमाणें देवलोकांत थाट आहे ! कांहीं कमी नाहीं ! आणि कां कमी असेल ? या आमच्या पृथ्वीवरचे प्रबल पुरुष, राजे, वैद्य, सुवर्णकार, चित्रकार, शिल्पज्ञ, विद्वान, योद्धे, भविष्यज्ञ, हेच मरणोत्तर देव होऊन जात असल्यामुळें त्यांनीं आपला ऐहिक स्वभाव किंवा प्रकृति सर्वथैव टाकावी हें कांहीं संभवत नाहीं; किंवा तसें करणेंहि शक्य असलें तरी ज्या आम्हीं अत्रस्थ मर्त्यांनीं त्यांच्या आयुष्यक्रमाची कल्पना करावयाची त्या आम्हीं आमच्या इंद्रियांचे व मनाचे जे धर्म आहेत त्यांच्या बाहेर कसें जावें ? आमच्या देवांच्या आणि महादेवांच्या कल्पना, आमचे आचार, आमचे विकार, आणि आमचे विचार यांवरच अवलंबून असल्या पाहिजेत. कल्पनातुरगीवर आरोहण करून तिला कितीहि भरधांव सोडिली तरी अंत-बाह्येंद्रियविषयांस सोडून ती कोठें जाणार ? ज्ञानेंद्रियांनीं व कर्मेंद्रियांनीं ज्या विषयांचे ज्ञान होतें त्याविषयांपैकीं लहानास थोर करणें, तुटलेल्यास जोडणें, दूरांस जवळ करणें, कुरूपांस सुरूप व सुरूपांस कुरूप करणें, सचेत-नांचा व अचेतनांचा अन्योन्यांशीं किंवा ज्यांचा त्यांच्याशीं मिलाप करून नवीन तिरस्करणीय किंवा रमणीय सृष्टि निर्माण करणें हें काय तें कल्पनेचें काम होय. कल्पना झाली तरी फक्त इंद्रियांच्याच द्वारें ज्या विषयाचें ज्ञान होत असतें त्यांच्या बाहेर जाऊं शकत नाहीं. तिनें पाहिजे तेवढी घडामोड करावी; पण नवीन विषय उत्पन्न करणें हे तिचें काम नव्हें. सारांश, धार्मिक लोक पाहिजे तें म्हणोत, आमच्या देवता येथील प्रबल पुरुशांच्या, राजांच्या, वैद्यां-कारागिरांच्या, किंवा योद्धयांच्या कल्पनेनें काढलेल्या मुळाहून कदाचित् कांहींशा श्रेष्ठ अशा प्रतिमा आहेत, व अशा प्रतिमा काढण्याची संवय तिला लागण्यास मनुष्यातील स्वकुलांतील पूर्वजपूजेचा प्रघात कारण झाला आहे, असें कबूल करणें भाग आहे. आणि म्हणून सर्व धर्मकल्पनांच्या आणि

देवतांच्या स्थूलमानानें मुळास पूर्वपूजा आहे, असें म्हटल्याशिवाय कोणाहि विचारी पुरुषास राहवणार नाहीं.

अथ आचारप्रकरणं : : ४

पूर्ण एकांताशिवाय स्वेच्छाचार नाहीं. दोन मनुष्य एकत्र आले कीं एकानें दुसऱ्याशीं कसें वागावें, असा प्रश्न उत्पन्न होतो; आणि त्या दोहोंत ज्या प्रकारचा संबंध असेल तदनुसार त्यांचें एकमेकांशीं वर्तन होतें. पण कसेंहि झालें तरी मनुष्य एकटा असतां तो ज्याप्रमाणें वागूं शकेल त्याप्रमाणें त्याला दुसऱ्यासमक्ष कधींहि वागतां येत नाहीं. दुसऱ्याच्या सान्निध्यामुळें स्ववर्तनांत जो भेद करावा लागतो, त्यास येथें सामान्यपणें आचार किंवा आचारपद्धति म्हटलें तरी चालेल. समाजांत अनेक प्रकारच्या व्यक्तींशीं व्यवहार करावयाचा असल्यामुळें, या आचारपद्धतीस विलक्षण प्रकारचें बहुविधत्व आलें आहे. राजाप्रजा, पतिपत्नी, बाहिणभाऊ, स्वामिसेवक, गुरुशिष्य, अग्रणी-अनुयायी, ग्राहकविक्रेता, श्रेष्ठकनिष्ठ–असे समाजघटकांत अनेक प्रकारचें संबंध असतात आणि या संबंधानुरोधानें स्थापित झालेल्या आचारनियमांप्रमाणें आजपर्यंत एकाचें दुसऱ्याशीं वर्तन होत आलें आहे. हे आचारनियम केवळ चिरस्थाई असतात असें नाहीं. देशकालाप्रमाणें त्यांत फेरफार होत जातात. तथापि ते कशातरी प्रकारचें असल्याखेरीज कोणताहि समाज चालावयाचा नाहीं. समाज म्हणजे एकाहून अधिक व्यक्तींचा समुदाय. असा समुदाय चालू राहाण्यास्तव त्याच्या घटकांचें अन्योन्यांशीं जें वर्तन व्हावयाचें त्याचे कसलें तरी नियम असलेच पाहिजेत. अशा नियमांशिवाय समाजाची कल्पनाच अशक्य आहे. हें म्हणणें केवळ मनुष्यसमुदायासच लागूं आहे असें नाहीं. मनुष्याहून बुद्धीनें, शरीरानें व सामर्थ्यानें बऱ्याच अंशीं कमी अशा समाज करून राहणाऱ्या चतुष्पादांत, पक्ष्यांत व सूक्ष्म कीटकांत सुद्धां हे आचार नियम दिसन येतात. श्रेष्ठाला वचकणें, बरोबरीच्याशीं सामना करणें, कनिष्ठावर चालून

जाणें, आवडत्याला कुरवाळणें, संकटावस्थेंत शरण जाणें, व कोणी उपकार केला असतां कृतज्ञता प्रदर्शित करणें-हे आचाराचे प्रकार खालच्या प्रतीच्या प्राण्यांत सुद्धां कर्माधिक प्रमाणानें सांपडतात हें सर्वांस ठाऊक असेलच. तेव्हां ते मनुष्यसमाजांत सांपडतात, यांत कांहीं नवल नाहीं. ज्याप्रमाणें कसल्यातरी दोऱ्याशिवाय निरनिराळे मणि एकत्र होऊन माळ व्हावयाची नाहीं, त्याप्रमाणें कसल्यातरी समाजबंधनाशिवाय समाज चालावयाचा नाहीं. कशा तरी प्रकारचीं समाजाचारबंधनें स्थापित झाल्यानंतर, त्यांपासून समाजास विशेष वळण लागणारी धर्मबंधनें व राज्यबंधनें उत्पन्न होतात, व या तिहींनीं मिळून समाजास पुष्कळच बळकटी येते; पण धर्मबंधनाशिवाय किंवा राज्यबंधनाशिवाय वेडावांकडा समाज अस्तित्वांत यावयाचा नाहीं असें नाहीं. आफ्रिका, अमेरिका व आस्ट्रेलिया यांच्या कांहीं भागांत असे समाज पाहण्यांत आले आहेत कीं, त्यांत सामान्य आचारबंधनाशिवाय समाजघटकांस एकत्र राखण्यांस दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचीं बंधनें नाहींत. जुन्या राष्ट्रांत रहाणाऱ्या आम्हां जुन्या लोकांची अशी समजूत आहे कीं, सामाजिक, धार्मिक, व राजकीय या तीन प्रकारच्या बंधनाशिवाय समाजघटना होऊं शकणारच नाहीं. पण ही आमची चूक आहे. ज्यांना कोणत्याहि प्रकारचें धर्माचार आणि राज्याचार बिलकुल ठाऊक नाहींत. असे या क्षणीं पृथ्वीच्या पाठीवर पुष्कळ रानटी लोक आहेत. पण हें मात्र खरें आहे कीं, ज्या समाजांत धर्मबंधनें व राज्यबंधनें दिसूं लागलीं आहेत, त्या समाजांत आचारबंधनें दिसत नाहींत, असें मात्र कधींहि होत नाहीं. 'यत्र यत्र धूमः तत्र तत्र वह्निः' या न्यायाप्रमाणें जेथें धर्म व राज्य दृष्टीस पडतात, त्या ठिकाणीं सामाजिक आचारपद्धति स्थापीत झाली असेल तेथें धर्म आणि राज्य ह्या संस्था अस्तित्वांत आल्या असल्याच पाहिजेत असें म्हणतां येणार नाहीं. मुलाशिवाय आईबापें असतील, पण जनकजननीशिवाय संतानोत्पत्तीचा संभव नाहीं. धर्माचार आणि राज्याचार यांची सामान्य आचारांपासून उत्पत्ति होते, आणि ज्याप्रमाणें सृष्ट्यनुक्रमानुरोधानें प्राण्यांच्या जाती होत असतां, ज्यांच्या शरिरांत पृष्ठवंशास्थि (पाठीचा कणा) अस्तित्वांत आणण्यासारखे पदार्थ असतात त्यांत कसलीहि रूपें येत गेलीं तरी त्यांत पाठीचा कणा हा दृष्टीस पडावयाचाच असें-मासे, साप,

पांखरे, व गाई म्हशी वगैरे प्राण्यांच्या शरीररचनेवरून स्पष्ट दिसते, त्याप्रमाणें समाजास कोणत्याहि प्रकारची स्थित्यंतरे प्राप्त झाली तरी त्यांत सामाजिक आद्याचारांची छाया पडल्याशिवाय रहात नाहीं, या सामाजिक आचाराहून आद्यतर किंवा पुराणतर असा दुसरा कोणताहि आचार नाहीं; व यांपासून उत्पन्न झालेले इतर आचार कितीहि मंदावत किंवा क्षीण होत गेले तरी सामाजिक आचार नाहींसे होत जाण्याचा संभव नाहीं. उलट यापासून निघालेल्या आचारांस क्षीणता येत जाईल तसतसी याची वृद्धिच होत जाण्याचा संभव आहे; आणि आजपर्यंत असेंच होत आलें आहे. समाजास जसजशी उन्नतावस्था येत जातें, तसतशी त्यांतील धर्माचारांस आणि राज्याचारांस शिथिलता येत जातें, हें अनेक देशांच्या व समाजांच्या इतिहासांवरून सिद्ध करून देतां येण्यासारखें आहे. पण कोणत्याहि देशाच्या इतिहासावरून असें दाखवितां येणार नाहीं कीं, धर्माचार आणि राज्याचार शिथिल होत गेले म्हणून त्यांच्याबरोबर सामाजिक आचारांचीहि तींच वाट झाली. फार झालें तर येवढेंच दाखवितां येईल कीं, ज्ञानवृद्धीनें व ज्ञानप्रसारानें कोणत्याही समाजास उन्नतावस्था प्राप्त होऊन त्यांतील वेडेपणाच्या धर्माचारांचा व राज्याचारांचा लोप होत चालला, तर त्याबरोबर सामाजिक आचारांस सुस्वरूप येऊं लागतें व ते विशेष सभ्य आणि सुखावह असे होतात.

मनुष्यांची वन्यावस्था सुटत जाऊन त्यांची सुधारणा होऊं लागणें म्हणजेच त्यांमध्यें धर्म आणि राज्य या संस्थांची स्थापना होणें होय. या संस्थांची प्रथमावस्था केवळ आचारमय असते; म्हणजे मनुष्यांच्या आद्य धर्मपद्धतींत व राज्यपद्धतींत विवक्षित आचारांशिवाय दुसरें कांहीं नसतें. समाजांत जो पुरुष चातुर्यानें, धैर्यानें, व शरीरसामर्थ्यानें इतरांहून श्रेष्ठ असतो तो प्रथम त्यांचा राजा होतो, आणि पुढें देव होतो, हें मागें एकदां सांगितलेंच आहे. अशा रीतीने राजत्वाप्रत व देवत्वाप्रत पावलेल्या व्यक्तींच्या हयातींत किंवा त्यांच्या मरणोत्तर त्याशीं वागण्याच्या ज्या पद्धति त्यांस राज्याचार व धर्माचार म्हणतात. अनेक युगें जो राजा असतो तोच देव असतो; पण कालांतरानें राजेपणापासून देवपण वेगळें होतें, आणि राजपूजा व देवपूजा निराळ्या होतात. परंतु प्रथम राजत्व आणि देवत्व

एकाच व्यक्तीत असल्यामुळें, तीं निराळीं झालीं तरी राजास आणि देवास भजण्याच्या पद्धति किंवा आचार एकसारखेच असतात. ज्याप्रमाणें राजाला राजवाडा त्याचप्रमाणें देवाला देऊळ; राजाला वंदन त्याचप्रमाणें देवाला वंदन; राजाला करभार द्यावयाचा तसा देवाला करभार द्यावयाचा; शेतांतील उत्पन्नाचा पहिला भाग ज्याप्रमाणें राजपदीं अर्पण करावयाचा त्याप्रमाणें तो देवपदीं अर्पण करावयाचा; राजाला चोपदार तसे देवाला चोपदार, राजाला पालखी तशी देवाला पालखी; राजाला मुकुट, दागिनें, चौऱ्या, तसें देवालाही; राजाभोंवतीं मंत्रिगण तसा देवाभोंवतीं पूजकगण; ज्याप्रमाणें राजास स्तुतिपाठक असावयाचे त्याप्रमाणें देवासहि असावयाचे; ज्याप्रमाणें राजाच्या संतोषासाठीं बळी पडण्याची हौस त्याप्रमाणें देवाच्या संतोषासाठींहीं प्राणत्याग करण्याची हौस;—सारांश, पूर्वावस्थेतील मनुष्यें राजा आणि देव यांच्यांत फारसा भेद समजत नाहींत, आणि म्हणून त्यासंबंधानें त्यांचें जें वर्तन असतें त्यांतहि फारसा भेद असत नाहीं. राजाच्या स्वाऱ्यांचा थाट आणि देवांचें छबिने यांत म्हणावयासारखा भेद दिसत नाहीं, वाद्यें वाजताहेत, भाट गुण गाताहेत, लोक नमस्कार घालताहेत, बायका खिडक्यांतून लाह्या व रेवड्या फेकताहेत-वगैरे प्रकार ज्याप्रमाणें राजाची स्वारी निघाली असतां होतात, त्याप्रमाणें कोणत्याही देवाची पालखी निघाली असतां होतात; आणि हा प्रकार ज्याप्रमाणें या देशांत दृष्टीस पडतो, त्याप्रमाणें याच्याच तोडीचें जे जपान, चीन, तुर्कस्थान वगैरे देश आहेत त्यांतहि दृष्टीस पडतो, आणि पूर्वी ग्रीस, इटाली, स्पेन, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांतही दृष्टीस पडत असें. अर्थात देशपरत्वें राजास आणि देवास पूज्यता दाखविण्याची ही पध्दति किंचित निराळी असतें व आहे, हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं. पण सर्वत्र तिचें तत्व एकच आहे. ज्याप्रमाणें देवाच्या देवळांत पाहिजे त्याला प्रवेश करण्याची परवानगी नाहीं त्याप्रमाणें राजवाड्यांतहि पाहिजे त्याचा प्रवेश होण्याचा संभव नाहीं. ज्याप्रमाणें देव गुरवांच्या ताब्यांत, त्याप्रमाणें राजा मंत्र्यांच्या ताब्यांत. अद्यापि कित्येक ठिकाणी कांहीं राजे आहेत ते असें कीं, त्यांचे दर्शन लोकांस सहसा व्हावयाचें नाहीं. आमच्या इकडील पडदानशीन स्त्रियांप्रमाणें आफ्रिकेंतील कांहीं राजे पडद्याच्या आड बसून,

किंवा जुन्या शिवालयाच्या गाभाऱ्यासारख्या एखाद्या अंधाऱ्या कोठडींत आपणास कोंडून घेऊन, तेथून भेटण्यास आलेल्या लोकांशीं मंद स्वरानें स्वतः किंवा दुभाषाच्या द्वारें थोडेसें बोलतात! देवळांत गेलें असतां देवास जी प्रार्थना करावयाची असेल ती साष्टांग प्राणिप्रात केल्याशिवाय जशी करण्याची सोय नाहीं, त्याप्रमाणें पूर्वपद्धतीच्या राजास भेटण्यास गेलें असतां जमिनीपर्यंत लवून दहापांच मुजरे ठोकल्याशिवाय आणि गुडघे टेंकून तोंडाला पदर लावल्याशिवाय 'ब्र' काढण्याची सोय नाहीं! जीं जाड प्रकरणें असतात त्यांना मर्त्यास स्वतः उत्तर देण्यांत कमीपणा वाटत असल्यामुळें, भेटणाऱ्यानें दुभाषाकडे तोंड करून बोलावें, त्यानें 'जी जी' करीत 'सरकारकडे' तोंड करून त्याचा प्रतिध्वनि उठवावा, आणि मग सरकारांनीं तोंडांतल्यातोंडांत कांहीं तरी गुळमुळावें आणि मग दुभाषेबोबांनीं त्यांतील धरवतील तेवढें शब्द व वाक्यें धरून तीं भेटीस आलेल्या गृहस्थांपुढें बठवावीं! ही राजेपणाची ऐट आणि हा राजकीय आचारांचा थाट! याचेंच अनुकरण राजाच्या सरदारांनीं आपल्या खालच्या लोकांशीं आणि त्यांनीं त्यांहून खालच्या लोकांशीं करावयाचें! तिकडे धर्मसंबंधानेहि तसाच प्रकार. जो कोणी धर्मगुरू किंवा शंकराचार्य, किंवा परमहंस असेल तो एकाद्या देवतेचा काय तो दास; इतरांस तो साक्षात् देव आणि अशी अधिकारपरंपरा-पंचांगसांग्या गांवजोशापर्यंत किंवा श्राद्धभटापर्यंत असावयाची!

अशा प्रकारें राज्य आणि धर्म या संस्थांच्या पूर्वावस्थेंत आचारांस काय तें प्राधान्य असतें. जो त्याप्रमाणें वागेल तो राजनिष्ठ आणि धर्मनिष्ठ, आणि त्यावरच राजा आणि देव प्रसन्न! ज्याचें तदनुसार वर्तन नसेल त्यास जबर दंड! ज्यांनीं एकदोन पिढ्यांच्या मागील राजदरबारें पाहिलीं नसतील त्यांना वरील लेखांत किती तथ्य आहे, हें दिसून येणार आहे. धर्मासंबंधीं या प्रकारची यातायात जे आमच्यासारखे पाश्चिमात्य शिक्षणानें बरेच निगरगट्ट झालें आहेत त्यांना फारशी पीडा देत नाहीं; पण जे पहिल्या पद्धतीचे आहेत त्यांचा श्रावणीसारख्या कवायतीपासून होणारा 'जाच' अद्याप बिलकुल कमी झालेला नाहीं, व त्यांस तो 'जाच' असें वाटतहि नाहीं! येथल्याप्रमाणेंच पूर्वी युरोपियन लोकांतहि धर्माचारांची अशीच गर्दी व सक्ती असे;

आणि आतांहि आफ्रिकेंतील व अमेरिकेतील कांहीं अर्धवट सुधारलेल्या लोकांत ती दृष्टीस पडते. हवाई बेटांत टाबू नांवाचा उत्सव कांहीं दिवस होत असतो. त्या प्रसंगीं पुढें लिहिल्याप्रमाणें व्यवस्था होत असते.

"हा उत्सव सुरू असतां या बेटांत किंवा त्याच्या आसमंतांतील प्रदेशांत कोठेंहि चूल पेटविण्याची किंवा दिवा लावण्याची सक्त मनाई असते. तसेंच कोणीहि पाण्यांत होडी घालतां कामा नये, किंवा स्नान करतां कामा नये, असा प्रतिबंध असतो. तसेंच ज्या मनुष्यास देवळांत जावयाचें असेल त्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि मनुष्यास आपल्या घराच्या दाराबाहेर पडण्याची मनाई असतें. तसेंच कोठेंहि कुत्रें भोंकतां कामा नये, कीं डुक्कर डुरकतां कामा नये, कीं कोंबडा आरवतां कामा नये असा प्रतिबंध असतो. या प्रसंगीं या बेटांतील लोक कुत्र्यांची आणि डुकरांचीं तोंडें बांधतात, आणि कोंबडी वगैरे घरगुती पांखरें भोंपळ्यांच्या वाळलेल्या लकलांखालीं कोंडून घालतात, किंवा फडक्यांनीं त्यांचें डोळे बांधतात."

हें एक रानटी लोकांच्या धर्माचाराचें उदाहरण झालें. सुधारलेल्या युरोप खंडांतहि थोड्या वर्षांपूर्वी अशीच स्थिति होती. सेंट कोलंबेनस याची आज्ञा अशी आहे, "जो कोणी मंतरलेला पाव गमावील त्याला एक वर्षाचें प्रायश्चित्त; जो त्यास डोंगळा किंवा मुंगी लागूं देईल त्याला सहा महिन्यांचें; जो त्यास लाल होऊं देईल त्याला वीस दिवसांचें; जो त्याला अनमानानें पाण्यांत झुगारून देईल त्याला चाळीस दिवसांचें, कोठ्याच्या हलकेपणामुळें ज्या कडून ओकून पडेल त्याला वीस दिवसांचें, पण जर आजारीपणामुळें तो वर येईल तर फक्त दहा दिवसांचें. तसेंच जो कोणी आशीर्वचन होत असतां 'तथास्तु' म्हणण्यास चुकेल. किंवा जो जेवतांना बोलेल, किंवा जो चमच्यावर अथवा धाकट्या भावानें लावलेल्या कंदिलावर (खिस्ताचा) क्रुस काढण्यास विसरेल त्याला सहा फटके दिले पाहिजेत."

हा पाश्चिमात्य धर्मावर आणि ही त्याच्या उल्लंघनास सांगितलेली शिक्षा—यांचा विचार करतां, आमच्या येथें जीं शेंकडों व्रतें अस्तित्वांत आलीं आहेत, व ज्यांच्या भंगाबद्दल नाना प्रकारचीं प्रायश्चितें सांगितलीं आहेत, तीं पाहून त्यांविषयीं आपणास वाटत असलेला तिरस्कार किंचित्

कमी होईल, यांत कांहीं संशय नाहीं. निरनिराळ्या देशांतील व निरनिराळ्या स्थितींतील लोकांच्या सामाजिक, धार्मिक, व राजकीय आचाराविषयीं माहिती मिळवून त्यांचा शांतपणें विचार केला असतां त्याच्यायोगानें आपल्या मनावर दोन प्रकारचे परिणाम होतात. एक, आपली अशी खात्री होऊन जाते कीं, सामान्यपणें कोणतेहि लोक घेतले तरी त्यांना विवक्षित स्थिति प्राप्त झाली असतां त्यांच्या राजकीय, धार्मिक आणि सामाजिक कल्पना व आचार साधारणपणें सारख्या तऱ्हेचें असतात; दुसरें, जसजशी त्यांची सुधारणा होत जाते तसतसा त्या कल्पनांत व आचारांत पालट होत जाऊन त्यांस विशुद्धत्व येत जातें हें अवस्थांतर होण्यास ज्ञानबुद्धि व ज्ञान प्रसार कारण होतात. ज्यांना दुर्दैवानें सुशिक्षण मिळालें नसल्यामुळें अशा गोष्टींविषयीं शांतपणें विचार करण्याची संवय लागलेली नाहीं, व कोणत्या स्थितीपुढें कोणती स्थिति येतें हें समजलेले नाहीं, अशांनीं असलेली स्थिति अत्युत्तम मानून वरिष्ठ स्थितींचें ज्ञान करून देणाऱ्याचा उपहास करावा, हें अगदीं स्वाभाविक आहे. पण ज्याच्या मनावर सुविद्येचा चांगला परिणाम झाला असेल तो अशा अप्रबुद्धांनीं केलेल्या दुःशब्दांच्या पुष्पवृष्टीबद्दल त्यांचा राग न करतां, उलट त्याविषयीं अनुकंपा किंवा कींवच प्रदर्शित करील. " सोंवळ्या ओंवळ्याची मीमांसा, " ' देवतोत्पत्ति ' अशा विषयावरील आमच्या लेखांसारखे लेख वाचून पूर्वपद्धतीच्या सामान्य वाचकांचें पित्त खवळून जात असेल याविषयीं आम्हांस तिलप्राय शंका नाहीं. पण या गोष्टींस आमचा इलाज नाहीं. पण हितावह परंतु कडू न लागणारें असें भाषण नेहमीं करणें केवळ दुरापास्त आहे. ज्याला आसमंतांतील स्थिति वाईट वाटत असेल, व ती बरी व्हावी अशी इच्छा असेल त्याचें ती वाईट म्हटल्याखेरीज व तींतील चुका दाखविल्याखेरीज, कसें चालेल ? यावर कित्येक असा आक्षेप घेतात कीं, अशिक्षित लोकांपुढें अशा प्रकारचा बुद्धिवाद मांडल्यानें त्यांच्या बुद्धीस भ्रंश होऊन " इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः " अशी त्यांची स्थिति होतें, आणि तीमुळें समाजांत अनवस्था उत्पन्न होऊन त्याचे फार नुकसान होतें. आमच्या मतें या आक्षेपात बराच अर्थ आहे. पण तेवढ्यांवरून तो निरुत्तर आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. एक तर हें

ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, एक स्थिति जाऊन दुसरी स्थिति येण्यापूर्वी जो काल जातो त्यांत विशेष अव्यवस्था दृष्टीस पडणें हें साहाजिक आहे. तसेंच हेंहि लक्षांत वागविलें पाहिजे कीं, बुद्धीस बरें दिसण्यासारखें विचार पुढें आल्याबरोबर मनुष्य एका क्षणांत आपलें फार दिवस चालत आलेलें वर्तन टाकून देऊन त्या विचाराप्रमाणें नवीन वर्तन एकदम करूं लागला असें बहूशः घडत नाहीं. अशा गोष्टींत लिहिणारांनीं लिहावें आणि वाचणारांनीं वाचावें, असें कांहीं वेळ झाल्यावर प्रथम लिहिणारांच्या वर्तनांत थोडाबहुत फेरफार होऊं लागतो, व त्यांचें उदाहरण वारंवार डोळ्यांपुढें येऊं लागलें म्हणजे वाचणारांच्या मनांतहि खात्री झाली असल्यास, लिहिणारांचें अनुकरण करावें असें येऊं लागतें. सारांश, समाजाची सुधारणा मुंगीच्या पायानें होत असतें. म्हणून या पत्रासारख्या पत्रांत येणारे असामान्य विचार नवीन मंडळींच्या हातांत पडल्याबरोबर ती आपले फार दिवसांपासून चालत आलेलें धर्माचार, राज्याचार, किंवा सामाजिक आचार एकदम टाकील, अशी भीति क्षणभर-सुद्धां बाळगण्याची गरज नाहीं. असें होण्याचा संभव असेल तर आम्हांस त्यापासून फार आनंद होणार आहे. पण तसें मुळींच नाहीं. तथापि कर्तव्य तें केलेंच पाहिजे, असें समजून हा व्यवसाय आरंभिला आहे, आणि म्हणून कोणास कांहीं वाटलें, तरी अशा विषयाविषयीं जें सत्य व योग्य दिसेल तें लिहिणें भाग आहे.

विजयलांछनें : : ५

मनुष्याच्या उपजत मनोवृत्तींपैकीं सामर्थ्यप्रदर्शनाची हौस ही एक असावी असें वाटतें. बहुशः जगाच्या आरंभापासून पुरुष स्त्रियांपुढें, विद्वान अविद्वानांपुढें, धनवान निर्धनांपुढें, स्वतंत्र परतंत्रापुढें, प्रबुद्ध अप्रबुद्धांपुढें, जेते जितांपुढें, व शास्ते शासितांपुढें आपल्या सामर्थ्याची प्रतिष्ठा मिरवून तीपासून आनंद करून घेत आहेत. प्राणिमात्रास, व विशेषतः मनुष्यास

दुसऱ्यावर सत्ता, अधिकार किंवा अंमल गाजविण्यास इतका आनंद कां होतो याची मीमांसा येथें करीत बसण्याचें प्रयोजन नाहीं. सर्व स्थितींत व सर्व वर्गांत ही मनोवृत्ति दृष्टीस पडतें, येवढ्यावरून ती जन्मागत आहे, असें येथें घेऊन चालण्यास हरकत नाहीं. या एका वृत्तीमुळें मनुष्यसमाजांत अनेक आचार अस्तित्वांत आले आहेत. आज ज्या आचारांचा विशेष उहापोह करावयाचा आहे ते याच वृत्तीपासून उत्पन्न झाले आहेत.

ज्याच्या अंगांत विशेष रग असते त्याला आपल्या शत्रूचा पराभव केल्यापासून तात्कालिक समाधान तर होतेंच, पण त्याच विजयाची कांहीं खूण जवळ बाळगून तिजकडे पुनः पुनः पहाण्यापासून, किंवा ती आपल्या आप्तास किंवा मित्रास दाखविण्यापासूनहि पुष्कळ समाधान होतें. इंग्लंड-सारख्या बेटांतील धीवरांनीं फार कष्टानें एखादा प्रचंड किंवा असामान्य मासा पकडला असतां तो ते विकून न टाकतां बाळगून ठेवतात आणि अभिमानपूर्वक तो इतरांस दाखवितात. परराज्यामुळें, रानें फस्त झाल्यामुळें, हत्याराच्या प्रतिबंधक कायद्यामुळें, आणि कदाचित् भूतदयेच्या प्रसारामुळें आमच्या लोकांचा मृगयेचा नाद अगदीं सुटल्यासारखा झाला आहे.

मिथ्यैव व्यसनं वदन्ति मृगयां इदृग् विनोदः कुतः ।

अशा प्रकारें पारधीची तारीफ करणारे राजे, सरदार, किंवा सामान्य लोक येथें अगदींच दिसेनासे झाले आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण इंग्लंडसारख्या देशांत या विनोदाचा नाद अद्यापि अनेकांच्या ठाईं दृष्टीस पडतो. मृगया करून जी लूट कमाविली असेल तिच्यापैकीं टिकण्यासारखा भाग आपल्या बसण्याउठण्याच्या खोलींत प्रमुख स्थळीं मांडून ठेवण्याची चाल साहेब लोकांत आहे, हें ज्यांनीं शिकारीसाहेबांच्या बंगल्यांत एकदोन वेळां प्रवेश केला असेल त्यांच्या नजरेस आलेंच असेल. खुर्च्यांवर व बैठकीवर हरणांची मोठमोठीं कातडीं टांगलेलीं असतात, व कोठें कोठें शृंगाविस्तारामुळें भव्य दिसणारीं काळविटांचीं शिरें पेंढा भरून भिंतीवर किंवा दारांवर अडकवलेलीं असतात. त्यांतल्या त्यांत ज्याला वाघाच्या किंवा अस्वलाच्या शिकारीचा नाद असेल त्याला वाघांची आणि अस्वलांची कातडीं ठिकठिकाणीं पसरून ठेवण्यांत मोठा पुरुषार्थ वाटतो.

अशा प्रकारें मृगयेंत संपादिलेल्या विजयाचीं लांछनें वापरण्याचा नाद सुधारलेल्या लोकांसच असतो असें नाहीं. रानटी लोकांस तर हा नाद सुधारलेल्या लोकांहूगही अधिक असतो. त्या लोकांत ज्यापाशीं विशेष अस्थिसंग्रह किंवा चर्मसंग्रह असतो तो विशेष शूर गणला जातो, आणि इतरांस त्याच्या पराक्रमाचा धाक वाटतो; यामुळें अशा लोकांच्या झोपड्यांत जिकडे तिकडे हाडांची व कातड्यांची एकच गर्दी झालेली असते. आपण ज्याप्रमाणें कडीकपाटास हांड्याझुंबरें लटकवून देतो त्याप्रमाणें हे लोक आडव्या तुळवटास किंवा वाशास मोठमोठ्या वाघांचे आणि अस्वलांचे सांगाडे व कातडीं अडकवून ठेवितात! कित्येक रानटी लोकांच्या सरदारांची संपत्ति व भूषणें केवळ असल्या जनावरांच्या शिरांचीं व हाडांचीं झालेलीं असतात. ही संपत्ति व भूषणें बापाकडून मुलास येतात, व त्यांचा त्याला मोठा अभिमान वाटतो. शोशून लोकांतील योद्ध्याच्या अंगावर अस्वलाचे पंजे आणि पाय दृष्टी पडतात! फक्त राजाच्याच आळ्यावर सिंहाचें अथवा चित्याचें शेंपूट लोंबत असावें, असा कोसास लोकांत प्रतिबंध आहे!

याप्रमाणें भक्ष्य किंवा हिंस्र पशूंवर आपला किती अंमल चालतो हें दाखविण्यासाठीं सुधारलेले आणि रानटी लोक काय करतात, हें वर सांगितलें. पण हें सर्व प्रस्तावनारूप आहे. मनुष्यांच्या अन्योन्य व्यवहारांत कशा प्रकारचें आचार पडत जातात हें या निबंधांत दाखविण्याचा मुख्य उद्देश आहे. तो उद्देश चांगल्या रीतीनें सिद्धीस जाण्यासाठीं, म्हणजे पुढें जें सांगावयाचें आहे तें वाचकांच्या मनांत बरोबर रीतीनें उतरून देण्यासाठीं अशी प्रस्तावना केली आहे. रानटी, अर्धवट सुधारलेल्या व पूर्ण सुधारलेल्या लोकांचे हिंस्र पशूंशीं ज्या प्रकारचें वर्तन होत असते, त्याच प्रकारचें वर्तन आपापसांतहि होत असतें. रानटी लोकांतील एखादा वीर युद्धाला गेला आणि त्यानें परत येतांना आपल्याबरोबर कांहीं विजयचिन्ह आणिलें नाहीं तर यास विजयशाली कोण म्हणणार व त्याला कोण वचकणार? तेव्हां अशा लोकांतील योद्धे कांहीं पराक्रम करून येतात ते त्या पराक्रमाची कांहींतरी पक्की खूण आणण्यास कधींहि चुकत नाहींत! लढाईत जिंकलेल्या शत्रूकडील बायका, पुरुष व मुलें यांस कैद करून आणण्याचा प्रघात फार जुना आहे. ज्या रानटी

लोकांत नरमांससेवनाचा प्रकार चालू असतो त्यांस अशा रीतीनें आणिलेलीं लूट नासूं न देतां उरवून पुरवून बरेच दिवस चरितार्थाकडे लावितां येते. पण अशा प्रकारचीं लूट संभाळणें फार कठीण असतें. एक तर कैद केलेले इसम स्वजीवितरक्षणासाठीं तुटून पडतील अशी भीति असतें, शिवाय कैद्यांच्या मोठ्या समुदायाचें संरक्षण करण्यासहि मोठी पंचाईत पडते. अशा अनेक अडचणींमुळें अनेक कैदी पकडून आणिलेच तर त्यापैकीं जेवढ्या बायका व पोरें हवी असतील तेवढ्याशिवाय बाकीच्यांस मारून टाकण्याचा प्रघात असतो. जुने ग्रीक लोक असेंच करीत असत. सध्यांचे सर्व ठिकाणचे रानटी लोक असेंच करतात. तैमूरलंगादि ज्या दुष्ट पराक्रमी लोकांनीं हिंदुस्थानावर व युरोपावर अनेक स्वाऱ्या करून लाखो लोक गुलाम केले त्यांची त्यांनीं अशीच वाट लाविली ! शत्रूच्या अंतःकरणांत दहशत उत्पन्न करण्याचा व स्वजातीपुढें शौर्याची प्रतिष्ठा मिरविण्याचा हा अगदीं जुना व रानटी प्रकार होय. याच्या खालोखाल युध्दांत जिंकलेल्या शत्रूच्या शरिराचे कांहीं भाग कापून काढून त्यांचें प्रदर्शन करावयाचें हा दुसरा प्रकार. हा अद्यापि बऱ्यांच ठिकाणीं दृष्टीस पडतो, व आमच्या राज्याचारांवर व धर्माचारांवर याचा बराच परिणाम झाला आहे. मनुष्याच्या अनेक अवयवांत डोक्यास जें मुख्यांगत्व आलें आहे, तें अत्यंत स्वाभाविक आहे, हें कोणासहि समजणार आहे. प्रतिपक्ष्याचें शिर कापून आणण्याहून त्याचा पराभव केल्याचा दुसरा सबळ पुरावा तो काय देतां येणार ? एक डोकें आणिल्यानें शत्रु जिवंत राहिला नाहीं, जो मारावयाचा तोच मारला आहे, अशीं त्यापासून अनेक प्रमाणें मिळून हत्यांच्या विजयशालित्वाबद्दल आप्तांची, मित्रांची आणि न जिंकलेल्या शत्रूंची पूर्ण खात्री होऊन जाते. अशा प्रकारें कापून आणिलेलीं शिरें काठ्यावर घालून रानटी लोक मोठ्या आनंदानें नाचत सुटतात ! त्यांच्या राजाच्या खोपटापुढें वेळूं पुरून त्यांवर असलीं डोकीं बसवून दिलेलीं असतात. डहोमन लोकांच्या राजाच्या घरांतील भिंतींत विटांच्या व तोडींच्या जागीं शत्रूंचीं शिरकमलें बसवून दिलेलीं असतात, आणि कधीं कधीं याच कमलांची फरशीहि केलेली असते ! खुंट्यांच्या जागीं हातांचीं व पायांचीं हाडें बसविलेलीं असतात ! अशा रीतीनें शत्रूंच्या

शिरकमलांवर नित्यशः पादसंचार करणाऱ्या राजास त्याची प्रजा पराकाष्ठेची भीत असेल व त्याचे शत्रू त्यापुढें थरथरां कांपत असतील, हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं. राजा स्वतः युद्धांस न निघतां त्यानें तें काम आपल्या वजिराकडे किंवा दुसऱ्या कोणाकडे सोंपविलें असलें तर त्या प्रतिनिधीस राजाची मर्जी आपणावर सुप्रसन्न करून घेण्यासाठीं जितकीं डोकीं मिळतील तितकीं मिळवून तीं राजपदीं आणून अर्पण करावीं अशी महत्त्वाकांक्षा सहज उत्पन्न होते, आणि तदनुसार त्यांचें वर्तन होतें. रानटी लोकांच्या राजाप्रमाणें त्यांच्या देवताहि रुधिरप्रिय असल्यामुळें राजाप्रमाणें देवतांसहि शत्रुशिरःकमलें वाहण्याचा प्रघात पडतो; व अशा रीतीनें ज्या आचारांचा उद्गम प्रथम केवळ सामाजिक व्यवहारांत होतो त्यांचा अंमल पुढें राज्याचारांवर व धर्माचारांवर होऊं लागतो. असो; जिंकलेल्या शत्रुंस जिवंत धरून नेण्यापेक्षां त्यांचीं शिरें कापून नेणें विशेष सोईचें असल्यामुळें तसें करण्याचा प्रघात लौकरच पडतो. पण पुढें तोहि गैरसोईचा वाटूं लागतो. मनुष्याच्या साऱ्या अवयवांत डोकें फार जड; तशांत त्यावर बराच केशभार असला, आणि त्यांतून रक्त गळत असतें म्हणजे तें घेऊन जाणें मोठें त्रासदायक आहे. म्हणून हळूं हळूं सगळीं डोकीं न नेतां दांत व दाढा उपटून काढून त्या नेण्याचा प्रघात पडतो. पुढें तोहि बरासा न वाटून कान व नाकें कापण्याचीं चाल पडते. तैमुरलंगानें बगदाद आणि आलेपो येथें आपल्या शत्रुंच्या शिरांच्या पिरामिदी आणि कोट बांधलें होते ! झांझिखान पोलंडावर चालून गेला तेव्हां त्यापाशीं लाखों शिरें वाहून नेण्यापुरतीं जनावरें नसल्यामुळें त्यानें पोलिश लोकांच्या उजव्या कानांची नऊ पोतीं भरून घेतलीं, आणि त्यांसह स्वदेशांस प्रयाण केलें ! आफ्रिकेंतील कांहीं राजास शत्रुंची नाकें फार प्रिय असल्यामुळें त्यांचें लढाऊ सरदार नाकांनीं भरलेलीं ताटें त्यांस नजर करतात ! तथापि कान, नाकें वगैरे कुजणारे भाग असल्यामुळें कित्येक रानटी लोक फक्त दांतच घेऊन जातात, आणि त्यांच्या माळा करून ठेवतात. समारंभाचे वेळीं आणि सणाचे दिवशीं त्यांच्या बायका असल्या दातांचे दागिने मोठ्या प्रेमानें वापरतात ! डोकीं, दाढा, दांत, कान, नाकें यांशिवाय शरीराचें दुसरें भागहि कापून

नेण्याचा प्रघात आहे. कांहीं रानटी लोक काळजें काढून घेतात; कांहीं उजवे किंवा डावे हात कापतात; कांहींस मांसल असे कटिपश्चाद्भाग फार आवडतात. कांहींस तोंडाचीं कातडीं व कांहींस सगळ्या शरीराचीं सबंध कातडीं सोलून घेणें बरें वाटतें! तीं सहज निघून यावीं म्हणून ते जिवंत शत्रूंस वांग्याप्रमाणें निखाऱ्यांत बेतानें भाजून मग सोलतात! आणि अशा रीतीनें सोडविलेले अखंड चोगे वापरण्यांत व त्यांसह राजास व मित्रास भेटण्यास जाण्यांत मोठी प्रतिष्ठा वाटते! याप्रमाणें शरीरांतील बहुतेक सारे भाग व अवयव विजयलांछनें होऊं शकतात व होतात, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. एक मात्र भाग अद्यापि सांगितला नाहीं, पण मनुष्याची क्रूरता कोणत्या थरास जाते. हें त्यांस समजावें म्हणून तोहि विजयलांछन करण्यांत येतो, हें येथें सांगणें जरूर आहे. इतर अवयवांप्रमाणें हा गोपनीय अवयवहि कापण्याचा आणि सोलण्याचा प्रघात मागें युरोपांत व आशियांत रूढ होता, आणि प्रस्तुत कालीं आफ्रिकेतील व अमेरिकेंतील कांहीं रानटी लोकांत रूढ आहे. हाच आचार अन्यरूपानें एका मोठ्या सुधारलेल्या लोकांत अद्यापि रूढ आहे. हें पुढील एका निबंधांत विशेष स्पष्ट होणार आहे.

राज्याचार व धर्माचार सामाजिक आचारांपासून उत्पन्न होत असल्यामुळें समाजाच्या प्रथमावस्थेंतील धर्म आणि राज्य यांचे स्वरूपहि वर निर्दिष्ट केलेल्या रानटी सामाजिक आचारांच्या स्वरूपासारखेंच असतें. सध्यां आपणांस गुलाम, गुन्हेगार आणि शत्रू यांतील भेद नीट समजतो, व एकाच्या जागीं दुसरा समजणें अशक्य वाटते. पण रानटी लोकांस अशा प्रकारचें वस्त्वंतर समजत नाहीं. ज्याच्याकडून त्यांना कांहीं अप्रिय घडेल अशी भीति असते त्यास ते शत्रु किंवा गुन्हेगार समजून त्याचा पराभव करण्यास व त्याला गुलाम करण्यास उद्युक्त असतात. साक्षात् पोटच्या पोरांपासून त्यांस त्रास होऊं लागला तर त्यांना मारून टाकण्याची त्यांस शंका वाटत नाहीं, मग इतरांची कथा काय? अशा स्थितींतील राजेहि सामान्य मनुष्याप्रमाणें क्रूर असतात. व ज्याप्रमाणें सामान्य व्यक्ति आपल्या सामर्थ्याचा दुसऱ्यास वचक राहण्यासाठीं वर सांगितल्यासारखें निर्दयपणाचे

वर्तन करण्यास प्रवृत्त होते, त्याप्रमाणें राजेहि आपल्या प्रजेस व आपल्या शत्रूस आपली दहशत पडण्यासाठीं अशाच प्रकारचें क्रूर वर्तन करतात. लढाईत जिंकलेल्या लोकांची डोकीं उडविणें, हातपाय तोडणें, त्यांना मिरच्यांच्या धुऱ्या देणें, लिदींत पुरणें, तापल्या तोफावर बांधणें, कडेलोट करणें, हत्तीच्या पायाखालीं देणें, त्यांची नाकें व कान कांपणें, आणि त्यांच्या घशांत शिसें तापवून ओतणें हे निर्दयपणाचें प्रकार लढाईत कैद केलेल्या शत्रूकडील लोकांचा छळ करण्याकरितां जसें योजण्यांत येतात, त्याप्रमाणें प्रजेपैकींहि कोणी मनुष्यानें अपमान केला, हुकूम तोडला, किंवा बंडाचा घाट घातला तर त्याला शिक्षा करण्यांतहि योजण्यांत येतात. राजापराधाकरितां सुळावर चढविणें, जेथें खून केला असेल तेथें सर्व लोकांसमक्ष फांशीं देणें, भर चवाट्यावर फटके मारणें, हे सर्व सध्यांहि कित्येक ठिकाणीं अंमलांत असलेल्या शिक्षेचे प्रकार सरकारच्या सामर्थ्याची दहशत लोकांस असावी, येवढ्यासाठींच आहेत. राजा सिंहासनारूढ होतो, म्हणजे तो मनुष्यांचा स्वामी होतो येवढेंच नाहीं, तर सिंहासारख्या बलवान् हिंस्र पशूसहि जिंकून त्याच्या पाठीवर बसतों. असा या शब्दांत गर्भितार्थ आहे. सारांश काय कीं अर्धवट सुधारलेल्या स्थितींत सामाजिक आचार जितके क्रूर असतात तितकेच राज्याचारहि क्रूर असतात, असें सहज सिद्ध करून देतां येतें. कारण दुसरें पहिल्यापासूनच निघालेले असतात. ज्यांना हें विचार आपल्या समाजाच्या संबंधानें किती खरे आहेत हें पाहावयाचें असेल त्यांनीं महाभारतांतील कांहीं गोष्टी वाचून त्यांचे आपल्या मनाशीं शांतपणें चिंतन करावें. दुःशासनाच्या नरडीचा घोट घेऊन त्याच्या विदारलेल्या वक्षःस्थलापासून निघणाऱ्या रुधिरांत भिजविलेल्या हातानें द्रौपदीची वेणी घालण्याचा भीमानें केलेला पण आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच ! कदाचित् रा. ब नि. ज. कीर्तने यासारखे हिंदु धर्माचें आणि पुराणांचे मंडनकर्ते असें म्हणतील कीं, ही गोष्ट रूपकात्मक आहे व तिचा गुढार्थ आध्यात्मिक असून तो सामान्य जनांस कळण्यासारखा नाहीं ! अशाच रीतीनें वेदाचें अपौरुषत्व आणि गूढार्थत्व बरींच शतकें रूढ होऊन बसले आहे ! पण पश्चिमेकडून ज्ञानरवि या भरतखंडावर प्रकाशूं लागल्यापासून ' वेदार्थयत्न ' होऊं लागले आहेत. इतकेंच

नाहीं तर त्यांचें पौरुषत्व स्थापण्याचा विडाही कित्येकांनीं उचलला आहे, ही अत्यंत अभिनंदनीय स्थिती आहे.

मनुष्यांच्या प्रथमावस्थेंत सामाजिक व राजकीय आचार क्रूर असतात त्याप्रमाणें धर्माचारही क्रूर असतात, हें दाखविण्यासाठीं येथें विशेष खल करीत बसण्याची गरज नाहीं. कारण आमचीं पुराणें, आमची मूर्तिपूजा, आमचे प्रेतादिकांचे संस्कार आणि आमच्यापैकीं कनिष्ठ वर्गांत सुरू असलेली विलक्षण पाषाणपूजा यांचा क्षणभर विचार केला तर असें दिसून येईल कीं, आमच्या देवतांच्या कल्पना मेलेल्या पूर्वजांपासून म्हणजे त्यांच्या पिशाचांपासून निघाल्या असल्यामुळें, ज्या उपायांनीं व कृतींनीं रानटी व अर्धवट सुधारलेलीं माणसें आनंद पावतात, त्याच उपायांनीं व कृतींनीं देवतांहि आनंद पावत असतील, असा आमचा भरंवसा ठरून गेल्यामुळें आमच्यांतील अज्ञ लोकांचा पूजाविधि अत्यंत उपहासास्पद झाला आहे ! सांबासारख्या किंवा महिषासुरमथनीसारख्या देवतेचे रूपवर्णनच लक्षांत आणा म्हणजे आमच्या लिहिण्याचा अर्था प्रत्यय येईल. हत्तीचें ओलें कातडें पांघरून पिशाचगणांसह नर्तन करणाऱ्या " पंचतुंड नररुंडमालधर अशा पार्वतीशास " आम्ही नमन करणार ! मग काय विचारतां ? अशा भयंकर देवाची पूजाहि भयंकरच असली पाहिजे ! सांब हा थेट पिशाचवर्गांतून देववर्गांत आला असल्यामुळें त्याचें रूप आणि त्याची पूजाहीं पिशाचांचे रूप आणि पूजा यांसारखीं झालीं आहेत; व आमच्या पिशाचांच्या स्वरूपाच्या आणि त्यांच्या स्थितीच्या कल्पना आमच्या श्राद्धविधींत आणि गरुडपुराणांत पूर्णपणें नमूद झालेल्या आहेत ! उत्कुंभ, शय्यादान, गोप्रदान, लोहदान, कार्पासदान-या सर्वांवरून काय व्यक्त होतें कीं, शरीरास या लोकीं ज्या अडचणी येतात त्याच मरणोत्तर आत्म्यास पिशाचयोनींत येतात, असें आमचे लोक मानतात ! व अशाच प्रकारच्या पिशाचांपासून देवतोत्पत्ति झाली असल्यामुळें, त्यांचीं स्वरूपें आणि स्वभावही तशींच मानिलीं आहेत, आणि म्हणून त्यांच्या पूजाही तत्समान झाल्या आहेत यांत नवल तें कोणतें ?

व्यवच्छेदन : : ६

आपण संपादिलेली विजयश्री गाजविण्यासाठीं रानटी व अर्धवट रानटी लोक जिंकलेल्या शत्रूंस ठार न मारल्यास त्यांच्या शरीराचें कांहीं भाग कांपून घेऊन त्यांचा संग्रह करतात, हें वरील लेखांत सांगितलें. आतां याच आचारापासून उत्पन्न झालेल्या **व्यवच्छेदनाच्या** आचाराविषयीं दोन शब्द लिहावयाचे आहेत.

व्यवच्छेदन म्हणजे कापणें. जोंपर्यंत जिंकलेल्या लोकांच्या जिवाची पर्वा नसते तोपर्यंत हा प्रकार अस्तित्वांत येत नाहीं. डोक्याची नरटी काढणें जबडा उपसणें, कांतडें सोलणें, काळीज सोडविणें वगैरे विजय मिरविण्याच्या पद्धति अत्यंत क्रूरपणाच्या आहेत, आणि त्या जेथें रूढ असतात, तेथें मनुष्याचा जीव घेणें ही वाईट गोष्ट आहे असें कोणाच्या स्वप्नांतसुद्धां येत नसतें. पण पुढें आपआपसांतच युद्धें होतां होतां उभय पक्षांस असें दिसून येतें कीं, जिंकलेल्या शत्रूकडील लोकांस मारून टाकण्यापेक्षां गुलाम करणें बरें. त्यांस गुलाम करण्यानें त्यांच्याकडून निरंतर सेवा करून घेतां येईल. त्यांच्या वृत्तींत हा बदल होण्यास दोन कारणें होतात. सामान्य लोकांस असें वाटण्याचा संभव आहे कीं, रानटी लोक मोठे उद्योगी असतील. पण ही त्यांचीं चूक आहे. रानटी लोक पराकाष्ठेचे आळशी असतात. ज्याप्रमाणें सिंहव्याघ्रादि हिंस्र पशु भुकेनें कळवळूं लागल्याशिवाय आपल्या गुहा सोडून भक्ष्याच्या शोधासाठीं बाहेर पडत नाहींत, त्याप्रमाणें रानटी लोक चरितार्थास कांहीं नसलें तरच हातपाय हालविण्यास तयार होतात. भूक लागली म्हणजे हवें तें मारून ती भागवावी, आणि ती भागली म्हणजे पडून राहावें. अशीं त्यांना खोड असते. तेव्हां भूक भागविण्यास लागणारे पदार्थ कोणी आयतेच आणून देईल तर त्यांस ते मनापासून पाहिजे असतात. लढाईत पकडलेल्या लोकांस न मारतां गुलाम करून ठेविलें, आणि त्यांच्याकडून पारध करवून तिच्यावर चरितार्थ करतां आला, तर त्यांस तबियत लागेल तेव्हां मात्र थोडासा उद्योग करून बाकीच्या वेळांत विश्रांति घेण्यास सांपडते. याच

सुमारस गुरें पाळूनें त्यांच्या दुधदुभत्यावर किंवा शेतकी करून धान्यावर उपजीविका करण्याची कला समजून आली, तर लढाईतल्या कैद्यांस मारण्यापेक्षां त्यांना गुलाम करून ठेवण्याची इच्छा होण्यास विशेष कारण होतें. एक धनगर जितकीं गुरें पाळूं शकतो तितक्या गुरांपासून त्यांचा निर्वाह होऊन शिवाय आणखीही पुष्कळांचा होण्यासारखा असतो. शेतकऱ्याचे श्रम याहीपेक्षां विशेष फायदेशीर असतात. यामुळें काय होतें कीं, रानटी लोकांस धनगरावस्था व कृषीवलावस्था प्राप्त झाल्या असतां त्यांस माणसें मारण्याचा कंटाळा येऊं लावून त्यांना आपले गुलाम करून ठेवणेंच अधिकाधिक प्रिय वाटूं लागतें. अशा स्थितींत समाजांतील व्यक्तीचे दोन स्थूल विभाग होतात. एक चाकरांचा किंवा गुलामांचा; आणि दुसरा स्वामींचा किंवा धन्यांचा. पहिल्या वर्गांत बायकांचाही समावेश केला पाहिजे. घरच्या मालकानें लढण्याचें काम करावें, आणि बायकांनीं घरचीं कामें करावीं अशा प्रकारचा श्रमविभाग उत्पन्न होतो, आणि त्यापासून मिळूं लागलेली सुखें अधिकाधिक ग्राह्य वाटूं लागून ज्यांस गुलाम केलें असतें त्यांस चांगल्या रीतीनें वागविण्याची सहज प्रवृत्ति होतें. डोळे काढलेलें, हात तोडलेले, लंगडे झालेले अनेक गुलाम पदरीं असून काय फायदा ? गुलाम केलेल्या प्रत्येक इसमापासून जितका फायदा करून घेतां येईल तितका करून घेतां आला पाहिजे. काम करण्याचे अवयव तोडून टाकल्यास त्यांच्यापासून फायदा कसा होणार? तेव्हां तसें करणें बरोबर नाहीं. पण ते जिंकलेलें लोक आहेत असा कांहीं तरी शिक्का त्यांच्या अंगावर नेहमी दिसत असला पाहिजे, त्याखेरीज आपण विजयशाली आहों असें आपल्या मित्रांस किंवा शत्रूंस कसें कळेल, व त्यांवर आपला वचक कसा राहील ? चिंता नाहीं, पण तसे होण्यास गुलामास ठार मारलेंच पाहिजे असें नाहीं. ते लढाईत जिंकलेले लोक आहेत असें दाखविणारी एखादी कायमची निशाणी त्यांच्या अंगावर करून ठेवली म्हणजे झालें. अशा विचारांनीं **विजयलांछनास्तव** डोकीं उतरण्याचा, हातपाय तोडण्याचा, सबंध कातडें सोलण्याचा—सारांश, ज्या गोष्टीमुळें तत्क्षणी जीव जाईल, किंवा स्थाईक लुलेपण अंगीं जडेल, अशा प्रकारचा देहदंड करण्याचा प्रघात मागें पडून कोठें पायाचा आंगठा उतरणें, कोठें हाताची करंगळी

तोडणें, कोठें शेंडी काढणें, कोठें सुंता करणें असे आचार पडतात. आणि अशा प्रकारचें सामाजिक आचार एकदां रूढ झाले म्हणजे राज्याचारांस व धर्माचारांसही त्यांचें वळण लागतें.

पूर्वी युरोपांत व इतर खंडांत एका गृहस्थास आपली जमीन दुसऱ्यास विकावयाची झाली तर तो आपल्या वकिलाकडून विकत घेणाऱ्या मनुष्याच्या वकिलाच्या हातावर त्या जमिनींतील थोडीशी माती कांहीं साक्षीदारांसमक्ष पाडीत असें. जमीन ही उचलून देण्यासारखी वस्तु नसल्यामुळें असा प्रघात पडला असावा हें उघड आहे. आपणात उदक सोडण्याचा जो रिवाज आहे तोही अशाच अर्थाचा आहे. ज्या वस्तूवर आपण उदक सोडतों तीवरील आपलें स्वामित्व आपण सोडतों, असा या संप्रदायाचा मूळ आशय आहे. स्थावर वस्तु उचलून देतां येत नाहीं तेव्हां तिच्या संबंधानें अशा प्रकारचा तोडगा करणें भाग पडतें. पुढें ब्राह्मणभोजन घालावयाचें झालें, दक्षिणा द्यावयाची झाली, कन्यादान करावयाचें झालें तर उदक सोडण्याचाच प्रघात पडतो; म्हणजे स्थावरजंगम पदार्थांवरील स्वामित्व सोडण्याचा एकच पद्धत पडते; व असें होणें फार सोईचें आहे. तसेंच पूर्वीचें लोक लढाई करण्यास निघालें असतां ज्या लोकांवर चालून जावयाचें असेल त्यांच्याशी प्रत्यक्ष संग्राम करू लावण्यापूर्वी, माती आणि पाणी मागत; आणि त्या जिनसा त्यांच्याकडून आपल्या तर लढाई न करतां ते आपले गुलाम होण्यास तयार आहेत असें समजत या आचाराचा अर्थही उघड आहे. ज्यांनीं मागितल्या बरोबर माती आणि पाणी दिलें त्यांनीं आपण होऊन आपला देश ताब्यांत देण्याची कबुली दाखविली असें होतें. याप्रमाणेंच लढाईकरतां साहाय्य मागावयाचे झालें तर एकमेकांकडे भाले पाठवून देण्याची चाल असें; तसेंच लढाई सुरू होऊन कांहीं कैदीही करण्यांत आले आहेत असें दाखविण्याकरितां या मदतीसाठीं धाडण्यांत येणाऱ्या भाल्यांच्या फळांवर कैद केलेल्या लोकांचे हात किंवा बोटें टोंचून तें पाठविण्यांत येत असत. तसेंच ' आम्ही शरण आलों ' असें म्हणावयाचें असल्यास शस्त्रें उलट धरून किंवा हात बांधून घेऊन शत्रूच्या छावणींत जाण्याचा प्रघात असे. हात जोडणें, पायां पडणें, गुढघे टेकणें, तोंडांत मारून घेणें, कान उपटून घेणें, नाक घासणें

वगैरे जे प्रकार आपण देवापुढें किंवा राजापुढें करतो या सर्वांचा इंगितार्थ हाच आहे.

पण कोणी असें म्हणतील कीं, मनुष्यांनीं ठरविलेल्या ह्या कांहीं तरी खुणा आहेत. यावरून पूर्वी स्वामिसेवकसंबंध, राजाप्रजा संबंध किंवा देवपूजक संबंध दाखविण्यासाठीं ज्या आचारांच्या या खुणा आहेत असें आम्ही म्हणतों, ते आचार अस्तित्वांत असतील असें अनुमान करणें बरोबर नाहीं. त्यावर उत्तर येवढेंच आहे कीं, पृथ्वीवर सध्यां जे रानटी किंवा अर्धवट रानटी लोक आहेत त्यामध्यें असें आचार रूढ आहेत; आणि ज्या देशांतून ते नष्ट झाले आहेत, अशा देशांच्या इतिहासांत त्यांची उत्तम माहिती मिळण्यासारखी आहे. आमच्या देशांतील निरनिराळ्या वर्गांतले लोक निरनिराळ्या स्थितींत असल्यामुळें कोठें हे आचार प्रत्यक्ष आढळतात व कोठें त्यांची फक्त कवाईत दृष्टीस पडते. वुइलियम्स नांवाच्या एका प्रसिद्ध इंग्लिश प्रवाशानें असें म्हटलें आहे कीं, एका प्रसंगीं फिजी लोकांचा एक राजा मेला असतां त्याच्या दरबारनें त्याच्याप्रीत्यर्थ शंभर करंगळ्या तोडाव्या असा हुकूम फरमाविला; तसेंच एका मुलाचा आवडता बाप नुकताच वारला होता तेव्हां त्याला गाडण्यापूर्वी त्याच्या मुलानें आपली पितृभक्ति प्रदर्शित करण्यासाठीं आपलीं पांच बोटें तोडून त्यांस आपल्या पित्याच्या शवाबरोबर मूठमाती दिली ! अमेरिकेंतहि याप्रमाणेंच पितरांस व देवतांस अंगुलिच्छेद करून खूष करण्याचा प्रघात आहे. हाटेंटॉट लोकांत अशी चाल आहे कीं, एखाद्या बायकोचा नवरा मेला असला आणि तिच्या मनांत दुसरें लग्न करावयाचें असलें तर तिनें आपल्या बोटाचें पहिलें कांडें तोडून घेतलें पाहिजे. हा दुसरा नवरा मरून तिसरा करावयाचा असल्यास त्याच्या खालचें दुसरें कांडें दुसऱ्याच्या पिशाचास अर्पिलें पाहिजे, याप्रमाणें एका पाठीमागून एक हवे तितके नवरे करावे, प्रत्येका पाठीमागें बोटांचें एकेक कांडें गमविण्याची तयारी असली म्हणजे झालें ! याप्रमाणें पितृभक्ति किंवा भर्तृप्रेम दाखविण्यासाठीं हाताची बोटें गमावणें हें ज्या आमच्या लोकांत सतीचा प्रघात इंग्रजी होईतोंपर्यंत रूढ होता त्यांस हास्यास्पद किंवा बरुर वाटण्याचा मुळींच संबंध नाहीं. जिनें भर्तृशवाबरोबर अग्निप्रवेश केला तिची

काय थोरवी सांगावी ? तिच्या पुण्यप्रतापानें सासऱ्याच्या व माहेरच्या मागल्या व पुढल्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार होऊन, शिवाय खुद्द तिला त्याच भर्त्याशीं सात जन्म सहवाससुख ! पण हिंदु लोकांनीं असें समजूं नये कीं, अशा प्रकारच्या प्रेमप्रदर्शनांत आपणाहून श्रेष्ठ असें दुसरे लोक नाहींत ! हिंदुस्थानांत असा कोणताहि आचार नाहीं किंवा नव्हता, कीं ज्याच्या प्रतिमा दुसरीकडे दाखवितां येणार नाहींत. कांहीं बाबतींत तर हिंदुस्थानास लाज आणविणारे असे प्रकार इतर लोकांत रूढ आहेत. दूर कशाला, ही सतीची गोष्ट पाहिजे तर घ्या. माधवराव पेशव्याबरोबर फक्त रमाबाईच सती गेली. आफ्रिकेंत व अमेरिकेंत कांहीं रानटी लोक आहेत, त्यांचे राजे परलोकवासी झाले असतां त्यांच्याबरोबर त्यांच्या बायकाच तोडून पुरण्याचा प्रघात आहे. इतकेंच नाहीं, तर त्यांच्यासमवेत त्यांच्या आवडत्या व निवडक भावांस, गुलामांस व मंत्र्यांस व जनावरांसहि सती घालविण्याची चाल आहे. मेलेल्या पितरांस आंथरुणें पाहिजेत, गाई पाहिजेत, वडे पाहिजेत, तर घोडीं कां नकोत, कुत्रीं कां नकोत, गजिफाच्या पेट्या आणि बुद्धिबळांचे आणि सोंगटयांचे पट व त्या खेळण्यास लागणारे मित्र कां नकोत ? खरी प्रीतीच दाखवायचीं असेल, आणि मृताकरितां जें जें देण्यांत येतें तें तें त्याला पावतें व त्याचा उपभोग त्याला घेतां येतो हें खरें असेल तर अगोदर घरेंदारें जाळून टाकून मग आईबापांनीं मुलांबरोबर, मुलांनीं आईबापांबरोबर, बहिणींनीं भावांबरोबर व भावांनीं बहिणींबरोबर, राजानें प्रजेबरोबर व प्रजेनें राजाबरोबर, आणि मित्रांनीं एकमेकांबरोबर सती जावें, आणि येथल्यासारखाच पिशाचयोनींत सारा थाट उठवून द्यावा हें योग्य आहे ! बायकोनें नवऱ्यासाठीं स्वतःस जाळून घेणें हें उत्तम प्रेमाचें निदर्शक असेल तर त्याचें अनुकरण इतर सर्व संबंधांत होऊं लागणें यांत मनुष्यतेची केवढी उन्नति व्यक्त होणार आहे बरे ? आणि अशा प्रकारची उन्नति सार्वत्रिक झाल्यास येथील मनुष्यवस्ती नाहींशी होऊन जन्ममरणाचे क्लेश या पृथ्वीतलावर मनुष्यमात्रांत तरी न दृष्टीस पडूं लागल्यामुळें तिच्यावरील दुःखाचा किती भार कमी होणार आहे ? पण असें होत नाहीं. यावरून दिवसेंदिवस आम्ही नीच होत चाललों आहों, व खऱ्या प्रेमाचा आम्हांमधून लोप होत आहे,

असें म्हणणें जरूर नाहीं काय ? साक्षात् जाळून घेण्यानें ज्या प्रकारचें निकट प्रेम प्रदर्शित होतें त्याचा एक कोटयांश तरी आतां जे आचार रूढ आहेत त्यांनीं होत असेल काय ? असो; या सामाजिक आचारांचें राज्याचारांतहि अनुकरण होऊं लागतें, हें पहावयाचें असेल तर प्रस्तुतकाळीं चीनसारख्या जुन्या पद्धतीच्या देशांत अपराध्यांस कोणत्या प्रकारच्या शिक्षा देण्यांत येतात हें पहावें, व युरोपखंडांतील निरनिराळ्या देशांचे इतिहास वाचावे. कोणीं खोटें केलें तर त्याचें हात तोडावयाचे, कोणीं खोटी साक्ष दिली तर त्याची जीभ कापावयाची, कोणी स्त्री चपला निघाली तर तिचें नाक कापावयाचें किंवा तिच्या शरीराच्या निरनिराळ्या भागावर डाग द्यावयाचे; तसेंच कांहीं गुन्ह्यांबद्दल कान कापावयाचे, कांहींबद्दल पाय कलम करावयाचे, कांहींबद्दल डोळे काढावयाचे अशा प्रकारच्या शिक्षा सध्यां चिनांत सुरू आहेत, व पूर्वी येथें व युरोपांत अस्तित्वांत होत्या; आणि इंग्रजांचें राज्य येथें न होतें तर त्यांपैकीं बऱ्याच येथें सध्यांहि अमलांत असलेल्या दृष्टीस पडत्या. पण उत्तरोत्तर अशा शिक्षा क्रूर वाटूं लागून सौम्य शिक्षा देण्यानें मनुष्यांचीं नीति लौकर सुधारत जाते, असा अनुभव हळू हळू येऊं लागतो, आणि असल्या शिक्षा अगदीं मागें पडून सौम्य शिक्षा सर्वत्र अमलांत येतात. हा बदल क्रमाक्रमानें सर्व आचारांच्या संबंधानें होतो, व अखेरीस ज्या प्रकारानें कमींत कमी विकलांगता उत्पन्न होईल, व ती ज्याच्या कपाळीं आली असेल त्याला कमींत कमी वेदना सोसाव्या लागतील, असे प्रकार सामाजिक, धार्मिक, व राजकीय आचारांत रूढ होत जातात. अलीकडे लष्करी घोड्यांस खुणेसाठीं डागतात, हें सर्वांस ठाऊक आहेच; पूर्वी गुलामाच्या अंगावर मालकाच्या नांवाचा डाग देत असत. हाच प्रकार धर्मांत शिरला तेव्हां त्याच्या तप्तमुद्रा झाल्या. मग अर्थात् जो स्वामीस अधिक पैसे देईल त्याला ओल्या फडक्यावरच्या मुद्रा, जो पैसा न सोडील त्याला लालभडक मुद्रा, जी कोमलांगी असेल तिला ओझरत्या मुद्रा, जी हेडंबा असेल तिला प्रशस्त मुद्रा, असा परिपाठ पडणें किती स्वाभाविक आहे ? या मुद्रांप्रमाणेंच नाकांतील व कानांतील भोकांची गोष्ट होय. कोणी असें म्हणतात कीं, स्त्रिया स्वभावतः फार चंचल आहेत, म्हणून त्यांना अल्लड बैलाप्रमाणें

किंवा उंटाप्रमाणें थोड्या श्रमानें वागवितां येण्यासाठीं नथरूपी वेसणी त्यांच्या नाकांत घालावयाची चाल पडली! मुसलमान लोक आपल्या बायकांविषयीं विशेष दक्ष असल्यामुळें ते बायकांच्या नाकपुड्यांतील पड-द्यांत खाशी कडी बसवून देऊन तिच्या चंद्राकार परिघाचा खेळ तोंडावर होऊं देतात. ही नथ कधीं कधीं इतकी जड असते कीं, तिच्या ओझ्याने नाकाचा पडदा तुटून जाण्याची भीति पडून ती सांवरण्यासाठीं तिला एक दोरा लावून तो मागें बुचड्याला खेंचून बांधलेला असतो! कोणी म्हणतात कानानाकासही विंझे पाडण्याची पद्धत अलंकारशास्त्रप्रणीत आहे! असेल बापडी! येवढ्यानें अलंकारशास्त्राचें रहस्य पुरतें उमजत नसेल तर खालच्या वरच्या ओठांस चार किंवा पांच भोकें पाडून त्यांत बाळ्याबुगड्यांच्या व नथांच्या नवीन सवती अडकाविण्याचा प्रघात पडेल तर किती बहार होईल? तसेंच गुजराथी बायकांप्रमाणें दातांत सोन्यारुप्याच्या चुका मारून त्या ओठांतून बाहेर काढण्याचा प्रचार पडेल तर अलकारशास्त्रांत एक दोन नवीन उल्लास करून घातल्याचें श्रेय येणार नाहीं काय? असो; व्यवहारांत या बायकांच्या नथांतून केव्हां सुटूं ते सुटूं; येथें पाहिजे तेव्हां त्यांतून निस-टणे आमच्या ताब्यांत असल्यामुळें तसें करून दुसऱ्या एका अंगवैकल्याकडे वळतों. हें वैकल्य जगत्प्रसिद्ध आहे. याचा आरंभहि विजयलांछनापासूनच आहे. लढाईत धरलेल्या कैद्यांपासून संतानवृद्धि न व्हावी, घरांत ते वावरूं लागले असतां त्यांपासून स्त्रियांस भीति न रहावी यासाठीं गुलामांस बैला-प्रमाणें हतपुंस्त्व करण्याचा प्रघात यहुदी, फिनिशियन, मिसर, फ्रिजियन, पारशी, मुसलमान वगैरे अनेक रानटी लोकांत फार वर्षें रूढ होता, व अजूनहि तो अनेक रानटी लोकांत दृष्टीस पडतो. ज्याप्रमाणें तोडलेले हातपाय त्याप्रमाणें ही गुह्यांगें राजास नजर करणें हा आचार रानटी लोकांत पूज्य मानल्यामुळें, राजस्वरुप देवासहि तो अत्यंत प्रिय होत असेल असा तर्क करून, भक्तांनीं आपापल्या देवतांस आपण हे ऊन आपली किंवा दुसऱ्यांची सबंध गुह्यांगें किंवा त्यांचें कांहीं भाग अर्पण करण्यास तयार होणें हें किती स्वाभाविक आहे? ज्या इंद्रियामुळें सर्व सुखांत अत्यंत प्रिय सुखाची प्राप्ति होत असून जातिप्रवाह अव्याहत चालतो, त्याहून देवतेला नजर करण्यास

विशेष महत्त्वाची वस्तु कोणती असणार? आपल्याकडे कोणी सूर्यास हात वाहतात, कोणी पाय वाहतात, कोणी दुसरा कांहीं अवयव वाहतात, पण सुंतेवाल्यांनीं आम्हां सर्वांस हटविलें आहे असें कबूल केलें पाहिजे! युरोपियन लोकांत जसा बापतिस्मा, आमच्या लोकांत जशी मुंज, तसा मुसलमान व इतर लोकांत हा सुंत्याचा संस्कार प्रमुख होऊन बसला आहे. सुंता हा पूर्वीच्या कृत्रिम नपुंसकत्वाचें सौम्य रूप आहे. असो. विषयाच्या ओघांत या अमंगळ आचारांविषयीं आम्हांस इतकें स्पष्टपणें लिहावें लागलें याबद्दल वाचकांचो क्षमा मागून दुसरीकडे वळतो.

ज्याला आपण अलीकडे गोंदणें म्हणतों तेंही पराभूत लोकांवर पराभव झाल्याचें एक चिन्ह कायम करण्याचा मार्ग होतें. अलीकडे हें गोंदणें भूषण होऊन बसलें आहे, ही गोष्ट आम्हांस नाकबूल नाहीं. पण याची वंशावळ वरील सर्व आचारांच्या वंशावळीसारखीच आहे. शूर लोकांस शरीरावर अनेक वार लागले असून त्यांपासून जे डाग पडलेले असतात त्यांचें मोठें भूषण वाटतें व अशा डागांपासून उत्पन्न झालेली कुरूपता पुरुषांच्या सौन्दर्याची परीक्षा करण्याचा ज्यांचा विशेष अधिकार त्या स्त्रियांना ती कुरूपता न वाटतां, उलट ते डाग भूषणांसारखे वाटतात, व वाटणें नीट आहे. कारण ज्यांत जो गुण नसेल त्याला त्या गुणाचें मोठें कौतुक वाटतें. हा प्रकृतिनियम फार पूर्वीच्या तत्त्ववेत्त्यांच्या नजरेस येऊन गेला होता. स्त्रियांच्या अंगीं शौर्याभाव असल्यामुळें ज्याच्या शरीरावर शौर्याचीं चिन्हें ढळढळीत दिसत असतील त्याकडे स्त्रियांचें मन ओढणें हा नैसर्गिक प्रकृतिधर्म होय. असें नसतें तर डेस्डेमोना आणि ऑथेल्लो हें नाटक आपणांस पराकाष्ठेचें नीरस वाटलें असतें. असो. शरीरावर नानाप्रकारच्या रंगांच्या वेलबुट्ट्या काढण्याचा प्रकार आजमित्तीस रसिक लोकांत जरी भूषणावह मानिला असला, व 'प्रियाकुचतटीं' 'पत्रावली' काढण्याची रूढि भगवान् श्रीकृष्णापासून जरी आम्हांपर्यंत आली असली, तरी गोंदण्याची, मूळ पद्धत जिंकलेल्या लोकांवर पराभवाची कांहीं तरी टिकाऊ निशाणी ठेवून देण्याच्या बुद्धीनें शोधून काढली असावी, असें मानण्यास विपुल पुरावा आहे. आमचीं उभीं आडवीं गंधें व आमच्या बायकांचीं

निरनिराळ्या तऱ्हांचीं कुंकवें, आमच्या गोपीचंदनाचे टिळे, आमच्या वैष्णवांच्या कृष्णरेषा, आणि आमच्या शैवांचें भस्मार्चन–हीं सारीं दास्यसूचक चिन्हें आहेत, असें वाटतें.

आतां आणखी एका आचाराविषयीं अल्प उल्लेख करून हें बरेंच लांबलेलें **व्यवच्छेदनप्रकरण** आटपतों. हा आचार केशवपनाचा. सध्या या शब्दाचा विशिष्ट अर्थ होऊन गतभर्तृकांच जें वपन त्यासच केशवपन म्हणण्याची चाल पडली आहे. बाकी पुरुषांच्या वपनास केशवपन कां म्हणूं नये हें समजत नाहीं. तथापि त्याबद्दल आम्ही वाद करीत बसत नाहीं. क्षौर हा दुसरा सामान्य शब्द चालण्यासारखा आहे. मृतपूर्वजांविषयीं व त्यांपासून उत्पन्न झालेल्या देवतांविषयीं, आणि अगदीं जवळचे आप्त मेले असतां त्यांविषयीं आपलें प्रेम प्रगट करण्याकरितां केशांचें मुंडन करण्याचा विधि फार पुरातन व सार्वत्रिक आहे. ग्रीक लोकांत, रोमन लोकांत, अलीकडील ख्रिस्ती लोकांत सारांश बहुतेक सर्व लोकांत या मुंडनविधीचें लिंगभेदाप्रमाणें व आश्रमभेदाप्रमाणें कमीअधिक वर्चस्व दृष्टीस पडतें. कोठें दर महिन्यास किंवा पंधरवड्यास नखशिखांत वस्तरा चालविण्याची पद्धत आहे; कोठें कांहीं अपराधाबद्दल मिशा व पांपण्या काढण्याचीच चाल आहे; कोठें अर्धे डोकें, एक मिशी व अर्धी दाढी काढण्यांतच मोठी शिक्षा होतें असें मानतात; कोठें डोक्याच्या मध्यावर एक चंद्र केला म्हणजे काम होतें; कोठें प्रतिपौर्णिमेस व अमावास्येस एक बट ठेवून बाकीचें सारें डोकें व तोंड साफ करण्याचा प्रघात आहे; एकंदरीनें पहातां असें दिसून येतें कीं, शरीरावर वाढणाऱ्या या चीजेवर हवे ते प्रयोग केले तरी शरीराला म्हणण्यासारखी बाधा होण्याचा संभव नाहीं असें पाहून, तें करण्यास फारशी दगदग व खर्च पडत नाहीं असें मनांत आणून, आणि त्याचें पीक फिरून फिरून येणारें आहे असें जाणून, बरीच सुधारणा झाली असतां प्रत्येक राष्ट्रांत क्षौराच्या निरनिराळ्या तऱ्हांनीं जेवढें स्वामित्व, जेवढें प्रेम आणि जेवढी धार्मिकता व्यक्त करतां येईल तेवढी करण्याचा प्रघात पडतो, असें दिसतें. मिशावर ताव देऊन घर्षण करणें, किंवा 'आमच्या मिशा खालीं' असें म्हणून पड घेणें या सामाजिक आचारांत पुष्कळच इतिहास आहे! तेव्हां स्त्रियांचा केशकलाप

उतरून त्यांना पतिप्रेम प्रगटविण्यास लावणें किंवा पतीसमक्ष उत्तरहिंदुस्थानांत त्यांच्याकडून वेणीदान करविणें या अज्ञानमूलक पद्धति भरतखंडविशिष्टच आहेत असें नाहीं !

उपायन, कर व बलिदान : : ७

लॉर्ड लिटन् यांच्या कारकीर्दीत हिंदुस्थानच्या खजिन्यांत जी कोटी दीड कोटीची तूट पडली ती अफगाणिस्थानाच्या लोकांस दिलेल्या देणग्यांमुळें पडली, असें म्हणतात. जनरल रॉबर्टस् यांनीं कंदाहारवर कूच करून जात असतां, अफगाणी लोकांस जितकें आपल्या शौर्यानें तितकेंच आपल्या औदार्यानें जेरीस आणलें अशी त्या वेळेस लोकवार्ता होती. अफगाणिस्थानच्या डोंगराळ प्रदेशांतील लोक अगदीं निर्धन असल्यामुळें, जेव्हां आमचे कमँडर-इन्-चीफ कंदाहारच्या वाटेवर दोहों बाजूंस तोडे फेकीत चालले तेव्हां त्या लोभी कडव्या लोकांचें लक्ष ते गोळा करण्यांत व वांटून घेण्यांत व्यग्र होऊन गेलें, आणि आमच्या सेनापतीस अडथळा न होतां आपला मार्ग सुधारतां आला ! या कर्णोपकर्णीं आलेल्या वार्तेत तथ्य असो किंवा नसो, तीवरून एक सामान्य सिद्धांत अशा निघतो कीं, उपायनांनीं शत्रूंस कांहीं अंशीं वश करून घेतां येतें; आणि असें होणें स्वाभाविक आहे. पारितोषिकें, वायनें, दानें, उपहार आणि नजरा हीं सर्व कसल्या तरी उपभोग्य वस्तूंचीं झालेलीं असतात. या उपभोग्य वस्तु प्राप्त झाल्या असतां ज्यांस त्या प्राप्त होतात त्यांनीं त्या देणारांवर सुप्रसन्न किंवा मेहेरबान व्हावें, हें स्वाभाविक आहे. शिवाय, अशा प्रकारच्या देणग्यांपासून आणखी एक गोष्ट व्यक्त होत असते ती ही कीं, त्या देणारा आपणास वचकतो असें त्या घेणारास वाटूं लागतें, आणि कांहीं अंशीं तें खरेंहि असतें. ज्या कुत्र्यास पारध करण्यास शिकविलेली असते त्याला एखादे दिवशीं कांहीं सांपडलें नाहीं, तर तो निदान झाडाचें वाळलेलें पान किंवा एखादें चिपाड तरी तोंडांत धरून

शेंपूट हालवति हालवीत मोठ्या लाडानें धन्यास खूष करण्याचा प्रयत्न करील. यावरून काय दिसतें कीं, अप्रबुद्ध प्राण्यांत सुद्धां अशा रीतीनें वरिष्ठांची मर्जी सुप्रसन्न ठेवण्यास आपणांकडून होण्यासारखी खटपट करण्याची नैसर्गिक प्रवृत्ति आहे. आम्हीं मनुष्यें एकमेकांस ज्या देणग्या देतों त्या मुख्यतः दोन कारणासाठीं देतों. तीं कोणतीं म्हणाल तर. कोपशमन आणि स्नेहसंपादन. ज्याला कांहीं द्यावयाचें तो आपला शत्रु असल्यास त्यानें वैर विसरून जाऊन कोणत्याही प्रकारची पीडा देऊं नये अशा हेतुनें किंवा जो मित्र असेल त्यानें प्रसंगविशेषीं उपयोगी पडावें म्हणून आपण पदरमोड करून व स्वतःस झीज लावून घेऊन कधीं कधीं शत्रूंस व मित्रास नजरा पाठवितों. एकदां अशा कारणास्तव नजरा पाठविण्याची चाल रूढ झाली म्हणजे त्या कितीहि अल्प मोलाच्या किंवा शुष्क असल्या तरी चालतात. फार काय सांगावें, अशा कामास एखादा खडा, गवताची काडी, तुटलेला केंस, किंवा लाकडाची ढलपीसुद्धां बस होतें. पेरू येथील डोंगरांवर ओझीं वाहणारे हमाल डोंगराच्या माथ्यावर येऊन पोहोंचले, म्हणजे ओझी उतरुन टाकतात, आणि शैलाधिपति पचकामक देवास अशी प्रार्थना करितात कीं, "हे प्रभो, त्वां आम्हांस या ओझ्यासकट सुरक्षितपणें वर आणिलें, याबद्दल आम्हीं तुझें फार आभारी आहों- व या तुझ्या उपकारांतून मुक्त होण्यासाठीं हें आम्हीं आपल्या भिंवईचे केंस तुला अर्पण करतों"– असें म्हणून प्रत्येकजण आपापल्या भिंवईचा एकेक केंस उपटून टाकतो! या देशांतहि कित्येक ठिकाणीं डोंगर चढून गेल्यावर खडा उचलून टाकण्याची वहिवाट आहे, व अशा खड्यांचें मोठमोठाले ढीग जमलेले आहेत, हें पुष्कळांच्या पाहण्यांत व ऐकण्यांत आलें असेल. देणग्या देणें आणि त्या घेणें हा आचार प्रथम दोन अथवा अधिक विषम व्यक्तींत सुरूं होतो, व पुढें तो समव्यक्तींतहि पसरत जातो. कुळांनीं जमिनीच्या मालकांस, प्रजांनीं राजास, भक्तांनीं देवांस, शिष्यांनीं गुरूंस–अशा रीतीनें दक्षिणा देण्याचा आणि घेण्याचा प्रघात पडतो. पुढें एका दर्जाच्या मित्रामित्रांतहि त्या देण्याघेण्याचा प्रघात पडतो. दसऱ्याचें शुष्क सोनें थोर लहानांस व लहानथोरांस देतात व घेतात. संक्रांतीच्या 'शर्करावगुंठित' तिळांचीहि तशीच स्थिती आहे. पण

वाढणी पाठविणें, लग्नास किंवा मुंजीस आहेर देणें, दिवाळीस ओवाळण्या घालणें, आंब्याच्या डाल्या धाडणें, एकमेकांच्या मुलांस फटाकड्याच्या पेट्या आणि गांठ्या पाडवून देणें–हे आचार बरोबरीच्या लोकांत चालतात. सुधारकाच्या एडिटरांनीं लॉर्ड रे साहेबांस अफुसाचें कांहीं निवडक दाणें पाठविले आणि ते त्यांनीं स्वीकारले, किंवा लेडी रेनें मिसेस आगरकरणीस बाळंतविडा पाठविला, असें होण्याचा संभव नाहीं ! अशा प्रकारची देवघेव सर जेम्स फर्ग्युसन आणि सरदार रा. ब. रास्ते किंवा लेडी रे आणि अक्कलकोटच्या किंवा दुसऱ्या एका संस्थानच्या राणीसाहेब–अशांच्या दरम्यानच होऊं शकणार. अशा प्रकारच्या देणग्या ज्यांच्यामध्यें चालतात ते परस्परांस एका पदवीचें समजत असून, त्यांचा एकमेकांशीं पुष्कळ घरोबाहि झालेला असतो. नहाणाच्या हळदकुंकवाचें बोलावणें भलत्याच घरीं जावयाचें नाहीं, व भलत्याच ठिकाणचें वाढणें यावयाचें नाहीं !

येथपर्यंत या आचाराच्या सामाजिक स्वरूपाचें दिग्दर्शन झालें. आतां याला राज्यप्रकरणांत व धर्मप्रकरणांत कसें वळण लागतें हें थोडक्यांत दाखवूं. वर दर्शविल्यासारखे सामाजिक आचार रूढ झाले म्हणजे त्यांपासून समाजस्थितीस अनुसरून राज्याचार व धर्माचार पडूं लागतात. ज्या लोकांची स्थिती पशुतुल्य आहे व ज्यांना देवतांची किंवा पिशाचांची कल्पना नाहीं, अशांत देवतांस किंवा पिशाचांस बलि मिळण्याचा संभव नाहीं हें उघड आहे, पण त्यांच्या कल्पना येऊं लागल्या कीं, त्या संबंधानें या आचारांचा प्रादुर्भाव होतो, देवता आणि राजा या दोहोंपैकीं उपायानें कोणास देण्यांत येऊं लागतात, याचा निश्चय बरोबर करतां येत नाहीं; तथापि केवळ वन्यावस्थेतून पार पडलेल्या उत्तरध्रुवाजवळच्या एस्किमो लोकांसारख्या लोकांच्या स्थितीवरून असें दिसतें कीं मनुष्याच्या मनांत राजाच्या आणि राज्याच्या कल्पना येण्यापूर्वी पिशाचांच्या व देवतांच्या कल्पना येऊं लागणें शक्य आहे. म्हणून कर, खंडणी, करभार यांच्या अगोदर बलिप्रदानें अस्तित्वांत येण्याचा संभव आहे. तसेंच हेहि ध्यानांत ठेवण्यासारखें आहे कीं, ज्याप्रमाणें देवतांच्या व पिशाचांच्या कल्पना येण्यापूर्वी त्यांस बलि देण्याचा प्रचार पाडण्याचा संभव नसतो, त्याप्रमाणें ज्या लोकांत 'राजा' म्हणून कोणी एक इतरांहून कमी-

अधिक श्रेष्ठ मानलेली अशी व्यक्ति जेथपर्यंत अस्तित्वांत आलेली नसते तेथपर्यंत त्या लोकांत राजभाग, राजांश, सरकारदेणें, कर, खंडणी, सरकार-दंड असल्या कल्पना किंवा तदनुरोधी विचार अस्तित्वांत येण्याचा संभव नाहीं. पुनः याच विचाराच्या ओघांत असतां वाचकांच्या लक्षांत हेंही येऊन जाईल कीं ज्या देशांत एकसत्ताक राज्य कधींच स्थापण्यांत आले नाहीं, किंवा आलें असून जेथें लोकसत्ताक राज्याची लौकरच स्थापना झाली अशा देशांत या राजकीय देणग्यांची जी पद्धत असते ती ज्या देशांत एकसत्ता फार प्रबल आहे अशा देशांतील राजोपहारपद्धतीहून पराकाष्टेची भिन्न व क्षीण असते. पाटिलकुलकरण्यांनीं हस्ते गोळा करून नेमल्या तारखेस तालुक्याच्या मामलेदार कचेरीत पोतें हजर करणें-ही अलीकडील कर घेण्याची पद्धत पूर्वीपासून अमलांत आहे, असें समजणें फार मोठी चूक आहे; तसेंच असले कर गोळा करण्यासाठीं आतांच्या मामलतदारांसारखे दोन-दोनशें रुपये दरमहाचे अधिकारी फार प्राचीन कालापासून आपापल्या राजासाठीं कर गोळा करीत आहेत, असें समजणें हेंही चूक आहे. समाज अत्यंत संकुचित किंवा मर्यादित असला, आणि त्याला नाण्याचा उपयोग ठाऊक नसला, म्हणजे त्यांत अशा प्रकारें राजभाग जमविण्याची चाल कोठून असणार? समाजाच्या प्रथमावस्थेंत राजा म्हणजे एक विशेष बलवान् व चतुर पुरुष असतो. समाजांतल्या समाजांत जे तंटेबखेडे होतील ते मध्यस्थ होऊन कधीं बुद्धिबलानें व कधीं बाहुबलानें तोडणें, व दुसऱ्या जातीचा हल्ला आला असतां स्वजातीचें पुढारीपण पत्करून त्या अरिष्टांतून तिचा बचाव करणें-हें राजाचें मुख्य कर्तव्य. अशा समाजांत सामान्य प्रजेच्या आणि राजाच्या बाह्य स्थितींत म्हणण्यासारखें अंतर नसतें. राजाला तिन्हाइतांचें व अग्रणींचें काम करावें लागत असल्यामुळें तो इतरांहून थोडासा श्रेष्ठ गणला जात असतो, व त्याच्या आणि त्याच्या कुटुंबाच्या चरितार्थासाठीं समाजांतील प्रत्येक घरांतून कांहींना कांहीं तरी पोहोंचवावें लागत असतें. जो जे पिकवीत असेल; किंवा ज्याचा जो धंदा असेल त्यानें त्यानें आपल्या उत्पन्नाचा कांहीं भाग स्वसंतोषानें राजाला आणून द्यावा, अशी रीत प्रथम पडते, व पुढें या रीतीतील स्वातंत्र्य नाहींसें होऊन सत्ताधीनत्व येतें. तथापि जोंपर्यंत राष्ट्राचें क्षेत्रफळ संकुचित असून

त्यांतील लोक संख्या एका जातीची व मर्यादित असते, तोंपर्यंत हें सत्ताधीनत्व फारसें कठिण वाटत नाहीं. परंतु एका जातीचा दुसऱ्या जातीशीं संग्राम होऊन मिश्र समाज उत्पन्न झाला व राष्ट्राचा विस्तार आणि लोकसंख्या हीं वाढली म्हणजे ही सत्ताधीनता जाचूं लागते. अखेरीस जेव्हां हिंदुस्थानसारखा प्रचंड देश मोंगलासारख्या एखाद्या शूर लोकांच्या अंमलांत येऊन त्यांत जिंकणारे आणि जिंकलेले असे दोन ठळक वर्ग होतात. तेव्हां राजास कारभार देणें हें स्वसंतोषाबर बिलकुल अवलंबून राहीनासें होतें. बाबरासारख्या किंवा अकबरासारख्या सुद्धां एकट्या बादशहास येवढ्या देशावर राज्य करणें अशक्य असल्यामुळें त्याला ठिकठिकाणीं आपल्या प्रतिनिधींची स्थापना करावी लागते. या प्रतिनिधींनाहि आपापले मुलूख आवरण्यासारखे नसल्यामुळें पोटप्रतिनिधि नेमावे लागतात. याप्रमाणें सार्वभौम बादशहापासून पेट्याच्या तहशीलदारापर्यंत एकाहून एक उतरत जाणाऱ्या अधिकाऱ्यांची परंपरा लागत जाते, आणि हें सर्व जिंकणाऱ्या लोकांपैकीं असल्यामुळें त्यांचा अंमल मोठ्या सक्तीनें चालतो. प्रत्येकास आपला व आपल्या तैनातीचा खर्च भागवून शिवाय वरच्या अधिकाऱ्यास बराच ऐवज प्रतिवर्षी भेट किंवा खंडणी म्हणून पोहोंचवायाचा असतो; व ज्याच्याकडून विशेष खंडणी येईल त्याची बादशहाच्या दरबारांत तारीफ होऊन त्याची विशेष बढती होण्याचा संभव असल्यामुळें, व ज्याच्याकडून कमी खंडणी येईल त्यावर इतराजी होऊन त्याला बडतर्फी मिळण्याचा संभव असल्यामुळें जो तो आपापल्या ताब्यांतील लोकांस जितकें नाडवेल तितकें नाडून आपली व बादशहाची तुंबडी जितकी भरवेल तितकी भरण्याचा प्रयत्न करीत असतो; आणि असें करण्यांत त्यास शस्त्रबलाचें भरपूर सहाय्य असल्यामुळें लोकांची पराकाष्ठेची जाचणूक होते. उत्पन्नाचा अमुकच वांटा राजभाग, असा निर्बंध अशा स्थितींत बिलकूल चालत नाहीं. राजकिंकर जितकी माया मिळेल तितकी काढीत असतात. अशा प्रकारच्या संमिश्र समाजांत नाणे चालू असलें म्हणजे राजभाग उत्पन्नरूपानें न घेतां द्रव्यरूपानें घेण्याचा प्रघात पडतो, व या प्रघातामुळेंही प्रजेस फार त्रास होतो. राजाचें मागणें असेल तेवढी रक्कम जिवाच्या व भावी सुखाच्या आशेनें आपला माल जाईल त्या दरानें

विकून उभी करावयाची, हें किती कष्टावह आहे बरें? तथापि अशा स्थितींतही मनुष्यें उत्पन्न करीत असतात व राजदेणें देत असतात! ब्रिटिश सरकारच्या पदरीं असलेल्या नोकरांचे पगार मोठे असल्यामुळें लांचलुचपतीचा प्रकार बेताबातानें चालतो. पूर्वी युरोपांत, अमेरिकेंत, व आशियांत सरकारी नौकरांस मुळींच पगार मिळत नसल्यामुळें, किंवा अगदीं लहान मिळत असल्यामुळें, त्यांना आपले पगार काढून शिवाय राजभाग काढावा लागत असे. यामुळें गांवच्या पाटलाकडून थेट बादशहापर्यंत ज्याला आपण अलीकडे लांच म्हणतो तो सर्वत्र राजरोस घेण्यांत येत असे. प्रसिद्ध इंग्लिश तत्त्ववेत्ता लॉर्ड बेकन याची लांचखाऊपणाबद्दल प्रसिद्धी आहे. त्यावर स्पेन्सर साहेबांचें असें म्हणणें आहे कीं, ही त्यावेळची रीतच होती. साऱ्याच न्यायाधिशांस व इतर अधिकाऱ्यांस अशा रीतीनें आपल्या पगाराचीं भरती करून घ्यावी लागत असें; व ती किती करावी याला कोणत्याही प्रकारची ठरीव इयत्ता नसल्यामुळें, कांहींकडून योग्य मर्यादेचें उल्लंघन होई यांत कांहीं नवल नाहीं. आमचेकडील कांहीं नेटीव संस्थानांत व कित्येक रेल्वे कंपन्यांत आज या स्थितीचें जिवंत उदाहरण सांपडेल. तात्पर्य काय कीं, प्रथमावस्थेंत स्वसंतोषानें देण्याचीं जीं स्वल्प राजोपायनें असतात त्यांपासून अखेरीस कर, तिजोरी, आणि नोकरांचे पगार या तीन गोष्टी उत्पन्न होतात.

हें राजकीय जमाबंदीचें प्रकरण नीट समजलें असतां, देवस्थानें आणि त्यांचीं उत्पन्नें कशीं अस्तित्वांत येतात, हें समजणें मुळींच कठीण नाहीं. सध्यां पृथ्वीच्या पाठीवर जे रानटी, अर्धवट सुधारलेलें व पूर्ण सुधारलेलें लोक आहेत त्यांच्या सांप्रत स्थितीचा आणि पूर्वापार इतिहासाचा विचार केला असतां स्पष्टपणें असें दिसून येतें कीं, ज्याला आपण सध्यां बलि म्हणतो, म्हणजे देवताभाग म्हणतो, त्याची उत्पत्ति सामान्य उपयनांपासून म्हणजे सामाजिक देणग्यांपासून झाली आहे. देवतांची कल्पना महापुरुषांच्या पिशाचापासून आली असल्यामुळें व पिशाचांचे व्यवहार जिवंत मनुष्याप्रमाणेंच चालतात असा प्राथमिक लोकांचा विश्वास असल्यामुळें ज्याप्रमाणें बैल, घोडीं, कुत्रीं, ससे, कोंबडी वगैरे जनावरें जिवंत राजास नजर करण्यांत येतात, त्याप्रमाणें तीं त्यांच्या थडग्यांवर त्यांच्या पिशाचांच्या चरितार्थासाठीं

कापण्यांत येतात; व त्याच पिशाचांपासून निर्माण झालेलें जें महापिशाच म्हणजे देव याच्या मंदिरांत म्हणजे देवळांतहि या प्राण्यांचा संहार करण्यांत येतो. शिजलेल्या अन्नाच्या राजास मेजवान्या देतात; तें त्यांच्या थडग्यांत किंवा चितेंत घालतात, आणि देवापुढें नैवेद्यरूपानें मांडतात; सदर्हू प्रमाणें नव्या-नवाळीची नझर जिवंत राजाला, मृत राजाला, व देवाला करतात. आवळे, चिंचा, मोहोर वगैरे देवास वाहण्याच्या प्रचाराची आठवण वाचकांस दिली पाहिजे असें नाहीं. दूध, तूप, मध, रस, ताडी, मदिरा, सोम इत्यादिकांचीं वायनें जशीं नृपतीला व मृतपितरांना त्याप्रमाणेंच देवांनाहि अर्पण करतात. ज्याप्रमाणें जिवंत राजापुढें व मृत पितरांपुढें, त्याप्रमाणेंच देवापुढेंहि धूपदीप जाळायाचे आणि गंधदान करावयाचें ! सारांश, राजा, राजवाडा आणि राजभाग; मेलेले पितर, थडगीं किंवा चिता आणि श्राद्धान्न; व देव देवालयें, आणि बलि अथवा नैवेद्य—या तीन त्रयींत पराकाष्ठेचें साम्य आहे. यांपैकीं पहिलीपासून दुसरीचे, आणि दुसरीपासून तिसरीचे विधि व आचार अनुकरणानें अस्तित्वांत आले आहेत. तेव्हां राजवाड्यांत ज्याप्रमाणें राजसेवकांचीं त्याप्रमाणें देवांच्या भोंवतीं गुरवांची, बडव्यांची, आणि गयावळांची गर्दी असते, आणि राजस्थानाप्रमाणें देवस्थानाचाही थाट उठून जाऊन तीं शेंकडों वर्षें अव्याहत चालतात, यांत कांहीं नवल नाहीं.

भेटी, देवदर्शनें, यात्रा : : ८

आपल्या भाषेंतील 'भेट' हा शब्द द्वयर्थी आहे. 'भेट' म्हणजे एकानें दुसऱ्याकडे जाणें, हा एक अर्थ. तसेंच जातांना देण्याकरितां बरोबर घेतलेलीं, किंवा न जातां एकानें दुसऱ्यास धाडून दिलेली जी वस्तु तिलाही 'भेट' म्हणतात. मागल्या लेखांत या दुसऱ्या अर्थाच्या भेटी पाठविण्याचा प्रघात कसा पडत जातो, हें सांगितलें आहे. आतां 'भेटीच्या' पहिल्या अर्थाच्या संबंधानें थोडेसें लिहावयाचें आहे.

उपायनें विशेषतः कनिष्ठाकडून वरिष्ठास देण्यांत येतात हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. तेव्हां हीं नेऊन देण्यासाठीं कनिष्ठांनीं वरिष्ठाचे घरीं जाण्याची चाल पडते हें स्वाभाविक आहे. राजाकडे किंवा देवाकडे रिक्त हस्तांनीं जाऊं नये, अशी सामान्य शास्त्राज्ञा किंवा फार प्राचीन कालापासून चालत आलेला संप्रदाय आहे. यावरून ज्या देशांत किंवा लोकांत राजसत्ता स्थापन झाली नाहीं, किंवा ज्यांना मेलेल्या आप्तांस किंवा त्यापासून निर्माण होणाऱ्या देवतांस बलिसमर्पण केलें पाहिजे, असें वाटूं लागलेलें नाहीं, त्यामध्यें एकानें दुसऱ्याकडे भेटण्यास जाण्याची चाल असण्याचा संभव नाहीं आतां भेट घेण्यांत नेहमीं 'मी तुमचा किंकर किंवा आज्ञाधारक सेवक आहें' असें दाखविण्याचाच हेतु असतो असें नाहीं. कनिष्ठांनीं वरिष्ठांविषयीं आपली निष्ठा प्रदर्शित करण्यासाठीं जाणें, हा भेटीचा मुख्य हेतु खरा. परंतु अलिकडे दुसऱ्याही अनेक कारणासाठीं एकमेकांच्या भेटी घेण्यांत येतात. आपणांपैकीं एखादा जिज्ञासु मनुष्य इंग्लंडांत गेला असतां स्पेन्सरसारखा तत्त्ववेत्ता किंवा ग्लॅडस्टनसारखा लोकाग्रणी घरीं वागतो कसा, अभ्यास करतो कसा, सामान्य लोकांशीं बोलतो कसा, वगैरे गोष्टी प्रत्यक्ष पहाण्याच्या इराद्यानें त्याला भेटण्यास जाईल; तसेंच कोणा एखाद्या मनुष्यास दुसऱ्याच्या वर्तनांत विशेष दोष दिसल्यास त्याला तो दाखविण्यासाठीं त्याची भेट घेणें इष्ट वाटेल; किंवा एखाद्या परोपकारी सुखवस्तु गृहस्थाला कोणी मनुष्य संकटांत पडला आहे असें समजल्याबरोबर त्यास मदत करण्याची बुद्धि होऊन त्याच्या घरीं जावेंसें वाटेल. तेव्हां अलीकडील प्रत्येक भेटींत प्रणिपातपूर्वक प्रभुभक्ति-प्रदर्शनाचा आशय असतो, असें म्हणतां येणार नाहीं. तथापि भेट घेण्याची मूळ चाल पडण्यास श्रेष्ठाला अभिवंदन करून त्याची मर्जी आपणावर सुप्रसन्न करून घेण्याची इच्छा कारण झाली असावी असें दिसतें.

उत्तर ध्रुवाजवळच्या एस्किमो सारख्या ज्या लोकांत राजपुरुष अस्तित्वांत आलेला नाहीं त्यांत भेटीचा संप्रदाय फार फार स्वल्प आहे किंवा मुळींच नाहीं, असें त्यांविषयीं चौकस प्रावाश्यांनीं प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून दिसतें. एकंदरीनें पाहतां भेटी घेण्याचा प्रचार मिश्र समाजांत फार दृष्टीस पडतो.

एकाच जातीच्या लोकांनीं आपल्यापैकीं एकास आपला राजा किंवा नायक केलें तरी त्याविषयीं आपली निष्ठा प्रगट करण्यासाठीं त्याला वारंवार भेटण्यास जाण्याची चाल पडत नाहीं, व त्यालाहि त्या गोष्टीची इतकी परवा वाटत नाहीं. पण मिश्र समाजाची तशी गोष्ट नाहीं. एका जातीच्या लोकांनीं दुसऱ्या जातीच्या लोकांस जिंकलें असतां जिंकणाऱ्या जातीच्या लोकांस, व विशेषतः त्यांचे नायक राजनिष्ठ आहेत किंवा नाहींत हें पहाणें विशेष अगत्याचें असतें. यामुळें मिश्र समाजांत मुख्य नायकास म्हणजे राजास किंवा बादशहास उपनायकांनीं म्हणजे मांडलिकांनीं वारंवार भेटण्यास जाण्याचा प्रघात पडतो. दिल्लीचे मोंगल बादशहा किंवा पेशवे मोठमोठाले दरबार भरवून मांडलिकांकडून नजराणे घेत व त्यांना पोषाख देत, हें सर्वांस ठाऊक आहेच. सध्यांही राणीच्या वाढदिवसास इलाख्यांचे गव्हर्नर व हिंदुस्थानचे व्हाइसरॉय दरबार भरवून कित्येकांस पोषाख व पदव्या देतात, आणि मधूनमधून नॉनऑफिशीअल लोकांच्या भेटी घेण्यासाठीं छोटेखानी दरबार किंवा लेव्ही करतात, त्यांचें इंगित तरी हेंच आहे. राजदरबारांत हजर राहून स्वामीस मुजरा करणें आणि नजराणा देणें यांत 'मी तुमचा दास आहें; मला तुमचा अंमल मान्य आहे, व मी तुमच्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची फंदफितुरी करण्यांत गुंतलो नाहीं' असें दाखविण्यासारखें होय; निदान भेटीस येणाऱ्याच्या बाह्य वर्तनावरून तरी तसें अनुमान करणें भाग पडतें. त्याच्या उलट, बोलावणें गेलें असून जो दरबारास आला नाहीं किंवा ज्यानें नजराणा पाठविला नाहीं अशाच्या मनांत कांहीं तरी पापबुद्धि उत्पन्न झाली आहे असा तर्क होऊं लागतो, व सर्व मांडलिकांस सक्तीनें दरबारांत बोलावून आणून त्यांच्याकडून नजराणें घेण्याचा आणि त्यांस राजधानींत कांहीं दिवस राहण्यास लावण्याचा प्रघात पडतो. या कामासाठीं बादशहा व राजाधिराजे पाहिजे तितका खर्च करण्यास तयार असतात; पण एकूणएक मांडलिकानें वर्षांतून एकदोन वेळ तरी राजदरबारीं येऊन आपली स्वामिभक्तीची हजीरी द्यावी, असें त्यांस वाटत असतें. पर्वोपर्यंत जपानांतील सरदारांस किंवा मांडलिकांस आपापल्या जहागिरींत वर्षांतील बारा महिन्यांपैकीं फक्त सहा महिने घालविण्याची परवानगी असे.

दुसरे सहा महिने त्यांनीं येड्डो येथें घालवून प्रपंचसुख अनुभवावें असा निर्बंध असे. प्रपंचसुख असें म्हणण्याचें कारण असें कीं, या सरदारांनीं बंडखोर न व्हावें म्हणून त्यांची बायकामुलें 'ओलीस' म्हणून नेहमीं राजधानींत ठेवलेलीं असत ! आपल्या मिजासखोर मोंगल बादशहांच्या अंमलांत तर या प्रचाराच्या हास्यास्पदतेची कमाल होऊन गेली होती. या बादशहांपैकीं कित्येकांच्या अमदानींत ठरीव सरदारांनीं दिवसांतून दोन वेळां म्हणजे सकाळीं अकरा वाजण्याचे सुमारास न्यायनिवाडा चालला असतां, व रात्रीचे देहाचे सुमारास राजकीय प्रकरणांची वाटाघाट होत असतां, तख्ताधिपतीस सलाम करण्यास आलेच पाहिजे. असा नियम असे ! कोणास ही कदाचित् अतिशयोक्ति वाटेल, पण जम्मु व काश्मीर येथें ही प्रात्याहिक द्विबार प्राणिपातपद्धति आज. मित्तीस जागृत आहे. तसेंच आमच्या एका मित्रानें एकदां आम्हांस असें सांगितल्याचें स्मरतें कीं, बडोद्यासारख्या इंग्रजी धर्तीवर आलेल्या संस्थानांतही असे कांहीं वृद्ध राजभक्त आहेत कीं, महाराज राजधानींत असोत किंवा नसोत, त्यांना वाड्यांत जाऊन महाराजांच्या गादीला निदान वाड्याला तरी, सकाळसंध्याकाळ मुजरा केल्याशिवाय अन्न गोड लागावयाचें नाहीं ! असो. ज्या ठिकाणीं सर्वोनीं मुख्य नायकास किंवा राजास भेटण्यास येण्याची सोय नसतें त्या ठिकाणीं त्यांनीं त्यांच्या प्रतिनिधिस व मंत्र्यांस भेटावे असें ठरविलेलें असतें; म्हणजे मांडलिकांनीं महाराजांस भेटावे व सामान्य लोकांनीं मंत्र्यांस भेटावें. असा नियम होतो; व हाच नियम थोड्याशा भेदानें येथेंहि जे दरबार प्रतिवर्षी भरविण्यांत येतात, त्यांत दृष्टीस पडतो.

मोठमोठे राजे आणि त्यांचे मांडलिक यांच्या अन्योन्य भेटीचा हा प्रकार झाला. त्यांचेंच अनुकरण इतर पदवींचे लोक करतात. कनिष्ठानें वरिष्ठास भेटण्यास जावें हा साधारण नियम; जर वरिष्ठ कधीं कनिष्ठास भेटावयास गेला तर तो अनुग्रह समजावयाचा. कर्जदारांनीं सावकारास, कुळांनीं जमीनदारास, पक्षकारांनीं वकिलास, शिष्यांनीं गुरूस, धाकट्या भावांनीं वडील भावास, मुलांनीं मातापितरांस, खालच्या अधिकाऱ्यांनीं वरच्या अधिकाऱ्यांस, व सांसारिकांनीं परमार्थरतास भेटण्यास जावें अशी पद्धत सर्वत्र पडली आहे व हिचें उल्लंघन चांगल्या कारणाशिवाय कोठेंहि होत नाहीं.

दसऱ्यासारख्या किंवा संक्रांतीसारख्या सणास प्रत्येक वर्गांतील मोठमोठ्या लोकांनीं बिलायती घालून व उजव्या किंवा डाव्या बाजूस पानसुपारीची ताटे ठेववून भेटीस येणाऱ्या मंडळींची वाट पहात बसावें, हा या सणास एकमेकांच्या भेटी घेण्याचा जुना प्रकार होय. यांत अलीकडे बरेंच अंतर झाले आहे, व पुढें याहूनहि अधिक होण्याचा संभव आहे. कारण सुधारलेल्या किंवा सुधारूं लागलेल्या देशांत एका प्रकारची समता वाढत असते, व या समतेमुळें एका पक्षाची पूजनीयता आणि दुसऱ्या पक्षाची पूजकता यांचा हळू हळू लोप होत असतो. समाजरचनेची आद्यबंधनें बलात्कारात्मक असतात व जोंपर्यंत किंवा ज्या बाबतींत हें बलात्कारत्व जारीनें अंमलांत असतें तोंपर्यंत व त्या बाबतींत त्या कनिष्ठांचा वरिष्ठांशीं वर सांगितल्याप्रमाणें व्यवहार चालतो. युरोपांतील सुधारलेल्या देशांत आजमित्तीस लष्करी खात्यांतील अधिकाऱ्यांचे एकमेकांशीं वागण्याचे जें नियम आहेत ते इतर खात्यांतील नियमांपेक्षा कमी सक्तीचे आहेत. ज्या देशांत एकसत्ता प्रबल असते त्यांतील आचारांची रहाटी बऱ्याच अंशी लष्कराच्या रहाटीसारखी असतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. एकसत्ता क्षीण होत जाऊन लोकसत्ता प्रबल होत गेली, आणि लोकांत ज्ञानाचा आणि संपत्तीचा बराच प्रसार झाला म्हणजे बलात्कारतत्त्व लयास जाऊन संमतितत्व तत्स्थानत्पन्न होतें, आणि तसें झाले म्हणजे सामाजिक व राजकीय आचारास समतेचें वळण लागू लागतें. धर्मसंबंधानेंहि अशाच प्रकारची स्थित्यंतरें होत जातात, पण त्यांस थोडासा आधिक काळ लागतो. धर्माचार राज्याचारांच्या अगोदर अस्तित्वांत येऊन त्यांचे वैरूप्यहि त्यापेक्षां सावकाशीने नाहींसें होतें. राजाच्या अगोदर देवाची कल्पना येत असल्यामुळें व देव हा राजाहुन मोठा मानिला असल्यामुळें राजाविषयीं पूज्यबुद्धि नाहींशी झाली तरी देवाविषयीं ती नाहींशी होत नाहीं, व राजे आणि रजवाडे पंचत्वाप्रत गेले तरी देवालयांत जाऊन प्रार्थना करावयाची पद्धत सुरूं असते. धर्मसंबंधाचें बरेंच ज्ञान वाढलें तर एवढाच भेद होतो कीं, शुद्ध पाषाणास किंवा मनुष्याकृति पाषाणमूर्तिस देव कल्पून, व त्यांचे ठाई मनुष्यस्वभावासारख्या देवस्वभावाची कल्पना करून, मनुष्याच्या अन्तर्बाह्य इंद्रियांस ज्या गोष्टींनीं समाधान व

आनंद होतात, त्याच गोष्टींनी शिलाकार देवतांसहि संतोष होत असेल असें मानणें बरोबर नाहीं असें वाटूं लागून, सजीव व निर्जीव पदार्थांच्या बलिप्रदानानें त्यांचें अर्चन करून त्यांस सुप्रसन्न करून घेण्याचा प्रघात मागे पडत जातो, व मूर्तिशून्य अशा मंदिरांत नियमित काळीं व दिवशीं निराकार परमेश्वरास प्रेमपूर्वक डोळे मिटून, हात जोडून, गुडघे टेकून, व प्राणिपात करून भजण्याचा व स्तवण्याची पद्धति सुरूं होते. ख्रिस्तीधर्म मुसलमानी धर्म व इंकडील कांही थर्मपंथ अशा प्रकारचे आहेत. मूर्तिपूजेचा लय होऊन निराकार ईश्वररूपाचें ध्यान होऊं लागणें हें धर्माचें बरेंच उन्नत स्वरूप होय यांत संशय नाहीं. तर हें स्वरूप त्यास प्राप्त झाले असतांहि, तदनुयायांस मूर्तिपूजा कालांत लागलेल्या साऱ्या सवयी नाहींशा होत नाहींत. ख्रिस्ती व मुसलमान लोकांनीं फक्त मूर्तिपूजा काय ती टाकली आहे; बाकी त्यांचे इतर धर्माचार बऱ्याच अंशीं आम्हां मूर्तिपूजकांच्या धर्माचारासारखेंच आहेत. जातप्रेतादिकांच्या संस्काराचें बंड जसें आम्हांत तसें त्यांतहि अद्यापि बरेंच आहे. धर्माधिकाऱ्यांचें वर्चस्व जसें आमच्या इकडील अज्ञ लोकांवर व स्त्रियांवर अजून जबर आहे, तसें तिकडेहि आहे. इकडील भाविक जसे प्रत्येक दिवशीं देवदर्शनास जातात, त्याप्रमाणें प्रत्येक दिवशीं मशिदींत जाऊन निमाज पडणारे व चर्चांत जाऊन प्रेअर करणारे भाविक त्यांच्यातहि आहेत. ज्याप्रमाणें देवास भेटण्यास व भजण्यास घरापेक्षां देऊळ विशेष सोईचें आहे असें आम्हांस वाटतें त्याप्रमाणें ख्रिस्त्यांस व मुसलमानांसहि वाटतें. पवित्र भूमीस यात्रा करण्याची उत्कंठा क्रूसवाल्यांच्या अंतःकरणांत एकदां जेवढी प्रबल होती तेवढी आतां नाहीं हें कबूल केलें पाहिजे, पण श्रीकाशीस जाऊं इच्छिणाऱ्या भाविक हिंदूंची संख्या मक्केस जाऊं इच्छिणाऱ्या महंमदीयांच्या संख्येपेक्षां जास्त असेल असें आम्हांस वाटत नाहीं; कदाचित् जातिभेदाच्या व परधर्मीयांकडून धर्मांतर करविण्याचा वगैरेसंबंधानें मुसलमान व ख्रिस्ती धर्मांस विशेष श्रेष्ठत्व आलें आहे असें कित्येकांचें म्हणणें असेल, व कदाचित् तें बरोबरहि असेल; त्याविषयीं आम्हांस कांहींएक म्हणावयाचें नाहीं. आमचें इतकेच म्हणणें आहे कीं, धर्मासंबंधीं सारतत्त्वें, ठोकळ समजुती, आणि सामान्य आचार आम्हां तिन्ही लोकांत सार-

खेच आहेत, व देवाच्या भेटीस जाण्याचा म्हणजे देवदर्शन घेण्याचा आचार आजमितीस आम्हांत जितका रूढ आहे तितकाच त्या दोन, मूर्तीस न भजणाऱ्या, लोकांतहि आहे. खिस्ती लोकांत अर्वाचिन ज्ञानप्रसारामुळें यात्रांचा नाद बराच कमी झाला आहे, व चर्चला जाणाऱ्यांची संख्याहि प्रतिवर्षी कमी होत आहे. ह्या स्थित्यंतरांच्या बरेवाईटपणाविषयीं अभिप्राय येथें देण्याचें कारण नाहीं. येथें इतकेंच सांगितलें पाहिजे कीं; ज्या ज्ञानामुळें खिस्ती लोकांच्या वृत्तींत असा बदल झाला आहे तेंच ज्ञान इकडे पसरलें, (व पसरणार याविषयीं यत्किंचितहि संशय दिसत नाहीं) तर या देशांतील लोकांच्या धर्मवृत्तींतहि तसें स्थित्यंतर होणें अपरिहार्य आहे.

पुण्याचें लोकांनो, सावध व्हा, सावध व्हा : : ९

आज सर्व महाराष्ट्रभर तुमची कीर्ति दुमदुमत आहे, ती कां ? तुमच्या आंगीं स्वदेशाभिमान, बुद्धिमत्ता, वक्तृत्व, स्पष्टवक्तेपणा, स्वातंत्र्य इत्यादि अनेक गुण वास करीत होते म्हणून ? कोणत्याहि शहरांतील कीर्ति त्यांतील सुशिक्षित जे पांचचार गृहस्थ असतात त्यांवर अवलंबून असते. त्याप्रमाणें तुमचीहि होती. परंतु आतां मात्र ती एका उदार, बुद्धिमान्, सहिष्णु, सुशील, परोपकारी व तुमच्याविषयीं रात्रंदिवस कळकळ बाळगणाऱ्या पुरुषांवर अवलंबून आहे. जर तुमच्या दुर्दैवानें अशा महंतास बाहेर जाणें भाग पडलें तर तुमची स्थिती होणार काय ? तुम्हांला तर चटोरपणाची, अपमान करण्याची, कृतघ्नपणाची इतकी संवय लागून गेली आहे कीं, थेट वामनरावांपासून तों विनाकारण बी. ए. पर्यंत असें करण्यांत तुम्हांला गौरव वाटतो. विद्येनें, अधिकारानें, संपत्तीनें, सहिष्णुत्वानें व इतर पुष्कळ नैसर्गिक गुणांनीं तुमच्याहून जे श्रेष्ठ त्यांची विटंबना करणें, अवहेलना करणें (व ती तरी कोणाकडून ? ज्या पोरांना विद्येचा गंध नाहीं, देशसुधारणा, देशसेवा, सामाजिक सुधारणा अशा विषयांवर ज्यांना मत देण्यास अधिकार पोहोंचत

नाहीं अशा पोरांकडून) यासारखें महत् पातक दुसरें कोणतें ? धडधडीत आज आपण डोळ्यांनीं पाहतों कीं पुण्यांतीला एक हिरा जर गमावला तर तसा किंवा तशासारखा दुसरा मिळणें म्हणजे कोण पंचाईत ! कृष्णशास्त्री, केरूनाना, विष्णुशास्त्री, माधवराव कुंटे असे लोक निघून काल एका पाठीमागून एक बलात्कारेंकरून नेत आहे. अशा लोकांच्या मरणानें समाजबंधनाच्या अत्यावश्यक सांखळ्या अचानक गळून पडताहेत. अशी स्थिति असतां अजून देखील तुम्हीं जागें होऊं नये काय ? अशा खिंडी तुमच्या शहरांत पडतांना पाहून तुम्ही स्वस्थ बसणें, किंवा झालेल्या स्थित्यंतराची कल्पना सुद्धां तुमच्या मनांत न येणें हें कोणाच्या स्थितीचें दर्शक होय बरें ? अशी कल्पना करा कीं गांवांत एक परदेशाहून विद्वान मनुष्य आला व त्याला इकडील वादग्रस्त विषयावर माहिती करून घ्यावयाची असेल तर तुमच्या गांवांत पांचचार लोक आहेत कां, कीं ज्यांचीं मतें कांहीं विषयावर ठाम झालीं आहेत ? वाचाळपणा पुण्यांत तर इतका माजला आहे कीं, वाटेल त्यानें वाटेल त्या विषयावर बोलावें व यथेच्छ तोंडसुख घ्यावें ! असा पुरुष एखादा सांपडेल कीं जो विषयासंबंधानें पूर्ण माहिती मिळवून बोलेल. बाकी केनसाहेबांसारखे लोक येवोत, आमची पुण्यांतील मंडळीं त्यांच्याजवळ सुद्धां बाता झोडायला तयार ! फॉरेस्टसंबंधानें माहिती विचारा कीं उठलेच आमच्यांतले एखादे व दिली माहिती २।३ वाक्यांत ठोकून ! अबकारी खात्यासंबंधानें काय, जमाबंदी काय, मिठासंबंधानें काय, माहिती म्हणजे ओतप्रोत. माहिती इतकी भरपूर कीं, वर्तमानपत्र चालविण्याची तर कधींच पंचाईत पडत नाहीं.

पुण्यांतील लोकांना, ज्यांना ज्यांना म्हणून तुमची आंतली माहिती आहे ते सर्व तुमची दिखाऊ विद्वत्ता पाहून गालांतल्या गालांत हांसतात. कांहीं लोकांना तर तुमचा वृथाभिमान, पोकळ गर्व व वरकांती विद्या पाहून तिटकारा येतो. बरें इतकेंहि असून बढाई कोण ? ह्याला काय येतें, त्याला काय येतें, तो कोण शहाणा, त्याचेंच कां ऐकावें अशी तर घमंडी. विचारवैचित्र्य व विचारस्वातंत्र्य यांशिवाय मनुष्याची उन्नति व्हावयाची नाहीं हें खरें, परंतु एवढ्यांचकरितां मनुष्यानें बहकत सुटणें हें माणुसकीचें काम नव्हे. केवळ

विषयांची पूर्ण माहिती म्हणजे विषयसर्वस्व नव्हे, हीही गोष्ट प्रत्येकानें ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. ही झाली शिक्षण मिळालेल्या लोकांची स्थिति.

मध्यम प्रतीचे शिक्षण मिळालेल्या लोकांची स्थिति याहूनहि भयंकर आहे. मोठ्या माणसास भरसभेंत बेजबाब करणें, वडील माणसांचा मान न राखणें, अश्लील शब्द उच्चारणें, अर्थाचा अनर्थ करणें ह्या गुणांचें आदिपीठ पुणें शहर होऊन बसलें आहे. पुण्यांतील लोकांनो, अजून तरी जागें व्हा. आम्हीं पुण्यपत्तनवासी आहोंत असें म्हणण्याची देखील लोकांस शरम वाटूं लागली! बाहेर गांवच्या लोकांना तुमची किंमत कळून चुकली. ऐरिश लोकांना जसा कोअर्शन ॲक्ट तसा येथील लोकांना लावला तर कांहीं चांगला परिणाम झाला तर होईल. कांहीं सुशिक्षित लोकांचा असा समज आहे कीं, हा परिणाम शिक्षणाचा नव्हें. इतिहासांत हें शिक्षण मिळतें, कां गणितांत मिळतें, कां रसायन शास्त्रांत मिळतें. असें ते विचारतात. त्यांना उत्तर एवढेंच आहे कीं, तें हिराबागेत मिळतें, हल्लींची पुण्याची स्थिति आफ्रिकेतील कोणत्याहि रानटी शहरांपेक्षां अधिक चांगली आहे असें म्हणावयाला आज कांहीं जागा नाहीं. कोणत्याहि संभावित मनुष्याला किंवा स्त्रीला तुमच्या शहरच्या समाजापुढें येऊन बोलावें असें कधींहि वाटणार नाहीं. तुम्हीं हां आपली भयंकर स्थिति ओळखून सुधारण्याचा प्रयत्न न कराल तर याचा परिणाम याहूनही भयंकर होईल. मुळीं हिच स्थिति सुधारण्याला पांचचार वर्षें लागतील. ज्यांना ज्यांना म्हणून पंडिता रमाबाईचे हिराबागेंतील व्याख्यानाची आठवण होईल त्यांच्या अंगांवर रोमांचच उभे राहतील व पुण्यांतील उच्च प्रतीचें ब्राह्मणाला विद्येनें अतिशय मागासलेल्या लोकांत सांपडणाऱ्या अश्लील शब्दांचें बाळकडूच दिलें आहे अशी पक्की खात्री होईल. स्त्रीशिक्षणास लोकांची संमति असो किंवा नसो, ६०-७० कोसांवरून ह्या विदुषीबाई इतर देशांत स्त्रियांनीं कसकसे पराक्रम केले हें सांगण्यास मुद्दाम आल्या, पण त्यांचें भाषण सावधान चित्तानें ऐकून घेण्याइतका देखील सभ्यपणा पुण्यांत (जें विद्येचें माहेरघर असें लोक म्हणतात!!) नसावा ही गोष्ट फार लाजिरवाणी आहे. शहाण्या लोकांची अशी समजूत आहे कीं, पुरुषसमाजामध्यें स्त्रिया असल्या म्हणजे पुरुषांवर एक प्रकारचा दाब असतो. अनीतीचें शब्द स्त्रियांपुढें

उच्चारण्यास त्यांस शरम वाटते. पण आमच्या पुण्याची स्थिति त्याहून अगदीं उलट; कारण पुण्याचे लोक पडले फार शहाणे. अशा वेळीं त्यांच्या नीतीला उमाळा फुटतो.

जोंपर्यंत स्त्रीजातींविषयीं स्त्रियांच्या असाधारण गुणांबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न झाली नाहीं, जोंपर्यंत स्त्री म्हणजे प्रजाजननयंत्र होय, जोपर्यंत स्त्री तुमची दासी होय, तोंपर्यंत हा उद्दामपणा व बेशरमपणा जाणें फार कठीण आहे. लोकशिक्षणाकरितां ज्यांचें जनन अशी पुण्यांतील कांहीं वर्तमानपत्रें निलाजरेपणाच्या व तिरस्करणीय कृत्यांवर पांघरूण घालतात, व कांहीं तर पाठ थोपटतात व म्हणतात कीं, वाहवारे बच्यांनो, गाजविलीत आज, राखलीत बाजू!! धन्य तुमची!! आज आपल्या शहराचा व मातापितरांचा उद्धार केलात. कोण भयंकर स्थिति ही! ज्ञानप्रकाश सारखे म्हणतात कीं, जरी बागेंत दाटीमुळें गडबड झाली तरी लोकांचें वर्तन कांहीं वाईट नव्हतें. बरोबर आहे. दाटी होती म्हणून अश्लील शब्द पोरें बोलली व शहाणें लोक (!!) हांसले!!! बाकी पुण्याचे लोक फार गरीब व नितिमान!! असो. ज्ञानप्रकाश जेथें पडतो तेथें ही स्थिति! जर लोकांना खरोखर त्या सर्व गोष्टींबद्दल वाईट वाटत असलें, जर त्यांना आपल्या मुलाबाळांची काळजी असली, व जर आपल्या जुनाट व नामांकित शहराची कीर्ति राखावयाची असली तर, लवकर जागे व्हा, व आपली शोचनीय स्थिति सुधारा.

आमची एक दुष्ट खोड : आळस : : १०

आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ॥

समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक व्यापारवृद्धि आहे, व ती होण्यास उत्पादक उद्योग वाढला पाहिजे, हें मागें सांगितलें. पण दुर्दैवानें आमच्या येथें उत्पादक उद्योगाविषयींच रड आहे असें नाहीं; अनुत्पादक उद्योगाची सुद्धां आम्हांस म्हणण्यासारखी हौस नाहीं. आपण ज्या स्थितींत उपजलों

असूं ती स्थिति कसेंहि करून आपणांस कायम ठेवतां आली म्हणजे आपण कृतकृत्य झालों असा आपल्यापैकीं बहुतेकांचा समज असतो. असलेल्या स्थितींहून चांगली स्थिति यावी, अशी इच्छा करणारे पुष्कळ आहेत, पण ती प्राप्त होण्यासारखे परिश्रम करणारे इसम शेंकडा पांच सुद्धां मिळणार नाहींत. उत्पादक श्रम म्हणजे काय; राष्ट्राची संपत्ति वाढण्यास त्या श्रमांची आवश्यकता किती आहे; वगैरे गोष्टी सुधारलेल्या राष्ट्रांतील साऱ्यांच लोकांस समजत असतात असें नाहीं; पण त्या सर्वांत एक विशेष दिसून येत असतो. तो हा कीं, तेथील वयांत आलेला प्रत्येक इसम रात्रंदिवस कष्ट करण्यांत चूर होऊन गेलेला असतो. लोकांत उद्योग करण्याची हौस व संवय असली म्हणजे त्यांच्या उद्योगास चांगलें वळण लावून देऊन तो फायदेशीर होईल असें करणें कठीण नाहीं. तें काम विचारी लोकांचें आहे, व तें त्यांस सहज करतां येतें. पण सारी जी अडचण येऊन पडते ती आळसांत मौज वाटणाऱ्या लोकांस ती वाटेनाशीं कशी होईल, येथें आहे. मागल्या लेखांत असें म्हटलें आहे कीं, आमच्या लोकांस अंमलदारीचा फार शोक आहे. केवळ उद्योगदृष्टीनेंच पाहिले तर हा शोक दूषणीय आहे असें नाहीं. जर्मन लोकांनाहि सरकारी नोकऱ्यांचें असेंच वेड आहे. पण त्यांत व आम्हांत जो मोठा भेद आहे तो हा कीं, व्हॉन जेफकेन् सरकारी नोकर असला तरी सकाळपासून संध्याकाळपर्यंत इराणी वारूप्रमाणें जिवाकडे न पाहतां काबाडकष्ट करीत असतो! आमच्या लोकांची तशी गोष्ट नाहीं. आमच्या सेवाचिकीर्षु उमेदवारांत जी थोडीशी उद्योगपरायणता दिसून येते ती कोठपर्यंत? तर अंमलदारीचा हुकूम मिळेतोंपर्यंत. "अमक्या अमक्या ठिकाणीं तुम्हांस सबजज्ज किंवा मामलतदार नेमिलें आहे" असा हुकूम हातीं पडला कीं, आमच्या इकडील सरकारी नोकरांच्या रावसाहेबी खाक्यास आरंभ झाला! नौकरीवर रुजू होण्यापूर्वी पहिला विचार काय कीं, परीक्षेंत पास होण्यासाठीं कुटून काढलेल्या पुस्तकांची वाट कशी लावावी? कां तीं कोणास देऊन टाकावीं, कां त्यांचा गठ्ठा करून तो कोठें-तरी गाडून टाकावा, कां त्यांची आताराच्या घरीं रवानगी करावी, कां त्यांचा पाण्यानें किंवा विस्तवानें मागमूस नाहींसा करावा? यांपैकीं एखाद्या

पद्धतीनें ज्यांच्या समागमांत रात्रींच्या रात्री घालविल्या, व ज्यांना पोटच्या पोराप्रमाणें हातावर व पोटावर खेळविलें, आणि ज्यांच्या साहाय्यानें दोन पैसे कमाविण्याची अक्कल आली, त्यांची वाट लावल्यावर नोकरीवर हजर व्हावयाचें ! आणि ही हाजिरी मंजूर होऊन सरकारी गॅझेटांत नांव दाखल झालें कीं, संसारसमरभूमींत आपण विजयाचा झेंडा लाविला, असें या नादान वीरांस वाटतें. येथून पुढें केलेल्या कष्टांचें फळ भोगण्याशिवाय, आपणांस कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं, अशी त्यांची वृत्ति होतें, सुखोपभोगाशिवाय दुसरें कांहीं करावयाचें नाहीं असा त्यांचा निर्धार होतो. आधुनिक सुशिक्षित तरुण सरकारी नोकरांचें हें चित्र फाजील काढलें आहें, असें कोणास वाटणार आहे; आणि खरोखरीच ते तसें असेल तर आम्हीं आपली चुकी कबूल करून ती केल्याबद्दल त्यांची क्षमा मागूं ; पण तसें करण्यापूर्वी त्यांनीं ती आमच्या पदरांत घातली पाहिजे. कांहीं व्यक्तींचें वर्तन अपवादक असेल, पण आम्हीं जे येथें लिहित आहों तें व्यक्तींच्या संबंधानें नाहीं. सध्यां आमच्या न्यायखात्यांत आणि जमाबंदीखात्यांत खासे खासे अनेक सुशिक्षित तरुण आहेत, त्यापैकीं पुष्कळांना, विशेषतः न्यायखात्यांतील इसमांना, युनिव्हर्सिटीच्या पदव्या मिळालेल्या आहेत. राष्ट्रोन्नति म्हणजे काय, ती होते कशानें, जीं राष्ट्रें लयास गेलीं तीं कशानें गेलीं, आमचें डोकें वर निघण्यास आम्हांस काय केलें पाहिजे, वगैरे गोष्टींचें ज्ञान ज्याला झालेलें नाहीं, असा मनुष्य या सेवाकुल तरुणांच्या समुदायांत एकही सांपडणार नाहीं, असें असून नोकरी कायम राहण्यास, किंवा फार झालें तर बढती होण्यास, लागणाऱ्या अपरिहार्य उद्योगाशिवाय अधिक उद्योग करणारे इसम येवढ्या सुशिक्षितांच्या तांड्यांत किती आहेत ? कचेरींत पुढें आलेलें काम कसें तरी उडवून द्यावें; शिरस्तेदारांवर दरोबस्त जबाबदारी टाकून निःशंकपणें पुढें आणिलेल्या प्रकरणावर लहानमोठीं कोंबडी करावीं, हुजुरांतून आलेल्या हुकुमाची वाट जेमतेम लावावी, आणि वरिष्ठ अधिकारी तपासणीस आला असतां त्याच्या भोंवती घिरट्या घालून, होईल तितक्या उत्तम रीतीनें त्यांची सरबराई ठेऊन वेळ मारून न्यावी, ही यांची कर्तव्यकल्पना ! अगोदर उशीरानें उठावयाचें; नंतर शौचास जाण्यापूर्वी

बराच वेळ विड्या फुंकण्यांत, चिलमी ओढण्यांत, किंवा तंबाखू चोळण्यांत जावयाचा ! मुखमार्जन आटोपल्यानंतर संतानसमुदायासह तरुण कुटुंबिनीशीं सुखसंलाप करीत करीत चहापान करावयाचें किंवा कांहीं फराळ उरकावयाचा ! हा प्रकार आटोपल्यावर पुनः एकदां पानतंबाखूचा बार भरावयाचा ! तों कचेरीतला कोणी तरी कारकून प्रकरणें घेऊन येतो. मग बोलत बोलत त्यांवर सह्या करण्याच्या कामास सुरवात व्हावयाची, व हें बरेंच वेळ चालावयाचें. हें चाललें असतां कोणी भेटावयास आलें तर त्याच्याशीं बोलणें; धोबी, कोष्टी, वाणी, मारवाडी, कडबेवाला, लाकुडवाला, वगैरे कोणी आला असल्यास, किंवा बोलावून आणला असल्यास, त्याच्याशीं घासाघीस चालावयाची ! या घासाघिशींत मधून मधून अधिकाराची थोडीशी जरब दाखवायची, व तसें करण्यास पुढें असलेल्या कारकुनाकडून शिपायाकडून, व इतर गृहस्थांकडून अनुमोदन व प्रोत्साहन मिळत असावयाचें ! अशा थाटांत तास दोन तास घालवून पुढें स्नानास उठावयाचें. स्नानभोजन व पानतंबाखू आटोपल्यावर बायकोमुलांशीं गप्पा मारीत कांहीं वेळ काढावयाचा, किंवा थोडीशी वामकुक्षी घ्यावयाची ! नंतर कचेरीस जाण्याचा विचार ! तेथलें काम करण्याच्या पद्धतीचा वर उल्लेख केलाच आहे. संध्याकाळीं घरीं परत आल्यावर जेवणाच्या अगोदर व मागून घरांतल्या किंवा बाहेरच्या माणसांशीं गप्पा माराव्यायाच्या, किंवा विशेष संघट्टनांतले येणारे जाणारे स्नेही असल्यास गंजिफांस, सोंगट्यांस किंवा इस्पिकांस उदार आश्रय द्यावयाचा ! अशा प्रकारें आमचें बहुतेक तरुण रावसाहेब आपला कालक्रम करीत असतात, असें आम्हीं उघड उघड सांगतों. नाहीं म्हणण्यास कोणाची छाती असेल तर त्यानें नांवानिशीं पुढें यावें. फार झालें तर मामलतदारांच्या वतीनें या पद्धतींत आणखी एक कलम चढवावे लागेल. तें हें कीं, त्यांना घोड्यावर स्वार होऊन फिरावें लागतें, त्यामुळें त्यांचें उपभोगयंत्र मुनसिफांच्या यंत्राप्रमाणें एकसारखें चालत नाहीं. अशा प्रकारच्या आयुष्यक्रमांत सुख मानून तदनुसार वागणाऱ्या आत्मवंचक रावसाहेबांची सुशिक्षित मनें गंजत असतात, व शरीरास मांद्य येऊन त्यांना अनेक व्याधि जडत असतात, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत सुद्धां येत नाहीं ! सतत स्त्रीसान्निध्यामुळें कोणाची कामवासना

मंद झालेली असतें ती प्रज्वलित कोणत्या उपायांनीं होईल अशा पंचाइतींत कांहीं जण पडलेले असतात; कित्येकांस अग्निमांद्यानें घेरलें असल्यामुळें क्षुत्क्षोभ कशानें होईल अशी चिंता लागलेली असतें; सारांश, कोणास मधुमेह, कोणास जीर्णज्वर, कोणास मस्तकशूल, कोणास विस्तृतयकृत् याप्रमाणें या विषयसुखरत निरुद्योगी रावसाहेबांपैकीं बहुतेकांच्या पाठीमागें कांहींनाकांहीं तरी लचांड लागलेलें असतें ! अशापासून विशेष त्रास होऊं लागला कीं, घ्या 'सिकलीव्ह' आणि पळा पुण्यास अथवा मुंबईस ! किंवा जे कोणी येथल्या किंवा मुंबईच्या प्रसिद्ध डॉक्टरकडे वारंवार जात येत असतील त्यांच्या पाहण्यांत असले दोंदिल, फिकट, कृश, उत्साहशून्य, व किरकिर करणारे पुष्कळ रावसाहेब पाहण्यांत येत असतील असें आमचें अनुमान आहे, व तें बहुशः खोटें होणार नाहीं, अशी आमच्या स्वल्प माहितीवरून आमची खात्री आहे. सामान्य सुखांचा अभिलाष करणाऱ्या आमच्या तरुण सुशिक्षित अंमलदारांची ही गोष्ट झाली. हें बहुशः मोठ्या दुर्व्यसनापासून अलिप्त असतात. यांचें वर्तन निरुपद्रवी असतें. आपल्याकडून होईल तितका चोख न्याय करण्यास हे झटत असतात. नायकापोरांस यांच्या सहवासांत मोठें सुख असतें. एकंदरींत निरुद्योगाशिवाय म्हणण्यासारखें व्यसन यांचे अंगीं नसल्यामुळें त्यांची अंमलदारी लोकांस त्रासदायक होत नाहीं. पण याखेरीज अंमलदारांचा आणखी एक वर्ग आहे, त्यांत दोन तीन प्रकारचें लोक येतात; शिकलेलें, अर्धवट शिकलेले, व मुळींच न शिकलेले. यांपैकीं शेवटले पहिल्या पिढींतले आहेत. या जुन्या खोडांपैकीं कांहींचें वर्तन अनुकरणीय असेल याबद्दल आम्हांस शंका नाहीं. पण सामान्यपणें हे सारे वृद्ध कपी, आणि यांच्या जोडीचे कांहीं शिकलेले व कांहीं अर्धवट शिकलेले अंमलदार असे आहेत कीं, त्यांचें नांव काढलें असतां भीति उत्पन्न होते. यांपैकीं कांहींस द्रव्यलोभानें वेडावून सोडिलेलें असतें; कांहीं पराकाष्टेचे कामुक असतात; व कांहींना कटिशूळाची जबरदस्त व्यथा असून, शिवाय बाटलाबाईची विशेष भक्ति असते. लक्ष्मी, स्त्री, आणि मदिरा यांपैकीं एकीनें जरी एखाद्यास मनापासून घरलें असलें तरी देखील त्याची किती थोड्या काळांत धूळधाण होऊन जाते, हें सर्वांस ठाऊक आहेच. तेव्हां जे कोणी एकसमयावच्छेदेंकरून या तिन्ही

हडळींच्या झपाट्यांत सांपडत असतील त्यांची किती दुर्दशा होत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी, या तिघींनीं ज्यास गळ घातला आहे अशा कोणत्या मनुष्याची अब्रू, संपत्ति, किंवा शरीरप्रकृति फार वर्षे नीट राहिली आहे ? क्राफर्डप्रकरणामुळें कांहीं शिकलेल्या मामलतदारांची नांवें पुढें येऊन त्यांचा मोठा दुर्लौकिक झाला आहे; व नाना प्रकारचे लोक त्यांस नाना प्रकारचे दोष देत आहेत. पण वास्तविक पाहिलें तर यापैकीं बहुतेकांचा अपराध किती स्वल्प आहे बरें ? आपली नोकरी राहण्यासाठीं लांच देण्यास सिद्ध होणें ही गोष्ट वाईट नाहीं, असें आम्ही म्हणत नाहीं, पण बेशरम लोभी वरिष्ठ अधिकाऱ्यानें तो देण्याबद्दल चाप लाविला असतां, तो 'देत नाहीं' असें साफ म्हणणाऱ्यांच्या अंगीं अमानुष धैर्यच असलें पाहिजे; आणि तें सामान्य मनुष्यांच्या अंगीं नसल्याबद्दल त्यांस विशेष दोष देणें न्याय्य नाहीं; कारण तशा प्रकारचें धैर्य थोड्यांच्या अंगींच असतें. शिवाय, ही मंडळीं पुढें न येतीं तर हें विलक्षण प्रकरण सरकारास आपल्या हातीं मुळींच न घेतां येतें, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. इतकें करून मग त्यांस जेवढा दोष लावणें योग्य असेल तेवढा लावण्यास आम्हीं तयार आहों. पण जर कोणा हा स्वल्प अपराध करून, शिवाय लांच खाणारे व दुसऱ्यांच्या स्त्रीधनाचा अपहार करणारे मदिरासक्त अंमलदार रेव्हिन्यू खात्यांत, जुडीशियल खात्यांत किंवा दुसऱ्या कोणत्याहि खात्यांत असतील, तर त्यांस काय शिक्षा करावी, हें कोण सांगूं शकणार आहे ? असल्या राक्षसी अंमलदारांकडून उत्पादक श्रम होऊन देशाचा व्यापार व संपत्ति वाढविण्याची कल्पना स्वप्नांत तरी आणितां येईल काय ? यांच्या दुर्वर्तनामुळें यांच्या कुटुंबास व यांच्या ताब्यांतील रयतेस तर अनन्वित पीडा भोगावी लागतेच. पण कधीं कधीं इतरांस सुद्धां हे अनेक प्रकारें त्रासदायक होतात. असल्या अधिकाऱ्यांहून आळशी अधिकारी शेंकडोंपट बरें. सबब ज्याच्या मनांत देशोन्नति व्हावी असें असेल त्यांनीं अशांचें निर्मूलन करण्यास अगोदर झटलें पाहिजे. हें नाहींसें झाल्याशिवाय व्यापार व संपत्ति वाढण्याचा संभव नाहीं.

ही दगलबाजी नव्हे काय ? : : ११

मुंबई सरकारनें क्राफर्डप्रकरण हातीं घेतल्यापासून त्याचा शेवट होईपर्यंत जें करावयाचें, तें सेक्रेटरी ऑफ स्टेट व हिंदुस्थान सरकार यांस कळवून करावयाचें असा परिपाठ ठेवला होता. कांहीं विशेष करावयाचें झालें कीं, तारा सुटत, व प्रत्येक डाकेला कच्या हकीकतीचें पुडकें इंग्लंडास रवाना होत असे. क्राफर्डविरुद्ध जे साक्षीदार आणावयाचे त्यांना त्यांच्या अपराधाची पूर्ण माफी करण्याचें अभिवचन दिल्याखेरीज ते पुढें येणार नाहींत, असें मुंबई सरकारास वाटल्याबरोबर, त्यांनीं तसें करून ती गोष्ट तारेनें व डाकेनें सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कानावर घातली. त्या वेळेस त्या हापिसरानें मुंबई सरकारच्या करण्यास कोणत्याहि प्रकारचा प्रतिषेध केला नाहीं. लांच दिली, असें आपण होऊन कबूल करणारे मामलतदार नोकरींत ठेवणें बरोबर नाहीं, असें सेक्रेटरी ऑफ स्टेटचें मत होतें, तर त्याच वेळेस त्यांनीं मुंबई सरकारास अशी उलट तार पाठवावयाची होती कीं, अशा प्रकारें माफी देणें बरोबर नाहीं; कारण तसें केलें असतां आपल्या तोंडानें आपला अपराध कबूल करणारे मामलतदार नोकरीवर ठेवावे लागणार आहेत, व तसें होणें इष्ट नाहीं. पण त्या वेळेस सेक्रेटरींची स्वारी मूक राहिली. कारण त्या वेळेस मुंबई सरकारास तुम्ही अशी माफी देऊं नका, असें म्हणणें म्हणजे मागल्या तीन गव्हर्नरांनीं जी बेबंदशाही व लुटालूट जाणूनबुजून चालूं दिली होती, ती पुढेंहि चालूं देण्यास सेक्रेटरी ऑफ स्टेटची संमति आहे, असें झालें असतें, आणि त्यामुळें इंडिया हपिसाच्या नांवानें फारच मोठा गवगवा झाला असता. अशा कारणामुळें लॉर्ड क्रॉस यांनीं त्या वेळीं मुंबई सरकारास वाटेल तें करूं दिलें, मामलतदारांकडून होण्यासारखा फायदा करून घेतला, क्राफर्डसाहेबाची बाताबेताची वाट लाविली, आणि आतां दिलेली अभिवचनें अक्षरशः खरीं करून दाखविण्याचा प्रसंग आल्याबरोबर, क्राफर्डपक्षीयांनीं पार्लमेंटांत व त्याच्या बाहेर केलेल्या काहूरास भिऊन जाऊन, लॉर्ड क्रॉस मुंबई सरकारावर उलटून पडत आहेत, ही दगलबाजी नव्हे काय ? पूर्वी-

प्रमाणें इंग्लंडास पत्र जाण्यास वर्ष सहामाहिनें लागतें तर निराळी गोष्ट होती. पण तशा प्रकारची अडचण सध्यां मुळींच नाहीं. रोजच्या रोज येथील हवी ती गोष्ट इंग्लंडांस पोहोंचत आहे. व तिकडील येथें पोहोंचत आहे. या क्राफर्ड-प्रकरणांतील प्रत्येक महत्वाच्या गोष्टीच्या संबंधानें एकमेकांस तारा पाठविण्यांत आल्या होत्या. त्या वेळेस लॉर्ड क्रॉस यांची न्यायबुद्धि झोपीं गेली होती काय ? किंवा तिला कसला भ्रम झाला होता काय ? आमच्या मतें लॉर्ड क्रॉसकडून या कामांत अतिशय अप्रयोजकपणाचा विश्वासघात होत आहे. अगोदर तीनशे साडेतीनशें वर्षांचा जुना इंग्रजी कायदा आज-मित्तीस येथें लागू करणें हें अगदीं अयोग्य होय; पण कायदेवाल्यांच्या मतां-प्रमाणें तो लागू केला पाहिजे, असें घेऊन चाललों, तरी तो कोठें लावावा, आणि कोठें न लावावा याचा निर्णय करण्यास हिंदुस्थान सरकारास अधिकार नाहीं असें नाहीं. कायद्यांचें पालन करण्यानें एकंदरींत कल्याण होतें, म्हणून तें करावयाचें. कायद्याच्या ज्या पालनानें हिताहून अहित फार होणार तो कायदा बदलूं कां नये ? ब्रिटिश पार्लमेंटानें योग्य प्रसंगीं तो बदलल्याचें उदाहरण आहे, व हिंदुस्थान सरकारानेंहि या प्रसंगीं तसें करणें उचित आहे. याउप्पर आपणांविषयीं लोकांत बेभरंवसा आणि अप्रीति उत्पन्न करून घेण्याचा त्यांचा निश्चयच झाला असेल तर आमचा नाइलाज आहे.

शनीदेव उर्फ साडेसातीचा देव : : १२

शनैश्चराची मूर्ति काळी ॥
तो जातीचा होय तेली ॥
चरण पंगु सुरत चांगली ॥
पूजा करी काळभैरवाची ॥१॥

त्याची दृष्टि पड जयावर ॥
करी तयाचा चकनाचूर ॥
अथवा कृपा करी जयावर ॥
तयासि सर्व आनंद प्राप्त होय ॥२॥

तात्याजी महिपतीकृत शनीमाहात्म्य.

हे सूर्यतनया, ग्रहश्रेष्ठा, शनीश्वरा, तुझें उग्र व विशाल स्वरूप, तुझा भीमपराक्रम, व चराचरावर असलेला तुझा दरारा आम्हीं मर्त्य पामरांनीं काय वर्णावा ? स्वर्गस्थ देवगंधर्वापासून तो या क्षुद्र भूगोलावरील यःकश्चित् कीटकापर्यंत तुझ्या झपाट्यांत सांपडला नाहीं असा कोण आहे ? एका सव्वा प्रहरांत त्वां आपल्या पूज्य गुरूस कसा हात दाखविलास, हें कां आम्हांस अवगत नाहीं ? फकीराचा वेष धारण करून त्वां गुरूस अर्पण केलेल्या खरबुजांची शिरकमलें झाल्यामुळें, थोड्यांत चुकलें, नाहीं तर त्यावर सुळी जाण्याचाच प्रसंग येऊन बेतला होता ! सर्वसंगपरित्याग करून, बैराग्याच्या वेषानें हिमाचलावर संचार करणारा गिरिजारमणा तुझ्या भीतिनें दोन घटिका कैलासाच्या गूढ कंदरांत लपून राहिला ! श्रीरामचंद्रावर तुझी अवकृपा झाली तेव्हां त्याला वनवास प्राप्त झाला ! भगवती जानकीस तुझी दशा आली तेव्हां लंकेश्वरानें तिला चोरून नेऊन तिच्या शुभ्रकीर्तीस लोकापवादकलंक लाविला ! पुढें याच स्वारीवर तुझी वक्रदृष्टि झाली, तेव्हां कलहप्रिय नारदाच्या सांगण्यावरून त्यानें तुला उत्तान होऊं दिलें, व त्यासरशीं तुझ्या उरावरील त्याचा पाय निघून जाऊन तुझाच पाय त्याच्या उरावर बसला, व सहा महिन्यांत रामचंद्रानें परिवारासह त्याचें निर्दालन केलें ! तूं हरिश्चंद्रास प्रतिकूल झालास, तेव्हां कौशिक मुनि हात धुवून त्याच्या पाठीमागें लागल्यामुळें तो राजा पदच्युत कसा झाला, त्यानें आपले स्त्रीपुत्र कसे विकले, व डोंबाच्या घरीं त्यास किती दारुण यातना सोसाव्या लागल्या, हें पुराणांतरीं सुप्रसिद्ध आहे ! तुझ्या अवकृपेमुळें नलदमयंतीस भोगावे लागलेलें कष्ट ऐकून अद्यापिही अंगावर कांटा उभा राहतो ! जेव्हां इंद्रावर आपली खैर मर्जी झाली, तेव्हां त्यास दुर्बुद्धि आठवून त्यानें गौतमाच्या जायेबरोबर कुकर्म केलें आणि

त्या पापाबद्दल ऋषीच्या शापानें आपली सुंदर काया भगांकित करून घेतली! तुझ्या तडाक्यांत सांपडल्यामुळें, चंद्राला गुरुपत्नीस स्पर्श करण्याची इच्छा झाली व तीमुळें त्यानें आपल्यापाठीमागें क्षयरोग लावून घेतला! तूं वसिष्ठास अनुकूल नव्हतास, तेव्हां त्याचे शंभर पुत्र मृत्युमुखांत पडले, व परशरास मत्स्यगंधोपभोगामुळें सुदुस्तर पीडा सोसावी लागली! जेव्हां पांडवांस तूं द्वादशस्थानीं आलास, तेव्हां त्यांस द्यूतांत पडून स्त्री व राज्य गमावण्याची दुर्वासना झाली इतकेंच नाहीं, तर बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास भोगावा लागला! फार तर काय, पण जेव्हां श्रीकृष्णपरमात्म्यावर तुझी करडी नजर फिरली तेव्हां त्यावर स्यमंतक मणी चोरल्याचा आळ आला!

वाचकहो, ज्या ग्रहानें देवदानवांची अशी दुर्दशा करून सोडिली त्यापुढें आम्हां मानवांची काय मात्रा चालणार आहे बरें? उपजल्याबरोबर अंजिनीसूत पिकलेले फळ म्हणून सूर्यास धरूं धांवला असें म्हणतात; हे राजश्री जन्यूदरांतून अवतरलें नाहींत तोंच त्यांच्या दृष्टीच्या प्रचंड पराक्रमामुळें यांच्या पित्याच्या दिव्य शरीरलावण्याचा लोप होऊन, तें कष्टानें विकल झालें, त्याचा सारथी पांगळा झाला, व घोडें आंधळे झाले! आमचे राजे आम्हांस मोठे बलाढ्य वाटतात; पण ते एकदां शनीश्वराच्या साडेसातीच्या फेऱ्यांत सांपडले कीं, कसे धुळीस मिळतात. हें ज्यास पाहावयाचें असेल त्यानें 'विक्रमचरित्र' वाचावें. या भाग्यशाली राजास जेव्हां शनीमहाराजांनीं घेरलें तेव्हां त्यावर जीं संकटें ओढवलीं तसली आजपर्यंत कोणत्याहि मर्त्यावर ओढवली नसतील. बेअब्रू झालेल्या व बडतर्फ केलेल्या सगळ्याच मामलतदारांस बारावा शनी आला आहे किंवा नाहीं, हें आम्हांस ठाऊक नाहीं. पण त्यांपैकीं एकाला तरी तो निष्ठुरतेनें छळींत आहे, व नोकरी जाण्याशिवाय आणखी अनेक दुःसह दुःखें त्यावर आलीं आहेत हें आम्हांस ठाऊक आहे. विक्रमाच्या दुःखांशीं त्याच्या दुःखांची तुलना केल्यास त्याच्या दुःखास सुखेंच म्हणावें लागेल! विक्रमावर वेश्यकन्येचा मुक्ताहार चोरल्याचा आरोप शाबीत झाल्यामुळें तामलिंदापूरच्या चंद्रसेन राजानें त्याचे हातपाय तोडून त्यास वेशीबाहेर अन्नपाण्याबांचून उन्हांत होरपळत टाकावें, अशी शिक्षा दिली! मामलतदाराचे हातपाय कायम असून, त्यांस निदान पोटापुरतें कॉंपेनसेशन

मिळणार आहे ! पुढें विक्रमाची ग्रहदशा किंचित् फिरली तेव्हां उज्जनींतील एका तेल्याची मुलगी तामलिंदापुरास आपल्या सासरी जात असतां वेशीपाशीं तळमळत पडलेला विक्रम तिच्या दृष्टीस पडला. तेव्हां तिनें त्याला ओळखून घरीं नेलें आणि राजाज्ञेनें त्यास घाणा हाकण्याचे कामावर नेमिलें ! आमच्या मामलतदारांची ग्रहदशा फिरली असल्यास, हिंदुस्थान सरकार त्यांस मेहेतर-कन्येनें विक्रमास सांगितलेल्या कामापेक्षां अधिक योग्यतेचें काम सांगेल, याविषयीं शंका नाहीं. शेवटीं विक्रमाची ग्रहदशा संपली तेव्हां त्याचे हातपाय फिरून आले इतकेंच नाहीं, तर दीपरागाची तान घेतल्याबरोबर जिकडे तिकडे प्रकाशमय करून टाकणाऱ्या त्याच्या अलौकिक कंठमाधुर्यामुळें, राजा चंद्रसेनाची कन्या पद्मसेना एकाएकीं अनुरागबद्ध होऊन त्याची भार्या झालीं, आणि तिच्यासह राजा विक्रम मालव प्रदेशीं परत येऊन, ती उभयतां राज्यो-पभोग सुखानें घेऊं लागली ! इकडे आपल्या मामलतदारांची ग्रहदशा संपली असेल तर तेही पुनः अधिकारारूढ होऊन आपल्या मामलतींच्या स्वादुत्वाचें पुनः सेवन करूं लागतील अशी आम्ही आशा करतों ! पण ही गोष्ट हटकून व्हावयाला पाहिजे असेल तर त्यांनीं शनी माहात्म्यांत सांगितल्याप्रमाणें सुधा-रकासारख्या ब्राम्हणास दानभोजनादिकांनीं संतुष्ट केलें पाहिजे ! कारण म्हटलें आहेः—

जप (पत्र ?) कर्त्या ब्राम्हणांसी ॥
शनैश्चररूप मानूनि त्यासी ॥
दक्षिणा देऊनि पूजोसि ॥
प्रसन्नाचि करावें ॥ १ ॥

मग करावें ब्राह्मणभोजन ॥
यथाशक्ति द्यावें दान ॥
ब्राह्मण तृप्त होतां पूर्ण ॥
संतोष पावे शनिदेव ॥ २ ॥

वाचकहो, किती झाला तरी तेलकट शनि ब्रह्मतेजापुढें काय करणार ? निदान तात्या महिपतींनीं तरी त्याच्या महात्म्यापेक्षां ब्राह्मणमहात्म्य श्रेष्ठतर

करून ठेविलें असल्यामुळें, ब्राह्मणकीस जो फायदा होत असेल त्याबद्दल त्या वृत्तीवर अवलंबणाऱ्यांनीं त्याचे उपकार मानून त्यास दुवा दिला पाहिजे हें उघड आहे !

असो, येथपर्यंत आम्हांसारख्या भाविक लोकांच्या ग्रहाविषयीं या ज्या समजुती आहेत, त्या थोडक्यांत सांगितल्या. आतां त्याच पद्धतीनें म्हणजे थोडक्यांतच अलीकडल्या सुधारलेल्या ज्योतिष्यांचें याविषयीं जें म्हणणें आहे तें सांगतों, आणि आरती करतों.

हा भूगोल सोडून जर आपण शनीवर गेलों तर येथें आपल्या मनाची जी स्थिति कधींच होत नाहीं ती तेथें होईल. कां नाहीं होणार ? शनि कांहीं सामान्य ग्रह नाहीं. आम्हांपासून त्याचें अंतर १०,००,००,००० मैल आहे, व आमच्या पृथ्वीसारख्या ७३४ पृथिव्या एके ठिकाणीं कराव्या तेव्हां त्याच्या विस्ताराची कल्पना होणार आहे ! हा इतका मोठा आहे तरी आपल्या आंसाभोंवतीं इतक्या झपाट्यानें फिरत असतो कीं त्याची दिनप्रदक्षिणा दहा तासांत संपते ! शनीच्या विषुववृत्तापासून सुमारें २०,००० मैलांवर त्याला वेष्ठणारीं चापटीशीं व चकाकणारीं तीन वळीं किंवा वेढीं आहेत. या वेढ्यांस चापटीं असें म्हटलें आहे. कारण यांची जाडी दहांपाच मैलांहून अधिक असेल असें वाटत नाहीं ! इंग्रजींत या त्रिविध चक्रमालेस किंवा प्रभामंडलास रिंग्झ म्हणजे आंगठ्या म्हणतात. या आंगठ्यांचा व्यास १,६६,००० मैल आहे ! या आंगठ्या स्थिर नाहींत. शनीच्या बिंबाबरोबर त्याही मोठ्या वेगानें परिभ्रमण करतात. या तीन विशाल प्रकाशपरिधींनींच शनीचा परिवार संपला असें नाहीं. आपणांस काय तो एक चंद्र आहे. शनीच्या निरनिराळ्या भागांस निरनिराळ्या रात्रीं प्रकाशमय करणारे कमींत कमी आठ चंद्र आहेत ! या अष्ट चंद्रांपैकीं जो शनीपासून अगदीं जवळ आहे तो त्याच्या मध्यापासून १,२०,००० मैलांवर आहे, व जो सर्वांत दूर आहे तो २२,९३,००० मैलांवर आहे, यावरून काय सिद्ध झाले कीं, कमींतकमीं ४५ लक्ष मैलांचे व्यासाच्या वर्तुलांत जें कांहीं सांपडेल त्यास शनि आपल्या आकर्षणपाशानें बद्ध करून, आपल्या सभोंवतीं अनंत काल घिरट्या घालण्यास लावणार !

भारतीय फलज्योतिष्यांनीं गुरूस ब्राह्मण व शनीस तेली असें म्हटलें आहे, यावरून जुन्या ज्योतिर्विदांपाशीं अलीकडील दुर्बिणीच्या भिंगासारखीं "लहान वस्तु थोर" दिसवणारीं भिंगें असावींत असा तर्क होतो. कारण अलीकडील मोठ्याशा दुर्बिणींतून गुरूकडे (Jupiter) पाहिलें असतां, त्याच्या बिंबावर तीनपदरी जानव्यासारखे तीन पट्टे दिसतात, व शनीवर (Saturn) तर तेलाचा सारखा घाणा चालला असावा, असें दिसतें ! शनीवर इतकें तेज व त्याच्या भोंवती फिरणारे इतके चंद्र असून, त्याच्या दूरत्वामुळें तो तेल्यासारखा निस्तेज दिसतो, व मंदपणानें फिरतो, हें उघड आहे. मित्रोगेमस नांवाचा कोणी एक प्रवासी शनीवरून पृथ्वीवर उतरला तेव्हां त्याला ती वारुळाप्रमाणें दिसली, अशी जी ख्रिस्ती पुराणांत गोष्ट आहे तीवरून या दोन गोलांच्या आकारांचें प्रमाण ध्यानांत येतें. सूर्या-भोंवतीं शनीच्या प्रदक्षिणेस तीस वर्षें लागतात, म्हणजे आमच्यापेक्षां शनी-वरील वर्ष तीसपट मोठें आहे, व त्याच मानानें तेथील ऋतुही मोठे आहेत. सात वर्षें चार महिने पर्यंत पर्जन्यकाळ झाल्यावर तितक्याच लांबीचा हिंवाळा येतो, व तो आटोपल्यावर, सुमारें सव्वासात सव्वासात वर्षें वसंत आणि ग्रीष्म यांचा अंमल असतो. शनि कन्याराशीस आला असतां अति-शय पीडा देतो, अशी युरोपांतील अडाणी लोकांचीही समजूत आहे.

येथपर्यंत या ग्रहाधिपतींचें तत्त्वविनोदात्मक जेवढें वर्णन या स्थलीं करणें उचित वाटलें तेवढें केलें. आतां पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्याची आरती करून त्याचा निरोप घेतोः—

(जयदेव जयदेव जय पांडुरंगा या चालीवर)

जय देव जय देव जय शनीराया ॥
अज मज झाली बुद्धि तुजला वर्णाया ॥ जय. ॥
भाविक शास्त्रज्ञांसी संमत आशि गाथा ॥
गाऊनि चित्तांकर्षी केली तव कथा ॥
यास्तव प्रसन्न होऊनि 'वर माग आतां' ॥
ऐसें ह्मणाशील तरी दे हें तत्वतां ॥ जय. ॥

जे न सुधारका पडतील त्यांसी ॥
त्याची वा किंमत न देती त्यांसी ॥
राशीस येऊनी छळावें गा देवा ! ॥
वद नाहीं नामी कां पत्र हें राया ॥ जय. ॥
येथें बारा आणें मुंबापुरी रुपया ॥
फक्त दीड रुपया दुसऱ्या गांवींया ॥
बंगीतं मागतां पोष्टेजासफट ॥
फक्त अठरा आणे, हें कां संकट ? ॥ जय. ॥
वाचुनि यातें जोडी जो तत्त्वज्ञानाला ॥
संतती, संपत्ती, उद्गति दे त्याला ॥
तैसेंच, यांतील विचार ज्या मान्य ॥
त्या महाराष्ट्रीयां दे दे सुखदान ॥ जय. ॥

स्वयंवर : : १३

विदुषि म्हणे म्हणा जा जरि कथिलें म्यां परोपरि पण ती ।
प्रणति प्रभूसि करिती अनुकंप्या मी स्वयंवरा म्हणती ॥
गांधर्वेण विवाहेन बह्व्यो राजर्षिकन्यकाः ॥
श्रूयन्ते परिणीतास्ताः पितृभिश्चाभिनंदिताः ॥

कालेंकरून जो आचार रूढ झाला तो किती अभेद्य असतो याचें उत्कृष्ट उदाहरण आमची अलीकडील विवाहपद्धति आहे. आमचा पूर्वीचा इतिहास, परक्या लोकांचें वर्तन, व आमची सांप्रत जागृत झालेली विचार-पद्धति ही सारीं या अप्रशस्त चालीस प्रतिकूल आहेत तरी आम्हांस ती झुगारून देण्याचें धैर्य होत नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय ? किंवा आश्चर्य तरी कसलें ? "हा आमच्या वडिलांचा कूप, असें म्हणून खारें पाणीं पीत बसणारे" आम्हीं लोक आहों, तेव्हां जें रूढ झालें तें आम्हांस टाकवत

नाहीं यांत कांहीं नवल नाहीं. तथापि आमची प्रस्तुतची निकृष्टावस्था आम्हांस नको असेल तर सर्वांच्या अगोदर या अत्यंत अपायकारक प्रघाताचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या खटपटीपासून अनेक फायदे होणार आहेत. ज्याप्रमाणें युरोपांत क्याथॉलिक व प्रॉटेस्टंट या ख्रिस्ती धर्माच्या दोन पंथांत उत्पन्न झालेल्या वादापासून पुढें महत्त्वाचें अनेक परिणाम घडून आले, त्याप्रमाणें आज जर आपण जाणूनबुजून बालविवाह रद्द करणाऱ्याच्या कामीं झटूं लागतों तर त्यापासून अनेक महत्त्वाच्या गोष्टी निष्पन्न होणार आहेत. विचारानें चांगली गोष्ट कोणती व वाईट गोष्ट कोणती याचा पूर्ण निश्चय करून वाईट टाकण्याचा व चांगली स्थापण्याचा प्रयत्न एका बाबींत केला असतां जें धैर्य अंगीं येतें तेंच पुढें तसली दुसरी गोष्ट करण्यास प्रवृत्त करतें आणि ही दुसरी गोष्ट करतांना धैर्याचें भांडवल पहिल्यापासूनच अधिक असल्यामुळें, पहिल्या प्रसंगाहून विशेष सुलभ रीतीनें यशःप्राप्ति होतें. याप्रमाणें एका गोष्टींत यश आलें, दुसरींत आलें, तिसरींत आले असें होतां होतां नवीन नवीन गोष्टी करण्याचें धैर्य दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन त्याचा पाहिजे त्या कामीं उपयोग करण्यास उल्हास वाटूं लागतों, उन्हाळ्याच्या प्रत्येक दिवसास भूमितिश्रेढीनें वाढत जाणाऱ्या उष्णतेप्रमाणें मानसिक धैर्याची गोष्ट आहे; तें प्रत्येक दिवशीं अधिकाधिक होत जातें. उलट तें कमी होऊं लागलें म्हणजेहि भूमितिश्रेढीनेंच कमी होतें ! ज्याप्रमाणें आकाशांत फेंकलेला दगड खालीं येऊं लागला म्हणजे प्रत्येक क्षणास मागल्या क्षणापेक्षां अधिक फूट उतरतो त्याप्रमाणें कोणत्याही कारणानें राष्ट्राच्या किंवा त्यांतील एखाद्या व्यक्तीच्या मनास भयानें घेरलें म्हणजे तें क्षणोक्षणीं त्यास अधिकाधिकच ग्रासीत जातें ! तेव्हां बालविवाहावर निकराचा हल्ला करण्यानें प्रथम आम्हांत मानसीक धैर्य उत्पन्न होऊन, व उत्तरोत्तर त्याची वृद्धि होत जाऊन इतर कामाकडेहि त्याचा उपयोग करतां येऊं लागेल.

याशिवाय याच खटपटीनें दुसरा एक फायदा होणार आहे. तो हा कीं, आज जे आम्हीं चोहोंकडून धर्मपाशांनीं अगदीं जखडल्यासारखें झालों आहों त्या आम्हांस त्याच्या ' आज्ञा कोठवर पाळाव्या ' हें समजूं लागेल.

बालविवाहाचें पूर्ण निर्मूलन आणि स्वयंवराची प्रस्थापना यांच्या दरम्यान बराच धर्मवाद उपस्थित होणार आहे, व तो करण्यानें पुढ पुष्कळ हित होणार आहे. बापाच्या घरीं मुलगी ऋतुस्नात होतां कामा नये व ऋतुस्नात झालेल्या मुलीचें यथासांग गर्भदान झालेंच पाहिजे, नाहींतर उभय कुलांतील चाळीस पिढ्यास दुर्गति प्राप्त होते, अशा अजागळपणाच्या धर्म-समजुतींचा ऱ्हास होईल तितक्या त्वरेनें होणें फार इष्ट आहे. असल्या वेडेपणाच्या समजुतींचा मोक्ष करण्यास पूर्वेतिहास आणि पूर्वाचार हे पुनः पुनः पुढें आणून त्यांचें फिरून अवलंबन करा असें सांगत न बसतां अलीकडील न्यायाच्या भात्यांतून तीव्र बाण काढून त्यांचा त्यावर संपात केला पाहिजे. कोणतेही आचार घालण्यास पूर्वीच्या ऋषींस जितका अधिकार होता तितकाच आम्हांसही आहे; पूर्वकालीन आचार्यांवर ईश्वराची जितकी कृपा होती तितकीच आम्हांवरही आहे, व त्याच्याशीं त्यांचा जितका संबंध होता तितकाच आमचाही आहे; बऱ्यावाईटाची निवडानिवड करण्याची जितकी बुद्धि त्यांना होती तितकी किंवा तिहून अधिक आम्हांसही आहे; अनुजांसाठीं त्यांचें अंतःकरण जितकें कळवळत होतें, तितकें किंवा त्याहून अधिक आमचेंही कळवळत आहे; सृष्टिविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितकें त्यांस होतें तितकें किंबहुना त्याहून बरेंच अधिक ज्ञान आम्हांस आहे. सबब त्यांनीं घालून दिलेल्या नियमापैकीं जेवढें हितकारक असतील तेवढ्या-चेंच आम्हीं पालन करणार, व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागीं आम्हांस निर्दोष वाटतील असें नवीन घालणार–अशा धर्तीवर हा वाद नेला पाहिजे, व अशा धर्तीवर तो नेल्यासच त्यापासून फायदा होणार आहे. एका ऋषीविरुद्ध दुसरा ऋषी हुडकीत बसण्यांत, व साऱ्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तसलें काम झळकी-करांसारख्या शास्त्रांनीं जुन्या पद्धतीच्या लोकांसाठीं खुशाल करीत बसावें! कोणत्याही विषयाचा ऐतिहासिक पद्धतीनें ऊहापोह करण्यांत फायदा आहे. नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. पण आमच्या बहुतेक जुन्या पंडितांस ऐतिहासिक पद्धति म्हणजें काय, हें मुळींच ठाऊक नाहीं, त्यांना असें वाटतें कीं, जगांत म्हणून जेवढें कांहीं ज्ञान आहे तेवढें संस्कृत भाषेंतील ग्रंथ-

समुहांत भरलेलें आहे. त्याच्या बाहेर चहूंकडे अंधार आहे! व त्यांना असें वाटणें हें कांहीं अंशी स्वाभाविकही आहे. ज्याअर्थी दुसऱ्या भाषेंतील ज्ञान-भांडारांचा गंधहि त्यांस लागलेला नाहीं, त्याअर्थी त्यांना त्यांची महती कोठून कळणार? तेव्हां अर्थात त्यांनीं आपल्यापाशीं असलेल्या छोटेखानी डबोल्यासच अखिल विश्वांतील संपत्समूह समजून त्याच्या महत्वाचें व अद्वितीयत्वाचें पवाडे गात सुटावें, हें साहजिक आहे. पण ज्या आमचें डोळे उघडले आहेत, ज्या आम्हांस हिंदुस्थानच्याबाहेर देश आहेत, व संस्कृत ग्रंथांच्याबाहेर विद्या आहे हें पक्कें समजत आहे, त्या आम्हीही संकुचितदर्शनाच्या शास्त्रीवैदिकांप्रमाणें किंवा अगदीं मूढ जनांप्रमाणें वागत सुटावें ही मोठ्या लाजेची गोष्ट आहे; तेव्हां बालविवाहाचें निर्दालन करण्याचा प्रयत्न आपण मनापासून आरंभिल्यास, बऱ्याच धर्मकल्पनांचें संशोधनही आपणांस करावें लागणार आहे; व या कामीं हें संशोधन करण्यास आरंभ केला, म्हणजे इतर गोष्टींतही तें करण्याची इच्छा होऊं लागेल, व विचाराच्या भट्टींत धर्मांत शिरलेल्या हीण धातू खांक होऊन त्यांतील सार-तत्त्वरूप बावन्नकशी सोनें मात्र मागें उरेल!

बालविवाहाचें खंडन म्हणजे स्वयंवराचें मंडन. तेव्हां अर्थात् जे बाल-विवाहास प्रतिकूल असतील त्यांना स्वयंवरास प्रतिकूल असलेल्या लोकांच्या मतांचें समर्पक खंडन करतां आलें पाहिजे. यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं, बालविवाहापासून एकदम स्वयंवरावरच उडी कशाला मारावयाला पाहिजे? त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, जीं स्वयंवरें नाहींत त्या सर्वांस आम्हीं बालविवाहच समजतों! ज्यांचें त्यानें लग्न करणें म्हणजे स्वयंवर! एकाचें दुसऱ्यानें करणें म्हणजे बालविवाह! अर्धे स्वयंवर आणि अर्धा बालविवाह, अशी लग्नाची पद्धत शक्य नाहीं. कोणी असें म्हणतात कीं, फ्रान्स देशांत अशा प्रकारची विवाहपद्धति कांहीं वर्षांमागें रूढ होती. बापानें मुलाकरितां मुलगी पाहून ठेवावी, आणि मुलास ती पसंत झाल्यास तिचा त्याच्याशीं विवाह व्हावा, किंवा मुलानें आपल्या मनाजोगीं मुलगी पाहून ठेवावी, आणि ती बापास पसंत झाल्यास, तिचा त्याच्याशीं विवाह व्हावा, ही दिसण्यांत मध्यगामी पद्धत दिसते. व जे लोक बाल-

विवाहांतून निघून स्वयंवराकडे येण्यास निघाले असतील, त्यांना कांहीं वर्षें या पद्धतीपाशीं मुक्काम करावा लागत असे, असें वाटतें ! आम्हांस एके कालीं स्वयंवरपद्धति अत्यंत प्रचलित होती, अशाबद्दल पुष्कळ आधार आहे. आम्हांपैकीं बहुतेकांची लग्ने अकराच्या आंतील वयाच्या मुलीशीं झाली असल्यामुळें, सध्यां येथें बालविवाहाची पद्धत अंमलांत आहे, याबद्दल पुरावा देण्याची मुळींच गरज नाहीं ! एकदां आम्ही विवाहपर्वताच्या शिखरावर होतों; प्रस्तुत त्याच्या पायथ्याशी येऊन पडलों आहों; पुन्हां वर चढून जावें, अशी कित्येकांना इच्छा होऊं लागली आहे; पण कित्येकांना असें वाटत आहे कीं, तसें करण्याचा प्रयत्न केला असतां, आम्हांस घेरी येऊन, किंवा आमचा पाय निसरून आम्हीं पुन्हां पायथ्याशीं गडबडत येऊन पडूं ! तेव्हां कित्येकाचे असें म्हणणें पडतें कीं, आपणाला पायथाही नको आणि शिखरही नको; आपण आपले या पर्वताच्या मध्यप्रदेशाला धरून असावें ! प्रथमदर्शनी हा सल्ला मोठा नामी दिसतो; व त्याप्रमाणें आचरण करण्यासही आमची कांहीं हरकत नाहीं. पण मनुष्यस्वभावाचें ज्यास अगदीं सामान्य ज्ञान आहे, तोही असें सांगू शकेल कीं, मनुष्य हा प्राणी त्याला जी गोष्ट हितावह वाटूं लागली असेल तिचा पक्का शहानिशा केल्याखेरीज राहणारा नाहीं. मध्यप्रदेशाशीं येऊन ठेपल्यावर आणखी एक टप्पा वर जावें असें त्यांस साहाजिकपणें वाटूं लागतें. तेथें येऊन पोंहोंचल्यावर पुनः तोच नाद ! याप्रमाणें टप्याटप्यानें कां होईना, केव्हां तरी शिखरावर जाऊन थडकल्याखेरीज त्याचें पूर्ण समाधान व्हावयाचें नाहीं ! 'सामाजिक सुधारणापरिषदे' च्या मनांत जी बालविवाहनिषेधकमंडळी स्थापावयाची आहे, तिच्या पुरस्कर्त्यांनीं नुकत्यात प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत १०, १२ व १४ हें जे मुलींच्या वयाचे आंकडे दिले आहेत, ते आमच्या मतें केवळ टप्पे आहेत ! यांपैकीं शेवटचा आंकडा आम्हांस बराच पसंत आहे. पण खरें स्वयंवर ज्यांना येथें पुनः स्थापित व्हावयाला पाहिजे आहे, त्यांना तो पसंत होण्यासारखा नाहीं. पण त्यांत एक विशेष आहे तो हा कीं, त्या वर्षापर्यंत जे आपल्या मुली अविवाहित ठेवण्यास राजी होतील त्यांनीं धर्मानें घातलेली अटकनदी उतरण्याचें कांहींतरी साधन आपल्या मनाशीं तयार करून ठेवलें असावें, हें उघड

आहे. बहुतेक हिंदु मुली १४ वर्षांच्या आंत ऋतुमती होतात, हें निर्विवाद आहे. तेव्हां १४ च्या आंतील वयाच्या मुलींचें लग्न न करण्याबद्दल शपथ घेणें, म्हणजे नहाण आलेल्या मुलींचें लग्न करण्याविषयीं शपथ घेणें होय ! पण असें त्या पत्रकांत किती आहे ?

सामाजिक सुधारणा आणि कायदा : : १४

सुधारणेचा शब्दांतःपुराच्या बाहेर संचार होऊ नये म्हणून डोळ्यांत तेल घालून खडा पहारा करणाऱ्या नानाविध धर्मकल्पनांशीं तुमुल संग्राम करण्यास ज्यास स्फुरण यावें, त्याच्या भोंवताली उभारलेल्या प्रचंड लोकमत तटास ढांसळून पाडण्यास ज्ञानतोफांस ज्यांनीं सरबत्ती द्यावी, व त्यास गराडा घालणाऱ्या रूढिखंदकांवर क्रियासेतु बांधण्यास ज्यांनीं प्रवृत्त व्हावें अशा विचारसंपन्न लोकांनीं दुराग्रहाच्या भरी भरून व शुष्क बाबतींत दुही माजवून आपल्या मुख्य कर्तव्याची हेळसांड होऊं द्यावी ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय.

'नवखंड पृथ्वी व दहावें खंड काशी' यापुढें ज्यांच्या भूगोलविषयक कल्पनांची धांव जात नाहीं, वेदाचा अर्थ कालत्रयी होणें नाहीं अशी दृढ समजूत असूनही त्यांतच मनुष्यास अवश्यक अशा सर्व ज्ञानाचा गड्डा आहे असा ज्यांचा पक्का ग्रह झाला आहे व प्राचीन ऋषिप्रणीत आचारांहून सुखकर असें आचार असूं शकतील अशा नुसत्या कल्पनेचाही विटाळ न होऊं देण्याविषयीं जे अत्यंत दक्ष आहेत, तात्पर्य 'पुराणमित्येव हि साधु सर्वं' या महामंत्राच्या प्रभावापुढें पदोंपदीं येणाऱ्या असंख्य नडी ज्यांस साह्य झाल्या आहेत अशा लोकांनीं नुसतें कायद्याचें नांव ऐकलें नाहीं तोंच वेडावून जाऊन माघवबागेंतील सत्तेचाळीसेतरांवर ताण करून सोडावी हें अगदी सहाजिक आहे. परंतु ही सीमा ओलांडून पुढें गेलेल्या ज्ञानविशिष्ट म्हणविणाऱ्या लोकांनीं कायद्याच्या विरुद्ध इतकें काहूर कां माजवावें याचा

मात्र आम्हांस उमज पडत नाहीं. सामाजिक सुधारणा आणि कायदा यांच्या मध्यें अपरिहार्य एकनाड असल्यामुळें त्यांचें जुग कधींही जमावयाचें नाहीं असें जें कित्येक समुद्रिकांनीं गणित केलें आहे त्यांत आमच्या मतें कांहीं चूक झाली आहे, व ती दाखविण्याचा प्रयत्न केला असतां तिकडे शांतपणानें नजर फेंकण्याची जर ते तसदी घेतील तर हा वाद मिटून उभय पक्षांत समेट होणें केवळ दुरापास्त आहे असें आम्हांस वाटत नाहीं. सामाजिक सुधारणेंत कायद्याची मदत घेणें अनर्थावह आहे असें प्रतिपादणाऱ्या मंडळींच्या आजपर्यंतच्या वाटाघाटींत आम्हांस जितका दुराग्रहाचा भाग दिसून येतो तितका योग्यायोग्य विचार दिसून येत नाहीं असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. सकृतदर्शनी ज्यांत कांहीं अर्थ आहे असें भासतें असें काय तें एकच कारण पुढें आलें आहे. बाकी सर्व शब्दजाल, हट्टवाद व पुराणप्रियतेच्या संस्काराची अवशिष्ट झांक यांचेंच अकांडतांडव आहे व तें कारण हेंच कीं आमचें सरकार परकें, त्यांचा धर्म वेगळा, त्यांचे रीतिरिवाज भिन्न, तेव्हां अशा सरकारास आपल्या समाजव्यवस्थेंत हात घालूं देणें अत्यंत भयावह आहे; याचे परिणाम फारच अनिष्टकारक झाल्यावांचून राहणार नाहींत; व याबद्दल मागाहुन पस्ताव्यांत मात्र पडावें लागेल. आतां हा कोटि क्रम करणाऱ्यांस आमचा इतकाच प्रश्न आहे कीं, सामाजिक गोष्टींत आजपर्यंत सरकारनें जें औदासिन्य पत्करलें आहे त्याचे कारण तसें करण्यास आम्हीं त्यास परवानगी देत नाहीं इतकेंच आहे काय? मुसलमान लोकांनीं एका हातांत तलवार व दुसऱ्या हातांत कुराण घेऊन आम्हांपैकीं कित्येकास बाटविलें त्या वेळीं तसें करण्याविषयीं आम्ही त्यांस परवाना दिला होता काय? किंवा आमच्या समाजव्यवस्थेंत ढवळाढवळ करण्यास सरकारनें मनांत आणलें तर तें आज असमर्थ आहे असें तरी मानतां येईल काय? तात्पर्य सरकार सामाजिक बाबतींत उदासीन असण्याचें कारण तसें करण्यास आम्ही त्यास संधि देत नाहीं इतकेंच काय तें, बाकी आम्ही त्यास आमच्या घरगुती गोष्टींत हात घालण्यास केव्हां विनंति करूं म्हणून तें अगदीं चातकाप्रमाणें वाट पहात आहे व एकदां का त्यास आपणांकडून जराशी फूस मिळालीं कीं कायद्यामागून कायदे करून आमच्या सर्व सामाजिक व्यवस्थांचा भंड-

वडा करून आम्हांस ते त्राहि करून सोडतील, वगैरे विचारांत जर कांहीं तथ्य असेल तर मग " आपण कोंबडी झांकली कीं उजाडावयाचें राहिलेंच " असें मानणाऱ्या म्हातारीच्या समजुतींतही तथ्य नाहीं असें कोण म्हणेल ?

दुसरें, सतीजाण्याची चाल जी सरकारनें बंद केली त्यापासून आमच्या धर्मांतही प्रसंगानुसार हात घालण्यास सरकार डगमगणारें नाहीं असें सिद्ध झालें नाहीं काय ? किंवा जो पुनर्विवाह हिंदुधर्मशास्त्रानें बेकायदेशीर ठरविला होता तोंच कायदेशीर ठरविण्याविषयीं कित्येकांनीं आपण होऊन विनंति केल्यावरून तो कायदेशीर ठरविल्यास आज ३४ वर्षें झालीं असून त्या वेळीं मिळालेल्या फुशीचा त्यांनीं अद्याप पावेतों फायदा घेतला नाहीं हें कसें ? इंग्लंड देशांत बारा वर्षांच्या आंत पुरुषाचें लग्न झाल्यास तें बेकायदेशीर आहे. परंतु येथें पाळण्यास बाशिंगें बांधणेंहि कायदेशीर असून १० वर्षांच्या आंतील स्त्रियेशीं प्रत्यक्ष नवऱ्यानें संभोग केला असतां त्याजवर जबरी संभोगाचा आरोप शाबीत होतो असें कलम पीनल कोडांत कोठून आलें ? तात्पर्य, सामाजिक गोष्टींत आधींच सरकारनें हात घातला आहे, असें असतां आणखी अमुक एक गोष्टींत असा असा कायदा करा अशी सरकारास विनंति केल्यानें त्यास आमच्या सामाजिक गोष्टींत आयतीच ढवळाढवळ करण्यास फूस सांपडेल अशा समजुतीवर कायद्याचा निषेध करीत बसणें म्हणजे वास्तविक पाहतां आम्हांस पुढें जावयाचें नाहीं हेंच जगास जाहीर करणें होय.

आतां आजमितीस जितक्या म्हणून सुधारणा आम्हांस इष्ट किंवा आवश्यक वाटतात त्या सर्व कायद्याच्या मदतीनें सुसाध्य आहेत असें आमचें म्हणणें नाहीं किंवा त्यांपैकीं कांहीं कायद्यानें सुसाध्य असल्या तथापि त्या सर्वांवर कायद्याची अंमलबजावणी करावी असेंही आम्ही इच्छीत नाहीं. परंतु याचें कारण आमचें सरकार परकें आहे हें नव्हे; किंवा सामाजिक गोष्टींत सरकारनें हात घालणें गैरशिस्त आहे अशा सामान्य सिद्धांताचा आम्ही अंगिकार करतों असेंही नव्हे. व्यक्तीच्या ज्या आचरणापासून समाजाचें प्रत्यक्ष अपरिमित नुकसान होत नसेल, तें आचरण त्या व्यक्तीस घातक असलें, तथापि त्यानें तें करूं नये अशी समाजानें सक्ती करण्याचा समाजास

अधिकार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजबंधन या दोहोंसही मर्यादा आहेत. या मर्यादांचा अतिक्रम होईल तर त्यापासून एकंदर समाजाचेंच नुकसान होणारें आहे. व्यभिचार हा एक पुण्यमार्ग आहे असें कोणत्याही धर्माचा मनुष्य प्रतिपादणार नाहीं. परंतु एवढ्यावरून व्यभिचार करणाऱ्यांस कायद्यानें शिक्षा ठरवावी किंवा नाहीं असा प्रश्न पुढें आला असतां सर्व विचारी लोक एकदम हो म्हणण्यास तयार होणार नाहींत. त्या व्यभिचारापासून समाजाचें प्रत्यक्ष नुकसान होत आहे कीं काय? या प्रश्नाचा प्रथम विचार केला पाहिजे. तसेंच दारू पिणें हें जरी वाईट आहे तथापि ती पिणाऱ्या व्यक्तीपासून समाजास त्रास पोंहोंचल्यावांचून त्याच्यावर कायदा लागू करणें न्याय्य होणार नाहीं. तात्पर्य, एखादी गोष्ट आपणांस कितीहीं चांगली वाटली तथापि दुसऱ्यांनीं तिचा स्वीकार केलाच पाहिजे अशी सक्ती करण्याचा आपणांस अधिकार नाहीं. आपण पाहिजे तर त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करावा; परंतु यापुढें मात्र आपणांस जातां येणार नाहीं. वरील विचारावरून हेंहीं ध्यानांत येण्यासारखें आहे कीं, ज्याप्रमाणें एखाद्या व्यक्तीच्या आचारविचारापासून समाजाचें नुकसान नसतां तो आचारविचार बदलण्याची समाजास सक्ती करतां येत नाहीं, त्याचप्रमाणें आधींच जर समाजानें सक्ती केली असेल तर ती नाहींशी करणें हेंहि समाजाचें कर्तव्य होय व तें बजावण्यास समाज तयार नसेल तर समाजाचा विशेष जोरदार प्रतिनिधी जें सरकार त्यानें पुढें झालें पाहिजे. पातिव्रत्यसंरक्षणार्थ स्त्रियांनीं आपणांस पतिचितेवर जिवंत जाळून घ्यावें हें अत्यंत मूर्खपणाचें, अविचाराचें व साहसाचें कृत्य होय असें समजून लोकांची वाट न पाहतां सरकारनें एकदम या कामीं कायदा करून ती क्रूर चाल बंद केली. एखाद्या स्त्रीचा पति निवर्तला असतां तिनें दुसरा पति करूं नये अशी जी पातिव्रत्यसंरक्षणार्थ दुसरी सक्ती समाजानें केली आहे तीहि व्यक्तिस्वातंत्र्याविरुद्ध आहे हें सरकार जाणून होतें. परंतु सतीच्या चालीइतकी ती अमानुष नसल्यामुळें त्यांनीं कांहीं दिवस वाट पाहिली व योग्य काल आला असें दिसतांच तीही सक्ती दूर करून पुनर्विवाह कायदेशीर मानला जाईल, म्हणून ठराव केला. आतां पातिव्रत्यसंरक्षणार्थ समाजानें केलेली तिसरी सक्ती म्हटली

म्हणजे केशवपन होय. या केशवपनाच्या प्रघाताचें मंडन करणाऱ्या लोकांनीं त्यापासून किती जरी फायदे दाखविले व त्यास किती जरी संमत असला तथापि ज्या स्त्रीचें वपन होणार तिची इच्छा नसतां व ती एकसारखा हंबरडा फोडून आपणांस या ममताळू वैऱ्यांच्या तावडींतून कोणी सोडवील काय म्हणून गयावया होऊन चोंहीकडे दृष्टि फेंकीत असतां तिला जुलमानें न्हाव्यापुढें बसाविणें किती निंद्य आहे व अशा रीतीनें तिचें स्वातंत्र्य हिरावणें म्हणजे केवढा घोर जुलूम आहे हें सिद्ध करीत बसण्याची आमच्यामतें मुळींच आवश्यकता नाहीं. ज्यांच्यावर हा घोर प्रसंग गुदरतो त्या परावलंबी अबलांसी ही विटंबना कितपत मानवते हें त्यांचें हृद्गत जाणणाऱ्या समवयस्क मैत्रिणीवांचून दुसऱ्यांस सहसा सांगतां येण्यासारखे नाहीं ! तथापि त्याची अटकळ कल्पनेनें अगदींच बांधतां येणार नाहीं असें नाहीं. ज्यानें आपणांस जन्म दिला, आपणास लहानाचें मोठे केलें, व आपल्याकरितां अनंत कष्ट साहिले त्या बापाच्या नांवानें मिशा काढण्याचा प्रसंग दुर्दैवानें आला असतां केवळ चटावर काम उरकून घेण्यास पुरुष कसे तत्पर असतात; १५–२० दिवसांनीं मुन्डन केल्याचा मागमूसही राहण्याचा संभव नसून तें टाळण्यास काय काय उपाय योजतात व मुंडन केल्यावांचून गत्यंतर नाहीं असा प्रसंग आला असतां, आपल्या बापाविषयीं आपली पूज्यबुद्धि व्यक्त करण्याकारितां ज्यांनीं आपलें मुंडितमुख मोठ्या गर्वानें लोकांस दाखवीत फिरावें तेच लोक अंधारकोठडींत कशी दंडी देतात हें ज्यांनीं पाहिलें असेल त्यास स्त्रियांच्या मनाची स्थिति कशी होत असेल याची कल्पना करणें कठीण नाहीं ! लहानपणापासून ज्यांची जोपासना केली, ज्यांस न्हाऊं माखूं घालून वाढविलें, ज्यांस नाना भूषणांनीं शृंगारिले असें केश क्षणार्धांत नाहींसे होऊन आपण सर्वांच्या तिरस्कारास पात्र होणार व पंधरावीस दिवसांनीं पूर्वस्थिति येण्याची तर आशा नाहींच, परंतु उलटें ज्याचें मुखावलोकनही करावयास नको अशा त्या परक्या नापिकापुढें दर पंधरवड्यास मान वाकवावी लागणार हे विचार मनांत येऊन या विटंबनेस सर्व स्त्रिया आपण होऊन राजी होतील अशी सुस्ती कल्पनाही करतां येत नाहीं. आपल्या अत्यंत जवळच्या आप्ताच्या किंवा आपल्या स्वतःच्या प्रिय कन्येच्या अशा हाल अपेष्टा पाहू-

ण्याचें ज्या हातभाग्यांच्या कपाळीं आलें असेल त्यांचीं अंतःकरणें दुःखोद्वेगानें विव्हल झाल्यावांचून कदापि राहिलीं नसतील.

तात्पर्य, दुसरें लग्न करण्याची इच्छा असूनही तसें करण्यास कायद्याची आडकाठी असणें यांत जितका अन्याय आहे त्याहूनही या विद्रूप करण्याच्या घोर चालींत अधिक अन्याय व प्रत्यक्ष जुलुमाचा प्रकार आहे हें प्रत्येकास कबूल केलें पाहिजे व तो अन्याय नाहींसा करण्यास कित्येकांनीं अर्ज करून कायदा करून घेतला असतां, त्याहून अधिक अन्यायाचा व जुलुमाचा प्रकार बंद करण्याकरितां 'अमुक वयाच्या आंत मुळींच वपन करूं नये व त्यापुढेंहि तें स्त्रीच्या मर्जीविरुद्ध होऊं नये,' असा कायदा मागणें हें केवळ परंपरेस धरूनच आहे; यांत नवीन असें कांहीं एक नाहीं.

'म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं परंतु काळ सोकावतो' या न्यायावरच कायद्याचा प्रतिषेध करीत बसणें केवळ वेडगळपणाचें आहे, कारण सरकारनें सामाजिक गोष्टींत आधींच हात घातला आहे; तसेंच ज्या कांहीं सामाजिक गोष्टींत सरकारनें कायदे केले आहेत, व ज्या दुसऱ्या गोष्टींत कायदा असावा असें कित्येकांचें म्हणणें आहे, त्यांमध्येंही त्या त्या गोष्टी सामाजिक या सदराखालीं मोडतात किंवा नाहीं हा वाद अप्रासंगिक होय; व्यक्तिस्वातंत्र्य व समाजबंधन यांच्या ज्या योग्य मर्यादा आहेत त्यांचा अतिक्रम होतो कीं काय, एवढ्याच धोरणानें कायदा असावा कीं नाहीं हें ठरविलें पाहिजे, व सरकारनें जो सती जाण्यास प्रतिबंध केला, किंवा विधवेचें बेकायदेशीर मानलें जाणारें लग्न कायदेशीर ठरविलें तेंही वरील तत्त्वास अनुसरून केलें व विधवावपनाची चाल बंद करण्यास कायद्याची मदत असावी म्हणून जें कित्येकांचें मत आहे तेंही वरील तत्त्वावरच अवलंबून आहे, वगैरे विचार वरील लेखांत दाखविले. या लेखांत बालविवाहाची चाल बंद करण्यास कायद्याचें साह्य घ्यावें असें जें कित्येकांचें म्हणणें आहे, त्याविषयीं दोन शब्द लिहिण्याचा आमचा विचार आहे.

बालविवाहाची चाल अत्यंत घातक आहे याविषयीं आतां बहुधा मतभेद राहिला नाहीं. तसेंच या दुष्ट चालीच्या तावडींतून आपण सुटलों असें म्हणतां येण्यास, मुलगी निदान १५ १६ वर्षांची होईपर्यंत व मुलगा

२०–२२ वर्षांचा होईपर्यंत त्या उभयतांचाही 'नीतिशास्त्रां'त प्रवेश होऊं नये, हेंही पुष्कळांस संमत आहे. परंतु हें घडवून आणण्यास कोणते उपाय योजावेत याबद्दलच काय तो वाद राहिला आहे. एका पक्षाचें म्हणणें असें पडतें कीं, ही गोष्ट लोकांनींच आपल्या शिरावर घेतली पाहिजे; दुसऱ्या पक्षाच्या मतें केवळ लोकांवरच ही जबाबदारी सोंपाविण्यापेक्षां, सरकार व लोक या उभयतांच्या साह्यानें हें काम शेवटास नेण्याचा प्रयत्न करणें, नुसतें इष्ट आहे इतकेंच नाहीं, तर तसें केल्यावांचून या बाबतींत आमचें पाऊल खात्रीने पुढें जाण्याची फारशी आशा नाहीं. आतां सती जाण्याची चाल बंद करण्यास किंवा विधवाविवाह कायदेशीर ठरविण्यास जी कारणें होतीं, किंवा विधवापन बंद करण्यास जी कारणें आहेत, तींच या बालविवाहाच्या चाली-सही पूर्णपणें लागू होतात, असे मात्र म्हणतां येणार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य व समाजबंधन यांच्या योग्य मर्यादांचा जसा प्रत्यक्ष अतिक्रम वरील गोष्टींत होतो, तसा बालविवाहाच्या चालींत उघडपणें भासत नाहीं. या बाल-विवाहाच्या चालांमुळें लक्षावधी मुलांचा १२ दिवसांच्या आंतच मोक्ष होत असला, १६–१७ वर्षांतच मुलें बाप बनल्यामुळें त्यांची तारु-ण्यांतील हिम्मत व महत्त्वाकांक्षा सर्व जागच्या जागीं जिरून जात असली, किंवा ७–८ वर्षांपासूनच आईबापांच्या ममतेस पारखी होऊन, सासरच्या माणसांच्या धाकानें मुलींचें सर्व व्यक्तित्व नाहींसें होऊन संसाराचा गाडा हांकण्यास ती सर्वतोपरी लंगडी होत असली, तथापि त्यांत काय झालें? त्यांत घोर अनर्थ तो कोठें घडला? व तो बंद करण्यास कायदा कशास पाहिजे? असा एक पक्ष करतां येण्यासारखा आहे हें आम्ही जाणून आहों. आतां "कृतांतकटकामलध्वज जरा दिसों लागली ॥ पुरःसरगदांसवें झगडतां तनू भागली ॥" अशी स्थिति होऊन जाऊन ज्यांस मृत्युपाशानें घेरल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत, अशा ९९ वर्षांच्या थेरड्यास 'नवरा मुलगा' सजवून एखाद्या ७–८ वर्षांच्या अल्लड लेंकरास बाहुल्यावरच 'रंडकी' करण्यांत ज्यास अनीतीचा यत्किंचित्हि भाग दिसत नाहीं, व तिचा मात्र पुनर्विवाह झाल्यास 'अब्रह्मण्यम्' 'अब्रह्मण्यम्'

म्हणून दाही दिशा दणाणून सोडण्यास जे तयार, अशा लोकांस, आईबापांनीं व सासुसासऱ्यांनीं, केवळ आपल्या हौसेखातर सजीव बाहुलाबाहुलींचीं लग्नें लावण्याचा खेळ खेळल्यापासून, 'तुमचा खेळ होतो परंतु आमचा जीव जातो' असें म्हणण्यास कशी जागा सांपडते हें कळूं नये हें अगदीं असावें तसेंच आहे. तसेंच एकाद्या चोरट्या सुनेस ओळ लावण्याकरितां तापल्या पळीनें डागणें, किंवा तिला उलटी टांगून तिच्या पाठीची सालडीं काढणें हें जसें सासूचें कर्तव्यच आहे त्याप्रमाणें पुढें मागें वाईट पाऊल पडेल. एवढ्या संशयाच्या आरोपावरून एखाद्या बालविधवेची न्हाव्याकडून धिंड काढाविणें हें केवळ यथान्याय आहे अशींच ज्यांची समजूत अशा लोकांनीं बालविवाहाच्या कायद्याच्या आड यावें यांतही कांहीं विलक्षण नाहीं. व 'ही राष्ट्रीयसभा नुसत्या ब्राम्हणांचीच आहे व यापासून ब्राम्हण लोक आपलाच फायदा करून घेत आहेत' असे आजागळासारखे प्रलाप करणारे लोक वेडे आहेत म्हणून जसें सरकारनें ते जमेस धरण्यासारखे नाहींत तसेंच वरील लोकांचीही सल्लामसलत घेण्याचें सरकारास कारण नाहीं. परंतु राजकीय गोष्टींत मत देण्यास ज्यांस अधिकार आहे अशा सुशिक्षित लोकांत या बाबतींत केवळ एकमत जरी झालें नाहीं तरी कायदा असावा असें बहुमत झाल्यावांचून मात्र कायदा करणें योग्य होणार नाहीं हें उघड आहे.

आतां ज्या गोष्टींत प्रत्यक्ष अन्याय किंवा जुलूम होत नसेल असे समाजांतील दोष कायद्यानें काढूं पाहणें योग्य नाहीं असें आम्ही पूर्वी दर्शविलें असून या चालीच्या निरसनार्थ कायद्याची मदत घ्यावी असें कां म्हणतों, हें प्रथम सांगितलें पाहिजे. बापानें मुलास, पंतोजीनें शिष्यास, किंवा भाडेकऱ्यानें आपल्या तट्टास, ममतेनें, मन वळवून, चुचकारून मार्गास लावावें हा प्रथम पक्ष, परंतु तशानें सर्वच प्रसंगीं कार्यभाग होतो असें नाहीं. कधीं मुलास बागुलबोवाचें भय दाखवावें लागतें, कधीं शिष्यास घोडीवर चढविणें भाग पडतें; व तट्टास बाभळीच्या फोंकावांचून दुसरा उपाय अपुरा पडतो. तीच गोष्ट प्रस्तुत प्रसंगाही लागूं आहे. लग्न म्हणजे पोरखेळ नव्हे, त्याचा व समाजाच्या हिताचा फार निकट संबंध आहे, तेव्हां एकदां

कशीं तेरी पोरांचीं हाडें भाजून काढलीं कीं, गंगेंत घोडें न्हालें, असे समजून काळ वेळ वगैरे कांहीं न पहातां, जीं आईबापें आपल्या मुलांमुलींस चतुर्भुज करण्याविषयीं अगदीं हावरीं झालेलीं असतात, त्यांनीं आपलें कर्तव्य जाणून स्वसंतोषानें हा 'पोरखेळ' सोडावा हा तर राजमार्ग. परंतु आईबापांच्या अज्ञानामुळें किंवा दुराग्रहामुळें तीं तसें करण्यास तयार नसतील, तर त्यांस कायद्याच्या बागुलबोवानें भिवविणें अर्थात् अवश्य होतें. आतां नुसत्या आईबापांच्या धाकानें किंवा शिक्षकांच्या दबकावणीनें मुलांची सर्व सुधारणा होणारी नाहीं. मुलानेंहि कांहीं उमजलें पाहिजे हेंही खरें. परंतु चवदाव्या रत्नाच्या भीतीनें एकदां त्यास वळण लागले म्हणजे हळूंहळूं त्या वळणाच्या गोडीनेंच त्याचीं सुधारणा होत जाते. तसेंच बालविवाहाची चाल मोडून योग्य कालीं विवाह होऊं लागण्यास केवळ कायदा बस्स आहे असें आम्ही मुळींच म्हणत नाहीं. कायद्यानें फारच थोडा टप्पा साधणार आहे, पुढचा सर्व मार्ग क्रमण्यास समाजाच्या पायांतच जोर पाहिजे, त्यावांचून तो आंवरणार नाहीं हें उघड आहे. कायदा फार झालें तर मुलीच्या बाबतींत १०-१२ वर्षांपर्यंत मजल मारील किंवा मुलाच्या बाबतींत १६-१७ वर्षांपर्यंत विवाहमर्यादा नेईल. परंतु एवढ्यानेंच आपणांस समाधान मानून बसतां येत नाहीं; आपणांस त्याच्या पुष्कळ पुढें गेलें पाहिजे. कायद्याच्या योगानें इतकेंच होईल कीं, १०-१२ व १६-१७ ही मर्यादा तरी कायमची झाल्यासारखी होईल. आजमितीस ज्या लोकांस या दुष्ट चालीचे परिणाम माहीत नाहींत तेच याच्या पूर्वी लग्नें करतात असें नाहीं; ज्या लोकांस आपली चूक पूर्णपणें दिसत असते अशाही लोकांस मुलगी ७-८ वर्षांची झाली नाहीं तोंच व मुलास १२ वें वर्ष लागलें नाहीं तोंच त्यांच्या लग्नाच्या फिकीरींत पडावें लागतें. कारण, जातिभेदामुळें वधूवरांचीं निवड करण्यास फारच आकुंचित प्रदेश असल्यामुळें, व त्यांतल्या त्यांत नवीन शास्त्रार्थ मध्यें घुसून ब्राह्मणांतल्या ब्राह्मणांतच देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, असे वर्ग उत्पन्न झाल्यामुळें आपण आपली मुलगी किंवा मुलगा वाढविला असतां, त्यास पुढें योग्य स्थळ कसें मिळेल, ही काळजी आईबापांपुढें दत्तासारखी उभी राहून त्यांचे सर्व सुधारणेचे विचार जागच्या जागीं थिजून जातात. एखाद्या मनुष्याचें हात बांधून टाकून तो कांहीं उद्योग

करीत नाहीं म्हणून त्यास दोष देणें शहाणपणाचें नाहीं. तसेंच सुधारणा व्हावी असें इच्छिणाऱ्या व बोलून दाखविणाऱ्या लोकांच्या अडचणी दूर करतां येण्यासारखा असूनही त्या दूर न करतां "क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे" असा मोठ्या आढ्यतेनें उपदेश करीत बसणें, व जी गोष्ट आपल्या हातून घडत नाहीं, तीच दुसऱ्यांनीं न केल्याबद्दल त्यांचा उपहास करीत बसणें केवळ चुकीचें होणार आहे. ज्या सुधारणेचा केवळ स्वत:पुरताच परिणाम घडणारा असतो अशा गोष्टींत मनुष्यानें स्वतांस झीज लावून घेऊन धैर्याचें उदाहरण जगास दाखवावें हें योग्य आहे. परंतु ज्या सुधारणेचा दुसऱ्याच्या हिताहिताशीं प्रत्यक्ष संबंध पोहोंचतो अशा गोष्टींत, आपलें बोलणें खरें करून दाखविण्याकरितां, आपलें व आपणावर अवलंबून असणाऱ्या मुलाबाळांचें नुकसान करण्यास प्रवृत्त होणें हें सर्वथा योग्यच आहे असें खात्रीनें म्हणतां येण्यासारखें नाहीं. तात्पर्य, बालविवाहाची चाल घातक आहे असा जरी पुष्कळांचा समज झालेला आहे तथापि इतरांचाही तसा झाला आहे किंवा नाहीं याविषयीं साशंक असल्यामुळें व आपल्या मुलाबाळांचें हिताहित पाहणें विशेष महत्वाचें कर्तव्य असल्यामुळें, त्या विचारांचा आचारावर परिणाम घडण्यास जी एक मोठी अडचण येतें ती ह्या कायद्यानें दूर होण्यासारखी आहे. सर्वच मुलींचीं लग्नें १०--१२ वर्षांच्या आंत होणार नाहींत किंवा सर्वच मुलांची १६--१७ वर्षांपूर्वी होणार नाहींत अशी कायद्यानें हमी घेतली असतां सर्वांचीच काळजी दूर होईल व आपलें एक तरी पाऊल पुढें पडलें असें खात्रीनें म्हणतां येईल. शिवाय १०-१२ वर्षांच्या कांहीं मुली अविवाहित राहतात, व त्याबद्दल कोणी तक्रार करीत नाहीं येवढ्यावरून असा कायदा करण्यास लोकांचीं धर्मसमजूत आडवी येते असेंही म्हणतां येणार नाहीं. तात्पर्य, अशा बाबतींत सामान्य दृष्टीनें पाहतां कायद्याची मदत घेणें जरी सर्वांशीं ग्राह्य नाहीं तथापि आमच्या समाजाचा पूर्व इतिहास व सांप्रतची स्थिति ही मनांत आणतां हें आमचें निगरगट्ट तट्टू कायद्याच्या फोंकावांचून सहसा हलणार नाहींत असें आम्हांस वाटतें.

आपल्या सुशिक्षित मंडळींस खरोखर आपली सुधारणा व्हावी ही गोष्ट जर इष्ट असेल तर आमच्या मतें त्यांनीं या कायद्याच्या आड येण्याचें कारण

नाहीं. बाकी सुधारणाच नको असेल तर मग खुशाल 'थंडे सुधारक' व 'उतावळे सुधारक' वगैरे निरर्थक कोटिक्रम लढवून पांडित्य करीत बसावे. आम्ही जसा कायदा असावा असें सुचविलें आहे त्यांत वावगें असें कांहीं-एक नाहीं, त्याच्या योगानें समाजाच्या धर्मसमजुतीस धक्का पोहोंचण्याचें भय नाहीं. त्याच्या योगें पुष्कळांस इष्ट असणारीं सुधारणा अनायासानें होणारी आहे व तीही फारच नियमित असून सर्वांस संमत अशीच आहे, 'तुमच्या राष्ट्रीय सभेंत स्त्रियाही हजर आहेत हें पाहून मला फार आनंद होतो' असे मि. ब्राडलॉचे उद्गार ऐकून टाळ्यांचा गजर करून सोडणारे हिंदुस्थानच्या २५ कोटि प्रजेचे मुखत्यार जर अप्रामाणिक नसतील तर या कायद्यानें विवाहमर्यादा कायमची १०—१२ वर्षांवर येऊन, तितका वेळ तरी ज्यास जसें इष्ट असेल तसें मुलीस शिक्षण देण्याची सोय होणारी आहे, अशा विचारानें ते या कायद्याच्या आड येणार नाहींत अशी आम्हांस आशा आहे. १०-१२ वर्षांच्या पूर्वी विवाह न झाल्यानें पुष्कळ बालवधूंचें कुंकूं पुसलें जाणार नाहीं; अशा मुग्ध वयांत सासरीं कसें वागावें हें न कळल्यामुळें, त्यांच्या हातून ज्या चुका होतात, त्यांसही संधि राहणार नाहीं, व आईबापांच्या बेचाळीस कुळांचा उद्धार होण्याचें थांबून त्या लेकरांचाही पुष्कळ जाच अनायासें दूर होईल. पेनाच्या एका तडाख्यासरशीं सर्व सुधारणा करूं पहाण्याचा आरोपही या कायद्यावर आणतां येण्यासारखा नाहीं. बालविवाहाचा प्रघात खरोखर मोडण्यास समाजानेंच तयार झालें पाहिजे ही गोष्ट हा कायदा विसरला नाहीं. बापाच्या घरीं मुलीस ऋतु प्राप्त झाला असतां बेचाळीस कुळ्या नर्कांत जाणार ही वेडगळपणाची समजूत दूर करणें म्हणजे एकादा प्रचंड पर्वत जमीनदोस्त करण्यासारखें आहे व या पर्वतावर आघात करीत बसण्याचें काम समाजासच केलें पाहिजे, तें मात्र कायद्यानें होणें अशक्य आहे. फार दिवसपर्यंत एकाच स्थितीशीं खिळून गेलेल्या या आमच्या समाजास प्रथम गति देण्याचें काम मात्र कायद्यानें होणारें आहे. आगगाडी चालूं लागण्यापूर्वी जसा थोडासा धक्का सोसावा लागतो तसाच हा कायद्याचा कडक उपाय गौण असला तथापि तो पत्करला पाहिजे. एखादा मनुष्य रोगानें जर्जर झाला असतां नुसत्या मात्रेच्या वेढ्यानें त्यास म्हणजे

पूर्ण उतार पडून तो थट्टाकट्टा होतो असें नाहीं तर त्याच्या योगानें केवळ प्राण मात्र बचावतो. तशींच केवळ या कायद्याची गोष्ट आहे. यांत उतावळेपणाचा गंधही नाहीं. ज्या सरकारच्या न्यायप्रियतेवर आमचा इतका विश्वास आहे कीं, आम्ही सर्वस्वीं गुलाम बनलों आहों तथापि त्याच्याच मदतीनें आम्ही स्वतंत्र ज्ञानपद होऊ असा आमचा पूर्ण भरंवसा आहे; ज्यांच्या केवळ भूतदयेनें असंख्य गुलाम आज स्वातंत्र्य भोगीत आहेत, व आम्हांसारख्या परधर्मी, भिन्नवर्णी व हजारों कोसांच्या अंतरावर राहणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठीं अविश्रांत श्रम करणारे मि. ह्यूम, मि. ब्राडलॉ ह्यांच्यासारखे शेंकडों उदार महात्मे ज्या लोकांत निपजतात, त्या लोकांनीं नियंत्रित अशा हिंदुस्थान सरकारापाशीं आम्हीं कायदा मागितला असतां काय परिणाम ओढवतील कोण जाणे म्हणून बळेंच आपण भ्याल्यासारखें दाखवून दुसऱ्या असंख्य लोकांस भिववविण्याचा प्रयत्न करण्यांतच जर थंडी सुधारणा असेल तर अशा थंड्या सुधारकांपासून ईश्वर आम्हांस वांचवो ! आम्हांस त्यांची प्राणघातक माया नको ! ज्यांच्याकरितां एकादी सुधारणा करावयाची त्यांच्यावर त्या सुधारणेनें प्रत्यक्ष जुलूम होत असूनहि ती सुधारणा कोणी करूं पाहील तर त्याच्या आड येणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. व अशा लोकांसच जर योग्य रीतीनें 'थंडे सुधारक' म्हणतां येईल तर मग बालविवाहाच्या दुष्ट प्रघातांत, लोकांवर प्रत्यक्ष जुलूम न करितां अंशतः प्रतिबंध करण्यास साधनीभूत असा कायदा मागणाऱ्या लोकांस 'उतावळ्या सुधारकां'त ओढून, तुला न मला. घाल कुत्र्याला, असा प्रकार सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांनीं कां करावा हें आम्हांस समजत नाहीं

सामाजिक सुधारणा परिषदेचे निंदक : : १५

राष्ट्रसभेच्या पाठीमागून सामाजिक विषयाचा विचार करण्याकरितां गेलीं दोन वर्षें दोन सामाजिक परिषदा झाल्या. राष्ट्रसभेसाठीं एकत्र जम-

णाऱ्या लोकांना अनायासें सामाजिक गोष्टीविषयीं चर्चा करण्यास सांपडून, त्यासंबंधानें एकमेकांचे विचार एकमेकांस कळविण्यास व ताडून पहाण्यास सांपडावें, आणि जमल्यास एखादी विशिष्ट सुधारणा अमलांत आणण्यासाठीं सर्वांनीं एकत्र बसून एखादी तोड काढावी, या हेतूनें गेल्या दोन सामाजिक परिषदा भरविण्यांत आल्या, हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं. अशा प्रकारच्या सभांपासून व्हावा तितका फायदा तत्काळ होण्याचा संभव नाहीं, हें स्वल्प विचाराअंतीं ध्यानांत येण्यासारखें असतां, शिंगें मोडून घेऊन वासरांत शिरणारे सुशिक्षित पण लोकरंजनपरायण, लौकिकाभिलाषी, दुराग्रही, व कांहीं अंशीं भेकड असे कित्येक लोक अशा परिषदांचें आपणाकडून होईल तितकें अभिनंदन करण्याचें सोडून देऊन, त्यावर तुटून पडूं लागले आहेत, हें पाहून कोणत्या समंजस मनुष्यास विस्मय व खेद होणार नाहीं ? सामाजिक परिषदेचें काम नीट न झालें तर त्याबद्दल लाज कोणाला ? ज्यांनीं ती स्थापून तिच्या द्वारें कांहीं सामाजिक हित झालें तर पहावें, म्हणून आपणांकडून होईल तितकी खटपट चालविली आहे त्यांना ? किंवा जे त्याला आणवेल तेवढा व्यत्यय आणतात त्यांना ? 'अमुक प्रकारचें लोक अमुक रीतीनें सुधारणा करूं पहात आहेत, पण त्यांची ती रीत आम्हांस मान्य नाहीं,' असें म्हणून कांहींच न करणें, किंवा उपहास करीत सुटणें, हें फार सोपें आहे ! शंका कोणाला घेतां येत नाहींत ? दोष कोणाला दाखवितां येत नाहींत ? पाडापाड व मोडतोड करण्याला कोणाला कष्ट पडतात ? असलीं कामें कोणीही करूं शकेल ! शंकांचें समाधान करणें, दोषयुक्त वस्तूंतील चांगला भाग ओळखून त्याला बळकटी आणण्याचा प्रयत्न करणें व जें पडलें मोडलें असेल त्यांची डागडुजी करणें किंवा कांहीं तरी नवीन बांधणें हें किती कठीण आहे ? जो हें करील तोच खरा कसबी. अशाला 'दुर्धारक' म्हणून जे आपणांस व्यंग्योक्तीनें 'खरे सुधारक' ही संज्ञा लावून घेतात, व दुर्धारकांवर दुःशब्दांचा प्रहार करीत सुटतात त्यांनीं आजपर्यंत काय दिवे लाविले आहेत ? आजकाल सामाजिक गोष्टींत जी जागृति दृष्टीस पडूं लागली आहे तींत यांचें किती अंग आहे ? व तीबद्दल त्यांनीं काय केलें आहे ? स्त्रीशिक्षणासाठीं मुलींचीं हायस्कुलें

घालणें चांगलें नसेल, पण या 'मित' सुधारकांनीं आपल्याच पद्धतीनें कां होईना, यासंबंधानें काय केलें आहे ? पाहिजे त्या वयाच्या गतभर्तृकेनें पुनर्विवाह करण्यास हरकत नाहीं, असें जर कधीं कोणीं म्हटलें असेल तर त्यास अधीर ठरवून, या 'माफक सुधारकांनीं ऋतुस्नात होण्यापूर्वी जेवढ्यांस वैधव्य प्राप्त झालें असेल तेवढ्या अनाथ कन्यकांस तरी सनाथ करण्याचा प्रयत्न कां केला नाहीं ? लग्नाच्या वयाच्या इयत्तेविषयीं कायद्याचें बंधन करून घेणें हितावह नसेल, पण दहा वर्षांहून लहान वयाच्या मुलीचें लग्न करणें बरोबर नाहीं, हें जर या 'खऱ्या' सुधारकांस संमत असेल, तर दहा वर्षांच्या आंतील वयाच्या कोणत्याहि मुलीच्या भालप्रदेशावरील कुंकुमास धक्का न पोहचूं देण्याविषयीं यांनीं काय खबरदारी ठेविली आहे ? ऋतु प्राप्त न झालेल्या स्वस्त्रीशीं गमन करणाऱ्या उतावीळ नवऱ्याला पिनल कोडानें अपराधी समजून शिक्षा ठोठावावी, असें म्हणणें अविचार असेल, पण जर अशा प्रकारचा संभोग निंद्य आहे, असें समाजाच्या या निष्कपट हितचिंतकांस वाटत असेल, तर त्यांनीं अशा प्रकारचा अनाचार न होऊं देण्याबद्दल आजपर्यंत काय तजबिजी केल्या आहेत त्या आज ते जगापुढें मांडूं शकतील काय ? सर्वच गतभर्तृकांना वपन करून घेऊन कुरूप होणें संकटावह वाटत नसेल, पण ज्यांवर तो प्रसंग मूर्ख मातापितरांच्या किंवा निर्दय सासुसासऱ्यांच्या जुलुमामुळें येत असेल, त्यांना त्यांतून सोडविण्याबद्दल दुर्धारकांच्या या निंदक सुधारकांनीं कोणते उपाय केलें आहेत ? मांडीवर मांडी ठोकून वल्गना करीत सुटणें, दुसऱ्याचीं व्यंगें काढणें, मूढ अविचारी लोकांकडून पाठ थोपटून घेण्यासारखा प्रलाप करणें व कांहीं न करतां आपणांस देशहिताची मोठी कळकळ आहे, व तें साधण्यासाठीं आपण नेहमीं झटत आहों, असें दाखविणें फार सोपें आहे ! जर असें नसतें, व अनेक युगें रूढ होऊन बसलेल्या अपायकारक आचाराविरुद्ध जाणें हें किती अवघड आहे, हें सहज समजण्यासारखें असतें, तर सामाजिक-सुधारणा-परिषदेसारख्या संस्थेच्या न्यूनत्वाची टिमकी वाजवींत न बसतां, ते काढून टाकून तिला सुरूपता व हितकर्तृकता आणण्याचा प्रयत्न या 'माफक' व 'खऱ्या' सुधारकांनीं खचित केला असता !

अजून तरी सावध व्हा : : १६

गेल्या दीनबंधूंतील लेखकानें अन्वर्थ काम केलें. अनाथ, दीन, अबला गाईस वैधव्याची जन्मभर आठवण देणारा जो न्हाव्यांचा वर्ग त्यांस चार गोष्टी सांगून त्यांच्या हातून प्रत्यही जें अघोर कर्म होत आहे तें स्वतः होऊन बंद करण्याचा उपदेश केला आहे. अहो धर्म समता ठेवणारें वेदोक्त धर्माचें अभिमानी आचार्य, दिक्षितांनों, आतांतरी कांहीं लाज धरा. तुमच्या लेकी, सुना व भगिनी यांची दया तुमच्या क्षुद्र बंधूस येऊन त्यांनीं सद्वासना धरली व अशरण स्त्रियांस तुमच्या धर्माच्या-अधर्माच्या असेंच म्हणणें सयुक्तिक आहे-चिखलांतून बाहेर काढून टाकण्याचें मनांत आणलें आहे, तें पाहून खालीं माना घाला. न्हाव्याकडून कट झाला असतां ब्राम्हण लोक भादरण्याचा धंदा पत्करून विधवावपनाची चाल कायम ठेवतील असें आम्हांस वाटत नाहीं. वेळेवर जागे व्हाल तर बरी गत आहे, नाहीं तर सुधारणेचा शकट आज जो ब्राह्मणांकडून बऱ्याच अंशानें हांकला जात आहे, तें सर्व फिरून आजपर्यंत अडाणी मानलेल्या लोकांकडे त्याचें धुरीणत्व जाईल, हें ध्यानांत धरा. ब्राह्मण स्त्रियांची दैना पाहून क्षुद्र लोकांस गहिंवर यावा व स्वलाभाची संधि सोडून म्हणजे आपल्या पोटावर बिब्बा घालून ब्राह्मण भगिनीचा उद्धार करण्याची खटपट करावी अशी उदाहरणें आपल्या डोळ्यांदेखत घडत असतांही, अजून कलियुगच आहे, या युगांत लोक नीतिभ्रष्ट होत जाणार, इत्यादि वृथा कल्पना करणाऱ्यांचे दांत त्यांच्या घशांत घातलेसें होत नाहीं काय? दीनबंधूनें सुचविल्याप्रमाणें न्हाव्यांत जर कट झाला तर किती बरें मजा होईल?

धर्मांधकारांत लोळणाऱ्या स्त्रिया, पैशाच्या लालुचीनें हजामत करणारे न्हावी, व अपवाद भयानें नातेवाईक लोक इतके सर्व पापाचरणामध्यें बुडत आहेत. यांपैकीं दोघांनीं मन घट्ट केलें असतां तिसऱ्याचें कांहीं न चालून त्यास गप्प बसावें लागेल. स्त्रियांनीं आपल्या संरक्षणाकरितां पुढाकार घेऊन या राक्षसी रीतीविरुद्ध बंड करावयाची वेळ येण्यास अजून बराच अवकाश आहे. राहतांपैकीं राहिले दोन वर्ग. ज्या लोकांत केशवपनाची चाल आहे

त्या जातींतील म्हणजे ब्राह्मणवर्गातील बरेच लोक आधुनिक शिक्षणाच्या जोरानें स्त्रियांवर होणारा जुलूम पाहण्यास दिवसानुदिवस नाखूष होत आहेत हा काय तो संतोषाचा भाग आहे. आतां ह्याच अमानुष कृत्यांत ज्यांचा हात आहे. असा तिसरा वर्ग म्हाव्यांचा. दीनबंधूनें लिहिल्याप्रमाणें खरोखरच त्या वर्गाची हलाखी असल्यास आपल्या दुष्कर्माचरणानें फिदा होणारी अक्काबाई त्यानें लवकर लाथ मारून बाहेर घालवावी. म्हणजे पतिशोकानें गताधार झालेल्या स्त्रीलतेवर वज्रभेदी शस्त्रानें तिच्या सौंदर्याचा विध्वंस करणाऱ्या कठोरहृदय म्हाव्यांच्या हातून प्रतिदिनी पातक होत नाहीं काय ? तिचे तें, पाषाणासहि द्रव आणणारे करूण शब्द ऐकून त्याच्या–मनुष्यच तो आहे–मनाची काय स्थिति होत असेल ? संसारापासून कोणाची निवृत्ति करावयाची असल्यास त्यास हा धंदा सांगावा म्हणजे झाले ! असो, याप्रमाणें संसार असार आहे, अशी खातरी होत जाणाऱ्या नापिकवर्गाची या मर्त्यलोकीं चलती चालत नाहीं, यांत काय आश्चर्य आहे ? आपल्यावर पडणारी ही गदा घालविणें नापिक वर्गाच्या हातांत आहे. त्यांनीं कट करून अनाथ गाईंचा आम्हीं लळ करणार नाहीं अशी सर्व जातीसमक्ष शपथ घेतल्यास काय गंमत होईल ? दिवसानुदिवस मानसोन्नति होत जाणाऱ्या श्रेष्ठ लोकांचा या पापकृत्यांपासून होणारा संताप जर सद्धर्मानें वर्तन करूं इच्छिणाऱ्या धनाभिलाषी म्हाव्यांच्या तिरस्कारांस मिळाला तर फार दिवसांपासून इष्ट वाटत असलेली सुधारणा सुरूं केल्याचें आपणास श्रेय येणार नाहीं काय ? लोकापवाद कमी झाला, व केशकर्तनकारांचा कट झाला तर गरीब बिचाऱ्या गाईस धर्माचें पांघरूण घेणाऱ्या या भुताटकी चालीला स्मशानभूमि दिसण्याचा दिवस जवळ येणार नाहीं काय ?

सरकारकडून कायदा मागण्याचा तरी हेतू हाच आहे. यामध्यें कोणत्याही विशिष्ट वर्गास दुखवण्याचें आमचें मानस नाहीं, अशी आपल्यामध्यें कांहीं गोष्टींमध्यें सुधारणा करण्याचें बऱ्याच लोकांच्या मनांत येत आहे, त्याचप्रमाणें इतर वर्गाच्याही मनांत निष्पाप वर्तन करण्याचें आल्यास या कामींतरी सरकारकडे जावें लागण्याचें कांहीं कारण राहील असें आम्हांस वाटत नाहीं.

सारांश, तात्पर्य ध्यावयाचें कीं, आमच्या श्रेष्ठ वर्गांतील स्त्रियांची सुटका करण्याचें इतर जातीच्या मनांत येत असतांनाही जर ज्यांचें नुकसान होत आहे अशा समजुतदार व श्रेष्ठ वर्णाच्या जातींत आपल्या येथील घाणेरडा तबेला धुण्याचे मनांत येणार नाहीं ? तर मात्र सरकारकडे गाऱ्हाणें न्यावयास आम्ही कधींही कमी करणार नाहीं. देवदयेनें सध्यांचा प्रसंग चांगला आहे; तेव्हां सगळ्यांनीं सावध व्हावें.

अनाथाचा वाली कोणी नाहीं ! : : १७

अलीकडे आमच्या युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांत जे फेरबदल होत आहेत त्यांकडे पाहिलें असतां, त्या मंडळींत जे जबरदस्त आहेत त्यांनीं हवें तें करावें, व लोकांचें खरें हित ज्या अभ्यासांत आहे, त्याकडे कोणींच लक्ष देऊं नये, असा प्रकार घडत आहे, असें दिसून आल्यावांचून राहणार नाहीं. थोड्या वर्षांपूर्वी सर रिचर्ड टेंपल यांस आर्ट्स् कोसमधील दोन परीक्षांच्याऐवजीं तीन कराव्या असें वाटलें. खुद्द गव्हर्नरच्या व चॅन्सेलरच्या, व त्यांतही सर रिचर्डसारख्या गव्हर्नरच्या व चॅन्सेलरच्या मनांत कांहीं हुक्की आल्याबरोबर ती तडीस जाण्यास काय कठीण पडणार ? युनिव्हर्सिटीचें लोक आपणांस मोठे सुशिक्षित व स्वतंत्र म्हणवितात, व त्यांवर जुलूम करीत नाहींत, त्यापुढें ते आपल्या स्वतंत्रतेची ऐट मिरवितातही ! पण सर रिचर्डपुढें त्यांचें कांहीं एक चाललें नाहीं. सेनेटच्या एका बैठकीला दोन परीक्षा मोडून त्यांचे जागीं तीन केल्या, व आर्ट्स् कोर्से जितका कंटकमय करणें शक्य होतें तितका करून सोडिला. ही तीन परीक्षांची व्यवस्था झाल्यापासून बी. ए. चा अभ्यास करणाऱ्यास कॉलेजांत प्रवेश केल्यापासून त्यांतून बाहेर पडेतोंपर्यंत दम टाकण्यास एक दिवसाची फुरसत मिळेल तर ज्याचें नांव तें ! एका परीक्षेच्या चरकांतून पार पडावें तों दुसरी 'दत्त' करून पुढें उभी आहेच ! पूर्वी दीड वर्षानें एकेक परीक्षा घेतली जात असे,

यामुळें अभ्यास मुरवण्यास वेळ सांपडे इतकेंच नाहीं, तर विद्यालयस्थ आयुष्य क्रम आतांहून अनेक प्रकारांनीं विशेष सुखावह करून घेतां येत असे. पहिल्या कोर्समध्यें पहिलीं व चौथी टर्म विद्यार्थ्यांस खेळणें, पोहणें, हिंडणें, अभ्यासाच्या क्रमाच्या बाहेरचीं पुस्तकें वाचणें, नवीन ओळखी करणें वगैरे गोष्टींत घालवितां येत असे. सध्यां तसें मुळींच करतां येत नाहीं; कारण प्रत्येक वर्षाच्या अखेरीस एकेक परीक्षा ठेवून दिली असल्यामुळें, कॉलेजच्या संवत्सराच्या वर्षप्रतिपदेपासून त्याच्या फाल्गुन वद्य अमावास्येपर्यंत पुस्तकाच्या समागमांत अहोरात्र दंग असावें लागतें. याप्रमाणें विश्रांति न सांपडतां तीन वर्षेंपर्यंत सारा वेळ मानसिक श्रम करावे लागत असल्यामुळें, हा कॉलेजांतर्गत त्रिवार्षिक शिक्षणक्रम अत्यंत कष्टावह झाला आहे; हें अशा प्रकारच्या गोष्टीकडे बिलकुल ढुंकून न पाहाणाऱ्या लोकांशिवाय बाकीच्यांस पूर्ण विदित झाले आहे. हें सर्व रिचर्ड टेंपल यांच्या आग्रहाचें फळ तें !

टेंपल व फर्ग्यूसन साहेब जाऊन लॉर्ड रे आले. लोकशिक्षणाविषयीं यांनीं फार विचार केलेला असा यांचा लौकिक, यांचे पाय या देशास लागण्यापूर्वी येथें येऊन थडकला असल्यामुळें, हे आमच्या युनिव्हर्सिटींत कांहीं तरी विलक्षण फेरफार करतील असें वाटलें होतें. पण सुदैवानें तसें त्यांनीं केलें नाहीं. युनिव्हर्सिटीच्या अधिकारांत किंवा व्यवस्थेंत लॉर्ड रे यांनीं बिलकुल ढवळाढवळ केली नाहीं. सर्व परीक्षांचे अभ्यासक्रम व त्यांच्या मुदती जशा ते येण्यापूर्वी होत्या तशाच बहूशः अजून आहेत, व त्यांत जे अल्पस्वल्प फेरफार झाले आहेत ते युनिव्हर्सिटीनें आपले आपण केलेले आहेत.

मध्यम व वरिष्ठ शिक्षणांस लॉर्ड रे यांनीं बाहेरून जितकी मदत करवली तितकी केली. त्या शिक्षणाच्या अभ्यासक्रमांत त्यांनीं हात घातला नाहीं. यांत्रिक शिक्षण वाढलें पाहिजे; त्यांत लोकांचें खरें हित आहे; अशी त्यांची पक्की खातरी होऊन गेली होती. पण या कामीं युनिव्हर्सिटीकडून म्हणण्यासारखी मदत मिळण्याचा संभव नाहीं, असें त्यांस तेव्हांच दिसून आल्यामुळें त्यांनीं तिचा नादच सोडून दिला, आणि मग स्वतंत्र यांत्रिक शाळा स्थापण्याकडे आपलें लक्ष्य लाविलें. व्हिक्टोरिया ज्यु. टेक्निकल

इन्स्टिट्यूट ही त्या हेतूनें त्यांनीं केलेल्या दीर्घ परिश्रमाचें फळ होय. शास्त्रीय विषयांकडेही लोकांचें लक्ष विशेष लागावें, असें त्यांस वाटत होतें. पण तें घडवून आणण्यांतही त्यांनीं बाहेरून बाहेरून जितकें करवलें तितकेंच केलें. सर रिचर्डप्रमाणें युनिव्हर्सिटींत आपलीं चॅन्सेलरगिरी बजावली नाहीं ! सरकारी नोकरीवर जे लोक ठेवावयाचे त्यांस कोणत्या प्रकारचें शिक्षण मिळालेलें असावें याचा निश्चय करण्याचा अधिकार वाजवी रीतीनें सरकारकडे येतो. या योग्य अधिकाराचा फायदा घेऊन, त्यांनीं आमच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेस बिलकुल न दुखवितां युनिव्हर्सिटीकडून सरकारसाठीं युनिव्हर्सिटी-स्कूलफायनल नांवाची नवीन परीक्षा अस्तित्वांत आणविली, व तिच्या द्वारें आपला हेतु नेववेल तितका स्वतंत्रपणें तडीस नेण्याचा प्रयत्न केला. तसेंच, मेडिकल व सायन्स कॉलेजांस हवी तितकी मदत करून, व व्हाइस चॅन्सेलरच्या जागेवर, रे. मि. म्याकिकन यांची नेमणूक करून शास्त्रज्ञानप्रसाराविषयीं आपली दीर्घ उत्कंठा त्यांनीं होईल तितकी व्यक्त केली. यापलीकडे त्यांचा व युनिव्हर्सिटीचा प्रत्यक्ष संबंध घडला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. युनिव्हर्सिटीच्या कान्व्होकेशनांत त्यांनीं केलेलें भाषण व युनिव्हर्सिटीच्या बिलाविषयीं मुंबई सरकारचा अभिप्राय यांचा युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमाशीं कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता, हें कोणास सांगितलें पाहिजे असें नाहीं.

पण वारंवार होतें काय कीं, मूळ विचार करणारापेक्षां अनुकरण करणारेच मोठी धांदल करून सोडतात ! लॉर्ड रे गव्हर्नर झाले आहेत, व ते मोठे शास्त्रप्रसारेच्छु आहेत, असें दिसून आल्याबरोबर, ज्या त्या परीक्षेंत जमल्यास थोडेबहुत पदार्थशास्त्र ढकलून देण्याविषयीं कित्येक जण उत्सुक झाले, व युनिव्हर्सिटीच्या आर्ट्स् शाखेचा अभ्यासक्रम बदलण्याविषयीं चर्चा सुरूं झाली. हिला प्रारंभ होतांच ज्यांचे जे आवडते फेरफार होते ते त्यांनीं पुढें आणिले. इतिहास, अर्थशास्त्र, देशी भाषा वगैरेंचें बरेंच ज्ञान असल्याखेरीज कोणाला बी. ए. म्हणणें उचित नाहीं, अशी साधारण कल्पना झाल्यामुळें, बी. ए. चा अभ्यासक्रम वाढवा अशा सूचना येऊं लागल्या. या सूचनांबरोबरच वर्षांची संख्याही वाढविणें जरूर असल्यामुळें, तिहींच्या

जागीं चार वर्षें असावीं, असा बूट निघाला; व तो बहुतेकांस पसंत झाल्यासारखा होऊन नवीन अभ्यासक्रमाचा एक मसूदा तयार करण्यांत आला. या मसुद्यांत अर्थशास्त्र, इतिहास, पदार्थशास्त्र व देशी भाषा यांची बरीच सोय केली होती. पण जें चांगलें तें एकाएकीं प्राप्त झालें तर जगाची सुधारणा होऊन जाऊन करण्यासारखें पुढें कांहीं उरणार नाहीं, व उगीच माशा मारीत बसावें लागेल, अशी भीति कित्येकांस उत्पन्न होऊन, व आमच्या खंगूं लागलेल्या शरीरशक्तीकडे त्यांचें लक्ष जाऊन, अभ्यास वाढविण्यास त्यांनीं अशी हरकत घेतली कीं, आहेत त्याच अभ्यासांचें ओझें विद्यार्थ्यांस निभेनासें झालें असून त्यांवर अधिक ओझें लादण्यास तुम्ही प्रवृत्त होतांत याचा अर्थ काय? बी. ए. चा क्रम चार वर्षांचा असून त्याचा अभ्यास प्रस्तुत कालीं आहे तितकाच असला, तर तो त्रास न पडतां पक्का होईल. ही प्रतिसूचना मताधिक्यानें ठाम होऊन पहिले सारे बेत मागें पडले, व आज सायंकाळीं सेनेटपुढें जो वाद होणार आहे त्यांत चतुर्वार्षिक बी. ए. च्या परीक्षेसाठीं तयार केलेल्या नवीन मसुद्यांची चर्चा व्हावयाची आहे. या मसुद्यांत बी. ए. च्या प्रस्तुतच्या अभ्यासक्रमांतील कांहीं विषय कमी करून इतिहास, अर्थशास्त्र व इंग्रजी निबंध लिहिणें या विषयांस जागा केली आहे, देशी भाषांस गचांडी देऊन अजीबात हुस्कून लाविलें आहे. तिहींचीं चार वर्षें झालीं असून, व इंग्रजी, संस्कृत आणि गणित यांतील कांहीं पुस्तकें कमी करण्याचा विचार असून, हा मसुदा करणाऱ्यांस देशी भाषांस पाय ठेवण्यापुरतीसुद्धां जागा करतां आली नाहीं काय? किंवा यांत त्यांच्याकडे तरी दोष काय आहे? अनाथाला कोण वाली मिळणार? ज्याप्रमाणें पूर्वी एका ग्रांटानें या देशीं भाषांचा पिच्छा पुरवून त्यांस युनिव्हर्सिटींतून पिटाळून लाविलें, त्याप्रमाणें दुसरा एक ग्रांट अवतरून तो यांचा पक्ष घेईतोपर्यंत त्यांस असेंच बाहेर भटकत रहावें लागणार, असें आम्हांस वाटतें! सिंडिकेटांतील महादेवास ही अतिशय महत्त्वाची बाब आहे असें अद्यापि न वाटूं लागलें असल्यामुळें, सेनेटांतील वामनदेवाचें कांहींएक चालत नाहीं! देशांतील शिक्षणक्रम देशी भाषांत चालणें किती उचित आहे, हें ध्यानांत आणून तसें होण्याची खटपट करीत असणें हें तर एकी

कडेच राहिलें; पण बाकीच्या विषयांप्रमाणें देशी भाषांस युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमाचा एक विषयहि आम्हांस करतां येत नाहीं, यावरून आमची आस्था, धमक, निश्चित विचार, देशकल्याणाची खरी कल्पना आणि कोणत्याही गोष्टींत यश येईपर्यंत तिचा पाठलाग न सोडण्याचा निर्धार हीं व्यक्त होतात ! युनिव्हर्सिटी आपल्या अभ्यासक्रमांत देशी भाषांस घालीत नाहीं ! युनिव्हर्सिटी अमकें करीत नाहीं ! युनिव्हर्सिटी तमकें करीत नाहीं ! असें रडगाणें आतां आम्ही किती दिवस गात बसणार ? युनिव्हर्सिटी, सिंडिकेट, सेनेट, अभ्यासक्रम, शिक्षणालयें हीं सारीं निश्चयानें परिश्रम केल्यास आपल्या हातीं येणार आहेत, व आपणांस त्यांना पाहिजे तें वळण लावितां येणार आहे हें तुम्हांस केव्हां कळूं लागणार ? अगोदर देशी भाषांचा अभ्यास होऊं लागण्यांत व पुढें त्या भाषांतच अभ्यास होऊं लागण्यांत या देशाचें खरे हित आहे अशी तुमची पक्की खात्री झाली असेल तर युनिव्हर्सिटीचें नाक धरून तिच्याकडून या अप्रिय औषधाचा स्वीकार करविणें अशक्य आहे काय ? ती मोठी सामर्थ्यवती आहे हें आम्ही कबूल करतों. पण अशीला जेरीस आणण्याचा खरा उपाय तिच्यापुढें पदर पसरून 'यांत आम्हांस भिक्षा घाल' अशी तिची दीनस्वरानें प्रार्थना करीत बसणें हा नव्हे. असें करूं लागलांत कीं, तिला अधिकच ताठा भरला म्हणून समजा. अभिमानाचा काटा अभिमानानेंच काढला पाहिजे. युनिव्हर्सिटीचीं सूत्रें सध्यां ज्यांचे हातीं आहेत त्यांना देशी भाषांचा किंवा देशी भाषांत वरिष्ठ प्रतीचा अभ्यास होऊं लागल्यानें पाश्चिमात्य ज्ञानभांडारावर हल्ला करणें, व त्या हल्ल्यांत सांपडलेल्या लुटीपासून आपलें हित करून घेणें या गोष्टीस किती साहाय्य होणार आहे, हें अद्यापि नीट दिसूं लागलें नाहीं, कितीहि समजावून सांगितलें तरी समजत नाहीं, व कानाशीं कितीही ओरडलें तरी ऐकूं येत नाहीं ? आपल्या लोकांस समजविण्यास, पाहविण्यास व ऐकविण्यास, लेचेपेचे प्रयत्न उपयोगी नाहींत. देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत चळवळ करून तिच्या दंग्यानें यांचीं डोकीं भणाणून सोडलीं पाहिजेत, ' देशी भाषा युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांत घातल्याच पाहिजेत व ज्यांना जे विषय त्यांच्या द्वारें शिकविण्याची इच्छा असेल त्यांना ते शिकविण्याची परवानगी दिली पाहिजे, ' अशा अर्थाचे अर्ज प्रत्येक

खेड्यांतून, तालुक्यांतून व जिल्ह्यांतून मुंबईस रवाना होऊन त्यांचे पर्वतप्राय भारे युनिव्हर्सिटीच्या हॉलांत येऊन पडले पाहिजेत, व लोकमत न पाहणाऱ्या प्रस्तुत अधिकाऱ्यांना जातां येतां त्यांचे धक्के बसले पाहिजेत, म्हणजे ते डोळे उघडून पाहूं लागतील! अशा रीतीनें त्यांचे डोळे व कान, यासंबंधानें आपापले व्यापार नीट करूं लागले म्हणजे त्यांचे मेंदूही स्वाभाविकपणें आपलें काम नीट करूं लागतील; पण त्या भरंवशावर केवळ स्वस्थ राहणें नीट नाहीं. त्यांच्यापुढें या विषयांची चर्चा करून त्यांची खात्री करून सोडण्यासाठीं दूरदर्शी, विद्वान्, बहुश्रुत, तारतम्यज्ञ व वाग्विदग्ध अशा प्रतिनिधींस हा कज्जा युनिव्हर्सिटीच्या कोर्टांत चातुर्यानें व नेटानें चालविल्याबद्दल वकीलपत्रें दिलीं पाहिजेत.

न करत्याचा वार शनवार : : १८

राजकीय हक्क संपादन करण्यास आम्हांस जितक्या नडी आहेत तितक्या समाजसुधारणेस नाहींत. परंतु चमत्कार असा कीं, तेथेंही आपलें गुडघाभरच पाणी. आतां असें कां व्हावें यास पुष्कळ कारणें आहेत, व त्यांपैकीं कित्येक सयुक्तिकहि आहेत. परंतु खऱ्या अडचणीमुळें आमचें पाऊल जितकें थबकून राहतें त्यापेक्षां खोट्या अडचणीमुळें आम्हांस अधिक माघार खावी लागते. ज्या वर्गावर सर्व प्रकारच्या सुधारणेचा बोजा साहजिकपणें येऊन पडला आहे, त्याच्यांत जर कर्तव्य-पराङ्मुखता नसती तर खऱ्या अडचणी दूर करणें अशक्य नाहीं. परंतु एकतर आमच्या सुशिक्षित वर्गापैकीं कित्येकांस आपली जबाबदारी मुळींच कळत नाहीं व दुसरें, ज्यांस ती कळते त्यांच्यापैकीं कित्येक लोक विशेष स्वार्थपरायण असल्यामुळें, परोपकारार्थ आपल्या स्वतांस अप्रिय करून घेण्याचें त्यांस कधींही सुचत नाहीं. सुधारक मानलेल्या लोकांनीं ज्या ज्या सुधारणा सुचविल्या आहेत, त्या सर्व अप्रयोजक आहेत, असें म्हणावें तर तें आपल्या विद्वत्तेस शोभत नाहीं. तशानें सुशिक्षित लोकांत आपला सर्वथैव उपहास

होणार, बरें, त्यांचेंच मनोभावानें साह्य करावे तर सामान्य लोकसमुदायाकडून कांहीं काळपर्यंत तरी निंदा होणार. तेव्हां अशा स्थितींत काय करावें ? दोहोंकडचा लोभ तर सुटत नाहीं. अर्थात् त्यास उपाय एकच. ढोंगी बनावें म्हणजे झालें.

अशी आमच्या कित्येक सुशिक्षितांची अवस्था असल्यामुळें, आणलेल्या सोंगाची बतावणी करण्यास, त्यास बऱ्यावाईट सर्व मार्गांचें अवलंबन करण्याची, अर्थात् पाळी येते. आपली लबाडी उघडकीस येऊं नये म्हणून गारोडी जसा हरतऱ्हा करीत असतो. तसा यांचा प्रकार एकसारखा चालू असतो. 'करून कां दाखवित नाहीं ?' म्हणुन जो एक अशा लोकांकडून प्रश्न येतो त्यांचे इंगितही यांतच आहे असें आम्ही मागेंच एकदां दाखविलें आहे. आतां यावर जर कोणी त्यांस उलट प्रश्न केला कीं, 'बरें, दुसरें मूर्ख ठरले तर ठरेनात, तुम्ही स्वतःच कांहीं दिग्विजय करून कां दाखवित नाहीं ?' तर त्यावरही त्यांच्या पोतडीत शक्कल तयार आहेच. 'काय करावें हो! या पहिल्या मंडळींनीं अगदीं घाण करून टाकली. भलभलत्या गोष्टी विचार न करतां त्यांनीं केल्या. लोकांचा विश्वास उडाला. आतां फिरून लोकांचा आमच्यावर विश्वास बसण्यास फार काळ गेला पाहिजे. ही उतावळी सुधारक मंडळी आमचे पुढारी नव्हेत. हे आमचे कट्टे शत्रू आहेत. आमचा यांच्यावर अगदीं विश्वास नाहीं. अशी जेव्हां आम्ही लोकांची खात्री करूं, व या सर्वांस हुसकून लावू तेव्हां लोकांचा आमच्यावर विश्वास बसूं लागेल. मग पहा ! ' चल चल, म्हणतां सुधारणाच सुधारणा. उगाच घाई करून सगळी घाणच करून टाकावयाची कीं नाहीं ? दमादमानें घेतलें पाहिजे. ' पी हळद कीं हो गोरी ' असें कोठें झालें आहे ! '

वरील शक्कल खरोखर योग्य आहे किंवा 'आपल्याला कांहीं करावयाला नको ' याचेंच हें सुधारलेलें भाषांतर आहे हें ज्यांस पाहणें असेल त्यांनीं ' ज्ञानदीप ' मासिक पुस्तकाचे १८८७ सालचे शेवटचे दोन अंक नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत ते पहावे. त्यांमध्यें पुनर्विवाहाच्या प्रसारार्थ झालेल्या उद्योगाचा संक्षिप्त इतिहास दिला आहे. यामध्यें दिलेला इतिहास जर खरा

असेल–व तो तसा आहे असें आम्हांस वाटतें–तर मग या पुनर्विवाहाच्या बाबतींत आमच्या पूर्वीच्या पिढींनील लोकांनीं भलभलते प्रकार केले, असा त्यांच्यावर आणलेला आक्षेप वाजवी नाहीं असें आम्हांस म्हणावें लागतें. हा पुनर्विवाहाचा विषय पुढें आल्यास आज ५०-६० वर्षें झालीं. परंतु तेव्हांपासून आतांपर्यंत घडलेल्या सर्व गोष्टींचा उल्लेख करण्याची आम्हांस अवश्यकता नाहीं. आमचा उद्देश इतकाच आहे कीं, मागल्या पिढींतील पुढारी लोकांस 'उतावळे सुधारक' हें नांव किती अंशानें लागू होण्यासारखें आहे, हें या इतिहासांतील कांहीं ठळक गोष्टींच्या साह्यानें वाचकांस दाखवावें. या प्रांतीं पुनर्विवाहाविषयीं विशेष प्रयत्न करणारे विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांचे नांव सर्व आबालवृद्धांस माहीत आहे पुनर्विवाहाचा प्रचार पाडणें युक्तिदृष्ट्या कितीही आवश्यक असलें व तो करण्याची स्त्रियांस परवानगी नसणें म्हणजे केवळ अन्याय होय, ही गोष्ट जरी कितीही उघड असली तथापि या गोष्टींचा संबंध धर्माशीं पोंचत असल्यामुळें पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे अशी लोकांची खात्री करून देणें अवश्य आहे, ही गोष्ट शास्त्रीबुवा विसरले नव्हते. प्रथमतः पुस्तकरूपानें व वर्तमानपत्रद्वारा लोकांची समजूत घालण्याचे प्रयत्न त्यांनीं केले, व नंतर याविषयीं कोणास शंका असेल तर त्यांनीं वादास उभें रहावें, अशा अर्थाचे जाहिरनामे शहरोशहरीं स्वतःच्या सहीनिशीं लावले, परंतु उपयोग झाला नाहीं. विधवेचें गोत्र कोणते धरावें, तिचें दान कोणीं करावें, अशौचाचा निर्णय कसा, दायभागाचा निर्णय कसा, वगैरे बारीक शंकांचीं उत्तरें देण्याची जी शास्त्रीबोवांनीं मेहनत घेतली, ती उतावळेपणाचीच साक्ष असली तर न कळे ! इतकें करूनही विरुद्ध पक्षाची मंडळी वाद करण्यास उभी राहीनात, तेव्हां अर्थात् ज्या प्रचाराच्या सशास्त्रतेबद्दल त्यांची खात्री झाली होती, तो प्रचार सुरू करण्याचा 'पुनर्विवाहोत्तेजक' मंडळीनें निश्चय केला, हेंही साहजिकच झालें. १८६९ सालीं जो प्रसिद्ध विवाह सदर मंडळीनें घडवून आणला त्यांतील वधूचें वय १६ वर्षांचें असून, तिच्या दोन बंधूंच्या विचारानें ती विवाहास तयार होती. विवाह होण्याच्या अगोदर दोन दिवस 'हिंदुधर्म व्यवस्थापक' सभेकडून पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेबद्दल वाद करून, सशास्त्र ठरल्यास हा

विवाह व्हावा व तोंपर्यंत तो तहकूब ठेवावा, अशा अर्थाचें पत्र आलें होतें हें खरें. पण इतक्या दिवस विधिपक्षाची मंडळी वादास तयार असून कोणी वादास आलें नाहीं व आयत्या वेळीं ही मंडळीं वादास बोलावतात, त्या अर्थी कोणीकडून तरी या विवाहास विघ्न आणावें असा त्यांचा उघड हेतु दिसतो, असें समजून मंडळीनें विवाह करण्याचा निश्चय कायम ठेवला, यांत नवल नाहीं. लोक आपणांस वाळींत टाकणार याविषयीं जरी विधिपक्षास संशय नव्हता, तथापि शास्त्रीबोवांनीं एकंदर विवाह हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें चालविला, व यावरूनहि त्या मंडळींचा उतावळेपणा सिद्ध होत नाहीं. उलट पक्षाच्या मंडळींनीं शास्त्रीबोवांस 'तुमच्या ब्रापखान्यास आग लावूं' अशी धमकी दिली असतां मॅजिस्ट्रेटाकडून त्यांनीं त्यांचे मुचलके घेतले, यांतही त्यांचा दोष दिसत नाहीं. परंतु मुचलके घेण्यापलीकडे शास्त्रीबोवा गेले नाहींत. उलट पक्षाच्या मंडळींनीं तर रा. ब. विष्णु परशराम रानडे, रा. बाळ मंगेश वागळे, नारायण महादेव परमानंद वगैरे मंडळीवर सभेमध्यें मारामारी केल्याबद्दल कोर्टांत फिर्याद लावली परंतु कांहीं निष्पन्न झालें नाहीं. विवाह पत्रिकावर सह्या करणारे ७ गृहस्थ, वधूवर, व वधूचे दोन्हीही बंधू यांस हिंदुधर्म व्यवस्थापक मंडळीनें बहिष्कार घातला. पुनर्विवाह अशास्त्र आहे असें ठरेपर्यंत हा बहिष्कार आम्हांस मान्य नाहीं, म्हणून पुण्यांतील सुशिक्षित मंडळींनीं आपल्या सह्यांनिशीं वर्तमानपत्रांतून जाहीर केलें. या सह्यांची संख्या १७२ पर्यंत येऊन ठेपली, तेव्हां विरुद्ध पक्षास भीति वाटूं लागली. व त्यांनीं पांच पंच होते त्यांच्या बहुमतावर निकाल ठरावयाचा होता. निषेधपक्षाकडील पांचहि पंच पुनर्विवाहाच्या विरुद्धच होते. पैकीं एका पंचानें तर भरसभेंत असें बोलून दाखविलें कीं, आम्हांस सत्यासत्य पाहण्याची गरज नाहीं. आम्हांस कोणीकडून तरी प्रतिपक्षाचा पाडाव करावयाचा! परंतु इतकें झालें तरी पुनर्विवाह अशास्त्र ठरण्यास बहुमत झालें नव्हतें. तेव्हां, येनकेनप्रकारेण तें करण्याचा निषेधपक्षानें प्रयत्न केला. वे. व्यंकटशास्त्री हे मोठे सत्वस्थ होते. त्यांनीं स्वतः शास्त्रीबोवांस पुनर्विवाहाबद्दल शास्त्राधार काढून दिला होता. त्यावरून अर्थात् त्यांचें मत विधिपक्षास अनुकूल होतें. परंतु कित्येक शास्त्री मंडळींनीं व खुद्द शंकराचार्यांनीं

त्यांस उलट मत देण्याविषयीं आग्रह केला. धर्मराज देखील खोटें बोलले, मग अशा वेळीं तुम्हांस खोटें बोलण्यास काय हरकत आहे ? असा त्या भोळ्या म्हाताऱ्यास उपदेश करून, त्यांच्याकडून स्वामींच्या पायांची शपथ वाहून घेतली. तेव्हां अशा निर्लज्जपणानें पुनर्विवाह अशास्त्र ठरविण्याचा झालेला प्रयत्न पाहून विधिपक्षाच्या मंडळीस पराकाष्टेचा राग यावा, व सरकारदरबार व्हावेत व कित्येक मंडळींच्या मनांतून शंकराचार्यांवर फिर्याद करण्याचा विचार यावा, यांत विलक्षण असें आम्हांस कांहींच दिसंत नाहीं.

वरील सर्व गोष्टींवरून पुनर्विवाहाचा एक प्रचार पाडतांना त्यांतल्या त्यांत जातिभेद मोडावा, हिंदुधर्मशास्त्रांतील वेडगळ विवाहपद्धतीस झुगारून द्यावें, गणगोत पाहूं नये वगैरे उतावळेपणामुळें लोकांस चीड आली, ही गोष्ट सर्वथैव खोटी होय. १६ वर्षांच्या कोकणस्थ विधवेचा २५ वर्षांच्या कोकणस्थ वराशीं तिच्या स्वतःच्या भावांनीं विवाह लावण्यास तयार असावें, सर्व विधि धर्मशास्त्राप्रमाणें व्हावा, यांत सर्व सुधारणा एकदम करूं पाहाण्यासारखें कांहींच झाले नाहीं. आतां इतका प्रयत्न करूनही व इतकी खबरदारी घेऊनही प्रतिपक्षाचा दुराग्रह सुटत नाहीं. आपलें म्हणणें (मग तें वाकड्या मार्गानें कां होईना) सिद्ध करण्याचा निश्चय करून त्यांनीं तो शेवटास नेला, ही गोष्ट जेव्हां ठरल्यासारखी झाली, तेव्हां त्यापुढें जे पुनर्विवाह झाले त्यांत लौकिकाचा फारसा विचार न करितां, ज्यांस जो प्रकार योग्य व निर्दोष वाटला तो त्यांनीं केला. एवीतेवी लोकांची मदत मिळत नाहीं, आपणांस वेगळी जात तर करावी लागते, व बहिष्काराची पूर्ण छलना सोसावी लागते ती लागतेच मग इतक्या अडचणी सोसण्याचें ज्यांनीं धैर्य केलें, त्यांनीं लोकांची खुशामत करण्यास कबूल कां व्हावें ? त्यांस जर जातिभेद, विवाहविधि, गणमैत्री वगैरे प्रकार ईश्वरकृत नसून मनुष्याच्या अज्ञानापासून झालेले आहेत हें उघड दिसत असलें, तर मग त्यांनीं लोकांची पर्वा कां ठेवावी ? हें आम्हांस कळत नाहीं. समाजानें जर त्यांस थोडीशी मदत केली असती, तर समाजाच्या समजुतीस मान देण्यास तेही तयार झाले असते. जेव्हां समाजानें त्यांस टाकून दिलें, तेव्हां त्यांनींही तो धिक्कारला, हें यथास्थितच झालें. तात्पर्य, सुधारकांनीं या गोष्टीविषयीं चर्चा सुरूं

करण्यापासून शेवटपर्यंत जितकें करून समाजांत फूट पडणार नाहीं, तितके प्रयत्न केले; परंतु त्यांचा उपयोग झाला नाहीं; याचा दोष त्यांच्याकडे नाहीं, बाकीच्या समाजाकडेच आहे. अमुक एकानें पुनर्विवाह कां केला नाहीं ? हा प्रश्नही वरच्या माळकेपैकींच होय. नुसती हजामत करावयाची झाली तरीही 'छे, आज एकादशी आहे. बाबा रागावतील.' अशी ज्यांची स्थिती, त्यांनीं दुसऱ्या एखाद्यानें पुनर्विवाह न करण्यास अशी काहीं कारणें अगतील हा विचार कां करूं नये ? बरें, एकाच्या हातून चूक झाली, त्याच्या अंगीं बोलण्याप्रमाणें चालण्याचें धैर्य नाहीं; परंतु त्याशिवाय ज्यांनीं बोलण्याप्रमाणें आचरण करण्याकरितांच उतार वय झालें असूनही पुनरर्विवाह केला, अशी शास्त्रीबुवांसारखीं उदाहरणें लोक पुढें कां आणींत नाहींत ? उलट तेवढेंच उदाहरण पुढें कां आणतात ?

आतां कोणतीही गोष्ट मनुष्य करूं लागला असतां चुक्या ह्या होणारच. मागच्या लोकांनीं त्या चुका पाहून पाहिजे तर शहाणपण शिकावें व कमी चुका करण्यास झटावें. परंतु आपण कांहीं न करता दुसऱ्यावर नुसती टीका करण्याचें काम नामर्दपणाचें आहे. सगळेच पुराणिक चातुर्मासांत वांगी सोडतात असें नाहीं. कित्येकांस अनेक कारणांमुळें पुराणांतली वांगीं पुराणांत ठेवावीं लागतात. वैराग्याचा उपदेश करणारे सर्वच हादास दिगंबर नसतात. म्हणून तेवढ्यावरून सर्व पुराणिक व सर्व हरदास जनसमुदायाचें शत्रू आहेत, असें कोणी मानींत नाहीं; मग मागल्या पिढींतिल लोकांनीं एखादीं चूक केली असली, तथापि त्यांनीं केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ झाले, असें म्हणतां येणार नाहीं. त्यापासून आपल्या पुढील कार्यभागास मदतच झाली पाहिजे. त्यांनीं आमची हानि केली म्हणून आम्हांस हातपाय बांधून बसावें लागतें, म्हणजें 'न करत्याचा वार शनवार' यापैकींच आहे.

'असो. वर निर्दिष्ट केलेल्या निबंधांत जितका इतिहास दिला आहे तेवढ्यावरून आजपर्यंत याबाबतींत कसकसे व काय काय प्रयत्न झालें, याची बरींच चांगली अटकळ होते. तथापि याहून सविस्तर माहितीचें पुस्तक झाल्यास नव्या पिढीस अधिक फायदा होण्याचा संभव आहे, व तसें करण्यास निबंधकारास बरींच साधनें आहेत, असें आम्हांस वाटते. म्हणून पुढेंमागें

जमल्यास त्यांनीं हा प्रयत्न अवश्य करावा, इतकें सुचवून तूर्त आम्हीं हा लेख संपवितों.

हालवायाच्या दुकानावर ब्रह्मार्पण : : १९

येथील सरकारी नोकरींत जे इंग्लिश लोक आहेत त्यांचे सनदी व बिन-सनदी असें दोन वर्ग आहेत, हें आमच्या वाचकांस ठाऊक असेलच. यापैकीं पहिल्या वर्गांतील नोकर आमचे व सरकारचें शुद्ध जांवई आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांच्या जागा, यांचे पगार, यांच्या बढत्या, यांच्या बदल्या, व यांचीं पेन्शनें यांविषयीं जे नियम ठरलेले आहेत त्यांचे उलंघन करण्यांस कोणीहि समर्थ नाहीं ! अलीकडे दुसऱ्या वर्गांतील लोकही या जांवयाचें हक्क कमावूं पहात आहेत ! या कामांत यश येण्यासाठीं त्यांनीं जे भगीरथ प्रयत्न चालविलें आहेत ते पाहून या इंग्लिश लोकांच्या दीर्घोद्योगाची तारीफ न करणें अशक्य आहे. दोनतीन वर्षांच्या खटपटीनें येथून इंग्लंडांपर्यंत त्यांनीं असा घाट उडवून दिला आहे कीं, पहावें तें वर्तमानपत्र, घ्यावा तो मुत्सद्दी, व म्हणावा तो पार्लमेंटचा सभासद यांच्या मुठींत आल्यासारखा दिसतो ! हिंदुस्थानांतलि रुपयाची किंमत उतरली असल्यामुळें आपल्या पगारापासून आपला जितका व्हावा तितका फायदा होत नाहीं, इंग्लंडास पैसे धाडण्यास जी हुंडणावळ द्यावी लागते तीमुळें आपले फार नुकसान होतें, व पेन्शनास तर फारच मोठा छाट बसतो अशी यांची तक्रार आहे. जे लोक यांच्या वतीनें बोलतात ते असें म्हणतात कीं, सरकारच्या अशा इनामी नोकरांस असंतुष्ट ठेवण्यांत सरकारचा बिलकुल फायदा नाहीं. सरकारनें आपल्या नोकरांच्या पाठीवर हवे तितके कोरडे ओढून पाहिजे तितके काम, खच्चून काम करून घ्यावें, पण त्यांच्या पोटावर मारूं नये. या सर्व बिनसनदी नोकरांचा संतोष राखण्यास फार झालें तर तीन-चार लाख रुपये लागणार आहेत. येवढी रक्कम सरकारास पाहिजे तेंथून काढतां येईल. हिची काटकसर

करणें म्हणजे काडीसाठी पाडी गमावण्यासारखें होय ! हें सर्व एका दृष्टीनें बरोबर आहे. पण हे तीन लाख रुपये उत्पन्न होणार कोठून ? याचा विचार कोणीच करीत नाहीं. गेल्या वर्षी सेक्रेटरी ऑफ स्टेटनें या लोकांस असें उत्तर दिलें कीं, तुमची तक्रार बिलकूल ऐकली जाणार नाहीं. कारण अमुक किंमतीच्या रुपयांनीं तुमचें पगार व पेन्शनें दिली जातील असें सरकारनें बंधन करून घेतलेलें नाहीं. हिंदुस्थानांत जो व जसला रुपया चालू असेल तो व तसला रुपया तुम्हांस पत्करला पाहिजे. तुमची तक्रार ऐकणें म्हणजे हिंदुस्थानच्या गरीब प्रजेवर नवीन बोजा लादणें होय. हें सेक्रेटरी ऑफ स्टेटचें गतवर्षीचें उत्तर. यावर्षी तोच अधिकारी असें म्हणतो कीं, तुमची तक्रार वाजवी आहे व तिची चौकशी करण्याकरितां लौकरच पार्लमेंटरी कमिटी नेमण्याचा आमचा विचार आहे ! काय करील बापडा ? बाकीचे प्रधान, पार्लमेंटचे सभासद, वजनदार वर्तमानपत्रें, देशांतील ठळक लोक, व हिंदुस्थानांतील मोठमोठे अंमलदार इतक्यांनीं तुमची तक्रार विचारणीय आहे, असें आश्वासन दिल्यावर ती तशी नाहीं, असें म्हणण्याची हिंदुस्थान सेक्रेटरीची प्राज्ञा आहे काय ? ज्याप्रमाणें बैलाची वेंसण धरून किंवा गाढवाचा कान धरून आपण त्यास पाहिजे तसें वागवितों, त्याप्रमाणें इंग्लंडासारख्या देशांत लोकमत सरकारी अधिकाऱ्यास वागवितें. थोड्या दिवसांत या बिनसनदी नौकरांच्या खटपटीला निदान थोडें तरी यश येईल, याबद्दल आम्हांस बिलकुल शंका नाहीं. आतां आमची स्थिति पहा. जीं कामें बिनसनदी नोकर करतात तीं आमच्यानें होण्यासारखीं असून आम्ही सरकारास असें विचारीत नाहीं कीं, असले तक्रारी नोकर तुम्ही लावतां तरी कशासाठीं ? देऊं केलेल्या पगारांत यांचें समाधान होत नसेल तर त्यांचे काका दुसरे कां लावीत नाहीं. रुपयाची किंमत कमी न होऊं देणें ही सरकारच्या ताब्यांतली गोष्ट नाहीं. तेव्हां तीपासून जें नुकसान होईल तें सर्वांनीं निमूटपणें सोसलें पाहिजे. रुपयाची किंमत उतरल्यानें आम्हां नेटिव्हांचें नुकसान होत नाहीं काय ? युरोपीअन लोकांसच पैशाची किंमत कळते, व ऐषआरामाची लज्जत समजते असें तर नाहीं ना ? मग या बिनसनदी नोकरांचींच तक्रार ऐकणें हा पक्षपात नव्हे काय ? व या पक्षपाताबद्दल गरीब रयतेचें तट्ट हवें तसें

ताबलीत सुटणें हा अन्याय व पाप नव्हे काय ? पण हें सारें पाहतो कोण ? नेटिव्ह लोकांस उच्च प्रतीचीं कामें करतां येत नाहींत, व त्यांच्या खर्चास फार पैसे लागत नाहींत, हीं दोन प्रमेयें प्रत्येक युरोपिअनाच्या मनांत वज्रलेप होऊन गेलीं आहेत, व आम्ही नेटिव्हें त्यांचें निराकरण करण्याचा मुळींच प्रयत्न करीत नाहीं. तेव्हां आमचें कोणी ऐकत नाहीं, व मुक्या रयतेवरील कराचा बोजा प्रतिवर्षी वाढत आहे, हें कांहीं आश्चर्य करण्यासारखें नाहीं. वास्तविक पाहतां या दिनसनदी नोकरांच्या चळवळीबरोबर आम्हां लोकांतही चळवळ सुरू व्हावयाला पाहिजे होती. पण आम्ही पडलों कर्णाचे कर्ण ! जें आम्ही साऱ्या राज्यावर उदक सोडून बसलों आहों ते आम्ही पांचचार लाख रुपयांसाठीं अनुदारता प्रकट करण्यास तयार होऊं काय ? ही उदारता व ही शांति आम्हांस किती भोंवणार आहे हें कोणाच्यानेंही सांगवणार नाहीं !

राजकीय संनिधानाचें अपायकारकत्व : : २०

मनुष्य हा एकांतवासप्रिय प्राणी नाहीं. समाज करून राहिल्याशिवाय त्याला सुख होण्याचा संभव नाहीं. समाजसंस्थापनास श्रमसंयोगाची आवश्यकता आहे व श्रमसंयोग होऊं लागण्यास समाज पाहिजे. म्हणजे त्या उभयतांचें अन्योन्यावलंबन आहे. श्रमसंयोग चांगला चालण्यास सामाजिक संनिधान (Social organisation) पाहिजे. हें संनिधान दोन प्रकारचें आहे; एक स्वायत्त, व दुसरें परायत्त. स्वायत्त संनिधानापासून व्यक्तीचें हित होतें; समाजाचें हित प्रथम साधणें हा परायत्त संनिधानाचा मुख्य उद्देश होय. समाजाच्या आद्य स्थितींत परायत्त संनिधानाशिवाय समाजाचें संरक्षण व प्रगति व्हावयाची नाहीं, परायत्त संनिधानापासून राजकीय संस्थांची उत्पत्ति होते, व समाजाच्या प्रथमावस्थेंत या संस्थांचा अमल सक्तीनें चालविणें अवश्य असतें; तसें न झाल्यास समाजाची वाताहात होऊन, कोणाचेंच कल्याण होत नाहीं, वगैरे गोष्टींचें विवरण मागल्या लेखांत केलें आहे. राजकीय संस्थांच्या सक्त

अंमलामुळें लोकांचें कोणत्या प्रकारचें नुकसान होतें हें आज दाखविण्याचा विचार आहे.

हवा, पाणी, व अन्न हीं शरीररक्षणास अवश्य लागणारीं द्रव्यें आहेत, पण यांचें फाजील सेवन झालें असतां, तीं अपायकारक होतात याचा प्रत्येकास अनुभव आहे. एका व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्तीशीं व एका पोटसमुदायानें दुसऱ्या पोटसमुदायाशीं सलोख्यानें वागून समाजांत श्रमसंयोग उत्पन्न होऊं द्यावा, व तो होण्यासाठीं कोणाचा तरी सर्वांवर सक्त अंमल चालावा, ही गोष्ट निर्विवाद आहे, व अशा प्रकारच्या सक्त अंमलापासून होणारा फायदा आम्हांस पूर्णपणें मान्य आहे. पण यावरून असें समजतां कामा नये कीं, ही सक्ती जेवढी अधिक करावी तितकी समाजसुधारणेस अधिक मदत होते. या सक्तीसही सीमा आहे. या सीमेचे उल्लंघन केलें असतां ती समाजहितवर्धक न होतां, समाजहितविघातक होतें; सारांश, समाजाचें आकलन करण्यास कोणत्याही प्रकारचें सरकार नसल्यापासून जे परिणाम होतात तेच सरकारच्या फाजील सक्तीपासून होऊं लागतात. सरकारी अधिकाऱ्यांचा चरितार्थ आणि ते जीं कामें करतात त्यांचा खर्च प्रजेनें दिलेल्या करांपासून होत असतो, हें कर जर प्रजेच्या सामर्थ्याबाहेर गेले किंवा ते तीपासून काढण्यापासून सरकारी अंमलदार तीस दुःसह पीडा देऊं लागले तर जिकडे तिकडे मारामाऱ्या, दंगेधोपे, तंटें सुरूं होऊन सर्वत्र अनवस्था होणार नाहीं काय? प्रजा कितीही राजनिष्ठ असली तरी अचेतन वस्तूप्रमाणें पाहिजे तसली वागणूक ती हवा तेवढा वेळ सहन करील, असें समजणें हें शुद्ध मूर्खपण होय. कांहीं केलें तरी जाचांतून सुटण्याची आशा नाहीं, अशी खात्री झाली असतां, अगदीं क्षुद्र व क्षीण व्यक्तीदेखील बिथरून जाऊन आपला बळ करणाऱ्यांस शासन करण्यासाठीं, बेफाम होऊन त्याच्या नरडीचा घोंट घेण्यास धांवून जाते, असें अनेक प्रसंगीं दिसून येतें. हा एका व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्तीवर केलेल्या फाजील जुलमाचा परिणाम होय. जेव्हां कोणत्याही देशांतील सरकार आपल्या प्रजेशीं अशा प्रकारचे वर्तन करतें, तेव्हां तीहि कितीही सहनशील असली तरी, अंमलदारांचा जुलूम दुःसह झाला असतां, राजनिष्ठा झुगारून देऊन, त्यांस दंड करण्यासाठीं बंड करण्यास प्रवृत्त होतें. सरकारी अमलदारांचा जुलूम असह्य

झाल्यामुळें लोकांनीं हत्यारांस हात घालून बळ करणाऱ्या राजास आणि त्याच्या साथ्यांस कंठस्नान घातल्याची उदाहरणें पुष्कळ आहेत. सरकारी अंमलदाराच्या जुलुमापासून होणारे दुष्परिणाम या आशियाखंडांतील प्रत्येक देशांत पूर्वीपासून दृष्टीस पडत आहेत. युरोपखंडाच्या सुधारणेपेक्षां आशियाखंडांतील सुधारणेस आरंभ अगोदर झाला असून ती आजमितीस इतकी मागें पडली आहे, याचें बऱ्याच अंशीं येथील राजांचा जुलूम हें कारण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पूर्वेकडील राजांचा अनियंत्रितपणा सर्व पृथ्वीवर गाजत आहे. या अनियंत्रितपणामुळें होणारी विपत्ति अनवस्थेपासून उत्पन्न होणाऱ्या विपत्तीपेक्षां कधीं कधीं अधिक असते, यांत संशय नाहीं. रोमन लोकांनीं मिसर देश काबीज केल्यावर, तेथें जो सक्तीचा अंमल बसविला त्याची गोष्टहि अशीच आहे, ज्याप्रमाणें सध्यां आम्हांस हिंदुस्थान सरकारच्या व प्रांतिक सरकारांच्या खर्चाबद्दल नाना प्रकारचें कर द्यावे लागतात, त्याप्रमाणें इजिप्तच्या लोकांसही द्यावे लागत असत. तसेंच, आतां ज्याप्रमाणें इंग्लिश लोकांनीं आपल्या फायद्यासाठीं ब्रह्मदेशांत, अफगाणिस्थानांत, चिनांत, यूरोपांत, किंवा आफ्रिकेंत युद्ध मांडिलें असतां आम्हांस मनुष्यांचा व पैशाचा पुरवठा करावा लागतो, व आम्हीं त्याबद्दल कितीही ओरडा केला तरी त्याकडे हिंदुस्थान सरकार किंवा ब्रिटिश पार्लमेंट लक्ष देत नाहीं, त्याप्रमाणें रोमन लोक जीं जीं युद्धें करीत त्यांबद्दल इजिप्शियन लोकांस भूर्दंड भरावा लागे, वरचे अधिकारी खालच्या अधिकाऱ्यांपासून इतका पैसा उकळीत कीं, त्यांस आपल्या जागांचा राजीनामा देणें किंवा सद्सद्विवेक एकीकडे गुंडाळून ठेऊन तरवारीच्या धारेवर प्रजेपासून होईल तेवढी माया काढण्यास तयार होणें, भाग पडत असे. मांडलिकांनीं एक वर्षी स्वसंतोषानें दिलेला नजराणा पुढल्या वर्षी करभार होऊन बसे, व तो कोणी न दिल्यास त्यावर रोमन पलटणी चाल करून जात! ठरींव कर तर निमुटपणें द्यावे लागतच; पण त्याशिवाय सैन्याच्या अन्नपाण्याचा, वस्त्रपात्राचा व सामानसुमानाचा पुरवठा प्रजेस करावा लागे! अशा स्थितींत प्रजेचे किती हाल होत असतील, याची वाचकांनींच कल्पना करावी. तथापि रोमन पादशाहीस उतरता पाया लागला असतां रोमन अधिकाऱ्यांनीं फ्रान्स देशांतील

लोकांचा जो छळ केला त्याचा इतिहास याहूनही हृदयद्रावक आहे. त्या कालीं त्या देशांत रोमन अधिकाऱ्यांचा सुळसुळाट इतका झाला होता, व करांचें ओझें इतकें वाढलें होतें कीं, मजूर लोकांच्या अंगांत काडीचा देखील तकवा राहिला नाहीं, सुपीक प्रांत ओसाड पडले व ज्या ठिकाणीं नेहमीं नांगर चालत असत त्या ठिकाणीं भयंकर रानें वाढलीं ! प्रत्येक प्रांतावर व शहरावर अंमलदारांचा येवढा वर्षाव होत असे कीं, त्यांच्या संख्येचें अनुमान करणें अशक्य होऊन गेलें होते. चाबकाच्या 'चपचप' शब्दानें आणि त्यांच्या पाठीवर ते झडत आहेत त्यांच्या आक्रोशानें वातावरण सर्वकाळ भरून गेलेलें असे. विश्वासूक गुलामानें आपल्या धन्याविरुद्ध, बायकोनें आपल्या नवऱ्याविरुद्ध व मुलानें आपल्या बापाविरुद्ध पुरावा द्यावा, म्हणून त्यास चाप लावण्यांत येत असत. एक तालुकदार पाठवावा व त्यानें कांहींएक जमाबंदी करावी; ती पुरेशी न वांटून त्यास बडतर्फ करावें आणि त्याहून अधिक खरमरीत दुसरा तालुकदार त्याच्या पाठीमागून पाठवावा; व असें किती वेळां करावें आणि त्यांनीं किती जुलूम करावा, याला कांहींच सुमार नसे. अशा जाचामुळें गुरें आणि माणसें पटापट मरत; पण जें मागें रहात त्यांस आपल्या वांट्याचे व मेलेल्यांच्या वांट्याचे कर दिल्याशिवाय गत्यंतर नसे ! अशा संकटावस्थेंत रोमन प्रजेस कर गोळा करणारापेक्षां शत्रूच बरा वाटे, व संधि सांपडल्याबरोबर ते अंमलदारास सोडून शत्रूस जाऊन मिळत, हे किती स्वाभाविक होतें बरें ? रोमन पादशाहीचा ऱ्हास झाल्यावर फ्रान्स, स्पेन वगैरे देशांत व्हॅन्डाल्स, गॉथ्स वगैरे लोकांनीं लहान लहान स्वतंत्र राज्यें स्थापिलीं. प्रथमारंभीं या स्वल्प संस्थानांच्या नायकांची सत्ता फार संकुचित असे. त्यांना आपल्या सरदारांचा नेहमीं धाक असें. कालांतरानें या सरदारांचें अधिकार नष्ट होऊन राजांची सत्ता प्रबल झाली, व रोमनपदपादशाहीचा इतिहास आणखी एकवार घडून आला. या प्रबल झालेल्या गॉथिक बादशहांनीं किंवा राजांनीं रोमच्या बादशहाप्रमाणें आपल्या प्रजेस छळण्यास व नाडण्यास आरंभ केला. ज्या त्या गोष्टींत सरकार हात घालूं लागलें. कोणी कोणता धंदा करावा, कोणी कोणता पेहराव वापरावा, कोणी कोणत्या प्रकारें ईश्वरपूजा करावी, कोणत्या शेतकऱ्यांनीं कोणता जिन्नस किती उत्पन्न करावा,

कोणत्या कारखानदारांनीं किती मजूर पदरीं ठेवावें, किती मजुरी द्यावी, किती भांडवल कोणत्या व्यापारांत घालावें, व कोणता माल किती उत्पन्न करावा. याविषयीं सरकारी नियमांवर नियम, कायद्यांवर कायदे होऊं लागले, व त्याचा अंमल करण्यासाठीं नवीं नवीं खातीं व नवे नवे अधिकारी अस्तित्वांत आणून त्यांच्या पोषणासाठीं नाना प्रकारचें दुःसह कर बसविण्यांत येऊं लागले. रयतेच्या तक्रारींची कोठेंही दाद लागेनाशी झाली, व जिकडेतिकडे अन्याय माजून राहिला. कराच्या बोजाखालीं सारे लोक चीत होऊन गेले, आणि त्यांतून सुटण्यास काय उपाय करावें हें कोणास कळेनासें झालें! याप्रमाणें सारी प्रजा बेजार होऊन गेल्यावर काय प्रसंग गुदरतो, याचें उदाहरण फ्रान्स देशांत १७८९ सालीं जी प्रचंड राज्यक्रांती झाली ती देत आहे! शंभर वर्षांपूर्वी फ्रान्स देशांत लोकसंतापाग्नीचें जें भयंकर होमकुंड पेटलें त्यांत कित्येक शतकेंपर्यंत अनाथ प्रजेवर जुलूम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आणि सिंहासनस्थ राजाराणीच्या आहुती पडल्या! तात्पर्य, सामाजिक संनिधानास नियामक अशी राजसत्ता जरी आवश्यक आहे, तरी या सत्तेचा अंमल फाजील तीव्र झाल्यास समाजघटकांचें कल्याण न होता अकल्याण होणें शक्य आहे. फ्रान्स देशांत १७८९ सालीं जो भडका पेटला त्याचें इंगित ज्यांस समजून घेण्याची इच्छा असेल त्यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, दोनशें वर्षांच्या आंत फ्रेंच राजांनीं आपली जमाबंदी ११ कोटींपासून ३ अब्ज ११ कोटी केली! प्रस्तुत कालींही अशा प्रकारच्या जुलुमांची उदाहरणें दृष्टीस पडण्यासारखीं नाहींत, असें नाहीं. जो कोणी नैल नदीच्या काठानें थोडाबहुत प्रवास करील त्याला असें दिसून येईल कीं, जेथें जेथें सुलतानाचा अंमल नीट चालत नाहीं तेथील प्रजा त्याचा अंमल चांगला चालत आहे अशा प्रांतातील प्रजेहून विशेष सुखी आहे. पण या गोष्टीच्या सिद्धीसाठीं या रानटी तुर्क लोकांकडेच पहावयास पाहिजे असें नाहीं. ब्रिटिश लोकांनीं कितीही बढाया मारल्या तरी नेटिव्ह संस्थानांतील प्रजा ब्रिटिश अंमलांतील प्रजेपेक्षां एकंदरीनें अधिक सुखी आहे, असें दाखविणें फारसें कठिण पडणार नाहीं. मि. ली-वार्नरसारखें एककल्ली लोक ब्रिटिश राज्याचें कितीहि पवाडे गावोंत एल्फिस्टन कॉलेजचें प्रिन्सिपाल मि. वर्डस्वर्थ यांसारखे विचारी गृहस्थ

असें कबूल करतात कीं, इंग्लिश लोकांनीं येथें जी स्वराज्यव्यवस्था स्थापिली आहे तींबद्दल आम्हां हिंदु लोकांस जबरदस्त किंमत द्यावी लागत आहे.

यासंबंधानें स्पेन्सरसाहेबांच्या ग्रंथांतील एक वाक्य खालीं फूट-नोटेंत जसेंच्या तसेंच दिलें आहे.[1] कोणी असें म्हणतील कीं, हें लिहिणें इंग्लंडांत बसून लिहिणाऱ्या तत्त्ववेत्त्यांचें आहे, म्हणून त्याला विशेष वजन देतां येत नाहीं. नसेल कदाचित्! पण डॉ. हन्टरसारख्या अधिकाऱ्याचा अभिप्राय तरी सर्वांस मान्य असला पाहिजे. या सरकारी प्रमुख स्टॅटिस्टिकवाल्याचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थानांतील अर्ध्या लोकांस प्रतिदिवशीं अर्धपोटीं झोंपीं जावें लागतें! यावरून टापटिपीचा अंमल हटकून सुखावह असेलच, असें कोणासही म्हणतां येणार नाहीं आगगाड्या, तारायंत्रें, गिरण्या, हायकोर्टें, तार-ऑफिसें, पोस्ट ऑफिसें, वर्तमानपत्रें, कॉलेजें, प्रदर्शनें, टोलेजंग इमारती, प्रचंड बाजार, दरारा उत्पन्न करणारा फौजफांटा हे आणि अशा प्रकारचें सुधारणेचे दुसरें दागिने घालून हिंदुस्थानसारखा परकी अंमलांतला देश कितीहि नटला तरी तो अंतर्यामी सुखी असेलच, असें खात्रीनें म्हणवणार नाहीं. एखादे प्रसंगीं मायासुरानें निर्माण केलेल्या मायावी बाजारांत खरेदी करून बनलेल्या गिऱ्हाईकाप्रमाणें आमची स्थिति होण्याचा संभव आहे.

सामाजिक घडामोड : : २१

एका घराचे दगड काढून दुसऱ्या घरास लावायाचे असले तर किती त्रास पडतो हें सर्वांस माहित आहेच. पण हेच दगड चुन्यांत पक्के बसाविलेले असले तर फारच त्रास पडतो, आणि त्यांतही पहिली इमारत बांधल्यापासून

1 Notwithstanding the boasted beneficence of our rule in India, the extra qurdens and restraints it involves, have the effect that the people find adjacent countries preferable: the ryots in some parts have been leaving the homes and settling in the territory of the Nizam and in Gualior.

बरींच वर्षें लोटलीं असलीं, व चुन्याचा आणि दगडांचा एकजीव होऊन गेला असला, तर एकेक दगड सोडविण्यास किती मारामार पडते, हें कोणास सांगावयाला पाहिजे असें नाहीं. तात्पर्य, कोणत्याही जड द्रव्यांचा संनिकट संयोग करून त्यांपासून एक पिंड केला असतां तो पिंड मोडून त्याच्या घटकांचा निराळा पिंड बनविणें हें अतिशय कष्टाचें काम आहे, हें प्रत्येकानें कबूल केलें पाहिजे.

सामाजिक घडामोडींचाही असाच प्रकार आहे. प्रथम व्यक्तीच्या शरीररचनेचा विचार करा. आरंभीं हें शरीर समजातीय द्रव्याचें झालेलें असून, पुढें तें जसजसें वाढत जातें तसतसें त्यांत विषमजातित्व उत्पन्न होतें; व ज्या मानानें त्यांत विषमजातित्व उत्पन्न होतें त्या मानानें त्यांत अधिकाधिक दाढर्य उत्पन्न होऊन बाह्य संस्कारांत तें अधिकाधिक प्रतिबंध करूं लागतें. कोवळे वेळू, लहान झाडांच्या खांद्या किंवा तरुण मुलांचे अवयव यांत किती लवचिकपणा असतो बरें ? वाढ खुंटून प्रत्येक अवयवांत काठिण्य आल्यावर, कोणत्याही मनुष्यास चांगली कसरत शिकतां येत नाहीं, ही प्रत्येकाच्या पाहण्यांतली गोष्ट आहे. सामाजिक शरीरांतही परिणतीमुळें अशाच तऱ्हेचें काठिण्य उद्भूत होतें. कोणताही समाज एकदां वाढींस लागला, आणि श्रमविभागामुळें त्यास भिन्नावयवित्व प्राप्त झालें, व त्यांत निरनिराळे वर्ग उत्पन्न होऊन ते निरनिराळ्या क्रिया करूं लागले म्हणजे त्याचें रूपांतर करू पाहणाऱ्या गोष्टींस त्यांकडून मोठा प्रतिबंध होऊं लागतो. राज्य, धर्म, सैन्य, लोकाचार यांसंबंधानें ज्या रीति एकदां रूढ होऊन जातात त्यांत फिरून बदल करणें अत्यंत दुरापास्त होऊं लागतें. पूर्वापार चालत आलेल्या चालींत विचारदृष्ट्या कितीहि विसंगतता दिसली तरी त्या सोडणें किती जिवावर येतें. हें बालविवाह, केशवपन, सुतक इत्यादि प्ररूढ चालींचा विचार करतां, तेव्हांच लक्षांत येणार आहे. समाजांतील शेंकडा नव्याण्णव लोकांची स्थिति अंधपरंपरेप्रमाणें असते. मळलेल्या वाटेच्या बाहेर एक पाऊल टाकल्यानेंसुद्धां आपणांवर मोठा भयंकर प्रसंग गुदरेल, असा धाक त्यांस क्षणोक्षणीं वाटत असतो.

याचसंबंधानें आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे ती अशीः- ज्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीरांतील निरनिराळे अवयव आपापलीं कार्यें पृथक्‌पणानें करून एकमेकांस साहाय्य करतात, त्याप्रमाणें सामाजिक शरीरांतील निरनिराळे भागही आपापलीं कार्यें स्वतंत्रपणें करून इतरांस मदत करीत असतात. पण पुढें असाही प्रकार घडून येतो कीं, समाजाच्या एका स्थितींत ज्या वर्गाची आवश्यकता असते तो वर्ग समाजाचें स्थित्यंतर झाल्यामुळें अगदीं निरुपयोगी झाला तरी, सहसा नाहींसा होत नाहीं. उदाहरणार्थ, बडोद्यासारख्या संस्थानांतील बारगीर घ्या. यांचें आतां कांहीं एक प्रयोजन नाहीं; पूर्वी यांच्याकडून जी कामागिरी होत असे तिची आतां गरज राहिली नाहीं. तथापि त्यांचा चरितार्थ चालविणें संस्थानास भाग पडत आहे. या बारगिरांप्रमाणेंच आमच्या बहुतेक संस्थानिकांची, जहागीरदारांची, त्यांच्या सैन्यांची, निरनिराळ्या ठिकाणच्या देवस्थानांची, धर्माधिकाऱ्यांची व त्यांच्या मठांची, कित्येक धंदेवाल्यांची, आणि अनेक आचारांची गोष्ट आहे. ज्याप्रमाणें वार्धक्यामुळें श्रम करण्यास अयोग्य ठरलेल्या लोकांस नोकरीवरून दूर करून त्यांचे जागीं नवीन लोकांची योजना केली तरी पेन्शनदार करून ठेवावें लागतें, त्याप्रमाणें समाजाचें स्थित्यंतर होऊन त्यांतील कोणताही वर्ग निरुपयोगी ठरला तरी त्याचा बोजा बरींच वर्षें समाजास वहावा लागतो. कारण ज्याप्रमाणें कोणत्याही व्यक्तीस आपण होऊन पंचत्वास मिळणें आवडत नाहीं, त्याप्रमाणें समाजाच्या कोणत्याही अवयवास तें आवडत नाहीं. व्यक्तीप्रमाणेंच समाजाचें अवयवही आपापलें अस्तित्व दीर्घतम करण्याविषयीं झटत असतात.

येथपर्यंत सांगितलेल्या गोष्टींवरून समाजाचें रूपांतर होण्यास किती प्रत्यवाय असतात हें वाचकांच्या लक्षांत बरेंच आलें असेल. तथापि ज्यांच्या मनांत ही गोष्ट अजूनही बरोबर उतरली नसेल त्यांच्या समजुतीसाठीं आणखी एकदोन गोष्टी सांगतों. समाजांतील लोकांचे नियामक आणि नियत किंवा शास्ते आणि शासित असे मुख्य दोन भाग असतात, हें मागें सांगितलेंच आहे. या भागांपैकीं नियामक भाग समाजाच्या परिणतीबरोबर विस्तृत होत गेला तर त्या मानानें नियत भाग क्षीण होत गेला पाहिजे हें उघड

आहे. ज्या देशांत सरकारी अधिकाऱ्यांची संख्या आणि सरकारनें चालविलेलीं खातीं वाढत जातात त्या देशांतील प्रजा अधिकाधिक दुर्बल व परतंत्र होत जाते. सरकारी अधिकारी कोणत्याही खात्यांतले असले तरी त्या सर्वांचा चरितार्थ प्रजेनें दिलेल्या करांवर होत असतो. त्यामुळें होईल तितकी जमाबंदी वाढविणें आणि सक्तीचा अंमल चालविणें वगैरे गोष्टींत त्या सर्वांचे विचार सामान्यपणें एकसारखें असतात. खात्याखात्यांचा केवढाही विरोध असला तरी प्रजेशीं तंटा करण्याचा जेव्हां प्रसंग येतो तेव्हां तीं पट्‌दिशी एक होतात, आणि प्रजेशीं उद्‌भवलेल्या तंट्यांत यशस्वी होणें हें सर्वांसच हितकारक आहे, असें तेव्हांच लक्षांत आणून एकमेकांस साहाय्य करतात. शिवाय, निरनिराळीं खातीं परस्परांत कितीही विरुद्ध असली तरी प्रत्येक खात्यांतील खालच्या अधिकाऱ्यांचें वरच्या अधिकाऱ्यांशीं व मुख्य सरकाराशीं जे संबंध असतात तें सारे एकसारखेंच असतात, व त्या सरकारचा आणि त्याबरोबर आपला अंमल उत्कृष्ट रीतीनें चालावा, असेंही प्रत्येकास वाटत असतें; यामुळें साऱ्या प्रकारच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या स्वभावांत एक प्रकारचें साम्य तेव्हांच उत्पन्न होतें, "आणि समानशीलव्यसनेषु सख्यं" या न्यायानें प्रजेच्या कल्याणाकडे विशेष लक्ष न देतां, आपल्या वर्गाचें हित साधण्याविषयीं ते पराकाष्ठेचे तत्पर होऊन, त्या कामीं ते एकमेकांस अंतःकरणपूर्वक मदत करतात. ज्यानें सरकारी नोकरी धरली तो पूर्वीचा कितीहि सज्जन असला तरी त्याच्या वृत्तींत जो एकदम एक प्रकारचा पालट होतो त्याचें हें गुह्य आहे. स्वसंरक्षणपरायणता व स्वहितसाधनरति यांनीं प्रत्येकास घेरलें आहे आणि तसें होणें स्वाभाविक आहे. पण सरकारी अधिकाऱ्यांचा चरितार्थ व चैन प्रजेच्या श्रमाच्या फळांवर अवलंबून असल्यामुळें, त्याचा होईल तितका अपहार करण्याकडे त्यांची प्रवृत्ति किती होत जाते, हें कधीं कधीं त्यांच्या ध्यानांतसुद्धां येत नाहीं !

अधिकारी आणि प्रजा यांत उत्पन्न होणाऱ्या द्वंद्वास केवळ अधिकारीच कारण होतात, असें नाहीं. प्रजेकडूनही त्या कामांत बरीच मदत होतें ! मनुष्यमात्राचा असा स्वभाव आहे कीं, लहानपणापासून जी स्थिति कितीही वाईट असली तरी तीच बरी वाटत असते. ज्यांना जन्मापासून

स्वातंत्र्याचा उपभोग मिळत आहे त्यांना पारतंत्र्याचा जसा कंटाळा असतो, त्याप्रमाणें जें जन्मापासून पारतंत्र्यांत वाढलेलें असतात, त्यांना स्वातंत्र्य आपणांस उचित नाहीं, असें वाटूं लागतें. आज मित्तीस आपणांपैकीं शिकलेले अनेक लोक स्त्रियांस स्वातंत्र्य देण्यास तयार आहेत, पण त्याचा उपभोग घेण्यास आमच्या स्त्रीवर्गाची कोठें तयारी आहे ? आम्ही तें त्यांना जबरीनें देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना त्यापासून सुख न होता, उलट त्रास होतो. जे हौशी लोक आपल्या बायका नाटक पाहावयास किंवा हवा खाण्यास बरोबर घेऊन जातात त्यांच्या डोळ्यांपुढें वरील विधानांचें यथार्थ आल्याशिवाय राहणार नाहीं ! अशा प्रसंगीं स्त्रियांचा कावरेबावरेपणा, डोळे वर करून पाहण्याची व स्पष्टपणें बोलण्याची भीति, पुरुषांच्या मागोमाग चालण्यास वाटणारी शंका वगैरे गोष्टींमुळें त्यांची जी विलक्षण वृत्ति होतें तीवरून अशा रीतीनें समाजांत येण्यापेक्षां घरांतल्या घरातच रहाणें बरें असे त्यांस वाटत असावें असें स्पष्टपणें दिसत असतें. यावरून कोणी असें समजूं नये कीं, जी गोष्ट आमच्या स्त्रियांनीं पूर्वी कधींच न केल्यास आज त्यांना ती अवघड वाटत आहे, ती आपण त्यांच्याकडून कधींच करवूं नये. तसें करणें हें आपण प्रो. जिन्सिवाल्यांसारख्यांवरच सोंपविलें पाहिजे ! तथापि ज्या गोष्टीविषयीं आपण अपरिचित असतों ती प्रथम करूं लागतांना किती संकटावह होते, हें दाखविण्यासाठीं मात्र वरचें उदाहरण दिलें आहे; त्याहून येथें दुसरा हेतु नाहीं. तात्पर्य, जन्मादारभ्य ज्या गोष्टींची आपणांस संवय लागलेली असते, त्या गोष्टीं इतरांस कितीही वावग्या वाटत असल्या व त्यांपासून अखेरीस आपलें केवढेंही नुकसान होण्याचा संभव असला, तरी त्या आपणांस बऱ्या वाटतात आणि त्या टाकणें आपणांस सहसा रुचत नाहीं. दूर कशाला, आपल्या लोकांच्या राजकीय विचारांकडेच क्षणभर पहा. आम्हीं पहिल्यापासून अनियंत्रित एकसत्तात्मक राज्यपद्धतींत वाढलेलों असल्यामुळें 'राजा कालस्य कारणम्' अशी आमची पक्की समजूत, व ज्या त्या गोष्टींत राजाच्या तोंडाकडे पाहण्याची आम्हांस खोड ! लोकशिक्षण असो; व्यापारवृद्धि असो; यांत्रिक शोध असो; मादक द्रव्यसेवन निषेध असो; सामान्य

नीति प्रसार असो–काय पाहिजे तें असो, अगदीं शुष्क गोष्टीपासून मोठ्या महत्त्वाच्या गोष्टीपर्यंत सरकारापुढें तोंड वेंगाडल्याशिवाय, व राज्यकर्त्यांची मदत मागितल्याशिवाय, आमचें हातून कांहीं एक होणार नाहीं, असा आमचा पक्का ग्रह होऊन बसला आहे. केशवपन किंवा बालविवाह कायद्यानें बंद करा असें कोणी म्हटलें कीं केवढा अनर्थ करून सोडावयाचा कीं जशी कांहीं स्वातंत्र्यवृक्षावर आकाशांतील कुऱ्हाडच पडत आहे! म्हणचे काय कीं बायकांच्या व मुलांच्या पारतंत्र्याचा विच्छेद करणाऱ्या कायद्यास स्वातंत्र्यापहारक कुऱ्हाड म्हणावयाचें आणि ज्या गोष्टींनीं खरोखर स्वातंत्र्यापहार होत आहे त्यांस स्वातंत्र्यसंरक्षक म्हणून प्रेमानें कवटाळावयाचें—अशी आमची शोचनीय अवस्था होऊन गेली आहे! पण कांहीं अंशी ही अपरिहार्य आहे. पारतंत्र्यांत ज्यांचीं अनेक शतकें गेलीं आहेत त्यांना स्वातंत्र्याचा बाऊ वाटावयाचा! आणि पारतंत्र्यच सुखावह वाटायचें! आम्हां अर्धवट सुधारलेल्या लोकांची तर कथा काय? पण फ्रान्स व जर्मनी अशा सुधारलेल्या देशांतील तत्त्ववेत्त्यासही न कळत अशा प्रकारची भूल पडते, हें आश्चर्य नव्हे काय? सामाजिक नियंत्रण बलात्कारतत्वावर न होतां संमतितत्वावर होऊं लागेल तेव्हांच सामाजिक सुखाची परमावधि होण्याचा संभव आहे, हें सिद्ध करण्यासाठीं प्रसिद्ध फ्रेंच तत्ववेत्ता ऑगस्ट कौंट बसला असून वाहतां वाहतां भलतीकडे जाऊं लागला! संमतितत्वावर फ्रेंच समाजाची स्थापना करण्याकरतां त्यानें जी राज्यपद्धत वर्णिली आहे ती फ्रान्स देशांत आजपर्यंत रूढ असलेल्या राज्यपद्धतहिून अधिक सक्तीची आहे! जर्मनींतील अलीकडल्या सामाजिक तत्ववेत्यांची विचारपद्धति अशाच प्रकारची आहे यांनीं लोकांस पूर्ण स्वातंत्र्य देण्याच्या हेतूनें ज्या राज्यपद्धतीचें विवरण केले आहे त्या खरोखरीच अंमलांत आल्यास, व्यक्तिस्वातंत्र्य कोठें दृष्टीस पडेल किंवा नाहीं, याचीच शंका आहे! तात्पर्य, हाडामांसास खिळलेले आचार सामान्य लोकांसच बरें वाटतात असें नाहीं, तर त्यांतील दोष विचारीं विद्वानास देखील सहसा दिसत नाहींत, व दिसले तरी त्यांचा अव्हेर करणें हें त्यांच्यानेंही सहन होत नाहीं. त्यामुळें ज्या ठिकाणीं सरकारी अंमल मोठ्या जुलुमाचा असतो त्या ठिकाणीं तो वाढत जाण्यास प्रजेचें वर्तनही बऱ्याच अंशीं कारण होतें. जों जों सरकारी अधिकारी अधिकाधिक सक्ती करितात तों तों

प्रजेच्या अंगीं अधिकाधिक सहनशीलता येत जाते, व जों जों ही वाढत जाते तों तों अधिकाऱ्यांस अधिकाधिक जुलुम करण्यास सवड होतें. अशा रीतीनें एका बाजूनें औदत्य आणि दुसऱ्या बाजूनें नम्रता; एका बाजूनें चैन व दुसऱ्या बाजूनें कष्ट; एका बाजूनें स्वामित्व आणि दुसऱ्या बाजूनें गुलामगिरी यांची अधिकाधिक वाढ होत गेल्यास, उत्पादक लोकांची संख्या आणि त्यांनीं केलेलें उत्पन्न हीं दोनही संपुष्टांत येऊं लागतात. हळूं हळूं साऱ्यांसच कमीअधिक भिकारपण येऊन लोकसंख्येची वाढ खुंटते; आणि असाच प्रकार अधिकाधिक होत गेल्यास ती कमी होऊं लागून अखेरीस समूळ ऱ्हासाच्या पंथास लागते! तेव्हां लक्षांत काय गोष्ट ठेवायची कीं, समाजाची उन्नति होण्यास एक प्रकारची नियामक व्यवस्था जरी अत्यावश्यक आहे, तरी ती फाजील होतां कामा नये. नियामक व्यवस्था अस्तित्वांत आली म्हणजे समाजाच्या अंगीं एका प्रकारचें दाढर्य येऊं लागतें. व जों जों तीं व्यवस्था वाढत जाईल तों तों दाढर्य अधिकाधिक प्रबल होत जाऊन, समाजांतील लवचिकपणा अगदीं नाहींसा होतो, व ज्या मानानें हा लवचिकपणा नाहींसा होत जातो त्या मानानें समाजाच्या पुढील सुधारणेस प्रतिबंध होतो. म्हणून ज्यांच्या हातीं राज्यसूत्रें असतील त्यांनीं वरील विचार रात्रंदिवस डोळ्यांपुढें ठेवून, सरकारी अंमल अगदीं बेतापुरता चालवावयाचा असा निश्चय केला पाहिजे. ज्या देशांतील लोक चिखलांत रुतलेल्या गाईप्रमाणें हातपाय हालविण्यास अगदीं असमर्थ झाले असतील अशांस गाळांतून बाहेर पडून दोन पावलें टाकतां येण्यापुरती मदत सरकारनें अवश्य केली पाहिजे; पण त्यापुढें त्यांना आपल्या पायांनीं चालू न देणें म्हणजे त्यांस निरंतर पंगू करून ठेवून त्यांचें आणि त्याबरोबर आपलेंही नुकसान करून घेणें होय, हें अंमलदारांनीं कधींहि विसरतां कामा नये.

भारतीय कलांचें पुराणत्व : : २२

अलीकडे आम्हांस जी कारुण्यावस्था प्राप्त झाली आहे, व इंग्लिश लोकांसारख्या बलाढ्य लोकांपुढें आमची जी तेजोहीनता दृष्टीस पडूं लागली आहे, तीमुळें आम्ही पूर्वीपासूनच सर्व बाबतींत असेच गचाळ होतों कीं काय, असें परकीयांसच नव्हें तर आमचें आम्हांस देखील वाटूं लागलें आहे. असें सांगतात कीं, इंग्लडचा प्रसिद्ध बृहस्पति एडमंड बर्क जेव्हां वारेन हेस्टिंग्सविरुद्ध पार्लमेंट सभेंत गर्जुं लागला तेव्हां त्याच्या वाग्वज्रानें पार्लमेंटच्या सामान्य सभासदांची अंतःकरणें रागानें व शोकानें विदारून गेलीं येवढेंच नाहीं, तर ज्या हतभाग्य हेस्टिंग्सवर त्याच्या वाणीचे आघात होत होते, त्या खुद्द हेस्टिंग्ससाहेबाचें पाषाणहृदय देखील उकलून जाऊन क्षणभर त्यास असें वाटलें कीं, "मी मोठा कर्मचांडाळ दुरात्मा असलों पाहिजे!" बर्कच्या वाक्प्रभावामुळें हेस्टिंग्सची जशी दशा झाली तशीच आमचीहि अलीकडे होऊं लागली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. व्यापार, विद्या, कला, युद्धकौशल्य, धाडस, शरीरसामर्थ्य, मानसिक शक्ति वगैरे कोणत्याहि गोष्टींत आम्ही आपली युरोपिअन लोकांशीं, मुख्यत्वेंकरून इंग्लिश लोकांशीं, तुलना करूं लागलों कीं, त्यांच्या आमच्यांत जमीन अस्मानाचें अंतर स्पष्टपणें निदर्शनास येऊन, त्यांचें पारडें पृथ्वीवर बसल्यासारखें व आमचें आकाशांत लोंबत असल्यासारखें दिसतें! इंग्लिश लोकांत व आम्हांत खरोखरीच येवढें अंतर असतें, तर आमच्या मनाची जी सध्यां स्थिती झाली आहे, व तीविषयीं दुसऱ्यांस जें वाटत आहे त्याबद्दल इतका खेद करण्याची गरज नव्हती. अनेक गोष्टींत आम्ही आजमित्तीस इंग्लिश लोकांच्या मागें शेंकडों योजनें आहों, व आम्ही त्यांपासून शिकण्यासारख्या अनेक वस्तू आहेत, हें निर्विवाद आहे. पण येवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, ज्यांचा आम्हीं अभिमान मानावा, किंवा ज्यांच्या विचारानें पुढील वर्तन करतांना उत्साहावलंबन करावें असें आमच्या इतिहासांत कांहींच नाहीं. जुन्या ग्रीक किंवा रोमन लोकांच्या इतिहासाइतका आमचा इतिहास आनंदजनक किंवा उत्साहजनक नाहीं, हें प्रत्येक निःपक्षपाती हिंदूस कबूल केलें

पाहिजे. पण यहुदी, मिसर, पारसीक किंवा मुसलमान या लोकांच्या इतिहासापेक्षां आमचा इतिहास कमी मनोहर किंवा उपयुक्त आहे, असें मानण्याची गरज नाहीं, असें दाखविणें कठिण पडणार नाहीं. महंमदीय लढवय्यांप्रमाणें धर्मवेडानें युरोप व आशिया खंडांतील मोठमोठाले देश आम्ही उध्वस्त केलें नाहींत, व राज्यलोभानें लाखों लोकांचा प्राणसंहार करून आपली रुधिरभक्ति व क्रूरनिष्ठुरता जगाच्या इतिहासांत अमर केली नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण नीति, औदार्य, अनुकंपा, आप्तमित्रांचा परामर्ष वगैरे मानासिक गुणांचा; किंवा काव्य, चित्र, गान, वादन इत्यादि ललितकलांचां; अथवा दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिघटना, पाषाणखनन इत्यादि शिल्पकलांचा येथें अभ्युदय होऊन त्यांची इतकी अभिवृद्धि झाली होती कीं, त्यासंबंधानें आजमित्तीस सुद्धां आम्हांस कोणापुढेंही खालीं पाहण्याची आवश्यकता नाहीं. शिल्पकलेकडे वाफेच्या शक्तीचा उपयोग करण्याची युक्ति सांपडल्यापासून, त्या कलेंत प्रचंड क्रांति झाली आहे, व बाष्पप्रचोदित राक्षसी लोहयंत्रापुढें दीडफूट लांबीच्या हाडामासांच्या हाताचें कांहीं एक चालेनासे झालें आहे, हें खरें आहे. पण यंत्रानें केवढींही अचाट कामें केलीं तरी यंत्रें हातानींच करावीं लागतात, व यंत्रानें जी करामत करावयाची ती प्रथम हातानें साधण्यासारखी लागतें. यंत्रांत नानाप्रकारच्या वेलबुट्ट्यांचें काम निघतें; पण जर हातानें वेलबुट्ट्या काढतां येत नसल्या व नकाशे तयार करतां येत नसले तर वेलबुट्ट्यांचें काम यंत्रावर काढतां येणार आहे काय? ज्याप्रमाणें दुर्बिणीनें डोळसाच्या दर्शनशक्तीस साहाय्य होतें, पण आंधळ्यास तिचा कांहीं एक उपयोग नाहीं, त्याप्रमाणें जे हस्तकलेंत प्रवीण असतील त्यांसच यंत्रकला साधणार आहे; ज्यांचे हात थोटे आहेत त्यांना यंत्रापासून म्हणण्यासारखा फायदा होण्याचा संभव नाहीं. आतां येवढें खरें आहे कीं, यंत्रावर काम करणारीं बहुतेक मनुष्यें यंत्रासारखींच असतात; नवीन यंत्रे तयार करण्याची किंवा तीं बिघडलीं तर दुरुस्त करण्याची कला फार थोड्यांसच साधलेली असतें; हा विचार हस्तकलेसही तितकाच लागू आहे. चांगल्या कारागिरानें एखादा सुरेख नमुना घालून दिला म्हणजे त्याचें अनुकरण करणारेंच शेंकडा नव्याण्णव लोक असावयाचे. विशाल कल्पकता ही

नैसर्गिक देणगी फार थोड्यांसच प्राप्त झालेली असते. बहुतेक जनता तेल्याच्या घाण्याभोंवतीं डोळे बांधलेल्या बैलाप्रमाणें श्रेष्ठ लोकांनीं घालून दिलेल्या वाटांनीं भ्रमण करीत असते; आणि असें तिनें करणें हेच फायदेशीर आहे. ज्यांना स्वतःची अक्कल नाहीं त्यांनीं अक्कलवंतांची कास धरून चालावें हेंच नीट आहे. तात्पर्य, अर्वाचीन विस्तृत यंत्रकला युरोपीअन लोकांप्रमाणें आम्हांस अवगत नाहीं, व ती त्यांपासूनच आम्हीं शिकली पाहिजे, हे जरी आम्ही प्रांजलपणें कबूल करतों तरी ती साध्य होण्यास ज्या हस्तकला-प्राविण्याची आवश्यकता असते, ती हस्तकलाही आम्हीं सर्वांशीं युरोपीअन लोकांपासून उचलली पाहिजे हें मत आम्हांस मान्य नाहीं. तथापि आम्ही लौकर जागे झालों नाहीं, तर युरोपीय यंत्रकला आम्हांस साध्य होणार नाहीं, इतकेंच नाहीं तर सुमारें तीन हजार वर्षांच्या परिश्रमानें येथें भव्य उदयास आलेली जी आमची हस्तकला तिचाही लोप होईल, व एकदां तिचा लोप झाला म्हणजे अर्वाचीन यंत्रकलाही आम्हांस संपादितां येणार नाहीं, हें कबूल करणें भाग आहे. तेव्हां जे कोणी या देशांत यंत्रकलाप्रसार करण्याविषयीं झटत असतील त्यांनीं लाखों रुपयांचीं यंत्रें परक्या देशांत खरेदी करून, ती येथें आणून मांडिलीं आणि त्यांवर माल काढण्यास सुरुवांत केली, म्हणजे त्यांच्या श्रमास पूर्ण यश आलें असें आम्हांस वाटत नाहीं. यंत्रांचे कारखाने स्थापणें तर जरूर आहेच पण त्यांबरोबरच त्यांनीं दुसऱ्या दोन गोष्टी केल्या पाहिजेत त्या ह्या. आपली जुनी हस्तकला टाकाऊ नाहीं तर अत्यंत रक्षणीय आहे, अशी लोकांची खात्री केली पाहिजे, व जे त्या कलेंत निष्णात आहेत त्यांच्याकडून अर्वाचीन यंत्रकलेचें ज्ञान संपादवून, तें त्या हस्तकलेच्या विस्तृत उपयुक्तत्वाला कारणीभूत होईल, अशा उपायांची योजना केली पाहिजेत. तात्पर्य, ज्या वेळेस आमच्या जुन्या हस्तकलेस नवीन यंत्रकलेचें साहाय्य होऊं लागेल, व पूर्वी जीं चतुरस्रपणाचीं कामें नामांकित कारागीर दीर्घ आयासानें, खर्चानें, व काळानें थोड्या श्रीमंतांच्या सुखासाठीं व ऐष-आरामासाठीं करीत तींच कामें यंत्राच्या साहाय्यानें स्वल्प आयासानें, खर्चानें व काळानें होऊं लागून अनेक गरीबांस जेव्हां त्यांपासून सुख व ऐषआराम प्राप्त होऊं लागेल तेव्हांच आमच्या जुन्या हस्तकलेचें रक्षण

झालें, व पाश्चिमात्य यंत्रकलेनें या भूमींत बळकट मूळ धरलें असें म्हणतां येणार आहे.

येथील श्रीमान लोक धनाढ्य शेटसावकार किंवा पैसेवाले जहागीरदार व संस्थानिक पूर्वीच्या कामांसारखीं टोलेजंग कामें हिंदु कारागिरांकडून अलीकडे करवीत नाहींत, हें पाहून कित्येक पाश्चिमात्य लोक असें म्हणतात कीं, हिंदु लोकांत हस्तकौशल्याची अभिवृद्धि कधींच झाली नाहीं. नावाजण्यासारख्या ज्या थोड्याबहुत इमारती किंवा कोरीव लेणीं दिसतात. त्यांवरून इतकेंच सिद्ध होतें कीं, कांहीं कारणांमुळें हस्तकौशल्यांत आम्हांहून फार श्रेष्ठ अशा ग्रीक, रोमन, व मुसलमान लोकांचा आणि आमचा संबंध घडून आल्यामुळें आम्हांस तीं कामें करतां आलीं. त्यांचा आमचा संबंध न घडता तर हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पाहण्यासारखें किंवा वाखाणण्यासारखें कांहीं नसतें. आमच्या मतें हें म्हणणें फार चुकीचें आहे; व तें चुकीचें आहे, असें अनेक रीतींनीं सिद्ध करून देतां येणार आहे.

प्रथम असा विचार केला पाहिजे कीं, शिल्पकलेची व इतर कलांची उत्पत्ति व अभिवृद्धि होण्यास कोणत्या गोष्टींची अनुकूलता असणें जरूर आहे; व त्या गोष्टी इटाली, ग्रीस व तुर्कस्थान या देशांपेक्षां हिंदुस्थानांत पूर्वीपासून अधिक विपुलतेनें दृष्टीस पडत आहेत किंवा नाहींत ? जो कोणी थोड्या बारकाईनें या प्रश्नाचा विचार करील त्याच्या लक्षांत हें तेव्हांच येईल कीं, कोणत्याही देशांत कलांची वृद्धि होण्यास त्यांतील लोकांस चरितार्थासाठीं अहोरात्र खपावें लागतां कामा नये; शिवाय अशीं कामें करण्यास लागणाऱ्या जड द्रव्यांचें वैपुल्य असलें पाहिजे. बर्फाच्छादित उत्तरध्रुवाकडील प्रदेशांत खुज्या लोकांत किंवा सैबेरिया प्रांतांतील थंडीनें नित्य कांकडत असणाऱ्या लोकांत हस्तकौशल्याची वृद्धि कशी व्हावी, हें आम्हांस समजत नाहीं. ज्यांना केवळ उदरपोषणासाठीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत समुद्रोदरस्थ मत्स्यजातीशीं, अरण्यवासी भक्ष्य जनावरांशीं अथवा हवेंत संचार करणाऱ्या विहंगमांशीं झगडा करावा लागतो, व त्यांवर आपली उपजीविका चालवावी लागते, अशा लोकांस भव्य मंदिरें

बांधण्यास, नाना प्रकारचें कपडे विणण्यास व ऐषआरामाचे इतर तऱ्हांचे पदार्थ उत्पन्न करण्यास फुरसत कोठून सांपडणार? अशा लोकांनीं कॉड-सारख्या माशाच्या, रेनाडिअरसारख्या जनावराच्या किंवा कोंबड्यांसारख्या गृहपक्षाच्या चरबीवर, मांसावर व अंड्यांवर चरितार्थ चालवून संकटावह असें आयुष्यक्रमण करणें भाग आहे, शिवाय, ज्या ठिकाणीं सूर्य फारसा प्रकाशत नाहीं, मोठमोठ्या नद्या वाहात नाहींत, ठरीव ऋतूंत पाऊस पडत नाहीं व जमीन बहुधा उधडी असत नाहीं, अशा ठिकाणीं मृदु, कठीण, लवाचिक, किंवा दाणेदार अशा वनस्पतींची वाढ होऊन, इमारतींस लाग-णारें सुरेख लाकूड मिळावें कसें? तसेंच जिकडे तिकडे सफाईदार व टिकाऊ दगडाच्या खाणी लागत नसल्या व लोखंडासारख्या अत्यंत उपयुक्त धातू सांपडत नसल्या तर दगडी कामें व इत्यारें व्हावीं कशीं, हा मोठा प्रश्न आहे. इजिप्तसारख्या स्वाभाविक सुपीक देशाची लॅपलंडसारख्या ओसाड भू-खंडाशीं तुलना करतां येत नाहीं. एकांत मनुष्याच्या उपजीविकेस लागणाऱ्या गोष्टी सहज उत्पन्न होतात; दुसऱ्यांत त्या प्राप्त होण्यासाठीं तेथील लोकांस साऱ्या दिवसभर खपावें लागतें. नैल नदीच्या उथळ व रुंद पात्रांत जो गाळ वाहत असतो तो तिच्या दोनही किनाऱ्यांवरील प्रदेशांत कित्येक मैल आपोआप पसरला जाऊन त्यांस खत घातल्याप्रमाणें सुपीकपणा आणतो. अशा प्रका-रच्या क्षेत्रांत पूर येऊन गेल्यावर एकदां कसें तरी थोडेंबहुत बीं फेंकून द्यावें, आणि सातआठ महिने लोटल्यावर खंडोगणती धान्य घेऊन यावें असा प्रकार चालतो. अशा देशांतील लोकांत मनुष्यसुधारणेचा आरंभ झाला, निरनिराळीं शास्त्रें अस्तित्वांत आलीं, व काळाच्या विघातक सामर्थ्यास न जुमानणाऱ्या व आकाशाचें चुंबन करूं पाहणाऱ्या पिरमिदी उठल्या, यांत कांहीं नवल काय? ज्या कारणामुळें मिसर देशांत सर्वांआधीं सुधारणेस आरंभ झाला असें म्हणतात, तींच कारणें हिंदुस्थानांत आलेल्या आर्यशाखेची सुधारणा प्रथम तेथें होऊं लागण्यास पुरें होतीं, व त्याप्रमाणें ती येथें झाली, असें अंतर्बाह्य प्रमाणांवरून समाधान होण्यासारखें सिद्ध करून देतां येणार आहे. प्रथम हिंदुस्थानच्या बाह्य स्वरूपाकडे क्षणभर लक्ष द्या. येथें कशाची तरी वाण आहे काय? उष्ण, शीत, किंवा समशीतोष्ण कटिबंधांत पैदा होणारी

प्रत्येक चीज येथें हवी तितकी सांपडते. थंड व डोंगरी प्रत्येक प्रदेशांत होणाऱ्या जिनसा नगाधिराज हिमालय हव्या तितक्या देण्यास कालाच्या आरंभापासून एकसारखा उभा आहे! नैल नदीच्या सुपीक व रेताड मैदानांत लीलेनें होणारीं धान्यें पाहिजे असतील तर सिंधूच्या व गंगेच्या दोन्ही थडयांनीं त्यांची हवी तितकी विपुलता आहे. तांबड्या व काळ्या जमिनीतील व खारट आणि खडकाळ अशा प्रदेशांतील उत्पन्नें हवी असतील तर दाक्षिण हिंदुस्थानांस वेष्टणाऱ्या समुद्रमेखलेपासून घांटापर्यंत पसरलेल्या पूर्व-पश्चिम कोंकणपट्ट्याकडें, व घांटावरील मोठमोठ्या नद्यांनीं चित्रविचित्र व सुपीक करून सोडलेल्या सुखावह भूमीकडे अवलोकन केले म्हणजे झालें. हिंदुस्थानांतील उंच डोंगरी प्रदेश, वड, पिंपळ, खदीर, पळस, ताड, कळक वगैरे अत्यंत उपयोगी वृक्षांनीं आच्छादिलेले असून त्यांत व्याघ्र, सिंह, माकडें, मोर वगैरे हिंस्र आणि अहिंस्र प्राणी यथेच्छ संचार करितांना दृष्टीस पडतात. याहून सखल प्रदेशांत हत्ती, कृष्ण सारंग, तांबडीं हरणें, रानडुकरें, साळुंक्या, ससे व चकोरादि पक्षी स्वेच्छेनें विहार करीत असतात. हे दोन प्रकारचें प्रदेश सोडून जेव्हां आपण सपाट मैदानांत येतों तेव्हां जिकडे तिकडे नाना तऱ्हेच्या धान्यांचीं शेतें, उंसाचे फड, भाताचीं खांचरें, व नाना प्रकारच्या फळझाडांनीं, वेलांनीं आणि फुलांनीं भरून गेलेल्या बागा दृष्टीस पडतात. अशा प्रकारच्या रम्य व संपन्न देशांतील लोकांस चरितार्थ चालविण्याची आरंभीं येवढी तरी पंचाईत पडली असेल काय? व जर पडली नसेल तर ज्ञानवृद्धि आणि कलावृद्धि करण्याकडे त्यांचें लक्ष सहज वेधलें नसेल काय? पण हें सारें या पुण्य आर्यभूमीच्या बाह्य स्वरूपासबंधानें झालें. पुढच्या लेखांत हिच्या अंतःस्थितीचा विचार करून मग आम्हांस येथील कलांच्या पुराणत्वाबद्दल जो अभिप्राय द्यावयाचा आहे, तो उघडपणें देऊं.

भारतीय कलांचें पुराणत्व—नं. २ : : २३

कोणत्याही देशांत कलांची उत्पत्ति व अभिवृद्धि होण्यास त्यांची बाह्य स्थिति कोणत्या प्रकारची असली पाहिजे हें प्रथम सांगून, मग या भरतखंडाची स्थिति पूर्वीपासून तशी आहे, हें मागल्या लेखांत सांगितलें. तेव्हां इजिप्त देशाप्रमाणें या देशांतही कलांचा अभ्युदय फार प्राचीन काली झाला असला पाहिजे, असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं. इंग्रज लोकांचा अंमल येथें स्थाईक होण्यापूर्वीच बाष्पशक्ति त्यांच्या हस्तगत होऊन गेल्यामुळें, व त्यांच्या अंमलानें येथील कालांच्या पुरस्कर्त्यांची व आश्रयदात्यांची संख्या अत्यंत संकुचित झाल्यामुळें, येथील कारागिरी सांप्रत कालीं अगदीं लयास गेल्यासारखी झाली आहे, हें निर्विवाद आहे. तथापि ज्यांचें अवलोकन वस्तूंच्या केवळ पृष्ठभागांसच धरून रहात नाहीं, तर त्याच्या खालीं व पलीकडे जातें, त्यांना अजूनही असें कबूल करावें लागेल कीं, आज जें कलाचातुर्य हिंदुस्थानांत उपलब्ध आहे, त्याची उत्पत्ति व अभिवृद्धि आजकालची नाहीं, तर फार जुनी आहे. जुनेपणा ज्या दोन प्रमाणांनीं सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात त्यांपैकीं त्यांची सांप्रत स्थिति, या प्रमाणावर आक्षेप घेणारे असे पुष्कळ लोक आहेत. या लोकांत अनेक युरोपिअनांचा व बिलकुल शोध न करतां दुसरे म्हणतील त्यास 'हो' म्हणणाऱ्या किंवा केवळ बाह्य स्थितीवरून सिद्धांत बोधणाऱ्या एतद्देशीयांचा समावेश केला पाहिजे. हिंदू लोकांची राजकीय व सामाजिक अनुकंप्य स्थिति पाहून कलाखात्यांतही ते पूर्वीपासून असेच असलें पाहिजेत, व आजमितीस या देशांत ती थोडीबहुत कारागिरी दृष्टीस पडतें ती त्यांनीं अन्य लोकांपासून उचलली पाहिजे, असें अनुमान करून तिचें सूत हे हेकेखोर लोक ग्रीक किंवा मुसलमान लोकांकडे लावूं पाहातात ही त्यांची मोठी चूक आहे, हें पुढील विवरणावरून सहज लक्षांत येईल.

मनुस्मृति हा ग्रंथ कमीत कमी म्हटला तरी खिस्ती शकाच्या अगोदर किंवा पाठीमागून जो दोनशे वर्षांचा काळ लोंटला त्यांत लिहिला गेला असावा, ही गोष्ट आतां सर्व शोधक विद्वान मान्य करतात याविषयीं आतां मतभेद

राहिलेला नाहीं. मनुस्मृतींत ज्या कालांचीं व कारागिरांची अप्रत्यक्ष रीतीनें वर्णनें आली आहेत त्याच प्रकारच्या कला व कारागीर अद्यापि उपलब्ध आहेत. तेव्हां जर कोणी आम्हांस कलाशिक्षण दिलें असेल तर तें मनुस्मृति अस्तित्वांत येण्यापूर्वी दिलें असलें पाहिजे, असें मानणें भाग आहे. परंतु मनुस्मृतींत पूर्वीच्या स्मृतींचा व इतर ग्रंथांचा कला व कारागीर यांच्या-संबंधानें, उल्लेख केला आहे. तेव्हां आणखी असें कबूल करणें भाग पडतें कीं, ज्या अर्थी मनुस्मृतीच्या मित्तीपासून इतकीं शतकें लोटलीं असून व स्थित्यंतर करण्यास अत्यंत अनुकूल अशा अनेक गोष्टी घडल्या असून जर आमच्या कला व कारागीर त्या कालापासून आतांपर्यंत विशेष फेरफार न होतां एकांच स्थितींत दृष्टीस पडत आहेत, तर मनूच्या पाहण्यांत ज्या कला व जे कारागीर आले ते तत्कालीन स्थितींत अनेक शतकें असले पाहिजे; व हें अनुमान योग्य असेल तर भारतीय कलांचें पुराणत्व तीन हजार वर्षांवर नेऊन बसवितां येतें ! मनुस्मृतींत आलेक्झांडरच्या किंवा शिकंदराच्या स्वारी विषयीं बिलकुल उल्लेख नाहीं, तेव्हां ती स्वारी ती स्मृति झाल्यावर झाली असावी, असें म्हणणें कांहीं वावगें नाहीं; तसेंच मनुस्मृति ख्रिस्ताच्या अगोदर दोनशें वर्षें लिहिली गेली असावी असें म्हणा, किंवा त्यानंतर दोनशें वर्षांनीं लिहिली गेली असावी असें म्हणा, कसेंहीं म्हटलें तरी ती आस्तित्वांत येण्या-पूर्वी मुसलमानांचा पाय या पुण्यभूमिस लागला होता, असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. तेव्हां आम्ही आमच्या कला मुसलमान किंवा ग्रीक लोकांपासून उचलल्या असाव्या, असें सूक्ष्म विचाराअंतीं कोणाच्यानेंही प्रपादवणार नाहीं. आतां मनुस्मृतींत तरी अप्रत्यक्ष रीतीनें काय काय सांपडतें तें पाहू. अप्रत्यक्ष रीतीनें असें म्हणण्याचें कारण असें आहे कीं, अर्वाचीन एंजि-नीअरच्या ग्रंथासारखा मनुस्मृति कांहीं कलाग्रंथ नाहीं. तो धर्मग्रंथ आहे तथापि निरानिराळ्या अध्यायांत निरानिराळ्या वर्गांच्या कर्तव्यांचा व बंधनांचा विचार करीत असतां तत्कालीन कलांचा व कारागिरांचा उल्लेख करणें त्यास भाग पडलें आहे. तेव्हां अशा प्रकारच्या ग्रंथांत प्राकृत विषयाच्यासंबंधानें जें कांहीं सांपडेल त्यांत यत्किंचितही व्याज असण्याचा संभव नाहीं, हें उघड आहे. मनूस त्यासंबंधाची जशी स्थिति दृष्टीस पडली तशीच त्यानें वर्णिली असावी,

असें मानणें हेंच योग्य आहे. स्थलसंकोच नसता तर सबंध श्लोकच्या श्लोक येथें उतरून घेतले असते. पण जागेच्या अडचणीमुळें तसें करतां येत नाहीं. फक्त अध्यायाचा व श्लोकसंख्येचा उल्लेख करण्यांत समाधान करून घ्यावें लागत आहे. (अध्याय ८ श्लोक २४८ व अध्याय ९ श्लोक २८०, २८५) यांत देवालयांविषयीं उल्लेख आहे. (४, ४६)—येथून पुढें अध्यायाचा आंकडा जाडा व श्लोकाचा बारका असें समजावें--यांत मोडक्या देवळांचा उल्लेख आहे; आणि (४, ३९, १३० व ८, ८७,व ९, २८५) यांत, मूर्तींचा उल्लेख आहे; (८, २४८, ९, ५८९) यांत तळीं, हौद, विहिरी, व जिवंत टांकी यांचा आहे; (९, २८५) त पुलांचा आहे; (७, ७०, ७६ व १, १५२) त भुइकोट किल्ल्यांचा व डोंगरी किल्ल्यांचा आहे; (७, ७०, ७६, व ९,२७९) त राजवाड्यांचा आणि त्यांवर मोठमोठ्या कांठ्यावर फडकणाऱ्या निशाणांचा आहे; (९,२८०) त कोठारांचा आणि हत्यारखान्यांचा आहे; (४, १६०) त धनुष्यबाणांचा आहे; (९, ९०) त सर्व प्रकारच्या मारक शस्त्रांचा आहे; (९, २८०) त रथांचा आहे; (४, २०२, २३२ व ८, २९१) त बसण्याच्या गाड्यांचा आहे; (८, २०९) त ओझ्याच्या गाड्यांचा किंवा खटाऱ्यांचा आहे; (८, २३१) त पांढऱ्या पोषाखांचा आहे; (१०, ८७, १२, ६६) त लोकर, कापूस व ताग यांच्या रंगीत वस्त्रांचा आहे; (५, १२० व ११, १५९) त रेशमी कापड्यांचा आहे; (४, ६६, १८८, २३१, व ९, ७०, २१९) त हरएक तऱ्हेच्या तंतुपटांचा आहे; (७, ९०) त नीळ आणि (१०, ८२) त लाख यांचा आहे, (४, ६६) त जोड्यांचा आहे; (२, २४६ व ७, ९६) छत्र्यांचा आहे; (११, १६८, ७, २१८, ८, १००, ३२३) त पोळीं, मोतीं, व इतर रत्नें यांचा आहे; (४, ३६) त कानांतील सोन्याच्या दागिन्यांचा व (२, १९४,३, ५९) त बाकीच्या दागिन्यांचा आहे; (३, २०९, ४, २५०, १२, ६५) त निरनिराळ्या अत्तरांचा आहे; (४, २०२) त आसनांचा व (४, २५०) त मंचकाचा आहे; (३, २३४) त नेपाळच्या शय्यास्तरणांचा आहे; (४, २३९) त दिव्यांचा (७, १३२) त दगडांच्या वस्तूंचा, व (७, १२१) त हस्ति-

दंत आणि शिंगें यांचा आहे; (४, २३०, ५, ११२ व ११, ११८) त रुप्याच्या साध्या आणि कोंदणांच्या दागिन्यांचा आहे; (५, १११) त चमच्यांचा (२, ६५, ७, १३२, ८, ३१९) त पाण्याच्या भांड्यांचा, (४, ७४, ७, ५०) त फाशांचा, (४, २०२, २३२) त बिल्ल्यांचा व (४, १२०) त घोंगड्यांचा आहे. ही मनुस्मृतींत आढळणाऱ्या वस्तूंची अध्यायवार व श्लोकवार यादी झाली. याचप्रमाणें कारागिरांचीही यादी देऊं लागलों तर वाचकांस ती कंटाळवाणी होईल म्हणून इतकेंच सांगतों कीं, मनुस्मृतींत सुतार, बुरुड, लोहार, सोनार, शिंपी, कोष्टी, तेली, साळी वगैरेंचा उल्लेख केला आहे, व जरी या सर्वांस त्यानें खालच्या वर्णांत गोंविलें आहे, तरी त्यांच्या धंद्यांची उपयुक्तता ध्यानांत आणून असा अभिप्राय दिला आहे कीं, कारागीर कोणत्याही जातीचा असला तरी ज्या हातानें तो उपयुक्त वस्तू बनवितो तो हात कांहीं अपवित्र नाहीं. तसेंच विवाहित स्त्रियांनीं कारागिरांशीं भाषण करणें निषिद्ध नाहीं यावरून निवृत्ति मार्गाकडे ज्याचा विशेष ओढा त्या मनूलासुद्धां या कारागिरांचें महत्त्व आणि त्यांपासून जीवित सुखावह करण्यास होणारें साहाय्य यांची किती उत्कृष्ट कल्पना होती, हें सिद्ध होतें. तसेंच मनूच्या आमदानींत नाणें चालत होते असेंही स्पष्ट दिसतें. कारण या वैराग्यभक्तानें एका ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, "तांबें, रुपें, आणि सोनें यांच्या ज्या विशिष्ट वजनांस नाणें अशी पारिभाषिक संज्ञा आहे, व ज्याच्या योगानें जगाचा व्यवहार सुकर होतो, तीं, नाणीं अगदीं निर्दोष आहेत, असें माझें मत आहे." याच रीतीनें त्यानें दुसऱ्या एका स्थलीं ऋण, करार, सारा, परमुलुखांतल्या मालावरील कर, समुद्रप्रयाण, परदेशाशीं व्यापार यांविषयीं उल्लेख करून, शेवटच्या दोन गोष्टी ब्राह्मणांस निखालस वर्ज्य आहेत, असें म्हटलें आहे! यावरून काय उघड होतें कीं, परदेशांशीं हिंदुस्थानचा व्यापार मोठ्या झपाट्यानें चालत होता, व त्यामुळें जें दळणदळण सुरूं झालें होतें त्यामुळें ब्राह्मणधर्मास लागलेलीं उतरती कळा व बौद्धधर्माचा प्रसार यांच्या योगानें त्याचें चित्त उद्विग्न होऊन जाऊन, ब्राह्मण धर्माची पूर्वपदावर स्थापना करण्यासाठीं तो आपणांकडून होतील तेवढें निर्बंध घालीत होता. प्रस्तुत स्थलीं आम्हांस यासंबं-

धांत विशेष पडण्याची गरज नाहीं. तथापि मनुस्मृतीवरून येवढें सिद्ध करण्यास हरकत नाहीं कीं, मनूच्या कारकीर्दींत म्हणजे खिस्ती शकाच्या अव्वल कारकीर्दींत किंवा त्याच्या पूर्वी पांचसातशें वर्षें म्हणजे आज सुमारें तीन हजार वर्षें हिंदुस्थानच्या कला आणि कारागीर बहुतेक अंशीं आहेत तसें आहेत; त्यांना ग्रीक लोकांनीं किंवा मुसलमान लोकांनीं विशेषसें दुखावलेंही नाहीं, व सुधारलेंही नाहीं. थोडी काळजी घेतल्यास आणखी अनेक शतकें त्या कला आणि ते कारागीर तसेंच तगून राहतील ! पण हें घडावें कसें ? इंग्रजांनीं आणलेल्या बाष्पशक्तीपुढें व राक्षसी यंत्रशक्तीपुढें आमच्या हातकारागिरांनीं टिकाव धरावा कसा ? आणि आमच्या कलांचें नांव चालावें कसें ? अथवा आमच्या कारागिरांचा उदरनिर्वाह व्हावा कसा ? याला एकच उपाय दिसतो तो हा कीं, आमच्या हस्तकौशल्याचा युरोपीय बाष्पशक्तीशीं व यंत्रशक्तीशीं विवाह होऊन त्यांच्या समागमापासून उत्पन्न झालेली संतानें जिकडे तिकडे फडकूं लागलीं पाहिजेत !

भारतीय कलांचें पुराणत्व–नं. ३ : : २४

मनुस्मृतींच्या साहाय्यानें आमच्या कलांचें पुराणत्व सिद्ध करण्यास अप्रत्यक्ष जातीचा किती पुरावा मिळतो, यांचें दिग्दर्शन मागल्या लेखांत केलें आहे. आमचीं महापुराणेंही यासंबंधानें बरींच उपयोगी पडण्यासारखी आहेत. मनुस्मृति आणि रामायण व महाभारत हे अगदीं निराळ्या प्रकारचें ग्रंथ आहेत. तथापि त्यांमध्यें कालदूरता विशेष नसल्यामुळें कलादि मुख्यविषयबाह्य गोष्टींचे जे उल्लेख त्यांत आढळतात, ते परस्परांशीं सदृश असून एकमेकांचें समर्थन करणारे आहेत. आमच्या शोचनीय स्थितीमुळें, या महापुराणांचा अभ्यास आमच्या हातून जसा व्हावा तसा मुळींच होत नाहीं. पूर्वपद्धतींचे कांहीं लोक ती पोथीपुढील तांदुळासाठीं, व्यासपूजेच्या प्राप्तीसाठीं; सप्ताहाच्या फायद्यासाठीं, किंवा बिदागीसाठीं वाचतात !

अलीकडील तरुण लोक तीं परीक्षा पास होण्यासाठीं वाचतात ! इतिहास-दृष्टीनें त्यांच्याकडे अवलोकन करून ज्यानें त्यांच्या वाचनास आरंभ केला आहे, व तें तडीस नेलें आहे, असा बहुधा एकही अर्वाचीन विद्वान् सांपडणार नाहीं. एखादा बुद्धिवान् व कल्पक विद्वान् या दोन ग्रंथांचा यथास्थित रीतीनें अभ्यास करील तर भारतीय आर्यांच्या पौराणिक कालांतील स्थितीचें प्रत्येक बाबतींत विश्वसनीय, मनोरंजक व बोधावह असें चित्र त्यास काढतां येणार आहे ! पण असलें काम नीट रीतीनें होण्यास लागणारा राजाश्रय किंवा लोकाश्रय आम्हांस मिळत नसल्यामुळे यांचें जितकें मंथन व्हावयाला पाहिजे आहे तितकें अद्यापि कोणींही केलेलें नाहीं, व पुढेंही तें अशाच स्थितींत करण्यास कोणी झटेल, असें आम्हांस वाटत नाहीं. इंग्लिश लोकांनीं असलीं कामें हातीं धरल्यास, त्यांस खुद्द सरकाराकडून व सरकारी अधिकाऱ्यांकडून साक्षात् किंवा परंपरेनें पुष्कळ मदत होतें. इतिहासदृष्टीनें या ग्रंथांकडे पाहून त्यांच्या मदतीनें येथील जुनी स्थिती कशी असावी. राज्य पद्धति कोणत्या प्रकारची असावी, राजा आणि प्रजा यांचे अन्योन्य संबंध कसें होते; वर्णावर्णांत द्वेषभाव असे कीं संतोषवृत्ति असे; राजावर लोक प्रीति करीत किंवा त्याला नाखूष असत; कायदे कोण करी; कर कोणत्या प्रमाणानें, कशावर व केव्हां घेत; सैन्याची व्यवस्था कशी काय ठेविली जात असें; स्वदेशी व्यापाराला उत्तेजन देऊन परकी देशाचा माल स्वदेशांत येऊं न देण्याबद्दल निर्बंध करीत असत किंवा नाहीं; व्यापाराची मुख्य ठिकाणें कोणतीं होतीं; कोणकोणत्या जिनसा विशेष पिकत; अथवा कोणता जिन्नस कोणत्या ठिकाणीं विशेष सुबक होत असे आणि त्याला काय किंमत पडे; लोकाशिक्षणाची व स्त्रीशिक्षणाची सामान्य स्थिति कशी होती; स्त्रियांस, नोकरांस व इतर परोपजीवी लोकांस कोणते हक्क असत, व त्यांचा सांभाळ कोणत्या रीतीनें होत असे वगैरे गोष्टींविषयीं उत्कृष्ट माहिती या दोन पुराणांत खचित सांपडेल, अशी आमची खात्री आहे. पण इतका शोधक व सुखवस्तु वाचक येथें कोठून पैदा होणार ? व झाला तरी तो आम्हांस लाभणार कसा ? फार्‌दिशीं तो एखादे ठिकाणी रावसाहेब होऊन बसावयाचा, किंवा कोठें वकिलीचें 'प्रॅक्टिस' करूं लागावयाचा, अथवा एखाद्या नेटिव्ह

संस्थानिकांच्या पदरी चार-दोनशें रुपयांवर पडून रहायचा ! मध्यां आमच्या संबंधानें हें बिकट काम युरोपियन लोक करीत आहेत, व तें आमच्या हातून नीट होऊं लागेतोंपर्यंत, युरोपियन लोकांच्या शोधांवर, व कांहीं अंशी त्यांच्या कल्पनावर, आम्हांस अवलंबून असलें पाहिजे. प्रस्तुत निबंधही सर जॉर्ज बर्डवूड यांनीं हिंदुस्थानच्या कलांच्या पुराणत्वाचें जें मंडन केलें आहे त्याच्या अनुरोधानें लिहिले जात आहेत. ज्यांना सर जॉर्ज यांचा इंग्रजींत लिहिलेल्या अस्सल लेख पहावयाचा असेल त्यांनीं बाँबे गॅझेट पत्राचा १३ जून १८९० चा अंक पहावा. असो.

रामायण आणि भारत हीं इतिहासाची पुस्तकें नाहींत हें जरी खरें आहे, तरी जो ऐतिहासिक दृष्टीनें त्यांकडे पाहील त्याला त्यांपासून तत्कालीन व त्या पूर्वीच्या समाजाच्या अंतर्बाह्य स्थितीविषयीं बरीच माहिती मिळणार आहे. प्रस्तुत विषयाच्या समर्थनासाठीं सर जॉर्ज यांनीं रामायणांतून एकच उदाहरण घेतलें आहे. पण तेवढ्यावरूनसुद्धां पौराणिक कालांत आमच्या कलांची व कारागिरीची स्थिति कशी होती, हें सहज समजण्यासारखें आहे. रामायणाच्या दुसऱ्या कांडांतील एकोणिसाव्या अध्यायांत अयोध्येंतील लोक भरतासह जो रामाचा शोध लावण्यास निघाले आहेत त्याचें वर्णन आहे. रामशोधार्थ काढलेली भरताची स्वारी मोठ्या थाटानें व व्यवस्थेनें निघाली होती. हींत प्रत्येक धंद्याचें लोक असून, धंद्याच्या महत्त्वाच्या अनुरोधानें त्यांच्या रांगा लाविल्या होत्या, व त्या त्या धंद्यांतील प्रमुख इसमांना त्यांचे पुढारी किंवा नायक नेमिलें होतें. या प्रसंगीं हजर असलेल्या लोकांत अग्रस्थान जवाहिऱ्यांस दिलें होतें. जवाहिऱ्यांच्या पाठीमागून कासार चालले होते, व कासारांच्या मागून हस्तीदंती काम करणारे, गंधी, सोनार, कोष्टी, लोकर विणणारे, सुतार, पितळेचें काम करणारे, चितारी, गायनाचीं वाद्यें करणारें, शस्त्रें करणारें, लोहार, तांबट, पुतळे करणारे, स्फटिक कांपणारे, कांच करणारे आणि असेच इतर कारागीर अनुक्रमानें जात होते. ही यादी पाहून रामायणकालीं हे धंदे हिंदू लोकांस माहीत नव्हते असें कोण म्हणूं शकेल ? हिंदुस्थानास मुसलमानांचा वारा सातव्या शतकापर्यंत मुळींच लागला नाहीं. रामायण व भारत यांतील राजे क्षिस्ती-

शकाच्या पूर्वीची पांचशें आणि त्यानंतरचीं पांचशें वर्षें यांच्या दरम्यान होऊन गेले असावे, असें हिंदु लोकांच्या सुधारणेविषयीं ज्यांचें म्हणण्यासारखें अनुकूल मत नाहीं, असे पंडित देखील कबूल करतात. तसेंच रामायणांत धंद्याची जी यादी दिली आहे तींच कोणी झाला तरी आज करील. फार तर काय पण एखादा सेन्सस रिपोर्ट घेतला आणि त्यांतील वर्गीकरणाकडे पाहिलें, तर धंद्याच्या कोष्टकांत म्हणण्यासारखा फरक करावा लागणार नाहीं. तेव्हां काय सिद्ध झालें कीं, रामायणकालीं या भरतभूमींत जे धंदे येथें चालत होते तेंच अद्यापिही चालत आहेत व ग्रीक लोकांच्या आणि मुसलमान लोकांच्या स्वाऱ्यांनीं त्यांत म्हणण्यासारखा फरक झालेला नाहीं. आणि वास्तविक पाहिलें तर हा फरक त्या लोकांकडून होण्याचा संभवही नव्हता. ग्रीक लोक तर येथें एखाद्या साथीसारखे, वावटळीसारखे किंवा टोळधाडीसारखे आले आणि गेले! हिंदुस्थानांत त्यांनीं कायमचें ठाणें कधींही दिलें नाहीं, व त्यामुळें त्यांच्याकडून येथील कलाकौशल्यांत म्हणण्यासारखा फेरफार झाला नाहीं. 'म्हणण्यासारखा' असें बुद्धया लिहिण्याचें कारण असें कीं, ग्रीक लोकांनीं आम्हांस जिंकून आपली सत्ता येथें कायम केली असें जरी उपलब्ध इतिहासावरून म्हणतां येणार नाहीं, तरी त्यांचें आमचें दळणवळण मुळींच होत नव्हतें असें नाहीं. कांहीं लोकांची जिज्ञासा आणि कांहींचा व्यापार यांच्या योगानें या उभय देशांत बरेंच दळणवळण होत असावें, असें मानण्यास हरकत नाहीं. पण या दळणवळणावरून हिंदुस्थानांतील कारागिरी हिंदू लोकांनीं ग्रीक लोकांपासून उचललो असावी, असें अनुमान करण्यास पुरेसा पुरावा मिळत नाहीं. उलट हिंदु व ग्रीक या उभयतांनींहि आपापल्या कारागिरीचीं मूलतत्त्वें आपल्याहून जुन्या अशा तिसऱ्याच आर्यशाखेपासून संपादिलीं असावी, असें मानण्यास बराच आधार आहे. तसेंच हिंदुस्थानांतील कलाकौशल्याचें अनेक पदार्थ ग्रीस देशांत व इतर देशांत जात असून, त्यांची तेथें मोठी तारीफ व अनुकरण होत असे, याबद्दलही बराच पुरावा आहे. तेव्हां कारागिरीच्यासंबंधानें जर ग्रीक लोकांचें सुद्धां आम्ही कांहीं कर्ज लागत

नाहीं, तर त्यांच्या पाठीमागून ज्यांनीं या देशांत बऱ्याच शतकांनीं पाय ठेवला त्या मुसलमानांचें लागतों, असें म्हणणें शुद्ध साहस आहे. शिवाय मुसलमान लोकांनीं आपल्या कसबानें किंवा विद्येनें आमच्या कारागिरींत किंवा विद्येंत प्रचंड क्रांति करून त्यांचा मागमूस नाहींसा करावा, असा त्यांचा अधिकारही नव्हता. मुसलमान लोक आम्हांहून विशेष कडवे, विशेष शूर, विशेष मिजासी, व धर्माभिमानी आहेत, हें क्षणभर कबूल करतां येईल; पण इंग्रज लोकांप्रमाणें ज्ञानांत कलाकौशल्यांत, राजकारणांत किंवा कल्पकतेंत आम्हांहून ते श्रेष्ठ होते, असें म्हणण्यास बिलकूल आधार नाहीं. त्यांनीं येथें पांचसहाशें वर्षें आपली बादशाही चालविली हें कबूल आहे; पण इंग्रजांनीं आपल्या शंभर वर्षांच्या अंमलानें आमच्या अंतर्बाह्य स्थितींत जें जमीनअस्मानाचें अंतर पाडिलें आहे, तें मुसलमानांत सहाशें वर्षांच्या एकछत्री अंमलानें पाडितां आलें नाहीं, हें निर्विवाद आहे. आणि असेंच होणें स्वाभाविक होतें. वर निर्दिष्ट केलेल्या गुणांत आम्हांहून मुसलमान लोक खरोखरच श्रेष्ठ असते तर त्यांच्या सहाशें वर्षांच्या अंमलांत आमच्या घरच्या सुधारणेचा मागमूसही न राहतां आपणहून कमी सुधारलेल्या ज्या ज्या लोकांस त्यांनीं जिंकून पादाक्रांत केले, व ज्या ठिकाणीं त्यांनीं आपली कायमचीं राज्यें स्थापिली त्या ठिकाणच्या जुन्या सुधारणेचा आतां पत्ताही लागत नाहीं. तात्पर्य काय कीं, कोणत्याही कमी सुधारलेल्या लोकांनीं आपणांहून अधिक सुधारलेल्या राष्ट्रास जिंकून तेथे आपली गादी स्थापिली, व अनेक वर्षें त्याचें अव्याहत राज्य केलें, तरी त्याच्या हांतून तेथल्या लोकांच्या वरिष्ठ सुधारणेचा बीमोड होऊं शकत नाहीं, हा जो इतिहासज्ञांनीं नियम काढिला आहे तोच आम्हांसही लागू होतो. याच गोष्टीचा दुसरा प्रयत्न असा आहे कीं, दक्षिण हिंदुस्थानांत म्हणजे कर्नाटक, म्हैसूर वगैरे प्रांतांत मुसलमान लोकांचा स्थाईक अंमल कधींच झाला नाहीं, व पाश्चिम हिंदुस्थानांत तो फार स्वल्पकालीन होता. यामुळें पश्चिम हिंदुस्थानांतिल कलाकौशल्यावर मुसलमानांच्या अंमलाची झांक यत्किंचित् दिसते, पण कर्नाटकांतील व म्हैसूर प्रांतांतील कारागिरीस म्लेंच्छस्पर्श कधींही झाला नाहीं, असें त्या त्या प्रांतांतील कारागिरीच्या आजच्या स्थितीवरून

म्हणणें भाग पडतें. उलट, अहमदाबाद हैद्राबाद, (दक्षिण) अशा थेट मुसलमानी शहरांत सुद्धां आमची कारागिरी मशिदीपर्यंत व जनानखान्या-पर्यंत जाऊन भिडली आहे असें दिसून येईल !

भारतीय कलांचें पुराणत्व–नं. ४ : : २५

गेल्या तीन लेखांत मनुस्मृति, महाभारत व रामायण या तीन ग्रंथांच्या सहाय्यानें भारतीय कला किती जुन्या आहेत हें थोडक्यांत दाखविलें. आज याहूनही एका जुन्या ग्रंथाच्या मदतीनें त्या गोष्टीचें पुष्टीकरण करून, मग थोडासा बाहेरचा पुरावा देण्याचा मानस आहे.

सर्व ग्रंथांत वेद हा अत्यंत पुराणग्रंथ आहे, असें आम्हीं हिंदु लोक म्हणतों इतकेंच नाहीं, तर युरोपांतील अत्यंत शोधक अशा प्रत्येक देशांतील विद्वानांचें तसेंच मत आहे. यासंबंधानें मॅक्स म्यूलरसाहेबांनीं कोठेसें असें म्हटलें आहे कीं, पृथ्वीवरील मनुष्याचा, निदान आर्यशाखेतील मनुष्यांचा आद्य इतिहास दुसऱ्या कोणत्याही पुस्तकांत मिळण्याचा संभव नाहीं. आपल्या मनांतील विचार दुसऱ्यास कळविणें हा भाषेचा मुख्य उपयोग होय. अशा प्रकारची भाषा आर्यशाखेंतील मनुष्यांमध्यें अस्तित्वांत येऊन चिरस्थाई होण्यासारखे जे विचार त्यांनीं छान्दस वृत्तांत प्रथम गोंविले ते वेदांत दृष्टीस पडतात. वेदांतील ऋचा ज्या वेळेस रचल्या गेल्या त्या वेळेस आर्यलोकांस लेखनपद्धती माहीत नसावी, असें अंतर्बाह्य प्रमाणावरून कित्येक पंडित अनुमान करितात. तात्पर्य, मनुष्याच्या बुद्धीचा, विकास होऊं लागला, बाह्य सृष्टीचा चमत्कार त्यांस वाटूं लागला; सूर्यचंद्रादि आकाशस्थ तेजोमय गोलक एका दिशेनें दिसूं लागतात, व कांहीं वेळ आकाशपंथ आक्रमून पुनः नाहींसे होतात; कधींकधीं नभोमंडळ अभ्रांनीं व्याप्त होऊन जिकडेतिकडे पर्जन्यवृष्टि होऊं लागते; पर्वतांच्या बाजूंवरून पाण्याचे

मोठमोठे लोट वाहूं लागतात; विजा चमकतात; गडगडाट होतात; फिरून वृष्टि थांबते; आकाश निरभ्र होतें; गगनस्थ कोट्यवधि लहानमोठे तारकापुंज चमकूं लागतात; प्राणिमात्रांची भीति नाहींशी होऊन ते पुनः जिकडे तिकडे संचार करूं लागतात; नद्यांचें, सरोवरांचें व सागरांचें उदक फिरून स्वच्छ होतें; झाडांस पालवी फुटून तीं टवटवीत दिसूं लागतात; व पुनः कांहीं महिन्यांनीं सृष्टी आपले उग्र स्वरूप धारण करते, असा विलक्षण चमत्कार पाहून कधीं भयानें, कधीं आनंदानें, व कधीं आश्चेनें आणि निराश्चेनें चकित होऊन सृष्टींतील भव्य वस्तूंस प्रबुद्ध प्राणी कल्पणाऱ्या, व त्यांची कोप शांत होऊन त्यांची मर्जी आपणांवर सुप्रसन्न करून घेण्यासाठीं त्यांचा प्रार्थना करणाऱ्या बाल्यावस्थेतील मनुष्यजातीचे वेद हे अव्याज उद्गार होत, ही कल्पना कांहीं वावगी नाहीं. तथापि जडसृष्टींतील चमत्कारांचें इतके कौतुक व आश्चर्य वाटून, त्यांचे ठायी बुद्धिमत्तेची, शक्तिमत्तेची, व मनुष्याला सुखदुःख देण्यास सामर्थ्य असल्याची कल्पना येण्यापूर्वी, व त्यांचें स्तवन करण्याची मनांत स्फूर्ति होऊन ती करतां येऊं लागण्यापूर्वी, बरीच सुधारणा झाली असावी, असें अनुमान करणें अवश्य आहे. इंद्र, चंद्र, वरुण, सूर्य इत्यादिकांस देवता कल्पून "अमक्या देवा, तूं आम्हांस पाऊस दे; तमक्या देवा, तूं आमच्या गाईंचे संरक्षण कर; अमुक देवा तूं आमचा राजा आहेस, तूं आमचा पिता आहेस, तूं आमचा पालक आहेस; तूं चोरास दंड करतोस; तूं मित्रांचे पालन करतोस; तूं लढाईंत मदत करतोस; तूं सज्जनांस मरणोत्तर सद्गति देतोस; तूं औषधींचा स्वामी आहेस; तूं धातूंचा उत्पादक आहेस; तूं मनुष्यास कलाज्ञान देतोस; तुझ्या कृपेनें आमचा व्यवहार व्यवस्थित चालतो"—अशा प्रकारचें स्तव ज्यांनीं केले त्यांना अनेक वस्तूंचे धर्म समजले असावे, व वन्यावस्थेतून पार पडून राज्यधर्म, व समाज या संस्थांची उत्पत्ति व अभिवृद्धि त्यांत बरीच झाली असावी, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. वेदरूप दर्पणांत अशा प्रकारच्या प्रथमावस्थेचें उत्कृष्ट प्रतिबिंब आहे, व जो कोणी इतिहासदृष्टीनें त्यांकडे पाहील त्यास तें सहज स्पष्टपणें दिसण्यासारखें आहे. अशा दृष्टीनें ज्यानें रा. ब. शं. पां. पंडितकृत वेदार्थयत्नाचे कांहीं अंक पाहिले अशा आमच्या एका शोधक व कलाभिज्ञ मित्रानें केलेलें एक टिपण मेहेर-

बानी करून आमच्याकडे पाठवून दिलें आहे. त्यावरून वेदकालींही या भरतखंडांत कलांचा किती प्रसार झाला होता हें सहज दिसून येणार आहे. निदान वेद तरी आम्हीं कोणापासून मागून किंवा चोरून आणिले नाहींत, हें आमच्या दीर्घशत्रूसही कबूल केलें पाहिजे! तसेंच वेदाहून जुना असा दुसरा ग्रंथ जगांत उपलब्ध नाहीं हेंही अजूनपर्यंत निर्विवाद आहे. तेव्हां वेदांत ज्या कलांचा व कारागिरांचा उल्लेख आहे, त्या कला व ते कारागीर तरी आर्यशाखेंत निर्माण झाले असले पाहिजेत, असें प्रत्येक विचारी मनुष्यास कबूल करणें भाग आहे.

वेदार्थयत्न

वस्तूचें नांव.	वे. य पा.	श्लोक.	ऋचा.
पेले	१०४	४	१५
पेले	११२	२	५
भांडीं	११४	५	१५
मातीचीं भांडीं	११६	९	१५
सोनें	१६८	५	२२
	४१८	५	३५
सोन्याचे रथ	३०६	१६	३०
होमाच्या पळ्या	३२२	५	३१
चिलखतें	३३	१५	३१
चिलखतें	८५०	९	५८
वज्र	३४६	१	३२
वज्र	६	३	५१
बाणांचे भाते	७२६	६	९२
धनुष्य	३७२	३	३३
सोन्याच्या खिळा	३७२	४	३३
मोत्यांचे हार	४१६	४	३५
सोन्याचें वज्र	४१६	४	३५

वस्तूचें नांव	वे. य. पा.	श्लोक.	ऋचा.
नांगर	८२४	२	५७
वस्त्रें	४६	१५	२३
चुना	२४८	१	२६
चुना	२७	२।३	४
घुसळण्याची रवी	५	७	२८
नगारा	२७०	४	२८
घागरी	२७६	५	२८
आंस व चाकें	२८	९	२८
मध	३०४	१४।१५	३०
तांबें (कलश)	३९४	२	३४
हातोडा	४०४	८	३४
हत्यारें	४५६	१६	३६
भाले, कुऱ्हाडी	३१	५	६३
	५०६	२	३९
चाबूक	४६८	२	३७
लगाम	४७०	३	३७
कोयता	४९८	१२	३८
सुतार	८४	४	५८
आयुधें	८८०	४	६१
घरें आणि वाडे	८९६	१३	६१
शहरें व किल्ले	५२८	७	४७
फासे (शंखाचे)	४३४	३	४१
ध्वज (निशाण)	५४५	९	४१

वर जी यादी दिली आहे तिवरून वेदकालीं आर्यलोकांना सोनें, रुपें, लोखंड वगैरे धातूंचा उपयोग समजला होता; ते शेतकी करूं लागले होते; गाई, घोडे वगैरे जनावरें माणसाळून त्यांनीं त्यांस आपल्या कामास लाविलें

होतें; धनुष्यबाण, खड्ग, रथ वगैरे जिनसा त्यांस करतां येत होत्या; गरीब व श्रीमंत आपल्या मगदुराप्रमाणें लहानमोठीं घरें बांधून रहात होते; यज्ञ-यागादि क्रिया होऊं लागल्या होत्या; शहरें व किल्ले बांधण्यास आरंभ झाला होता-इत्यादि गोष्टी चांगल्या रीतीनें सिद्ध होतात. तेव्हां सांप्रत कालीं आपल्या देशांत ज्या जुन्या कला दृष्टिस पडत आहेत त्यांचा उगम आर्यशाखेंतील लोकांत वेदाच्या पूर्वी झाला असावा, असें अनुमान होतें. म्हणून भारतीय कलांच्या पुराणत्वास कमींत कमी पांच हजार वर्षें झालीं असावीं, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

आतां याचसंबंधानें बाहेरून जो विपुल पुरावा मिळतो, त्याचा स्वल्प उल्लेख करूं. शके १३० त जन्मलेला ॲप्युलिअस ग्रंथकार 'फ्लारिडा' नांवाच्या ग्रंथांत असें म्हणतो कीं, 'हिंदुस्थानांतून युरोपांत हस्तिदंताच्या राशी, मिऱ्याच्या गोण्या, दालचिनीचे गठ्ठे, आणि सोन्यारुप्याचे डाग येत असत!' पहिल्या शतकांतील 'पेरिप्लस' नांवाच्या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, केप गार्डाफ्यूच्या आसपासचे लोक हिंदुस्थानांतून तांदूळ, तूप, तीळ, साखर, सुटा व विणलेला कापूस, आणि रेशमी कापड आणीत असत. अरबस्थान व तुर्कस्थान यांतील लोक हिंदुस्थानचें केशर, हळद, निळें कापड, शेवरीचा कापूस, मलमल, रेशमी कापड आणि अरबी तऱ्हेचे पेहराव घेऊन जात. इराणांत हिंदुस्थानांतून साग, शिश्वी, शिंगें वगैरेंचें कोरीव सामान जात असे. बार्बरी संस्थानांतील लोक कराचीशीं व्यापार करीत आणि तेथून पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानांतील उत्तम प्रकारचें सुती कापड, नाना प्रकारचे अंबर, स्फटिकादि मौल्यवान् पाषाण, काचेचीं भांडीं, व सोन्या-रुप्याचीं ताटें व तबकें नेत. भडोच आणि मच्छलीपट्टण या ठिकाणीं फार मोठा व्यापार चालत असे. कोणी असें म्हणतात कीं, मुसलमानांनीं मच्छली-पट्टण येथें चिटाचा कारखाना प्रथम सुरूं केला. पण हें म्हणणें बरोबर दिसत नाहीं. कारण, पेरिप्लसमध्येंच असें म्हटलें आहे कीं, ख्रिस्तीशकाच्या पहिल्या शतकांतच मच्छलीपट्टण सुताच्या कारखान्यांत पहिल्या प्रतीचें होऊन बसलें होतें. आणि त्यापूर्वी बरींच वर्षें इराणचें आखात आणि तांबडा समुद्र यांशीं त्याचा कापडाचा व्यापार चालत होता असें दिसतें. तेव्हां जे हिंदु

लोक बाहेरच्या पुराव्यावरून सुद्धां खिस्ती शकाच्या आरंभाच्या सुमारास इतके कलानिपुण होऊन बसले असें सिद्ध होतें त्या हिंदु लोकांत मध्य आशियांतून रानटी मुसलमान लोकांच्या ज्या झुंडी हिंदुस्थानांत आल्या त्यांनीं कोणत्या प्रकारचें कलाज्ञान दिलें असेल हें समजणें अशक्य आहे.

खरोखरीच पाहिलें तर युरोपखंडाशीं हिन्दुस्थानचा व्यापार सुरूं झाल्यास किती वर्षें झालीं याचा बरोबर निर्णय करणें फार कठिण आहे. एका जर्मन शोधकास ट्रॉय येथें एक शिश्वीचें कोरीव लाकूड सांपडलें. विचार करतां तें हिंदुस्थानचें असावें असें त्याचें म्हणणें आहे. म्हणजे खिस्तीशकापूर्वी सुमारें हजार वर्षें आम्ही भूमध्यसमुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील शहरांशीं व्यापार करूं लागलों होतों, असें सिद्ध होतें. क्याल्डिआ प्रांतांतील ऊर येथील जुन्या देवालयाच्या पडक्या मालमसाल्यांत हिंदुस्थानच्या सागाच्या तुळया सांपडल्या आहेत, व त्यासंबंधानें इतकाच प्रश्न निघाला आहे कीं, खिस्ती शकाच्या पूर्वी दोन हजार वर्षें हें देऊळ प्रथम बांधलें गेलें त्या वेळेस त्या (तुळया) हिंदुस्थानांतून नेल्या असाव्या, किंवा खिस्तीशकापूर्वी सहाव्या शतकांत प्रसिद्ध नेबुचाड्नेझर नांवाच्या राजानें त्याचा जो जीर्णोद्धार केला त्याकरितां नेल्या असाव्या. खिस्तीशकाच्यापूर्वी १८ व्या शतकांत इजिप्त देशांत ज्या घराण्यांतील राजे राज्य करीत होतें त्यांच्या थडग्यांत हिंदुस्थानांतील नीळ, कापूर व चिंचेच्या पेट्या सांपडतात ! नोहाचें गलबत हिंदुस्थानच्या सागाचें बांधलें असावें, असें आलेक्झँड्रिआच्या एका जुन्या शोधकाचें म्हणणें आहे. बायबलांत सांगितलेलें ऊस वगैरे जुने पदार्थ हिंदुस्थानांत व ब्रह्मदेशांत उत्पन्न होणारे आहेत. कोंबडा हा खिस्तीशकाच्यापूर्वी ५०० किंवा ६०० वर्षें युरोपांत गेला असावा, असें दिसतें. आमचा मोर ग्रीस देशांत खिस्ती शकापूर्वी ४४० वे वर्षी गेल्याबद्दल बेमालूम पुरावा आहे. सालोमन नांवाच्या राजानें या भव्य व रमणीय पक्षास खिस्तीशकाच्यापूर्वी १००० व्या वर्षी यरूशलेम येथें दक्षिण हिंदुस्थानांतून आणविलेलें असावें असें वाटतें. कारण 'टोक्की' हें त्याचें तामील भाषेंतील मूळचें नांव बराच अपभ्रंश होऊन युरोपांतील निरनिराळ्या देशांत पसरलें आहे, असें मानण्यास पुष्कळ आधार आहे.

पूर्वपश्चिम समुद्रांचें वेष्टण; सह्य, विंध्य, व हिमालय अशा पर्वतांच्या

रांगा; कृष्णा, नर्मदा, सिंधू, भागीरथी, व ब्रम्हपुत्रा अशा नद्यांचें प्रवाह; वसंतग्रीष्मादि ऋतूंची अस्खलित परंपरा; सर्व प्रकारच्या धातूंचें, पाषाणांचें, व वनस्पतींचें अस्तित्व; प्रचंड अरण्यें; विस्तृत व सपाट मैदानें; शीत, उष्ण व समशीतोष्ण हवांचे प्रदेश इत्यादि कारणांनीं कलांच्या उत्पत्तीस व अभिवृद्धीस अत्यंत अनुकूल अशा या भरतखंडांत त्यांचा आरंभ केव्हां झाला, आणि हिंदुस्थानचा इतर देशांशीं व्यापार किती वर्षें सुरूं आहे, याचा निर्णय करणें बऱ्याच अंशीं अशक्य आहे. जितकें मागें जावें तितकें कमीच गेलों असें वाटतें. तात्पर्य, भारतीय कलांच्या उत्पत्तीचा कालनिर्णय कल्पनाबाह्य व शोधातींत आहे असें मानून, ज्या साधनांनीं ही आपली वडिलोपार्जित कमाई आपणांस व इतरांस अत्यंत हितकारक होईल अशांची योजना करावयास लागणें, हेंच आपलें आजमित्तीस मुख्य कर्तव्य आहे, हें ध्यानांत धरणें फार अवश्य आहे. असें आपण केलें नाहीं, तर काळाच्या झपाट्यांतून इतकी सहस्र वर्षें तगून राहिलेल्या आमच्या कलांचा मागमूस नाहींसा होऊन, आपण अन्नास मोताद होऊं, व अखेरीस त्यांच्याप्रमाणेंच आमचीही दशा होईल, हें रात्रंदिवस डोळ्यापुढें ठेऊन जें करणें असेल तें समंजस व सुशिक्षित लोकांनीं करावें.

हा कलंक कसा जाणार ? : : २६

बालविवाहापासून होणाऱ्या अनर्थांत घोडनवऱ्यानें अल्पवयस्क स्वस्त्रीवर केलेल्या जुलमापासून होणाऱ्या दुष्परिणामांचाहि समावेश होतो, अशा प्रकारच्या अमानुष कामवासनेपासून स्त्रीला मृत्यु येणें याहून भयंकर असें काय असेल कोण जाणें ? 'मी तुला सहधर्मचारिणी करीन व संसारयात्रा तुझ्या विचारानें चालवीन' अशी देवब्राम्हणासमक्ष शपथ घेऊन आपल्यावर अनावर कामाच्या होमकुंडांत आपल्या सहधर्मचारिणीची आहुती टाकणारे नराधम

जरी थोडे असले, तरी आमरण तिला छळील असा एखादा व्याधी तिच्या पाठीस लावून देणारें, किंवा प्राण जाईपर्यंत ज्याच्यापासून तिला अहोरात्र पीडा होईल असें एखादें व्यंग तींत उत्पन्न करणारें, भ्रतारूपी राक्षस अनेक असतील यांत संशय नाहीं, बंगाल्यातील हरी मोहन हा या नरपशूंचा एक मासला आहे. वास्तविक पाहतां अशा व्यक्तीला पशू म्हणणें हें बरोबर नाहीं; कारण त्या अप्रबुद्ध प्राण्यांतही अशा अघोर क्रूरतेचा अनाचार घडत नाहीं. हा लज्जास्पद प्रकार आम्हां मनुष्याकरतांच राखून ठेविला आहे. हरी मोहन आपल्या सासुरवाडीस रहात होता; त्याची निजण्याची खोली त्याच्या बायकोच्या खोलीपासून दूर होती. एके दिवशीं मध्यरात्रीच्या सुमारास आपली पुमोनी मोठमोठ्यानें ओरडत आहे, असें वाटून तिची आई घाबऱ्या घाबऱ्या तिच्या खोलींत धांवत गेली, तों निश्चेष्ट पडलेली पुमोनी भिऊन गेलेलें जांवई तिच्या दृष्टीस पडलें ! पुमोनीचें आंथरूण रक्ताने भरून गेलें होतें ! 'जांवईबुवा, हा काय प्रकार आहे ?' असें सासूबाईनें विचारल्यावरून त्यांनीं असें उत्तर दिलें कीं, 'हें मला कांही ठाऊक नाहीं; पण हिचे आरडणें ऐकून मीं आपल्या खोलींतून या खोलींत आलों. आणि पाहतो तों हा प्रकार ! हें कसें झालें असेल तें मला ठाऊक नाहीं, पण दहाव्या वर्षानंतर नवऱ्यानें बायकोकडे जाणें हें बेकायदेशीर होत नाहीं, हें मात्र मला ठाऊक आहे !' अशी या निंद्य प्रकरणाची हकीकत वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली आहे. आजपर्यंत आम्हीं त्याविषयीं उल्लेख केला नाहीं. कारण त्यांतील खरा निराळाच प्रकार असेल, असें आम्हांस वाटत होतें. अजूनही खोटा ठरल्यास हरी मोहनाची क्षमा मागण्यास आम्ही तयार आहों. पण तसें होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. हरी मोहनास देहांत प्रायाश्चित्त न मिळालें तरी बरींच वर्षें काळयापाण्यास जावें लागणार आहे. ईश्वरकृपेनें हरी मोहनाच्या हातून हें अघोर पातक घडलें नसेल तर त्याच्या व आमच्या तोंडास लागणारा हा काळोख चुकणार आहे. हरी मोहनाच्या वयास तिशी उलटून गेली आहे, व त्याच्या परलोकवासी बायकोला फक्त अकरावें वर्ष लागलें होतें या गोष्टी वाचकांनीं ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत ?

ही हृदयभेदक गोष्ट खरी नसो किंवा असो; अशा तोडीच्या गोष्टी या भरतखंडांत कोठें कोठें या बालविवाहामुळें घडत असतील, याविषयीं कोणासही शंका घेतां येणार नाहीं. तेव्हां असल्या गोष्टी कधींही कानीं न येतील अशाबद्दल काय उपाय करावें, हा मुख्य प्रश्न आहे. यासंबंधानें कित्येकांचें असें म्हणणें आहे, कीं, बायकोच्या बारा वर्षांच्या आंत तिच्या नवऱ्यानें जरी तिच्याशीं संभोग केला तरी तो असंमत संभोग मानून त्याला शिक्षा करण्याचा अधिकार असावा. सध्यांच्या पिनल कोडांत दहा वर्षांपुढें विवाहित स्त्रीशीं नवऱ्यानें केलेल्या संभोगास जबरीचा संभोग मानिलेला नाहीं. त्यामुळें कोर्टापुढें असला खटला आला असतां, अशा प्रकारची आगळीक करणाऱ्या नवऱ्यास जबरीच्या संभोगास ठेवलेली शिक्षा देतां येत नाहीं. फार झालें तर दुखापत करणारास सांगितलेली शिक्षा त्यास देतां येते. पण बायकोस दहावें वर्ष लागण्यापूर्वी जो तिच्याशीं संभोग करून तीस दुखापत करील त्यानें तिच्याशीं जबरीचा संभोग केला असें होऊन त्याला त्या अपराध्यास ठेवलेली शिक्षा ठोठावतां येतें. तेव्हां दहाच्या ठिकाणीं बारांची यत्ता घातली असतां कांहीं बरें होणार आहे, असें ही सूचना करणारांचें म्हणणें आहे. हा फेरफार करण्यास आमचा कोणत्याही प्रकारचा अडथळा नाहीं. पण त्यापासून म्हणण्यासारखा फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. मुलगा आणि मुलगी यांचें लग्न होण्यापूर्वी किती वय असावें, अशाविषयीं आमच्या कायद्यांत मुळींच निर्बंध नसल्यामुळें; जरी पांच वर्षांच्या विवाहित मुलीकडे आठ वर्षांचा किंवा अडतीस वर्षांचा तिचा नवरा गेला आणि तें त्याचें करणें उघडकीस आलें नाहीं, तर त्यानें तें कर्म केलेंच नाहीं, असें घेऊन चालावें लागतें. किती वर्षांचा कोण मनुष्य आपल्या बायकोकडे केव्हां जातो. हें पाहण्यास कोणत्याही प्रकारचें पोलिस ठेवतां येणार नाहींत. तें ठेवले तरी त्याला असले गुन्हे पकडतां येणार नाहींत. खुद्द मुलगी, व तिचे आप्त, आणि तिच्या नवऱ्याचे आप्त व मित्र असला गुन्हा आपणाकडून होईल तितकें करून बाहेर पडूं देण्याविषयीं परकाष्ठेची काळजी घेत असतात. कारण तो उघडकीस आल्यानें सर्वांच्याच तोंडाला काळोख लागण्याचा संभव असतो. पण जेव्हां तो फारच अनावर होतो, व त्यापासून कांहीं भयंकर

परिणाम उत्पन्न होतो, तेव्हां तो त्यांच्या इच्छेविरुद्ध बाहेर पडतो, आणि सर्वांस खालीं पाहण्यास लावतो. ज्यानें अशा प्रकारचा केलेला संभोग कोणत्याही कारणामुळें बाहेर पडला, त्या दुखापतीबद्दल शिक्षा होणें किंवा जबरीच्या संभोगाबद्दल शिक्षा होणें यांत विशेष अंतर आहे, किंवा कमी अधिक बेअब्रू आहे असें आम्हांस वाटत नाहीं. समजा कीं, एका मुलीचे बारावें वर्ष फाल्गून वद्य अमावास्येस संपते, व दुसरीस त्याच दिवशीं तेरावें वर्ष लागतें. कायद्याप्रमाणें एकीस 'बारा वर्षांची आणि दुसरीस तेरा वर्षांची' असें म्हटलें पाहिजे. समजा कीं, दोघींच्याही घोडनवऱ्यांनीं दोघींवर बलात्कार केल्यामुळें एकाच प्रकारचा परिणाम घडून येऊन, दोनही खटलें कोर्टापुढें आले. अशा स्थितींत वर सुचविलेला फेरफार पनिल कोडांत केला असल्यास पहिलीच्या नवऱ्यास कायद्याप्रमाणें दुखापतीबद्दल व दुसरीच्यास जबरीच्या संभोगाबद्दल, येवढाच भेद काय तो होणार आहे. पण या भेदामुळें या दोघा कल्पित राक्षसांच्या निर्दयपणांत, कामांधतेंत किंवा बेअब्रूत काय अंतर दाखवितां येईल, हें आम्हांस कळत नाहीं. पाहिजे त्या वयाच्या मुलींचीं लग्नें करण्याची मोकळीक असण्यापासून घडणारें अनर्थ संभोगाच्या कायद्यांत लहानलहान फेरफार केल्यानें टळण्याचा संभव नाहीं. ज्या उल्लूंस हा गुन्हा करावयाचा असतो ते जबरीचा संभोग आणि दुखापत यांतील भेद पाहून तदनुसार वर्तन करणारे नसतात ! जे अत्यंत निंद्य किंवा क्रूर कर्म करण्यास प्रवृत्त होतात ते त्यांना ठेवलेल्या शिक्षांतील अंतर पाहण्यास कधींही थांबत नाहींत ! असें कर्म करतांना ते बेफाम होऊन गेलेले असतात, व त्यांचा मद उतरेतोंपर्यंत ते कामातुर पशूप्रमाणें वागत सुटतात. अशांच्या ताब्यांत स्त्रीच्या रूपानें लहान मुली देण्याचा प्रघात जोंपर्यंत चालू राहील तोंपर्यंत सुधारलेल्या लोकांनीं आमच्या तोंडावर थुंकण्या सारखे किंवा त्यांत शेण घालण्यासारखे असले निंद्य प्रकार घडल्याशिवाय राहणार नाहींत ! आणि विवाहकालाची मर्यादा तर कायद्यानें वाढवून घेण्यास आम्ही तयार नाहीं. तींत परक्या सरकारनें हात घालतां कामा नये. शिक्षणानें लोकांचीं मनें विकसित होऊन, ती जसजसी वाढत जाईल तसतशीच वाढूं दिली पाहिजे. दहा किंवा बारा वर्षांच्या आंत मुलींचीं लग्नें करूं

नयेत, असा कायदा करून घेतला तरी असले अनर्थ कसे टाळतां येणार आहेत ? वरातीहून घरीं आल्याबरोबरच आपल्या बारा वर्षांच्या बायकोशीं एखादा घोडा असें कर्म करण्यास कशावरून प्रवृत्त होणार नाहीं ? पण इतकें तरी कशाला ? स्त्रिया ऋतुस्नात झाल्यावर जरी त्यांचे विवाह होऊं लागले तरी ज्याला असलें कर्म करावयाचें असेल त्याच्या तावडींत कोणी तरी मुलगी सांपडेलच. तेव्हां यासंबंधानें कायद्याचा कांहींएक उपयोग नाहीं, असें या बेकायदेवाल्यांचें म्हणणें आहे. धन्य त्यांच्या अकलेची, कोटिक्रमाची, स्वातंत्र्याभिमानाची आणि कर्तृत्वाची ! ! !

समजत नाहीं तें हें : : २७

तिशी उलटलेला हरी मोहन अत्युत्कट विषयवासनेमुळें बेफाम होऊन पुमनीवर चालून गेला, व ज्याप्रमाणें भुकेनें अत्यंत क्षुब्ध झालेला एखादा क्रूर व्याघ्र कोठें तरी निःशंकपणें फिरत असलेल्या किंवा पडून राहिलेल्या शेळीवर उडी घालून आपल्या तीक्ष्ण दंष्ट्रांनीं तिच्या शरीराचें विदारण करतो आणि आपली क्षुधा भागवितो, त्याप्रमाणें हरी मोहनानें आपल्या कौमारावस्थ धर्मपत्नीशीं राक्षसी आचार करण्यास सुरवात केली; व त्याच्या दुःसह यातना न सहतां आल्यामुळें तिनें फोडलेला हंबरडा ऐकून तिला सोडविण्यास निघालेली तिची आई तिच्यापाशीं येऊन पोहोंचण्यापूर्वीच त्यानें आपल्या भडकलेल्या कामकुंडांत तिची आहुति टाकिली. आणि तिच्या जीविताबरोबरच आपल्या लौकिकाची रांगोळी केली–वगैरे प्रकार ऐकून सदय मनुष्याच्या अंतःकरणांत त्या हतभाग्य कुमारिकेविषयीं करुणा उत्पन्न होणें, आणि हरी मोहनासारखे जे अधम असतील त्यांस फाडून खावें किंवा हालहाल करून मारून टाकावें, असें वाटणें हें फार साहाजिक आहे; तसेंच अशा प्रकारचा पुण्यप्रकोप खवळून गेला असतांही, ज्याच्या वृत्तींतील विचारशीलतेचा निखालस लय होऊं शकत नाहीं, अशांनीं अशा

प्रकारच्या भयानक गोष्टीचा विचार क्षणभर एकीकडे ठेवून असे प्रकार पुनः पुनः न घडूं देण्याबद्दल काय करावें याचा विचारास लागणें हेंहि अत्यंत स्वाभाविक आहे; पण जगाची जी खरी स्थाईक सुधारणा होते, ती विपत्तीच्या दर्शनानें उत्पन्न होणाऱ्या आकस्मिक हृत्क्षोभानें, किंवा त्या विपत्तीच्या निरसनार्थ आवेशाच्या भरांत कांहीं तरी सुचविलेल्या उपायानें होत नसते. विपत्तीचें निर्मूलन करण्याची प्रवृत्ति होण्यास ती पाहून खेद झाला पाहिजे, व त्या खेदाबरोबर ती घालविण्याचा कांहीं तरी उपाय करावा, असें वाटलें पाहिजे. या दोन गोष्टी प्रथम झाल्याखेरीज मनुष्याच्या हातून कोणत्याही प्रचंड विपत्तीचें निर्मूलन होणार नाहीं हें खरें आहे. पण येवढ्या दोन गोष्टी झाल्या म्हणजे तें निर्मूलन होईलच असेंही खात्रीनें सांगतां येत नाहीं. आपण ज्या जगांत राहत आहों तें अनेक प्रकारच्या दारुण विपत्तींनीं ओतप्रोत भरलें आहे, हें खरें आहे, आणि त्या विपत्तींची संख्या थोडी कमी झाल्याखेरीज आमची येथील वस्ती सुखावह होण्याचा संभव नाहीं, हेंहि खरें आहे. पण येवढ्यावरून विपत्ति दृष्टीस पडली कीं, ती नाहींशी करण्यासाठीं प्रथमदर्शनीं जो उपाय सुचेल तो करीत सुटावें, असें सिद्ध होत नाहीं. कधीं कधीं अशा प्रकारच्या उपायांनीं नफा न होतां उलट नुकसान होतें. सगळ्या झाडाला कीड लागून जाऊन तें अगदीं वठून गेलें असलें व त्याचीं फळें आळ्यांनीं भरून जात असलीं तर त्याच्या वरच्या सालीवर किंवा फळावर औषधोपचार करून काय फायदा होणार आहे ? क्षारोदकादि ज्या उपायांची योजना करावयाची असेल त्यांचा परिणाम त्यांच्या अंतर्सालीवर किंवा मुळावर झाला तरच त्यापासून कांहीं फायदा होण्याचा संभव आहे. त्याप्रमाणें हाडापर्यंत जाऊन भिडलेला व्रण त्याच्या तोंडावर चोपडलेल्या तेलांनीं किंवा मलमाच्या पट्ट्यांनीं बरा होण्याची अशा नाहीं; त्याप्रमाणें समाजाच्या हाडापर्यंत जाऊन खिळलेल्या व शेंकडों वर्षें वहात असलेल्या अमंगलाचाररूप व्रणांचें निराकरण भलत्याच प्रकारच्या कायद्यांनीं होण्याचा संभव नाहीं. पुमनीचें हृदयद्रावक वर्तमान ऐकल्यापासून परमपूज्य रघुनाथरावांप्रमाणें आमचें अंतःकरणही कळवळत आहे. असला भयंकर मृत्यु कोणत्याही आर्यकुमारिकेस इतउत्तर न यावा, असें हिंदूप्रमाणें

सुधारकासही नाभिमूलापासून वाटत आहे. पण ज्या उपायांनीं अप्राप्तयौवन कन्यकांवर येणारें हें विघ्न टाळतां येईल असें त्या मद्रपूरस्थ सुधारकाग्रणीस किंवा पत्राग्रणीस वाटत आहे, ते उपाय फारसे फलद्रूप होणार नाहींत, अशी सुधारकास भीति पडली आहे, हें त्याचें मोठें दुर्दैव होय!

मद्रास येथील विवाहपरिषदेचें (Marriage Association) असें म्हणणें आहे कीं, दुर्दैवी वंग-कन्येचें हें खेदजनक उदाहरण लोकांच्या डोळ्यांपुढें आहे तोपर्यंत सर्व सुधारणेच्छू सुशिक्षितांनीं व इतर सदय लोकांनीं सरकारकडे अर्ज करून, 'जो नवरा आपल्या बायकोशीं १४ वर्षांच्या आंत (म्हणजे बायकोस चवदावे वर्ष लागण्यापूर्वी) संभोग करील त्यानें तिच्याशीं जबरीचा संभोग केला असा आरोप त्याच्यावर ठेवून त्याला जबरीच्या संभोगांस सांगितलेली शिक्षा देण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटास येईल, अशा प्रकारचा फेरफार पीनल कोडांत करून घ्यावा.' आमच्या मतें असा अर्ज करण्यांस फार लोक तयार होणार नाहींत. झाले तरी सरकार तो मान्य करून त्याप्रमाणें पीनल कोडाचें कलम फिरवणार नाहीं, व त्यांनीं तें फिरविलें तरी त्यापासून म्हणण्यासारखा फायदा न होतां, बराच त्रास होईल. कसा तो पहा. या देशांतील मुली बहुधा बारापासून चवदा वर्षांपर्यंत ऋतुमती होतात. त्यापुढें अस्नात राहणाऱ्या अशा मुली फार आढळणार नाहींत. मुली ऋतुमती झाल्या कीं त्यांचें गर्भाधान केलेंच पाहिजे, असा प्ररूढ आचार आहे, व शेंकडा नव्याण्णव बाबींत त्याचें परिपालन होत आहे. तिजवराची, बिजवराची, घोडनवऱ्याची तर गोष्ट राहूं द्या. कारण 'माझी प्रिया पातळ नेसून मला भेटेल केव्हां' असें त्यास झालेलें असतें, व ऋतुशांतीचा मुहुर्त, फार तर नाहींच, पण एका आठवड्याच्या लांबणीवर टाकण्याची भीड खुद्द ब्रह्मदेवानें घातली तरी देखील ती मान्य करण्यास तों तयार नसतो! तेव्हां नहाण आल्यावर, पण चवदा वर्षांच्या आंत, अशांनीं स्वस्त्रियांशीं केलेला जो संभोग त्यास तुम्ही आपल्या कायद्यांत 'संमत संभोग' म्हणा, किंवा 'असंमत संभोग' म्हणा, ते म्हणून त्याचा अनुभव घेतल्याशिवाय राहावयाचे नाहींत! प्रबुद्ध कामवासना सुखोपभोगाची उत्कंठा, धर्मबंधन, रूढाचार व लोकमत इत्यादि कारणांनीं

असे लोक एकांत-प्रियादर्शनाविषयीं मोठे आतुर झालेले असतात ! पण ज्या मुलाची अजून शाळा सुटली नाहीं, ज्याला 'अरे' वांचून कोणी बोलत नाहीं, ज्याच्या पाठीमागचा मास्तरचा धाक सुटलेला नाहीं, ज्यांच्या तोंडावर यौवनारंभाचें कोणतेंहि चिन्ह दिसूं लागलें नाहीं, ज्याच्या निद्रेचा विषयचिंतेनें भंग होऊं लागला नाहीं, व ज्याला त्या सुखाचीं खरी गोडी समजण्याचा संभव नाहीं, अशा लुस्कान पोरासदेखील, गर्भाधानाचा सुखसोहळा पाहण्याविषयीं कासावीस झालेल्या आया, सास्वा, नणंदा, भावजया जावा, व इतर स्त्रिया जबरीनें मदनपाशांत बद्ध करून टाकतात, हें आपण नित्य पाहत असून, चवदा वर्षांच्या आंतील संभोगास जबरीचा संभोग म्हणावें, आणि त्या गुन्ह्यास सांगितलेली शिक्षा न्हाणवलीच्या नवऱ्यास देण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटला असावा, अशा अर्थाचे कलम पीनल कोडांत घालून द्या, अशी सरकारास पदर पसरून प्रार्थना करणारे किती हिंदू निघतील कोण जाणें ! जे असें करण्यास तयार होणारे असतील त्यांनीं सरकारकडे तरी जाण्याची काय गरज आहे ? त्यांनीं चवदा वर्षांपर्यंत आपल्या मुलींचीं लग्नेच करूं नयेत, किंवा तसें होणें शक्य नसल्यास तें वर्ष उलटेतोंपर्यंत निदान त्यांना त्यांच्या सासरी तरी पाठवूं नये. पण तेंही न घडल्यास त्या अवधीच्या आंत त्या आपल्या नवऱ्याच्या तावडींत न सांपडतील, अशाविषयीं तरी पक्का बंदोबस्त करावा म्हणजे झालें ! पाहिजे त्या वयांत मुलींची लग्ने करण्याची चाल ज्या देशांत रूढ आहे, व जेथें ऋतुमती झालेल्या स्त्रीचें गर्भाधान करण्याचा धर्माचार व लोकाचार प्रचलित आहे, अशा देशांत चवदा वर्षांच्या आंत नवऱ्यानें ऋतुस्नात स्वस्त्रीशीं केलेल्या संभोगांस जबरीचा संभोग म्हणावें अशी सूचना कोणी केली असतां, ती ऐकून वरच्यासारखा विनोद करण्याची प्रवृत्ति होणें स्वाभाविक नाहीं काय ? पीनल कोडांत असें कलम घातल्यास तें केवळ 'मृताक्षर' होऊन बसणार नाहीं असें जें कित्येक लोक मनांतल्या मनांत म्हणत आहेत तें आमचें ध्यानांत केव्हांच येऊन चुकले आहे ! ज्या मुली तेराव्या वर्षीं ऋतुमती होऊन चवदाव्या वर्षीं गर्भवती किंवा अपत्यवती होतील त्यांच्या नवऱ्यांवर जबरीच्या संभोगाचें खटले करण्यास त्यांचीं अपत्यें बेमालूम पुरावा होतील यांत शंका नाहीं ! माझ अशा प्रकारचें

खटले करण्याचें श्रेय पोलिसानें आपल्या शिरावर घेण्यास तयार झालें पाहिजे; कारण, नुकत्याच अपत्यवती झालेल्या किंवा होण्याचीं चिन्हें दिसूं लागलेल्या मुलींच्या किंवा सुनांच्या नवऱ्यांवर जबरीच्या संभोगाच्या फिर्यादी लावणारे मुलींच्या सासरचे किंवा माहेरचे आप्त उत्सुक असतील, असें आम्हांस वाटत नाहीं. तेव्हां तो बोजा सर्व प्रकारें लोकांच्या नीतीचें व कायद्यांचें संरक्षण करण्यास नेमिलेल्या पोलिसाच्या डोक्यावर येऊन पडणार आहे, व तो उचलतांना भल्या गृहस्थांची अब्रू घेण्याची किंवा बेकायदेशीरपणें दोन पैसे मिळविण्याची त्यांस चांगली सवड होणार आहे! ही सत्यवती आणि अपत्यवती मुलींची आणि त्यांच्या नवऱ्यांची गोष्ट झाली. यांच्या संबंधानें न लपविण्यासारखा पुरावा पोलिसाच्या हातीं येण्याचा संभव असल्यामुळें, असलीं दंपत्यें कोर्टापुढें खेंचून आणून त्यांपैकीं गुन्हेगारांस शिक्षा ठोठावतां येणार आहे, हें कबूल आहे. पण चवदाव्या वर्षापर्यंत, नहाण आलें नसून किंवा तें आल्यावर, जे कच्चे किंवा पक्के युवे आपापल्या स्त्रियांशीं बिनबोभाट समागम करीत असतील त्यांचा समाचार हें पोलिस कसा घेणार? नवरा केवढाही असला तरी नहाण आल्यावर पूमनीसारख्या त्याच्या स्त्रीचा परिणाम होण्याचा संभव नाहीं, व तो तितक्या विकोपास गेला नाहीं तर तो बाहेर येण्याचाही संभव नाहीं; व तो बाहेर आला नाहीं, म्हणजे पोलिसाच्या हातून कांहींएक होणार नाहीं! पूमनीच्या प्रकारासारखा प्रकार उघडकीस आला म्हणजे संताप येणें व कांहीं निर्बंध करावा, असें वाटणें वाजवी आहे. पण तो करण्यापूर्वी त्याचा उपयोग कितपत होणार आहे, हें शांतपणें पाहिलें पाहिजे. आपलें "फूल नाहीं तर फुलाची पाकळी" या न्यायानें, विवाहकाल तर वाढवितां येतच नाहीं तेव्हां जबरीच्या संभोगाची घालवेल तितकी दहशत घालून जेवढा फायदा होईल तितक्यांतच समाधान मानून घ्यावयाचें असेल तर मग आमचें कांहीं एक म्हणणें नाहीं. "माझ्या बायकोच्या वयास चवदावें वर्ष लागलें नसून मी तिच्याकडे जाण्यास निघालों आहें, पण जर करतां माझी वासना मला आयत्या वेळीं अनावर होऊन माझ्या हातून दुखापतीचा प्रकार घडला व तो

बाहेर आला, तर मला दुखापत केल्याबद्दल शिक्षा न होतां, जबरीचा संभोग केल्याबद्दल शिक्षा होऊन, माझी सर्व जगभर बेअब्रु होणार आहे; तेव्हां तें चवदावें वर्ष लागेतोंपर्यंत त्या वाटेलाच जाऊं नये, हा उत्तम मार्ग," असा विचार करून जे अशा कर्मापासून पराङ्मुख होतील, ते या आमच्या पीनल कोडांतील कलमाच्या भीतीनें तर झालें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण तुमच्या त्या कलमाचा असा परिणाम कोटींतून एकावर तरी होईल किंवा नाहीं, याचा संशय आहे! अशा कलमानें कोटि मुलींतून फार झालें तर, एका मुलच्याच अब्रूचा व जीविताचा बचाव होणार आहे, यासाठीं तें कलम पीनल कोडांत घालूं नये असें आमचें म्हणणें नाहीं. खुशाल घालावें. पण त्यापासून किती उपयोग होणार आहे, हें नीट ध्यानांत आणून घालावें. म्हणजे तें घातलें गेल्यास आपण मोठी फुशारकी मिरवण्याजोगी किंवा कृतकृत्यता मानण्याजोगी सुधारणा केली, असा वृत्तींत गर्व उत्पन्न होणार नाहीं, व पुढें अजून विपत्तीचा पर्वत आहे, असें ध्यानांत वागेल. वारंवार हेात काय असतें कीं, जी सुधारणा आपण हातीं घेतलेली असते, किंवा जिचें आपणांस मोठें महत्त्व वाटत असतें, ती घडून आली असतां बहुतेक विपत्ती नाहींशी होईल असा आपणांस भ्रम होत असतो; व तसेंच यासंबंधानेंही होण्याचा फार संभव आहे. तसें न व्हावें म्हणून पुनरुक्तीच्या दोषास न भितां, आम्ही आणखी एक वेळ असा प्रश्न विचारतों कीं, वर निर्दिष्ट केलेला फेरफार पीनल कोडांत करून टाकला असें मानिलें, तरी आजमितीस जे लहान किंवा थोर नवरे आपापल्या चवदा वर्षांच्या आंतल्या, नहाण आलेल्या किंवा न आलेल्या बायकांकडे बिनबोभाट जात आहेत, जे पूर्वी गेले व आपल्या मूर्खपणाचा परिणाम करून चुकले, व जे येथून पुढें गुपचूपपणानें जातील, त्यांचा बंदोबस्त कसा करावयाचा? त्यांना अतींद्रिय ज्ञान आहे असे पोलिस पैदा झाल्याशिवाय, अशा प्रकारचें अपायकारक पण बिनबोभाट संभोग-जबरीचे संभोग-बंद करतां येणार नाहींत, किंवा कोर्टापुढें आणतां येणार नाहींत. अशा प्रकारचे संभोग प्रतिदिवशीं हजारों होत आहेत, हें कोणत्याही सत्यशील हिंदूस नाहीं म्हणतां येणार नाहीं. तेव्हां जर ते बंद व्हावें अशी खरोखर इच्छा असेल, तर या जबरीच्या संभोगाच्या सुधारलेल्या कल-

मावर फारसा भरंवसा ठेवण्यांत अर्थ नाहीं. ते बंद करण्यास निदान आम्हांस एकच उपाय दिसतो तो हा कीं, **विवाहाकालाची मर्यादा वाढविणें. ही पाहिजे तितकी** वाढविण्यास आम्ही पाहिजे तसला कायदा करून घेण्यास तयार आहों, व ही वाढविल्यानें आमच्या अनेक रोगांस उतार पडणार आहे अशी आमची खात्री आहे! मुली बापाच्या घरीं लग्नाआधीं बरीच वर्षें राहिल्या, तर ममतेनें त्यांना शिक्षण देण्यास पुष्कळ अवधी सांपडेल; प्रपंचाचें लगडें त्यांच्या पाठीमागें अल्पवयांत न लागल्यामुळें त्यांची वाढ चांगली होऊन पुढें त्यांचीं मुलें सुदृढ निपजतील, प्रपंचाचा भार त्यांस सहज वाहतां येईल; पुष्कळांच्या कपाळचें वैधव्य टळेल, स्वयंवरपद्धति, गांधर्वविवाह किंवा स्वाभिमतविवाह यांचा प्रघात हळूं हळूं पडूं लागेल; पुरुषांस साहसाचीं कामें करण्यास उमेद राहील; संतति अधिकाधिक कार्यक्षम निपजत जाईल; सर्वत्र उद्योग, उत्साह यांची वृद्धि होईल-सारांश, ज्या कारणांनीं ऐहिक संसारयात्रा सुखावह होते त्यांपैकीं बरींच कारणें या मंदभाग्य देशांत दिसूं लागतील! पण हें सारें व्हावें कसें? पनिल कोडांतील जबरीच्या संभोगाच्या कलमांत फरक केल्यानें खचित नाहीं. केव्हांना केव्हां तरी मुलींचीं लग्नें चवदापंधराव्या पुढें होऊं लागलीं पाहिजेत. हें होण्यास्तव आम्हीं धर्मबंधनांकडे दुर्लक्ष करण्यास, किंवा त्यांनीं आम्हांस आपल्या पोटांत घेण्यास, तयार झालें पाहिजे! हें घडवून आणण्यास साम आणि संग्राम असे दोन उपाय आहेत. सामानें हेतु सिद्ध होणार असेल तर वर्दळीस येण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सामाच्या बाजूनें प्रयत्न करण्यास आरंभ करणें म्हणजे निदान दहा वर्षांच्या आंत मुलींचीं आणि सोळा वर्षांच्या आंत मुलांचीं लग्नें करण्याविषयीं कायद्याचा प्रतिबंध करून घेणें, व या शेवटच्या पायरीवरून पुढें निभेल त्या रीतीनें चढत जाणें, असें जें राजे **सर. टी. माधवराव** यांचें म्हणणें आहे तें आम्हांस प्रशस्त वाटतें. एवढेंही करण्यास जे तयार नसतील ते कपटी समाजाहितचिंतक किंवा मिथ्या सुधारक होत!

आमच्या स्त्रियांचा पेहराव : : २८

विशेष बदल न होतां ज्या अनेक गोष्टी आमच्या लोकांत पुरातन कालापासून चालत आल्या आहेत त्यांतच आमच्या स्त्रियांच्या पेहरावाची गणना करतां येईल, असें वाटतें. पूर्वीच्या ऋषिपत्न्या ज्या प्रकारचीं पातळें किंवा वल्कलें वापरीत असत, त्याच प्रकारचीं पातळें किंवा लुगडीं वानप्रस्थाश्रमाचें आचरण करणाऱ्या आमच्या गतभर्तृका वापरीत आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. देशपरत्वें व जातिपरत्वें येथील स्त्रियांच्या पोषाखांत थोडाबहुत फरक आहे, हें प्रत्येकास कबूल केलें पाहिजे. पण कोणत्याही विवक्षित प्रांतांतील किंवा जातींतील स्त्रियांच्या वस्त्रांचा इतिहास पाहिला तर त्यांत विशेष अंतर पडलें आहे, असें दाखविणें फार कठिण होईल.

पोषाखांत वस्त्रें आणि अलंकार या दोहोंचा समावेश होतो. प्रस्तुत निबंधांत स्त्रियांच्या फक्त वस्त्रांचा विचार करण्याचा इरादा आहे.

या निबंधाच्या मथळ्यावरील शब्द वाचूनच कित्येकांचें पित्त खवळून जाईल, हें आम्हांस पक्कें ठाऊक आहे. पण आम्हांस त्याची भीति कशाला पाहिजे ? सुलतानी किंवा मोगलाई अंमल असता, आणि पथ्यकारक पण अप्रिय भाषण करणारास दंड होत असता, तर अशा प्रकारचें लेख लिहिण्यांत किती धाडस करावें, हा विचारणीय प्रश्न झाला असता. पण सांप्रतकालच्या उदार व सुधारलेल्या राज्यांत मतस्वातंत्र्याचा अलोकिक उपभोग आम्हांस मिळत असल्यामुळें, ज्यांनीं सुधारक हें नांव धारण केलें आहे त्यांनीं लोकापवादभयानें लोकांच्या आचरणांतील दोष न दाखविणें, व सुधारणेचे नवीन मार्ग न सुचविणें, हें मित्रेपणाचें काम होय. रूढ गोष्टींच्या चांगलेवाईटपणाचा यत्किंचित् विचार न करतां, त्या रूढ आहेत, येवढ्या साठींच त्यांचें मंडन करणें, आणि नवीन सुधारणा नवीन आहेत, येवढ्यासाठींच त्या सुचविणारांवर तुटून पडणें, हें अविचारीपणाचें कृत्य कोणत्या देशांतील असमंजस व हट्टी लोकांच्या हातून घडत नाहीं ? फेर म्हणून कोणत्याही गोष्टींत फेर करावा, असें आमचें म्हणणें नाहीं. पण जर कोणत्याही

फेरापासून अधिक सुख होण्याचा संभव असेल, तर त्याच्या आड येणें यासारखें वेडेपण नाहीं. आज कित्येक वर्षें अव्याहत चालत आलेल्या आमच्या स्त्रियांच्या पोषाखांत म्हणण्यासारखें दोषस्थल नाहीं, व असले तरी तें काढून टाकण्यासारखें नाहीं असें जर कोणी समाधानकारक रीतीनें सिद्ध करून देईल तर आम्ही यासंबंधानें जें लिहिणार आहो, तें आनंदानें परत घेऊं. पण तसें न झाल्यास आम्ही ज्या सुधारणा सुचविणार आहों, त्या हळूं हळूं अमलांत आणण्याचा विचार लोकांनीं अवश्य केला पाहिजे.

प्रथम, स्त्रियांप्रमाणें पुरुषांचा पोषाख कायम राहिला नाहीं, हें अगोदर लक्षांत आणिलें पाहिजे. उद्योगाच्या, पदवीच्या व राजकर्त्यांच्या सोयीप्रमाणें पुरुषांच्या पेहरावांत फरक झाले आहेत, व होत आहेत. आंगरखा आमचा नव्हे, मुसलमानांचा आहे, हें उघड आहे. तसेंच रामायणांतील किंवा महाभारतांतिल योद्धे तुमान घालीत होते किंवा नाहीं, याची शंका आहे ! श्रुतिस्मृतिकालांत किंवा पुराणकालांत निरनिराळ्या वर्गांतील स्त्री-पुरुषें कोणत्या प्रकारचीं वस्त्रें परिधान करीत होतीं व कोणत्या प्रकारच्या भूषणांनीं आपलीं शरीरें नटवीत होतीं, हें जर कोणी पुराणविद्याविद् साधार दाखवूत देतील, तर त्यांनीं एक मोठी उपयुक्त कामगिरी बजावली असें खचित होणार आहे. पण जोंपर्यंत तशा प्रकारचा लेखक पुढें आला नाहीं तोंपर्यंत बहुतेक भरंवसा अनुमानांवरच ठेवणें भाग आहे; व हीं अनुमानें बहुशः खोटीं ठरण्याचा संभव नाहीं. कारण आमचा नाइलाज झाल्याखेरीज कोणत्याही गोष्टींत आपण होऊन फेरबदल करणारे आम्ही लोक नाहींत. हिंदुस्थानच्या सभोवतीं उल्लंघन न करण्यासारखा खंदक किंवा भिंती असत्या, आणि दुसऱ्या कोणत्याही लोकांचा आणि आमचा संबंध न घडता, तर वेदकालापासून आतांपर्यंत व आतांपासून कालांतापर्यंत आम्ही जसेच्या तसेच असतों, यांत काडीयेवढा संशय नाहीं. कारण, विचारशक्ति असून विचारशक्ति नसलेल्या व केवळ उपजत बुद्धीच्या धोरणानें आचरण करणाऱ्या मनुष्येतर प्राण्यांप्रमाणें आमची वृत्ति आहे. आमच्या वस्त्रप्रावरणांत किंवा आचारविचारांत मधून मधून जे कांहीं फरक झाले आहेत, ते दुसऱ्या लोकांचें आमच्याशीं संघट्टन झाल्यामुळें झाले आहेत; व सध्यां जे होत आहेत तेही त्याच

कारणामुळें होत आहेत. आम्ही म्हणजे अमुक एक गोष्ट चांगली नाहीं, असें आपण होऊन ठरवून ती रद्द केली आहे, आणि तिच्या जागीं दुसरी कोणती तरी करूं लागलों आहों, असें सहसा आढळणार नाहीं; असो.

स्त्रियांच्या पेहरावाचा विचार करतांना उपयुक्तता आणि दर्शनता हे दोन गुण डोळ्यांपुढें ठेविले पाहिजेत. तसें न केलें तर त्यावरील टीकेंत अनेक प्रमाद होणार आहेत. उपयुक्ततेच्या दृष्टीनें पाहतां निरनिराळ्या धंद्यांतील स्त्रियांचे पोषाख निरनिराळ्या तऱ्हांचे पाहिजे आहेत, हें उघड आहे. पण ही गोष्ट आजपर्यंत कोणाच्याही लक्षांत आली नाहीं, असें वाटतें. भंगीण, सुतारीण, कासारीण, परटीण, शेतकरीण, स्वयंपाकीण, दळपीण, कांडपीण, गौळण, कुंभारीण, भटीण—सारांश, ईणप्रत्ययांत पाहिजे ती धंदेवालीण घ्या, 'लुगडेंचोळी' हा साऱ्यांचा, साऱ्या ऋतूंतला, व सार्वकालिक पोषाख! यांत कोणी अल्पस्वल्प फेरफार करतात, पण त्यास फेरफार म्हणावें कीं काय, हें आम्हांस समजत नाहीं. कित्येक प्रांतांतील खालच्या प्रतीच्या बायका चोळ्या मुळींच घालीत नाहींत, हा एक फेरफार आहे! तसेंच कित्येक प्रांतांतील कुणब्यांच्या बायका कासोटा मुळींच घालीत नाहींत, हा दुसरा एक फेरफार आहे! पण या किंवा अशा प्रकरच्या इतर फेरफारांस फेरफार म्हणणें म्हणजे मिठांत तिखट व तिखटांत मीठ घातल्यानें नवीन तोंडीं लावणें झालें, असें म्हणण्यासारखें होय! पोषाख असा असावा कीं, जो घातला असतां कोणतेंही काम करतांना हस्त-पादादि अवयवांचे चलनादि व्यापार सहज होऊन, शरीरास कोणत्याही प्रकारचें कष्ट होऊं नयेत, किंवा त्यांत वैरूप्यता दिसूं नये. जो पोषाख क्षणोक्षणीं सावरला नाहीं तर ज्यापासून हातीं घेतलेल्या कामास वारंवार हरकत होणार किंवा शरीर उघडें पडणार, असा पोषाख काय कामाचा? स्त्रीची मान आणि कंबर यांमधील मागला पुढला भाग नीटपणें झांकला जाऊन, कोंपरापासून त्यांचे दोनही हात पाहिजे तें काम करण्यास हवे तिकडे फिरवितां येण्यासारखे असावे, या गोष्टीस बहुधा कोणीही 'ना' म्हणणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. हें जर खरें असेल तर आम्ही आपल्या वाचकांस व इतरांस त्यांच्या गळ्याची शपथ घालून असें विचारतों कीं, हात सव्वाहात खणाची

चोळी आणि डाव्या खांद्यावर उजव्या खांद्यावर अथवा उजव्या खांद्यावरून डाव्या खांद्यावरून घेतलेल्या पदरानें हें काम होण्यासारखें आहे काय ? आपल्या बायकांचा पदर सांवरण्यांत किती वेळ जातो, व तो वरचेवर अंगावरून सरत असल्यामुळें त्यांना किती त्रास पडतो, हें ज्यांच्या पाहण्यांत आलें असेल, त्यांच्यानें वरील प्रश्नास 'हो' म्हणवणार नाहीं असा आमचा समज आहे. ही, चोळीलुगडें वापरण्याचाच ज्यांना अधिकार आहे, अशा सभर्तृकांची गोष्ट झाली. पण आमच्या गतभर्तृकांची स्थिति याहूनही विशेष शोचनीय आहे. त्यांच्या पदराला चोळीचेंसुद्धां पाठबळ नाहीं ! त्यानें दगा दिला कीं, त्या उघड्या पडल्याच ! शिवाय, गतभर्तृकांच्या पदरास त्यांचें डोकें झांकून ठेवण्याचें आणखी एक फाजील काम असतें ! यासंबंधानें या हतभाग्य स्त्रिया एकसारख्या कांचणींत असतात, असें म्हटलें तरी चालेल. आपल्या अंगाचा पाहिजे तो भाग उघडा पडला तरी हरकत नाहीं, पण आपलें डोकें उघडे पडतां कामा नये; कारण तें उघडे पडले असतां आपल्या लळकांचा निर्दयपणा व आपल्या धर्माचा अधर्मीपणा उघडा पडेल, अशी भीति त्यांच्या मनांत सर्वकाळ वागत असतें. यामुळें अडचणीच्या वेळीं अशा स्त्रियांच्या पाठी दिसतात. पण डोकीं कधींही दिसत नाहींत. यासंबंधानें परवां आम्ही एका मित्राशीं बोलत असतां, त्याचें असें म्हणणें पडलें कीं, गतभर्तृकांच्या केशकलापावर न्हाव्याची लोखंडी फणी चालूं न देण्याचें सामर्थ्य आम्हांस येईल तेव्हां येवो, पण तें येईतोंपर्यंत त्यांनीं तेवढ्या चोळ्या घालूं देण्याचा प्रघात जरी पडला तरी देखील त्यांची पुष्कळ दैना वांचणार आहे.

आतां कोणी असें म्हणतील कीं, लुगड्याचा पदर उरःस्थलावर मोकळा खेळूं दिल्यानें त्यास ज्या सुरकुत्या पडतात, त्यामुळें युरोपियन स्त्रियांच्या वक्षःस्थलाप्रमाणें आमच्या स्त्रियांचीं वक्षःस्थलें उठून दिसत नाहींत, आणि हा या ढिल्या पदरापासून होणारा एक मोठा फायदा आहे; तसेंच, ज्या वेळेस स्त्रियांना आपले दोनही हात विशेष रीतीनें अव्याप्रत ठेवण्याची गरज असते, त्या वेळेस त्या आपले पदर एका खांद्यांवरून मागें नेऊन दुसऱ्या हाताखालून पुढें आणतात, आणि डाव्या बाजूस त्यांचें शेवट घट्ट खोंचून ठेवतात. यावर आमचें असें म्हणणें आहे कीं, कोणत्याही कारणानें स्त्रियांचीं

वक्षःस्थलें उठुन दिसणें हा आमच्यांत मर्यादेचा गौण प्रकार मानिला असतां तर कांडतांना, न्हाऊ घालतांना, मोठमोठ्या मेजवान्यांत वाढतांना, किंवा अशाच प्रकारच्या इतर प्रसंगीं आमच्या स्त्रियांची जी नीटनेटकी व ठाकठीक आकृति दिसते, ती आम्हांस कधींच रुचली नसती! तसेंच, मोठमोठ्या भारतीय कवींनीं आर्यमहिलांच्या उरोजविस्तारांची केलेलीं असंख्य वर्णनें आम्हीं मिटक्या मारीत कधींच वाचलीं नसतीं! तेव्हां या बाबतींत युरोपिअन लोकांत व आम्हांत रुच्यंतर नाहीं, हें उघड आहे. तथापि, स्त्रियांचें हे प्रांत अस्पष्ट असणें हेंच उत्कृष्ट शिष्टसंप्रदायास उचित आहे, असें मानिलें, तरी पदराच्या सुरकुत्यांचें घसरतें 'हाफजाकिट' बनविण्यापेक्षां, चोळी न घालतां किंवा घरच्या घरीं तयार केलेलें प्रत्यक्ष हाफजाकिट घालण्यास काय हरकत आहे? ही हाफजाकिटें दोन प्रकारचीं असावीं. एक काम करताना घालण्याचीं; व दुसरीं बाहेर जातांना घालण्याचीं. बाहेर जातांना घालावयाच्या जाकिटांच्या अस्तन्या बऱ्याच लांब असाव्या, आणि त्यांचा रंग बहुधा लुगड्यांच्या रंगासारखा असून, त्यांची शेवटें लुगड्यावर पडावीं. पण यासंबंधानें कदाचित् मतभेद होण्याचा संभव आहे! जाकिटें घालण्याचा प्रघात पडल्यावर, पदर काढण्याची मुळींच गरज पडणार नाहीं, व त्यां मानानें लुगड्यांची लांबी कमी केली तरी हरकत नाहीं. लुगड्यांच्या पदरांवरील नकशीचें काम कमरेसभोंवतीं खुलेल अशा रीतीनें दाखवितां येणार आहे. खोटा देशाभिमान एकीकडे ठेवून चोळीपदरांच्या जागीं, किंवा चोळीच्या वरती हीं जाकिटें घालण्याची पद्धत पाडिली असतां अनेक फायदे होणार आहेत. पदर सांवरण्याचें काम वारंवार हातांनीं न करावें लागल्यामुळें, ते मोकळे राहून स्त्रियांच्या अंगीं कार्यक्षमता अधिक येईल; कमरेवरील त्यांचा कोणताही भाग उघडा पडण्याची भीति राहणार नाहीं; थंडीच्या दिवसांत चौघडीचें अवजड पांघरूण घेण्यापेक्षां, फलाणीची बंडी घातल्यानें पाठीच्या व पोटाच्या हाडांतील ऊब सहज राखतां येणार आहे. लुगड्याच्या पदरापेक्षां जाकिटावर हरतऱ्हेच्या नकशीचें काम करून तें सुलभ रीतीनें दाखवितां येणार आहे. पण या सर्वांहून मोठा फायदा हा आहे कीं, बायकांच्या गळ्यांतले एकूण एक दागिने पटवेकऱ्यांच्या कसबासकट मांगे-

पुढें सबंध दाखवितां येऊन, दुसऱ्यांनीं आपणांस श्रीमंत म्हणावें, आणि आपलें स्वरूप खुलून दिसावें, हा जो दागिने घालण्याचा मुख्य उद्देश तो पूर्णपणें सफल होईल ! सध्यांच्या पदरामुळें आमच्या बायकांच्या गळ्यांतील दागिन्यांचा जेवढा भाग उजवा खांदा आणि मान यांच्या दरम्यान दिसतो, तेवढ्यांतच आम्हांस आपलें समाधान करून घ्यावें लागतें ! पण यापुढें जाकिटें घालण्याचा प्रचार पडल्यास, टिका, ठुशा, सरी, पुतळ्यांच्या माळा, कंठा, तन्मणी, पेट्या, चंद्रहार वगैरे अलंकारांनीं आमच्या प्रियकरणींचीं वक्षःस्थलें मंडित होऊन, आतांपेक्षां शेंकडोंपट आल्हादजनक होतील, यांत काय संशय आहे ? तसेंच खुद्द जाकिटेंही तापट्याची, मखमलीचीं किंवा अशाच एखाद्या उंची कपड्याचीं करून, त्याच्या अस्तन्यांवर व पुढील भागावर जरीच्या किंवा रेशमाच्या वेलबुट्टीचें कारागिरीचें काम केलें तर त्यानें दागिन्यांची शोभा दुणावेल, किंवा त्यांच्या अभावीं तेंच काम अत्यंत शोभादायक होईल ! बोलून चालून नटण्याचें काम सर्व लोकांनीं स्त्रियांकडे सोंपविलें आहे. तेव्हां जोपर्यंत हें त्यांना व आम्हांस संमत असेल तोपर्यंत त्यांचें लावण्य जितक्या थोड्या खर्चांत, त्यांना जितकें अधिक सुखावह व आमच्या दृष्टीस जितकें अधिक रमणीय होईल, तितकें करणें हेंच आमच्या प्रबुद्धत्वास उचित आहे. यावरून असें कोणीं समजूं नये कीं, मडमांचा पोषाख आम्हांस मान्य आहे, व त्याचें अनुकरण, आमच्या स्त्रियांनीं करावें असें आम्हीं सुचवीत आहों. मडमांच्या पेहरावाचा बराच भाग, विशेषतः त्यांचा झगा आम्हांस बिलकुल पसंत नाहीं. तथापि त्यासंबंधानें व आमच्या स्त्रियांच्या पोषाखाच्या इतर भागांच्या संबंधानें आजच लिहिण्याचे प्रयोजन नाहीं.

---

*

आमच्या स्त्रियांचा पेहराव-नं. २ : : २९

मागल्या लेखांत आमच्या स्त्रियांच्या पदराविषयीं चर्चा करून तो आम्हीं नापसंत ठरविला आहे, व त्याचे जागीं जाकिट घालण्याचा प्रघात पडेल तर फार बरे होईल, अशी इच्छा प्रदर्शित केली आहे, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. आंतां आमच्या स्त्रियांच्या पोषाखाच्या इतर भागांविषयीं विचार करून, सवड असल्यास दागिन्यांचाही थोडा विचार करावयाचा, असा इरादा आहे.

पदर लुगड्याचा काढतात; तेव्हां पदरानंतर स्वाभाविकपणें लुगड्याचा विचार करणें जरूर आहे. हें आमचें लुगडे आम्हांस पूर्ण संमत आहे. याच्या जागीं लहंगा, परकर, झगा किंवा दुसरें कोणतेहि अधोवस्त्र वापरण्याचा प्रघात पडावा, असें आम्हांस वाटत नाहीं. हें आमचें लुगडे दिसण्यास व शोभेस जितकें चांगलें असावें तितकें आहे. शिवाय, त्यापासून दुसरा असा एक फायदा आहे कीं, हें नेसण्यास मुळींच पंचाईत पडत नाहीं. एक लुगडे सोडून दुसरें लुगडे नेसणें ही गोष्ट आमच्या स्त्रियांस शरीराचा कोणताही भाग उघडा पडूं न देतां पाहिजे तेथें करतां येण्यासारखी आहे. झग्याची व इतर अधोवस्त्रांचीं तशी गोष्ट नाहीं. तसलीं वस्त्रें वापरण्यास स्त्रियांना एकांतस्थळीं जावें लागतें. झगे वापरणाऱ्या स्त्रियांस आमच्या स्त्रियांप्रमाणें नदीच्या कांठीं, लग्नमंडपांत, किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं स्त्रीपुरुषांच्या समक्ष वस्त्रांतर करतां येत नाहीं. कोणताही पोषाख असा असावा कीं, तो वापरणाराच्या ताब्यांत असावा; वापरणाराला त्याचे गुलामपण काढण्यास न लागावें या दृष्टीनें युरोपियन स्त्रियांच्या झग्याहून गैरसोयीचें वस्त्र शोधून काढूं म्हटल्यास सांपडावयाचें नाहीं. आमच्या कलावंतिणींचें झगे किंवा मारवाडणींचें लहंगे याच धर्तीचे आहेत; पण ते त्यापेक्षां पुष्कळ बरे. युरोपीय स्त्रियांच्या झग्यांस फाजील कापड लागून, हिंडण्याफिरण्यास त्यांना मोठा त्रास पडतो. थोडेंसें झपाट्यानें चालावयाचें म्हटलें, किंवा ज्या जमिनीवरून चालावयाचें ती साफ नसली कीं, हे झगे एका हातानें किंवा दोन हातांनीं वर सांवरून

धरावे लागतात ! जों जों श्रीमंती अधिक तों तों या झग्यांचा विस्तार मोठा ! साऱ्या मडमा आपापले झगे वर उचलून न धरतां जमिनीवर पडूं देतील, तर घरांत व रस्त्यांवर केरसुण्याचें काम फारसें पडणार नाहीं. ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील बहुतेक खेड्यांतल्या भंग्याचें काम कुत्रीं करतात, त्याप्रमाणें युरोपखंडांतल्या झाडूंचें काम या झग्यांच्या फरपटण्यानें होऊं लागेल ! शिवाय, एक झगेवाली स्त्री यथास्थितपणें बसावयाचीं म्हणजे तिला किती तरी जागा लागते ! पुरुष हा उद्धट प्राणी आहे. तेव्हां त्याला होईल तितक्या दूर अंतरावर ठेवावें, अशा बुद्धीनें तर पाश्चिमात्य स्त्रियांनीं या लहानशा कापडी कोटांत आपणांस कोंडून घेण्याचा प्रघात पाडला नसेल ना ? एकंदरींत स्त्रियांनीं इतकी जागा आडवावी, हें आम्हांस बरें दिसत नाहीं. परंतु युरोपियन लोक आम्हांहून स्त्रियांस विशेष मान देणारे व भजणारे आहेत; तेव्हां कदाचित् त्यांनीं जाणूनबुजून त्यांचा या कामांत वरचष्मा होऊं दिला असेल ! किंवा बाहेरून दिसण्यांत " आम्हीं तुम्हांस अधिक जागा व्यापूं देतों, म्हणून स्वतःपेक्षां आमचें तुम्हांवर विशेष प्रेम आहे," असें त्यांस आमिष दाखवून सर्वकाळ त्या आपल्या ताब्यांत राहण्यासाठीं त्यांनीं त्यांचें स्वातंत्र्य हरण करण्याची तर युक्ति काढली नसेलना ? आम्ही असें ऐकतों कीं, या झग्यांचा त्रास त्यांच्या विस्तारानेंच संपत नाहीं. त्यांच्या आंत चोळण्यासारखें किंवा चड्डीसारखें दुसरें एक वस्त्र वापरण्याची सभ्य स्त्रियांची चाल आहे. असें असेल तर मग फारच त्रास ! अशा स्त्रियांना वस्त्रांतर करतांना केवढा अट्टाहास करावा लागत असेल, याची वाचकांनीच कल्पना करावी. आणि येवढें कशासाठीं, तर कंबर बारीक दिसावी म्हणून ! आमच्याप्रमाणें युरोपियन लोकांतही सिंहकटीचें मोठें महत्व आहे. पण आम्हीं ती दाखविण्यासाठीं विशेष खटपट करीत नाहीं. युरोपियन लोकांत जी जात्या मृदंगकटी असेल तिला देखील सिंहकटी दाखविण्यांचे अनेक उपाय काढले आहेत, असें म्हणतात ! कमरेखाली झगे फुगविण्यासाठीं व कमरेचा परिघ जेवढा कमी होईल तेवढा करण्यासाठीं, कमरेभोंवती कित्येक स्त्रिया लोखंडाचा पट्टा करकचून आंवळतात, असें सांगतात ! हें खरें असेल तर लोहबंधनामुळें कोठा आणि कूस यांच्यावर दाब पडून, अन्नपचन होण्यास

व गर्भाचे संवर्धन होण्यास अडथळा होत असेल, व सुइणीच्या मदतीशिवाय प्रसूत होणें फार कठीण पडत असेल. खेरीज नेहमीं नेहमीं कंबर फारच आंवळली तर कुबड निघण्याचा संभव असतो, हें एक निराळेंच अरिष्ट! तसेंच या झगेदार बायकांस पुरुषांप्रमाणें किंवा आमच्या स्त्रियांप्रमाणें दोहींकडे दोन पाय सोडून घोड्यावर बसतां येणें बहुतेक अशक्य असल्यामुळें एकाच बाजूस दोनहीं पाय सोडून बसण्यासारखीं खोंगरे तयार करणें त्या लोकांस भाग पडलें! या खोगरास साइड सॅडल्स असें म्हणतात. या खोगरावर बसण्यास शिकणें म्हणजे एक प्रकारची बिकट कसरत करण्यास शिकण्यासारखेंच आहे! या प्रकारच्या आरोहणापासून घोडा व बसणारीण या उभयतांसही मोठा त्रास पडत असेल असा आमचा तर्क आहे. खरें काय असेल तें त्या मडमांच्या व घोड्याच्या जीवाला ठाऊक! एकंदरींत, हा झगा आमच्या स्त्रियांच्या बिलकूल कामाचा नाहीं, असें आम्हांस वाटतें. तसेच, युरोपियन स्त्रियांत जाकिटें घालण्याची चाल जरी रूढ आहे, तरी विशेष थाटाच्या प्रसंगी त्या ज्या प्रकारची जाकिटें वापरतात तींही आम्हांस नको आहेत. ऐन थंडीच्या दिवसांत रात्रीच्या प्रसंगी उरःस्थलाचा बराच भाग व खांद्या खालचा हाताचा बराच भाग अनावृत ठेवण्यांत काय सुख किंवा मौज आहे, हें आम्हांस समजत नाहीं. या प्रचारामुळें थंडीच्या दिवसांत तिकडील स्त्रियांस मोठे क्लेश होतात, व कधींकधीं त्यांना त्यापासून शीतविकार जडतात, असें आम्ही ऐकतों. असे असून शेंकडों शतकें हा प्रघात तिकडे रूढ असेल तर "बलवान् लोकाचारा, तुला साष्टांग नमस्कार असो," याशिवाय दुसरें काय म्हणावें? तात्पर्य, युरोपखंडांतील लोकांनीं आपल्या स्त्रियांच्या पाठीमागें जो पोषाख लाविला आहे, त्यांत त्यांनीं त्यांच्या सुखाकडे किंवा सोईकडे न पाहतां, त्या आपल्या नजरेस खूप मौजेच्या कशा दिसतील येवढ्याच गोष्टीचा विचार केला असावा असें दिसतें. नाहींतर इतका बोजड किंवा अवजड पेहराव ते कधींही मान्य न करते. सामान्यपणें आम्ही आपल्या पाषाणाच्या देव्यांस ज्याप्रमाणें सजवितों, त्याप्रमाणें ते आपल्या स्त्रियांस सजवितात, असें वाटतें. गंगा, लक्ष्मी, अंबिका वगैरे देवतांच्या मूर्तीचे पोषाख बांधावयाचे आहेत असें आम्ही म्हणतों, व

ते बांधण्यांत पदराचा झोळ, निऱ्यांची गर्दी, चापचोपी वगैरे गोष्टींकडे आम्ही जितकें लक्ष देतों, तितक्या या चालत्याबोलत्या मडमा आपल्या पेहरावाकडे देत असाव्या, आणि तसें करणें त्यांच्या पुरुषांच्या आग्रहामुळें त्यांस भाग पडत असावें असें आमचें अनुमान आहे.

युरोपियन स्त्रियांच्या पोषाखावर वास्तविक पाहतां येथें इतकी टीका करीत बसण्याची गरज नव्हती. पण अलीकडे " आपलें तें सारें चांगलें, " असें प्रतिपादणाऱ्या कित्येक आग्रही व अविचारी लोकांनीं सत्यास पराङ्मुख होऊन, " सुधारक मंडळींस जेवढें भारतीय, तेवढें ओंगळ वाटतें, व जेवढें पाश्चात्य तेवढें अनुकरणीय वाटतें " असा जो पुकारा रात्रंदिवस चालविला आहे तो किती मिथ्या आहे, हें अनेक उदाहरणापैकीं एका उदाहरणानें वाचकांच्या नजरेस आणण्यासाठीं आम्हीं हें यत्किंचित् विषयांतर करण्यास प्रवृत्त झालों. बाकी युरोपियन लोकांवर या टीकेचा कांहींएक परिणाम होण्याचा संभव नाहीं, हें आम्हीं पक्कें जाणून आहों. कारण ज्या लोकांस जो पोषाख मानवलेला असतो व ज्याच्याशीं त्यांच्या सुरेखपणाच्या कल्पना खिळून गेलेल्या असतात, ते दुसऱ्या लोकांच्या टीकांनीं त्यांत फेरबदल करण्यास कधींही राजी होत नाहींत. शिवाय, त्यांच्या पोषाखांत ज्या गैरसोई आहेत त्या त्यांच्यापैकींच कांहींच्या नजरेस येऊं लागल्या आहेत व त्या आपल्या लोकांच्या नजरेस आणण्यास तिकडील टीकाकार हवे तितके खबरदार आहेत ! त्यांना आमच्या मदतीची बिलकूल गरज नाहीं. तथापि येथें ऐवढें म्हटल्यावांचून राहवत नाहीं कीं, युरोपियन स्त्रियां आपला झगा टाकून देऊन आमच्या स्त्रियांच्या लुगड्यासारखें एखादें वस्त्र वापरूं लागतील तर त्यांचा पोषाख कमी खर्चाचा आणि कमी त्रासाचा होईल इतकेंच नाहीं, तर सौंदर्य व सुख या कल्पनांत साऱ्या मनुष्यतेस पसंत पडेल असा कांहीं भाग असेल तर त्याकडे त्यांची थोडीबहुत प्रमाणानें प्रवृत्ति झाली असें होऊन, इतर खंडांतिल लोकांच्या, व कदाचित् युरोपखंडांतील लोकांच्याही दृष्टीस त्या आतांहून रमणीय वाटूं लागण्याचा संभव आहे.

येथपर्यंत आमच्या स्त्रियांच्या चोळीलुगड्यांचा विचार झाला; आणि हाच मुख्य महत्वाचा होता. आतां थोडा वेळ त्यांच्या डोक्याकडे आणि

पायांकडे पाहूं म्हणजे झालें. आमच्या साहेबलोकांच्या मडमांप्रमाणें आमच्या बायकांच्या डोक्यावर शिस्तरी टोप्या चढाविण्याची कांहींएक गरज नाहीं. तथापि उन्हांत, पावसांत, किंवा वाऱ्यांत जातांना त्यांच्या डोक्यांस कांहीं तरी शिरस्त्राण घालण्याची चाल पडेल तर बरें होणार आहे. सध्यां पदराशिवाय दुसरें कांहींहि असत नाहीं. फारच झालें तर पदरांवर शालजोडी किंवा शेला घेण्यांत येतो. पण या सर्वांचे पर्यवसान हात अडवून ठेवणें आणि सर्व शरीर एखाद्या ऊंच कापडाच्या पोत्यांत गुंडाळण्यासारखें करणें-अशावर होतें हें कांहीं प्रशस्त नाहीं. बुरखा घेण्याचें दिवस गेलें. ऊन व पाऊस यांपासून संरक्षण करण्याचा जो सामान्य उपाय तो आम्हीं स्त्रियांस करूं देत नाहीं, ही मोठ्या शरमेची गोष्ट होय. आम्हीं धट्टयाकट्ट्या पुरुषांनीं काश्मिरी चोगे घालावें, बूटस्टॉकिंग्ज चढवावें, कानास रुमाल गुंडळावें किंवा पागोट्यावरून कानपट्या बांधाव्या, सकलादीच्या टोप्या घ्याव्या, आणि या सर्वांच्यावर छत्र धरावें, आणि त्या बिचाऱ्या अबलांनीं भर पावसांत एखाद्या चौघडीनिशी किंवा शालजोडी निशी अथवा नुसत्या पदरावरच रस्त्यानें अनवाणी भिजत जावें, ही आम्हांस मर्यादेची अमानुष कल्पना वाटतें. उन्हांत व पावसांत स्त्रियांनीं छत्री वापरण्यांस आम्हांस बिलकूल हरकत दिसत नाहीं. तसेंच त्यांस घरांतील स्वच्छ जमिनीशिवाय दुसऱ्या कोठेंहि चालण्याची संवय नसल्यामुळें, उन्हानें तापलेल्या किंवा पाण्यानें आणि थंडीनें गारठलेल्या जमिनीवरून चालतांना त्यांना पराकाष्टेचें क्लेश होऊन कधीं कधीं उष्णतेचे आणि थंडीचें विकार होतात. हे टाळण्यासाठीं सर्व स्त्रियांनीं घराबाहेर पडतांना जोडे वापरण्यास काय हरकत आहे, हें आम्हांस समजत नाहीं. तसेंच, मोठ्या थंडींत प्रवास करावयाचा असल्यास त्यांनीं हातमोजे व पायमोजे घालण्यास, आणि घोड्यावर बसावयाचें असल्यास किंवा लांबीची मजल मारावयाची असल्यास मऊ कातडयाचे बूट घालण्यास आम्हीं त्यांस अडथळा कां करावा, हें सांगतां येणें फार कठीण आहे. पण **शास्त्रात् रूढिर्बलीयसी** या न्यायाचे आम्ही सारे गुलाम होऊन गेलों आहों. लोकांच्या कानाशीं कटकट करतां करतां हिच्या शृंखला झुगारून देऊन जो मार्ग सुखावह व सुगम असेल त्यानें जाण्याचें धैर्य ज्या दिवशीं

आमच्या अंगीं येऊं लागेल तो सुदिन म्हणावयाचा. कोणीं कांहीं केलें व म्हटलें तरी तो एकदां येणार आहे याविषयीं आम्हांस शंका नाहीं. अविचाराच्या व दुराग्रहाच्या प्रत्यवायामुळें तो थोडासा दुरावणार आहे, एवढेंच काय तें !

अलंकारमीमांसा : : ३०

मनुष्यांच्या हातून ज्या अनेक असंबद्ध किंवा परस्परविरोधी गोष्टी होत असतात त्यांतच अलंकाराचा समावेश करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. बोलण्यांत साधेपणाची तारीफ करीत नाहीं, असा कोण आहे ? तथापि मौल्यवान् वस्त्रें परिधान करून, व जेथल्या तेथें नाना प्रकारचे अलंकार चढवून ठुमकत जाणारी तरुण रमणी नेत्रपथांत आली असतां, ज्यानें अभिलाषपूर्वक तिजकडे पाहिलें नाहीं किंवा पाहून ज्याचा अंतरात्मा क्षणभर आनंदित झाला नाहीं, असा कोण पुरुष आहे ? दागिन्यांत कांहीं अर्थ नाहीं; दागिने घालण्यासाठीं नाकाला, ओठाला, कानाला, भोंकें पाडणें हा रानटीपणा होय; दागिन्यांमुळें चोरांपासून त्रास होतो; लहान मुलांच्या अंगावर सोनें घातल्यानें त्याच्या जिवास अपाय घडतो; दागिन्यांत पैसे अडवून ठेवल्यानें देशांतील उत्पादक भांडवलापासून व्हावा तितका फायदा होत नाहीं; दागिन्यांपासून कोणत्याही प्रकारचें खरें सुख होत नाहीं;—वगैरे पोकळ वेदांताच्या गप्पांत आम्हांस बिलकुल हांशील वाटत नाहीं. दागिने घालावयाचे नाहींत, चांगलीं वस्त्रें वापरावयाचीं नाहींत, सुग्रास अन्न खावयाचें नाहीं, सुरेख घरांत रहावयाचें नाहीं तर करावयाचें तरी काय ? सकाळपासून संध्याकाळपर्यंत जे कष्ट करावयाचे ते ओलीकोरडी भाकर, जाडाभरडा कपडा आणि थंडीवाऱ्याचें निवारण होण्यासारखें एखादें मजबूत खोपट यांसाठींच काय ? यावर कोणी असें उत्तर देतील कीं, कोणतीही गोष्ट फाजील करूं

नये. फाजीलपणापासून नुकसान आहे. पण यावर आमचें प्रत्युत्तर असें आहे कीं, या उपदेशाची विशेष गरज नाहीं. एखादा मनुष्य अत्यंत उपयोगी वस्तूंकडे दुर्लक्ष करून, अलंकाराकडे आपली सर्व प्राप्ति लावीत असला, म्हणून अलंकार घालण्याच्या पद्धतीवर चाल करून जाणें अगदीं अप्रशस्त आहे. सर्व ठिकाणचे रानटी लोक, सुधारलेल्या राष्ट्रांतील सर्व अज्ञान लोक, सुशिक्षित कुटुंबांतील स्त्रिया व मुलें–या साऱ्यांस अलंकारांची मोठी हौस असते, हें अल्प अवलोकनावरून दिसून येणार आहे. उतार वय झालेल्या कांहीं मोठमोठ्या व विचारी विद्वानांस मात्र प्रत्यक्ष आपल्या अंगावर अलंकार घालण्यांत मोठीशी हौस वाटत नाहीं. तेव्हां जी गोष्ट अनादि-कालापासून सर्व प्रकारच्या, सर्व स्थितींतल्या व सर्व वयांच्या स्त्रीपुरुषांस कमी-अधिक प्रमाणानें प्रिय होऊन बसली आहे, तींत कांहीं तात्पर्य नाहीं असें म्हणणें, व तिच्यापासून जे क्वचित् अनर्थ घडतात ते न घडण्यासाठीं ती अजीबात टाकून द्या, असा मंत्रोपदेश करीत सुटणें म्हणजे मनुष्यस्वभावाचें आणि मनुष्यसुधारणेचें पूर्ण अज्ञान प्रकट करण्यासारखें होय. कोणी काय पाहिजे तें म्हणो; अलंकारांची हौस समूळ नाहींशी होण्याचा संभव नाहीं. एका प्रकारचे अलंकार नाहींसे केले तर दुसऱ्या प्रकारचे अस्तित्वांत येतील. उच्च धातू वापरण्याचा प्रघात कमी झाल्यास लत्ताकपड्यांवर अधिक खर्च होऊं लागेल; व दोहोंच्याही फेऱ्यांतून सुटलों तरी घरांवर, घोड्यांवर, नोकरांवर किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्या तरी ताब्यांतल्या वस्तूंवर अलंकार व वस्त्रें चढवून त्या आपल्या सभोंवतीं ठेवण्यांत व त्यांच्याकडे पाहण्यांत मनुष्यांना आनंद वाटत राहील.

ज्याच्या योगानें वस्तूंचें रूप विशेष खुलल्यासारखें वाटतें त्यास आपण अलंकार असें म्हणतों या व्याख्येप्रमाणें शोभा देणाऱ्या प्रत्येक वस्तूची अलंकारांतच गणना केली पाहिजे. पण प्रस्तुत लेखांत अलंकाराची थोडी मर्यादित व्याख्या करणें जरूर आहे. नाहींतर विषयप्रतिपादनाची मोठी पंचाईत पडेल. मूळचें स्वरूप अधिक चांगलें दिसण्यासाठीं मौल्यवान् धातूंच्या व पाषाणाच्या ज्या नानातऱ्हेच्या चिजा स्त्रीपुरुषें अंगावर घालतात त्यांसच येथें अलंकार असें समजून त्याविषयीं थोडी चर्चा करूं.

अलंकारापासून स्वाभाविक सौंदर्याच्या मोहकपणांत भर पडते, असा सर्वांचा अनुभव आहे. कित्येक पाश्चिमात्य व पूर्वात्य कवींनी नग्नसौंदर्याची मोठी प्रशंसा केली आहे. पण सध्यां आमचीं जीं मनें आहेत त्यांनीं वस्त्ररहित आणि अलंकाररहित अशा अत्यंत लावण्यवती स्त्रीचें किंवा सुंदर पुरुषाचे रूप डोळ्यांपुढें आणण्याचा प्रयत्न केला तर त्यांना तें रूप हिडिस वाटतें! "नष्टनंदन वनांतील" लतामंडपांतल्या पुष्पशय्येवर विलास करतांना मनुष्यांच्या आद्य मातेस आपल्या पतीचें नग्नसौंदर्य पाहून काय वाटलें असेल तें असो, किंवा मनुष्यांच्या आद्य पूर्वजास आपल्याच हाडामांसापासून निर्माण केलेल्या नग्न रमणीस दृढालिंगन देतांना काय आनंद झाला असेल तो असो, आतांच्या आमच्या मनास नग्न स्त्रीपुरुषांची कल्पना ओंगळ वाटते, आणि नग्नसौंदर्याच्या मनोहारित्वाविषयीं कोणी केवढयाही थापा मारल्या, तरी ॲडॅम आणि ईव्ह यांचें अनुकरण करण्यास अर्वाचीन माणसें कधींही तयार होणार नाहींत. अलंकारांविषयीं लोकांचीं मतें स्थिर नाहींत व सारखीं नाहींत, हें कबूल आहे. देशकालाप्रमाणें त्यांत फरक असतो व होत जातो. तिसऱ्या किंवा चौथ्या शतकांतील दागिन्यांत आणि आतांच्या दागिन्यांत बराच बदल झाला असला पाहिजे; तसेंच, कोणत्याही दोन राष्ट्रांतील लोकांच्या दागिन्यांत फारच थोडें साम्य असतें, हें कोणास सांगावयाला पाहिजे, असें नाहीं. पण जेथें दागिन्यांची बिलकुल हौस नाहीं, असें एक देखील राष्ट्र मिळावयाचें नाहीं. आपण दुसऱ्याला प्रिय व्हावें, अशी मनुष्याच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति आहे. पण ह्या प्रवृत्तीचें विशेष प्रदर्शन स्त्रीपुरुषांकडून एकमेकांस प्रिय होण्यासाठीं चालविलेल्या वर्तनांत दिसून येतें. सौंदर्याला सर्वत्रच मान आहे. पण पुरुषांच्या सौंदर्याला स्त्रियांत आणि स्त्रियांच्या सौंदर्याला पुरुषांत विशेष मान असल्यामुळें, त्या सौंदर्याला खुलवणारे अलंकार वापरण्याची इच्छा उभयतांतही स्वभावसिद्ध होऊन बसल्यासारखी झाली आहे. दागिन्यांमुळें स्वाभाविक सौंदर्यांत खरोखरीच भर पडेनाशी होईल, निदान पडत नाहीं असें वाटूं लागेल, तेव्हांच हा मनुष्यास लागलेला दागिन्यांचा नाद सुटण्याचा संभव आहे. मोठ्या प्रयासानें हा थोडासा कमी अधिक करतां येईल,

पण जोंपर्यंत स्त्रीपुरुषें एकमेकांस प्रिय होण्याचा प्रयत्न करीत असतील, तोंपर्यंत दागिन्यांचा थोडाबहुत नाद सर्वत्र दृष्टीस पडल्यावांचून राहणार नाहीं.

दागिन्यांवर मनुष्यांचें इतकें प्रेम बसण्याचें दुसरें एक कारण असें आहे कीं, त्यामुळें आपण श्रीमंत आहों, असे इतरांस सहज रीतीनें दाखवितां येतें. दहापांच हजारांच्या नोटा आंगरख्यावर किंवा लुगड्यावर चिकटवल्या तर तो हेतु सिद्धीस जाणार आहे, हें खरें आहे. पण तसें केल्यानें सौंदर्यांत भर न पडतां, तें उलट विद्रुप दिसण्याचा संभव आहे. तेव्हां सौंदर्याला मदत होऊन पुनः श्रीमंती दाखवितां येण्यास अलंकार घालण्यासारखें दुसरें साधन नाहीं. शिवाय, एकदां दागिन्यांचा पक्का नाद लागला म्हणजे काटकसर करण्याची संवय लागते, आणि तीमुळें दुर्व्यसनांत किंवा दुसऱ्या कोणत्याही वाईट गोष्टीकडे खर्च करण्याची इच्छा होत नाहीं, हा आणखी एक फायदा आहे. तसेंच, एखादा प्रसंग गुदरला असतां, दागिने जसे उपयोगी पडतात, तसें दुसरें कांहींएक उपयोगास येण्याचा संभव नाहीं. व्यापारांत घातलेला पैसा पाहिजे तेव्हां हातीं येऊं शकत नाहीं इतकेंच नाहीं, तर बुडण्याची भीति असून, त्याचे योगानें रूपाला मोहकता आणण्यास कांहींच साहाय्य मिळत नाहीं. ब्यांकेंतला पैसा पाहिजे तेव्हां हातीं येण्यासारखा असतो. पण ठुशीच्या जागीं कां "ब्यांकबुक" घालतां येणार आहे? तात्पर्य, दागिने ही एक प्रकारची अत्युत्तम ठेव आहे. ह्या ठेवीपासून सौंदर्यवृद्धि होत असून खेरीज अनेक फायदे होतात. म्हणून दागिने वापरण्याची हौस मनुष्यांतून सहसा जाण्याचा संभव नाहीं, हें सिद्ध आहे.

कोणी असें म्हणतात कीं, दागिन्यांत पैसा घालण्यापेक्षां तो वस्त्रप्रावरणांत खर्चणें विशेष इष्ट आहे; कारण कापड दागिन्यापेक्षां विशेष उपयोगाचें व सुखाचें आहे. पण यास एक उत्तर आहे कीं, शीत कटिबंधांतले लोक आवश्यकतेमुळें आपल्या पैशांचा चूर पेहरावांत करतात. म्हणून आम्हीं उष्ण कटिबंधांतील लोकांनींही तसेंच करीत सुटावे, हें योग्य नाहीं. अवश्य असेल तेवढा पैसा कपड्यांत खर्च करण्यास आमची हरकत नाहीं. पण आवश्यकतेबाहेर जितका पैसा वांचेल तितका सारा कपड्यांपेक्षां असंख्यपट अधिक टिकाऊ आणि उपयोगी अशा अलंकारांत खर्चणें हेंच प्रशस्त

आहे. यावर कोणी असें म्हणतात कीं, कपड्यावर केलेल्या खर्चानें दागिन्यांवर केलेल्या खर्चापेक्षां व्यापारास अधिक उत्तेजन मिळतें. पण आमच्या मतें ही विचारसरणी चुकीची आहे. कापडखरेदी केल्यानें कोष्ट्यांस व शेतकऱ्यांस उत्तेजन मिळतें, दागिने करविल्यानें खाणींतून मौल्यवान् धातू काढणारांच्या आणि सोनारांच्या धंद्यांस आश्रय देण्यांत येतो ! तेव्हां दागिने घाला किंवा उंची लत्ताकपडा वापरा, कोणत्या तरी व्यापारास उत्तेजन हें मिळतेंच ! पण कपड्यांत पैसा उधळून बसण्यांपेक्षां तो दागिन्यांत वेंचण्यांत विशेष फायदा आहे तो असा कीं, कपडा दागिन्यांइतका टिकाऊ नसल्यामुळें त्यांतील पैशाचा व्यय लौकर होतो, व दागिन्यांतिल पैसा फार दिवस टिकतो. वस्त्र जुनें झालें म्हणजे त्यापैकीं कांहींच हातीं लागत नाहीं; जुन्या दागिन्यांपासून रुपयाचे आठ आणे तरी मिळतात ! तेव्हां वस्त्रावर फार खर्च न करितां तो दागिन्यांत करणें विशेष प्रशस्त आहे, हें सहज लक्षांत येणार आहे.

दागिन्यांमुळें चोऱ्या व खून होतात म्हणून दागिने घालूं नयेत, असें म्हणणें म्हणजे आगगाड्या व आगबोटी यांस अपघात होऊन प्राणहानि होते, म्हणून प्रवासाच्या कामीं त्यांचा कधीं उपयोग करूं नये, असें प्रतिपादण्यासारखेंच होय. लोकांच्या दृष्टीस पडणार नाहीं. चोरतां येणार नाहीं व कोणत्याही अपघातानें नष्ट होणार नाहीं, अशा रीतीनें संपत्तीचें रक्षण करणें बहुधा अशक्य आहे. सर्व पैसा व्यापारांत किंवा जमिनींत घालून बसून, आयत्या वेळेस त्यांची गरज लागली तर कोणाच्या तोंडाकडे पहावें ? व्यापारांत तोटा आला किंवा शेत पिकलें नाहीं म्हणजे जें नुकसान होतें तें चोरीच्या नुकसानापासून फारसे निराळें नाहीं, असें वाटतें. शिवाय, ज्या घरीं व ज्या माणसाच्या अंगावर कांहीं माया असेल त्यावरच उड्या पडण्याचा संभव आहे, हें जरी खरें आहे, तरी लोकांची गरीबी, अज्ञान, व स्वाभाविक दुर्गुणप्रवृत्ति या गोष्टीही चोऱ्या व खून या अरिष्टांस कांहीं कमी कारण नाहींत. लोक दरिद्री नसतील व सुशिक्षित आणि सदगुणी असतील, आणि पोलीसांचा बंदोबस्तही चांगला असेल, तर सुदाम्याच्या घराप्रमाणेंच कुबेरांचें घर व शरीर कां सुरक्षित असूं नये, हें सांगतां येणार नाहीं. ऐषआरामाच्या वस्तूंत दागिन्यांचा समावेश

होतो. जेथें राष्ट्र आहे तेथें थोडाबहुत ऐषआराम असलाच पाहिजे. देश-कालानुरोधानें या ऐषआरामाची तऱ्हा निराळी असेल; पण जेथें मुळींच ऐषआराम नाहीं, असें राष्ट्र सांपडावयाचें नाहीं. आम्ही हिंदु लोक दागिन्यांत म्हणजे एका प्रकारच्या ऐषआरामांत थोडाबहुत पैसा खर्च करतों, हें खरें आहे. पण हा खर्च प्राप्तीच्या मानानें इतर लोकांच्या ऐषआरामाकडे होत असलेल्या खर्चाहून फार कमी असून, प्रसंग असून, प्रसंग पडेल त्या वेळेस या खर्चाच्या बऱ्याच भागाचा पैसा करतां येतो, हा यांत एक विशेष फायदा आहे, असें प्रसिद्ध दादाभाई नवरोजी यांनीं आपल्या एका निबंधांत सिद्ध करून दाखविलें आहे. "काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरपर्यंत सुरक्षितपणें प्रवास करतां येण्यासारखा" पोलिसांचा बंदोबस्त सरकार ठेवील तर चोऱ्यांच्या आणि खुनांच्या हरकतीमुळें दागिने वापरूं नयेत असें म्हणतां येणार नाहीं, हें उघड आहे.

तथापि या वादग्रस्त विषयाच्या संबंधानें आम्ही थोड्याबहुत समयास येण्यास, म्हणजे आमच्या प्रतिपक्षांस रुचेल तर त्यांशीं तह करण्यास, तयार आहों. कारण कांहीं म्हटलें तरी जनसमूहास एकाएकीं सुशिक्षित, सुवृत्त व निर्लोभी करणें जितकें अशक्य आहे तितकेंच 'काठीला बांधलेल्या सोन्यास कोणीं हात लावूं नये' असा बंदोबस्त होणेंही अशक्य आहे. तेव्हां दागिन्यापासून होणारा फायदा तेंवढा साधून नुकसान टाळता येईल अशी युक्ति कोणी सुचविली, तर ती स्वीकारण्यास लोकांनीं एका पायावर उभें असलें पाहिजे. ही युक्ति फार सोपी आहे. **खरे दागिने न घालतां खोटे दागिने घालावे म्हणजे झालें!** असें केलें असतां, श्रीमंतापासून गरीबापर्यंत पाहिजे त्याला दागिन्यांपासून सौंदर्यास होणाऱ्या मदतीचा फायदा घेतां येऊन, शिवाय आपआपल्या मगदुरापर्यंत लत्ताकपड्यांवर अधिक खर्च करण्यास सवड सांपडेल. इतकेंच नाहीं, तर देशांतील बरेंच धन दागिन्यांत अडकून पडल्यामुळें त्याचें नुकसान होत आहे असें ज्यांचें म्हणणें आहे, त्यांची ही दागिने वापरण्यास होत असलेली बहुतेक हरकत दूर करतां येणार आहे. एकदा हा खोटे दागिने घालण्याचा प्रघात रूढ झाला, म्हणजे त्यांसाठीं घरे फोडण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें चोरलोकांत

समजून येईल, आणि मारवाड्यासारखे द्रव्यलोलुप लोक लहान मुलांचे खून करण्यास प्रवृत्त होणार नाहींत! यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं, लहानथोरांच्या बायका सारख्याच श्रीमंत दिसू लागल्या, तर धनाढ्यांनीं आपली श्रीमंती कशी दाखवावी? खोटे दागिने घातल्याने सौंदर्यास होणारे साहाय्य साधेल खरें, पण श्रीमंती दाखविण्याचा व ती दाखविल्यापासून मनास होणाऱ्या आनंदाचा लाभ खोट्या दागिन्यांपासून कसा करून घेतां येईल? या प्रश्नास आमचें प्रत्युत्तर येवढेंच आहे कीं, अलंकारांनीं देह अलंकृत करणें हा त्यांचा आद्य उपयोग आहे. त्यांपासून होणारी इतर कामें केवळ आनुषंगिक आहेत. तेव्हां त्यांचेकडून मुख्य काम करून घेऊन बाकीची कामें साधण्यास दुसऱ्या तोडी काढाव्या हें योग्य आहे. श्रीमंतांनीं पाहिजे तर आपल्या लग्याकपड्यानें आपली श्रीमंती दाखवावी, अथवा लोकर व कापूस आणि यंत्रें यांच्या समृद्धीमुळें श्रीमंती दाखविण्याचें तें द्वारही बंद झाले असेल तर, त्या लोकांनीं आपल्या कपाळावर "आमच्या पाशी इतकी माया आहे," अशा अर्थाची अक्षरें गोंदून घ्यावीं, किंवा त्यांना सुचेल तसला दुसरा एखादा उपाय काढावा, अथवा जबाबदारी पतकरून खरे दागिनें वापरीत रहावें! मात्र तसें करतांना इतकें ध्यानांत ठेवावें कीं, दिसण्यांत खऱ्या व खोट्या दागिन्यांत म्हणण्यासारखा फरक दिसत नाहीं, इतकेंच नाहीं, तर सौंदर्याची उठावणी करण्यांतही दोहोंचा सारखाच उपयोग असल्यामुळें गरीबांच्या बायका श्रीमंतांच्या बायकांप्रमाणें कसलेबसले सारे दागिने वापरू लागल्या, म्हणजे श्रीमंतांच्या बायकांच्या अंगावर असलेल्या खऱ्या दागिन्यांपासून त्यांस म्हणण्यासारखा कोणताही फायदा होणार नाहीं! असो; पुढें एखादे प्रसंगी हाच विषय पुन्हां हातीं घेऊन, आपल्या दागिन्यांपैकीं त्याज्य व रक्ष्य किती आहेत या मुद्याचा आणखी कांहींसा विचार करूं.

म्हणण्यासारखा उपयोग नाहीं : : ३१

हव्या तेवढ्या वयाच्या वराशीं हव्या तितक्या लहान वयाच्या बधूचा विवाह करावा, व मग त्या घोडनवऱ्यानें उतावीळ होऊन आपल्या ऋतुप्राप्त न झालेल्या भार्येशीं राक्षसीं विलास करून, तिच्या प्राणांचा किंवा प्रकृतीचा आणि आपल्या लौकिकाचा होम करावा, आणि त्यामुळें लोकांची मनें उदास होऊन त्यांना अगदीं लहानपणीं लग्नें करणें बरोबर नाहीं, असें वाटूं लागावें; पण तीं एकाएकीं बंद करण्याची छाती होत नसल्यामुळें तीं तशींच कायम ठेवून, त्यापासून होणारे घोर परिणाम न घडूं देण्याबद्दल प्रथम बारीकसारीक कायदेशीर प्रतिबंध करीत रहावें–असा या प्रश्नाचा सार्वत्रिक इतिहास असेल, व याहून दुसऱ्या कोणत्याही पद्धतीनें ही बालविवाहाची दुष्ट चाल नाहींशी करणें शक्य नसेल, तर कित्येक सामाजिक सुधारकांनीं संमतिवयाची इयत्ता वाढविण्यासाठीं हिंदुस्थानसरकारास अर्ज करण्याचा जो विचार केला आहे, तो केवळ वावगा आहे, असें म्हणतां येणार नाहीं. "बारा वर्षांच्या आंत आपण आपल्या बायकोशीं समागम केला, आणि त्यापासून भयंकर परिणाम होऊन तो जगापुढें आला, तर आपणांस असंमत उपभोगास सांगितलेली शिक्षा भोगावी लागेल; करितां आपण त्या समागमसुखाविषयीं उत्कंठ होऊं नये." असा परिणाम जितक्या घोडनवऱ्यांच्या मनांवर होईल तितक्या मानानें संमतिवय वाढविल्यापासून फायदा होणार आहे यांत बिलकूल संशय नाहीं. पण हें मान पराकाष्टेचें क्षुल्लक आहे. येवढ्यासाठींच कायदा करण्याची मोठीशी आवश्यकता नाहीं. यावर कोणाचा असा आक्षेप येईल कीं, संमतिवयाचें प्रमाण दहापासून बारा केल्यानें असंमत उपभोगांचा म्हणण्यासारखा प्रतिबंध होण्याचा संभव नाहीं, हें जरी खरें आहे, तरी जे उतावीळ नवरे हा गुन्हा करतील, त्यांना दोन वर्षांहून अधिक शिक्षा ठोठावण्याचा न्यायाधीशास अधिकार असणें जरूर आहे. कामवासना अनावर होऊन वयाचा व प्रकृतीचा मगदूर न पाहतां, अल्प वयाच्या मुग्ध कन्येवर बलात्कार करून तिच्या शरीराची,

अब्रूची आणि प्राणांची दुर्दशा करणाऱ्या मनुष्याचा अपराध फार मोठा आहे, व अशा मोठ्या अपराधास मोठी शिक्षा असणें हें योग्य आहे. यावर आमचें प्रत्युत्तर असें आहे कीं, कोणत्याही अपकृत्यास जी शिक्षा ठरवायाची ती त्यापासून होणाऱ्या परिणामांच्या अनुरोधानें नेहमीं ठरवितां येत नाहीं. ज्याच्या हातून तें अपकृत्य घडलें त्याचा हेतु कसा होता, हें पाहणें अनेक प्रसंगीं अवश्य असतें. असें समजा कीं, एखाद्या अचरट मनुष्यानें घरांतल्या घरांत पिस्तुलानें गोळी घालण्याचा नेम शिकण्याचा विचार करून, आपल्या परमप्रिय बायकोशी लडिवाळपणानें खेळत असलेल्या घरच्या भाटीवर कांहीं छरे सोडले, आणि ते त्या प्रियकरणीस लागून तिचा अंत झाला. तर अशा भावी गोलंदाजास बायकोचा खून केल्याबद्दल फांशी देणें बरोबर होईल काय ? अर्थात् नाहीं. त्याप्रमाणेंच जो घोडनवरा वयांत न आलेल्या आपल्या बायकोशीं राक्षसी वर्तन करतो, तो तिचा प्राण जावा किंवा तिच्या शरीरास आमरण दुःसह व्यथा जडावी, अशा बुद्धीनें तें करीत नाहीं. ज्याप्रमाणें दारूनें झिंगलेला मनुष्य पाहिजे तें करीत सुटतो त्याप्रमाणें उत्कट कामवासनेनें बेफाम होऊन गेलेला मनुष्य तसें कर्म करण्यास प्रवृत्त होतो. बायको मरावी असा त्याचा हेतु मुळींच नसतो. कसेंही करून आपली वासना तृप्त करावी, येवढाच त्याचा विचार असतो. सबब अशा अपराधाबद्दल पराकाष्टेच्या वाईट अविचाराच्या कृत्यास जी शिक्षा सांगितली असेल तीच देणें योग्य आहे. पंचवीस तीस वर्षांच्या दांडग्या मनुष्याच्या ताब्यांत आठदहा वर्षांची पोर बायको म्हणून द्यावयाची, आणि त्यानें अविचाराचा प्रकार केला म्हणजे त्याच्या पाठीमागें दहाबारा वर्षांचा कारागृहवास किंवा काळेपाणी लावायाचें, हें फारच शहाणपणाचें कृत्य होय ! वास्तविक पाहतां अशा रीतीनें मुलीचा विक्रय करणाऱ्या आईबापांस किंवा पालकांस, आणि विकत घेणाऱ्या सासूसासऱ्यांस किंवा नवऱ्यास चांगलासा दंड करणें न्याय्य आहे ! आठ-नऊ वर्षांच्या मुली पंचेचाळीस वर्षांच्या घोड्यांना अगोदर देतां कां ? आणि मग रडत बसतां कां ? बारा वर्षांच्या करूनच कां देत नाहीं ?

यासंबंधानें हिंदुस्थान सरकारास पाठविण्यासाठीं जें पत्र तयार झालें आहे

त्याचा मसुदा आमच्या पाहण्यांत आला आहे. या मसुद्यांत संमतिवय वाढविणें इष्ट आहे, असें सिद्ध करण्यासाठीं जितकी कुशलता दाखविणें शक्य होतें तितकी दाखविली आहे, व आजमित्तीस दहाच्या जागीं बारा वर्षें केलीं असतां लोकमतावर चांगला परिणाम होऊन, चौदाव्या वर्षापर्यंत नवऱ्यानें आपल्या बायकोकडे जाऊं नये, असा प्रतिबंध करून घेण्यास त्यांच्या मनाची हळूं हळूं तयारी होणार आहे, वगैरे गोष्टींचा यांत मोठ्या चातुर्यानें जातां जातां उल्लेख केला आहे. परंतु प्रश्नांतील वादाचें जें मुख्य स्थल त्यांत प्रवेश न करतां, त्याच्या सभोंवतालच्या अवांतर गोष्टींची मुद्देसूद व सप्रमाण चर्चा करून, त्या दृष्य ठरविल्यानें हिंदुस्थानसरकारास किंवा इतरांस असला कायदा करणें जरूर आहे, असें वाटण्याचा विशेष संभव नाहीं. बारा वर्षाच्या आंतील मुलीचा किंवा कोणत्याही वयाच्या मुलीचा नवऱ्यानें केलेल्या जुलुमाच्या संभोगानें उपहास होऊं नये, ही गोष्ट जितकी कायदा मागणाऱ्या लोकांस इष्ट आहे, तितकीच ती न मागणाऱ्यांस किंवा त्यापासून फायदा होणार नाहीं, असें म्हणणाऱ्यांस इष्ट आहे. तेव्हां नेणेंकरून कामांध नवऱ्यांस आपल्या बायकोची अशा तऱ्हेनें विटंबना करता येणार नाहीं, अशी कांहीं तोड निघाल्यास ती सर्व पक्षांस मान्य होईल, असें वाटतें. सरकारनें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें आमच्या धर्मांतर्गत विवाहपद्धतींत एक दोन महत्त्वाचे कायदे करून हात घातला आहे, म्हणून या बाबतींतही तसें करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें म्हणून सरकारचें किंवा या भावी कायद्याच्या प्रतिपक्ष्यांचें समाधान होणार नाहीं. सती जाऊं न देणें, गतभर्तृकांनीं पुनर्विवाह केला असतां त्यामुळें त्याचें किंवा त्यांच्या संततीचें कोणत्याही प्रकारचें नुकसान न होऊं देणें, धर्मांतरामुळें वडिलोपार्जित संपत्तीचा योग्य वांटा मिळण्यास हरकत न होणें वगैरे गोष्टी सरकारास बऱ्या वाटत होत्या, व म्हणून त्यांनीं लोकमताकडे विशेष लक्ष न देतां, त्यासंबंधानें तेव्हांच कायदे केले. संमतिवयाच्या संबंधानें त्यांना जेवढा निर्बंध उचित व अवश्य वाटला तेवढा त्यांनीं आमच्या अभिप्रायाची विशेष पर्वा न करतां केव्हांच घालून टाकला. पारशांनीं व खोजांनीं अमुक कायदा आम्हांस करून द्या, असें बहुमतानें विचारल्यावरून

त्यांना तो करून देण्यांत आला. यांतही कांहीं नवल नाहीं. या सर्व उदाहरणांवरून संमतीचें वय सध्यांप्रमाणें दहा न राहूं देतां बारा करावें, या म्हणण्यास विशेष आधार मिळत नाहीं. आजची मागणी लोकांकडून सरकाराकडे जात आहे व तीहि साऱ्या किंवा बहुतेक लोकांकडून जात आहे, असें नाहीं. तसेंच, हा फेरफार केल्यानें म्हणण्यासारखा फायदा होण्याचाहि संभव नाहीं. फार झालें तर ज्या वेळीं असंमत उपभोगाचा एखादा खटला कोर्टापुढें येईल, तेव्हां अपराध्यास आतांपेक्षां अधिक कडक शिक्षा देतां येईल येवढेंच काय तें. या फेरफारापासून अपराधप्रवृत्ति कमी होऊं शकत नाहीं, व ती होणें हा तर कायदे करण्याचा मुख्य हेतु असतो. दुसऱ्या बाबींत मुलीचें वय बारा किंवा चौदा वर्षांचें असल्याखेरीज ती कायद्यांत आली असें मानीत नाहींत, म्हणून बारा वर्षांच्या आंत नवऱ्याला तिनें जो रुकार दिला तोहि कायदेशीर मानूं नये, हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण, पाहिजे त्या वयांत लग्नाला रुकार देणें हें जर कायदेशीर आहे, तर ज्या गोष्टीसाठीं लग्न करावयाचें ती गोष्ट नवरा करूं लागल्यास ती कायदेशीर नाहीं, असें कसें म्हणतां येईल? बारावें वर्ष हा मुलींच्या ऋतुदर्शनाचा सामान्य काल होय, असें सुश्रुतादि तुमच्या अत्यंत पूज्य भिषक्प्रमुखांचें म्हणणें असतां, व मन्वादि आद्यस्मृतिकार आणि पाराशर, बृहस्पति, यम वगैरे इतर धर्मशास्त्रकर्ते हे बारा किंवा चौदा वर्षांच्या आंत नवऱ्यांनीं आपापल्या बायकांशीं संबंध ठेवूं नये, असें सांगत असतां, व या वयाच्या मुलींची लग्नें झाली नाहींत तरी हरकत नाहीं, असें त्यांचें म्हणणें असतां, तुम्ही आठदहा वर्षांच्या पोरी आपण होऊन विवाहपाशानें बद्ध करून टाकता कां, आणि मग त्यापाशापासून होणारा त्रास चुकविण्यासाठीं विशेष फायदा न होणारे कायदे मागत बसतां कां? तुमच्या मुलींचा, तुमचा, आणि तुमच्या जांवयांचा भंडवडा कशानें होतो, हें तुम्हांस पूर्णपणें कळून आलें आहे. तेव्हां शहाण्या माणसाप्रमाणें रोगाच्या मुळास हात घालाल, कीं वरवर लेप आणि मलमपट्ट्या लावीत बसाल? हिंदुस्थानांतील दोन प्रांतांत एका चाळीस वर्षांच्या अवकाशांत असंमत संभोगाचे शंभर खटले कोर्टापुढें आले, आणि त्यांपैकीं सुमारें निम्या खटल्यांस दहापासून

तेरा वर्षांच्या आंतील वयाच्या मुलींवर त्यांच्या नवऱ्यांकडून जुलूम झाला, असें सांगण्यांत, व या प्रसिद्ध जुलमाच्या मागें शेंकडों अप्रसिद्ध जुलूम झाले असतील असें म्हणण्यांत, 'संमतीचें वय वाढवा' या प्रार्थनेस विशेष पुष्टि मिळते असें आम्हांस वाटत नाहीं. संमतीचें वय वाढविल्यानें प्रतिवर्षी ज्या अडीच अपराध्यांस आजपर्यंत दुखापतीबद्दल शिक्षा द्यावी लागली, तिचे जागीं, संमतीचें वय वाढविल्यास, जबरीच्या संभोगाची शिक्षा देतां येईल, यापलीकडे कोणताही फायदा या कायद्यानें होणार नाहीं. कदाचित् फांशीचीच शिक्षा ठेवली तर मात्र काय होईल तें सांगवत नाहीं. पण त्या शिक्षेहून दुसऱ्या कोणत्याही हलक्या शिक्षेनें प्रसिद्ध गुन्ह्यांच्या मागें हात असलेल्या अप्रसिद्ध गुन्ह्यांची संख्या दहापांच अंकांनीं तरी स्वल्प होईल किंवा नाहीं, याची आम्हांस बरीच शंका आहे. अशा प्रकारचें जे गुन्हे कोर्टापुढें येतात ते बऱ्याच अंशीं नाइलाजास्तव येतात. जे हजारों मुलगे हजारों मुलींकडे पाहिजे त्या वयास जात आहेत, पण ज्यांच्या समागमापासून भयंकर परिणाम होऊं शकत नाहीं, त्यांचा प्रतिबंध या तुमच्या कायद्यानें कसा होणार ? किंवा चाळीस पंचेचाळीसापुढें विवाह केल्यानें कोणत्याही वयाच्या मुलीस घोर अपाय होईल अशा रीतीनें तीवर आपलें पौरुष गाजविणें ज्यांस अशक्य झालें आहे, अशांनीं आपल्या दशद्वादशसांवत्सरिक धर्मपत्न्यांशीं केलेल्या क्रीडा दंडय कशा होणार ? पंचाविशीच्या पुढले व चाळिशीच्या आंतले जे उल्लू व दांडगे प्रथमवर, बिजवर, तिजवर किंवा पाहिजे त्या खेपेचे वर, शुभमंगल झाल्यापासून आपलें उपभोगस्थान कायदेशीरपणें आपल्या हस्तगत झालें, तेव्हां त्यांना उपयोग तब्येत लागेल तेव्हां करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें समजून त्यावर झडप घालण्यासाठीं टपून बसलेले असतात, व सारी लज्जा एकीकडे गुंडाळून ठेऊन, संधि सांपडल्याबरोबर जसा बुभुक्षित लांडगा मेंढीवर उडी घालतो, त्याप्रमाणें जे दिवसाढवळ्या किंवा पूर्वरात्री आपल्या त्या अधार्ंग्यांस अंथरुणासकट सभोंवती निजलेल्या स्त्रियांतून उचलून नेऊन, त्यास योग्य वाटलेल्या एखाद्या एकांत स्थलीं, किंवा तेथल्यातेथेंच अमानुष सुखाचा घुटका घेण्याचें धाडस करतात, अशा साहसी, उतावीळ, दांडग्या व क्रूर लांडग्याच्या हातीं गरीब मेंढ्या न

पडाव्या हा जर मूळ उद्देश असेल तर तुम्ही मागत आहां त्या कायद्याने तों कधींही सिद्धीस जावयाचा नाहीं, व ज्या प्रचारामुळें तुमच्या तोंडांत सारीं सुधारलेलीं राष्ट्रें शेण घालीत आहेत, त्याचा निखालस लय या कायद्यानें कधींच होणार नाहीं. तो व्हावा अशी तुमची खरी इच्छा असेल तर बारा वर्षांच्या आंत मुलींचीं लग्नेंच करूं नका म्हणजे झालें. पण ही सुधारणा इतक्यांत तुमच्यानें होण्यासारखी नसेल, तर **सरकारापासून असा तरी कायदा करून घ्या कीं, पंचवीसपासून चाळीस वर्षांपर्यंत लग्न करूं इच्छिणाऱ्या कोणत्याही वयाच्या वरानें बारा वर्षांचें आंतील वयाच्या मुलीशीं लग्न करूं नये.** हिंदुस्थानसरकारकडे धाडण्यासाठीं तयार केलेल्या पत्रांच्या मसुद्यांत चाळीस वर्षांत जे जबरीचे शंभर संभोग हिंदुस्थानांतल्या दोन प्रांतांत झाले म्हणून म्हटले आहे, व ज्यांपैकीं सुमारें निम्मे दहापासून तेरा वर्षांच्या आंतील वयांचे मुलीशीं झाले, असे सांगितलें आहे, ते संभोग करणाऱ्या नवऱ्यांचीं वयें देण्यांत येती तर फार बरें होतें. पण तसें करणें त्या पत्राच्या चतुर लेखकास इष्ट कां वाटलें नाहीं, कोण जाणें. पण जर ती वयें पुढें येतील तर ते सारे जबरीचे संभोग पंचवीशी उलटलेल्या आणि पंचेचाळिशीच्या आंतल्या अविचारी प्रथम वरांनीं, बिजवरांनीं किंवा तिजवरांनीं केले असावे असें दिसून येईल, असें आमचे अनुमान आहे. विवाहपटावर वाघशेळीचा खेळ होऊं दिला असतां तुम्ही केवढीही खबरदारी ठेवलीत, तरी एखादे वेळीं वाघ शेळीला खाऊन बसेल आणि तुम्हांस राग, लज्जा व ममता या विकारांपासून होणारा अनिर्बाच्या त्रास सोसावा लागेल! तेव्हां सरकारकडे सध्यां जी मागणी घालण्याचा विचार चालविला आहे, तिचा नाद सोडून द्या, आणि पंचविशीच्या पुढल्या आणि पंचेचाळीशीच्या आंतल्या कोणत्याही विवाहेच्छु वरानें बारा वर्षाचे आंतील वयाचे वधूशी विवाह करूं नये, असा कायदेशीर निर्बंध सरकारकडून करून घ्या, म्हणजे तुमचा इष्ट हेतू तेव्हांच तडीस जाईल, व तुमच्या तोंडचा कलंक पुसेल. पण जर तुमच्या अंगांत खरोखरीच कांहीं रग असेल, व पूर्व ऋषींनीं घालून दिलेल्या नियमांची जी दृढ भक्ति तुम्हांस आहे म्हणून वरकरणीं तुम्ही नेहमीं म्हणत असतां, तिचा एक शतांश जर तुमच्या अंगांत खरोखरीच

वास करीत असेल, व त्या मर्द आर्यांचे केवळ मिथ्याभिमानी वंशज तुम्ही नसाल, तर त्यांच्याप्रमाणें आपल्या हातून पौरुषाचीं कृत्ये होण्यासाठीं सोळा वर्षेंपर्यंत बापानें आपणांस वाटेल तशा रीतीनें स्नेहपूर्वक आपल्या घरीं आपल्या मुलींचें संगोपन करावयाचें, आणि तिला तें वय प्राप्त झाल्यावर, आपल्या व तिच्या संमतीनें योग्य वर पाहून त्याच्या स्वाधीन तीस करावयाचें-अशी चाल घाला, आणि येथून पुढें होणाऱ्या संततीच्या मानास आणि कृतज्ञतेस पात्र व्हा ! एकदां असें करण्याचा निश्चय कराल तर साऱ्याच कटकटींतून सुटाल, आणि एकवार जिवाचा धडा करून अशी रूढि उघडपणें पाडण्यास प्रवृत्त व्हाल. तर ज्यांना अलीकडे कित्येकांनीं 'प्रतिगामी अथवा प्रतिकारी' (Reactionists) असें नांव ठेविलें आहे, त्यांपैकीं जे खऱ्या वास्तविक उपयुक्त सुधारणेस मुळींच प्रतिकूल नाहींत, असे इसम तुम्हांस येऊन मिळतील, आणि 'थंडे व गरम,' 'उतावीळ आणि मठ्ठ,' 'सुधारक आणि दुर्धारक' वगैरे संज्ञांनीं अलीकडील वादांत व्यक्त होऊं लागलेल्या मतभेदाचा निरास होऊन आपण सारे एकदिलानें स्वोन्नति व राष्ट्रोन्नति करण्यास लागूं.

कायदा मागतां ते जात कां करीत नाहीं ? : : ३२

ज्या लोकांची अद्याप समजूत अशी आहे कीं, पाश्चात्यांपासून राजकीय गोष्टींत मात्र आपणांस काय तें शिकण्यासारखें आहे, बाकी जी आमची गृहस्थिति आज अनादिकालापासून चालत आली, जिनें मोठाल्या क्रांत्यांशीं टक्कर मारिली, व जिचे पाय भक्कम खडकावर भरले आहेत, तींत ढवळाढवळ करून पाश्चात्य गृहपद्धतीच्या घर्तीवर ती अंशतःही नेण्याचा प्रयत्न करणारे झाडून सारे वेड्यांच्या इस्पितळांत पाठविण्याच्या योग्यतेचे आहेत, त्या लोकांनीं 'आम्हांस ही तुमची सुधारणा नको व तुम्हांस आमचें ऐकावयाचें नसेल तर करा वेगळी जात आणि व्हा मोकळे' असा सल्ला द्यावा, याचें आम्हांस नवल वाटत नाहीं. परंतु ज्यांचीं मतें वरच्यासारखीं नाहींत व इंग्रजी राज्य-

व्यवस्थेप्रमाणें त्यांची गृहस्थितीही बऱ्याच गोष्टींत अनुकरणीय आहे अशी ज्यांची खात्री आहे व ती ज्यांनीं स्पष्ट शब्दांनीं व्यक्तही केली आहे अशा लोकांनींही 'कायदा नको' असें आपण एकदां प्रतिपादिलेलें सोडावयाचें नाहीं, एवढ्याच दुराग्रहावर 'बाप दाखवा नाहीं तर श्राद्ध करा' या न्यायाचा अवलंब करावा; व 'कायद्याचें तरी नांव सोडून द्या, नाहींतर वेगळी जात तरी करा' असा मोठ्या गंभीरपणानें उपदेश करण्यास प्रवृत्त व्हावें, याचें आम्हांस राहून राहून आश्चर्य वाटतें. त्यांस हें कळत नाहीं कीं—

श्रुतिस्तु वेदोविज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः
योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयाद्विजः
स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिन्दकः

या मनूच्या कायद्याची अंमलबजावणी सर्व कालीं व सर्व स्थळीं होत रहाणें अशक्य असल्यामुळें 'बाप दाखवा नाहीं तर श्राद्ध करा' हेंहि तर्कशास्त्र नेहमीं व चोहींकडे निर्दोषच मानलें जाईल, असें नाहीं. तसेंच 'सामाजिक गोष्टींत कायदा नसावा' हें युरोपियन ऋषींचें सूत्रहि सर्वच स्थितींत लागू पडण्यासारखें नाहीं. त्यासहि अपवादस्थलें आहेत. 'एखाद्या पदार्थास गति मिळाली म्हणजे ती तशी सतत चालू असते' हा पदार्थविज्ञानशास्त्राचा नियम सामान्यतः जरी खरा आहे, तथापि त्यास पदोपदीं अपवाद दिसतात. मग जड पदार्थही जर एका सृष्टिनियमानें बांधले जात नाहींत, तर हवापाणी, चालीरीति, आचारविचार, धर्मसंस्था, शिक्षणक्रम वगैरे असंख्य कारणांनीं प्रतिक्षणीं भेद पावणाऱ्या सचेतन मानवी प्राण्यांच्या समाजास सर्व स्थितींत एकाच सूत्रानें बांधूं पाहणें किती हास्यास्पद आहे, हें अधिक स्पष्ट करून दाखविण्याची मुळींच आवश्यकता नाहीं.

आतां 'जात करा' हा आमच्या बंधूंचा उपदेश जर खरोखरच खोडसाळपणाचा नसेल, व कायदा मागण्यापेक्षां जात केल्यानें सुधारणा जर अधिक त्वरित, अधिक व्यापक, व अधिक सुखकर होणें शक्य असेल, तर या आमच्या मित्रांनीं 'जात करा' अशी आम्हाला मसलत देण्याचें सोडून 'चला आपण जात करूं या' असाच उपदेश केला असता. कारण कीं, बोलण्याप्रमाणें करून दाखविण्याचें धैर्य नसल्यामुळें जसे कायदेवाले भेकड

ठरतात, व त्यांचें पुढारित्व जसें त्यांच्यापासून हिसकावलें जातें, त्याप्रमाणेंच सुधारणा पाहिजे म्हणणारे बेकायदेवालेहि उदाहरण घालून देईपर्यंत भेकड कां मानले जाऊं नयेत? व त्यांच्याजवळच तेवढें पुढारित्वाचें पदक कां राहूं द्यावें? याची आमचे बेकायदेवाले फोड करतील काय? हो, अलबत. याची फोड पुष्कळ वेळ केली गेली आहे. ती काय बरें? ती इतकीच कीं, ज्यांस लोकनायकाचें काम करावयाचें असेल, त्यांनीं लोकांचेंहि कांहीं ऐकिलें पाहिजे; प्रत्येक गोष्टींत आपलाच हेका चालवून उपयोग नाहीं; कांहीं कांहीं गोष्टींत त्यांच्याच धोरणानें घेतले पाहिजे. बरें ठांक आमच्याही मतें वरील उपदेश खचित गृहणीय आहे, व आम्हांस तर वाटतें कीं आम्हीही त्यांस सोडून वागत नाहीं. वाः! मग कायदा कां मागतां? लोक कायद्याच्या विरुद्ध असतां तो मागत बसणें म्हणजे कांहीं लोकांच्या धोरणानें चालणें नव्हे! यावर आम्ही असें उत्तर देतों कीं, लोकनायकांनीं कांहींसें लोकांच्या धोरणानें घेतलें पाहिजे, हें जरी आम्हांस पूर्णपणें संमत आहे, तथापि कायदा हा शब्द तोंडावाटे काढला कीं, लागलाच लोकांच्या धोरणानें न वागण्याचा आरोप आम्हांवर कसा लागू होतो, हें मात्र दुराग्रहाच्या तर्कशास्त्रावांचून सिद्ध करून देतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं, लोकनायकांनीं जसा अंशतः लोकमताचा आदर केला पाहिजे, त्याप्रमाणें लोकांनींही नायकांच्या मताचा अंशतः अंगिकार केला पाहिजे, हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. परंतु सर्व तंटा काय तो वरील वाक्यांतील 'अंशतः' या अज्ञात संख्येची किंमत ठरविण्यांत पडला आहे. बालविवाहाच्या दुष्ट प्रचारापासून होणारे सर्व अनर्थ टळण्यास मुलींचा विवाहमर्यादा निदान सोळा वर्षापर्यंत तरी गेली पाहिजे, हें विचार करण्याची इच्छा असल्यास, कोणासही सहज समजण्यासारखें आहे परंतु रजोदर्शनानंतर कन्येचा विवाह करणें म्हणजे नरकाची सामग्री करणें होय, हा आमच्या लोकांचा समज जोंपर्यंत शिथिल झाला नाहीं तोंपर्यंत १६ वर्षोपर्यंत कायद्यानें मुळींच लग्नें बंद करूं पाहणें म्हणजे अत्यंत जुलूम होय, ही गोष्ट कायदा मागणारें पूर्णपणें जाणून आहेत, व असा कायदा करावा, असें कोणींही सुचविलें नाहीं. कायद्याची इयत्ता काय ती १० पासून १२ वर्षांच्या दरम्यानच सुचविली

जात आहे; व बारा वर्षांपर्यंत मुली अविवाहित रहाणें हें कांहीं लोकाचाराच्या विरुद्ध आहे, असें कोणास प्रतिपादितां येणार नाहीं. तेव्हां अशा रीतीनें कायदेवाल्यांची परमावधीची इयत्ता जर बारा वर्षांपुढें गेली नाहीं तर ते लोकांच्या समजुतीचा आदर करीत नाहींत, व लोकांच्या धोरणानें चालत नाहींत, हें बेकायदेवाल्यांनीं कोणत्यां आधारानें ठरविलें, याचा आम्हांस उमज पडत नाहीं. असो; इसापनीतींतील लांडगा आणि कोकरूं या गोष्टींतल्या लांडग्याप्रमाणें 'तूं नाहीं तर तुझ्या बापानें शिव्या दिल्या असतील,' या न्यायानेंच कांहींतरी दोष कायदेवाल्यांच्या माथीं मारण्याचा बेकायदेवाल्यांनीं निश्चयच केला असल्यास, 'ब्रह्मापि तं नरं न रंजयति' असेंच म्हटलें पाहिजे. दुराग्रहाच्या तर्कशास्त्रांतील दोष दाखविण्यास दुसरा मार्ग नाहीं. कायदा करून घेतला असतां नुकसान होईल, असें दाखवितां येईना म्हणून वाटेल तें बहकत सुटावें हा तर या बेकायदेवाल्यांचा नित्याचा क्रम. 'या पारशानें आपल्या जातीची सुधारणा करण्याचें सोडून हिंदूंच्या सुधारणेचा उठाठेव कां करावा?' हा मुद्दाही वरच्याच मालेंतील आहे. पण या आमच्या मलबारीच्या द्वेष्ट्यांस आम्ही असें विचारतों कीं, हिंदुस्थानांतील मद्यसेवनाचा दुष्ट प्रघात नाहींसा करण्याकरितां एकादा केन, देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आपणांस उपदेश करीत फिरला, व त्या घातक व्यसनाचा बीमोड करण्यास कायदा मागूं लागला तर त्यांत मात्र आम्हांस कांहीं वावगें दिसून येत नाहीं, आणि बिचारा मलबारी तेवढाच आमच्या तिरस्कारास पात्र होतो, याचें इंगित काय? केनसाहेबास जर कोणी असें म्हणता कीं 'अरे बाबा, आपल्या स्वतःच्या देशांतलें दारूचें व्यसन नाहींसें करण्याचें सोडून तूं आमच्या कां वाटेस जातोस?' तर आम्ही त्यांची काय किंमत केली असती? व तोच आक्षेप मलबारींवर आणणारांचीही किंमत तींच होते, हें कां नव्यानें सांगितलें पाहिजे?

असो, आतांपर्यंत आम्हीं जें लिहिलें आहे, तेवढयावरून कायदा मागणारे लोक समाजाच्या धोरणानें वागत नाहींत, समाजास अज्ञातपूर्व व अरूढ अशा गोष्टींबद्दल कायदे करवून त्यांच्यावर मोठा जुलूम करीत आहेत

व यांना सारी सुधारणा एकदम करायला पाहिजे आहे वगैरे आक्षेपांस ते पात्र नाहींत, व म्हणून त्यांस वेगळी जात करा असा उपदेश करण्याचें प्रयोजन नाहीं, असें दिसून येणार आहे. आतां 'जात करा' असें म्हणतां, 'जात करूं या' असें म्हणणारांविषयीं दोन शब्द लिहून हा विषय संपवितों व त्यावरूनही, जात करण्यापेक्षां कायदा मागणें हेंच इष्ट आहे असें दिसून येईल.

'जात करूं या' असा सल्ला देणारे सुधारणेच्छु व 'जात करा' असें म्हणणारे बेकायदेवाले यांच्यांत फार अंतर आहे. बेकायदेवाल्यांच्या मतें आम्ही जी आमच्या गृहस्थितीविरुद्ध ओरड करितों, ती जणूं काय त्यापासून आमचें स्वतःचें व्यक्तिशः नुकसान होत आहे म्हणून करतों. परंतु 'जात करूं या' म्हणणारे लोक या गृहस्थितीपासून एकंदर देशाचें मोठें नुकसान होत आहे, व तें बंद करण्यास जात करणें हा एक उत्तम उपाय आहे, असे म्हणणारे आहेत. ते म्हणतात कीं, जरी आपण एक बालविवाहाचा कायदा केला तथापि त्याचे योगानें फार तर १२ वर्षेंपर्यंत मुलगी अविवाहित राहील. परंतु ऋतुप्राप्तीपुढेंही तिला अविवाहित ठेवण्यास वेगळी जातच केली पाहिजे. तसेंच विधवांवर होत असलेला जुलूम दूर करणें ही जर सुधारणेच्या अनेक गोष्टींपैकीं एक गोष्ट असेल, तर तीही वेगळी जात केल्यावांचून होणार नाहीं. परंतु या वर्गांतील लोकांनीं आमच्या मतें जात करण्याच्या सर्व अडचणींचा विचार केला नाहीं. ज्या कारणांकरितां आम्ही कायदा मागतों, त्याच कारणांकरितां जात करणें योग्य नाहीं. बालविवाहाची चाल वाईट आहे, अशी पूर्ण समजूत असणारे लोक ८ व्या किंवा ९ व्या वर्षी आपल्या मुलींचीं कां लग्नें करतात बरें ? याचें कारण इतकेंच कीं, यापुढें मुलगी अविवाहित राहिल्यास लोक संशय घेतात, व तेणेंकरून मुलीस योग्य स्थळ मिळेल कीं नाहीं अशी भीति उत्पन्न होते. कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे हे ब्राह्मण असूनही त्यांच्यांत परस्पर बेटीव्यवहार होत नसल्यामुळें निवडणुकीचा प्रदेश आधींच संकुचित झाला आहे तो अधिक संकुचित होऊं न देण्याविषयीं झटणें, हें प्रत्येक पित्याचें कर्तव्य होऊन बसतें. दुसरें, कदाचित् कांहीं तजविजीनें मुलीचें नुकसान न होऊं देण्याविषयीं खबरदारी

घेणें शक्य असलें तथापि वडील माणसांच्या इच्छेविरुद्ध जातां येत नाहीं. तेंच कायदा असला म्हणजे सर्वच मुली ११ वर्षांपर्यंत अविवाहित राहिल्यामुळें योग्य स्थळ मिळण्याची काळजीही दूर होईल, व वडील माणसेंही नाखूष होण्याची भीति नाहीं. आतां अशा रीतीनें वडील माणसांचीं तोंडें बंद करणें म्हणजे केवळ भेकडपणा आहे, असें कित्येकांस वाटतें. परंतु काळ्या रंगाची, आखुड शिंगाची, व पुष्कळ दूध देणारी गाय मिळेपर्यंत दूधच घ्यावयाचें नाहीं, असा सर्वांनीं निश्चय केल्यास कसें होईल हें सांगत बसण्याची आवश्यकता नाहीं. कायद्यानें मनें दुखवतात, तो करूं नये; अवज्ञा केल्यानें मनें दुखवतात, तेव्हां तसें करूनही त्यांची मर्जी मोडूं नये; फार दिवसांच्या रूढीनें त्यांचे विचार निश्चित झाले असल्यामुळें त्याविरुद्ध त्यांच्याशीं वाद करणें म्हणजेही त्यांची मनें दुखवण्यासारखें आहे, म्हणून त्याच्याही भरीस पडूं नये, असाच वाद घालीत बसल्यास त्यास आमच्याजवळ उत्तर नाहीं. प्रवाशास जसा नेहमींच सपाट रस्ता मिळणें अशक्य आहे, व नेहमींच प्रातःकाळचा शीतल मंद वारा अनुभवितां येणें शक्य नाहीं, तशीच सुधारकांचीही गोष्ट आहे. सारासार विचार केला पाहिजे एवढें मात्र खरें. असो.

तेव्हां जोंपर्यंत मनुष्यस्वभाव बदलला नाहीं तोंपर्यंत वडिलांची मर्जी होईल तितकी सांभाळण्यास झटणें, व आपल्या पोटच्या गोळ्यांची काळजी वाहणें या गोष्टी नाहींशा होणार नाहींत, व यांपासून सुधारणेस येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्या म्हणूनच कायदा पाहिजे हे जर खरें असेल तर जात कशी करतां येईल ही शंका आहे. कारण जात केल्यानें आपल्या सर्व व्यवहाराचा प्रदेश फारच संकुचित होणारा आहे, व तेणेंकरून फार त्रास भोगावा लागेल, व वडिलांची मर्जी मोडतां न आल्यामुळें, मुलींस एकादें दुसरें वर्ष अविवाहित ठेवण्यास जर फारसे लोक तयार नाहींत, व देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे यांच्यांतही परस्पर विवाह होण्यास जर अद्याप आरंभ झाला नाहीं, तर वेगळी जात करण्यास कितीसे लोक तयार होतील, हा एक प्रश्न आहे. बरें, इतक्याही अडचणी सोसून आपण जात केली, तर लोकसमाज

लवकरच आपल्या मागून येईल अशी खात्री आहे काय ? व अशी खात्री देण्याजोगी जर वस्तुस्थिति नाहीं, तर वेगळी जात केल्यानें धड ना स्वार्थ ना परमार्थ असा प्रकार होणार आहे. एकंदर समाजाचें पाऊल पुढें पडावें हा तर आपला मुख्य उद्देश, व तो जर साधत नाहीं, तर आपण स्वतांस ताप करून घेऊन आपल्या मुलाबाळांच्या भावी कल्याणाविषयीं बेफिकीर राहणें हें सर्वथा अयोग्य होय. शिवाय, जात करण्यापासून केवळ स्वतःचें हित साधावयाचें नसल्यामुळें व सर्वच सुधारणा एका घावानें करूं पाहण्यानें आपल्याविषयीं लोकांच्या मनांत अविश्वास उत्पन्न होतो, असा कित्येकांचा आक्षेप असल्यामुळें ब्राह्मण सुधारकांची एक जात, शेणवी सुधारकांची दुसरी जात, परभूंची तिसरी जात असे अनेक भेद मात्र होणार व इतकेंही करून समाज तर अनुकरण करण्यास तयार नसणार. मग जात करणें म्हणजे आपलें व आपल्या पुढील पिढ्याचें जाणूनबुजून नुकसान करणें, व आधींच एकाचें तोंड पूर्वेस तर दुसऱ्याचें पश्चिमेस असें करून टाकणाऱ्यां दुष्ट जातिभेदाचें बंड निरर्थक वाढविण्याच्या पातकाचें भागीदार होणें नाहीं काय ? कन्या ऋतुमती झाल्यावर तिचा विवाह करण्यानें जातीबाहेर जावें लागण्याचें कारण नाहीं. तसें झाल्यास गोप्रदान करावें किंवा तिच्या जितक्या पाळ्या झाल्या असतील तितक्या ब्राम्हणांस भोजन घालून दक्षिणा द्यावी. असें 'संस्कारकौस्तुभां'त सांगितलें आहे. आतां पुनर्विवाहास जरी शास्त्राधार आहे, तथापि रूढीच्या बलवत्तर प्रभावामुळें लोक दुराग्रहानें तो कबूल करीत नाहींत हें खरें आहे व हा अन्याय दूर झाला पाहिजे हेही खरें आहे. परंतु पांचपन्नासाची जात करून म्हणजे हा अन्याय खात्रीनें बंद होईल, असें आम्हांस वाटत नाहीं. बालविवाहाच्या कायद्यानें जसें निदान १२ वर्षांच्या आंतील सर्व कन्यांचें वैधव्य खात्रीनें बंद करतां येईल, तसें जात करून समाजाच्या बऱ्याच भागांतून हा कलंक नाहींसा होण्याची आशा नाहीं. केशवपन केलें नाहीं तर कोणी जातीबाहेर टाकतो असें थोडेंच आहे. शारदासदनासारख्या ठिकाणीं त्यांस ठेवून, दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याच्या दीन स्थितींतून त्यांची सुटका केल्यास कोणी बहिष्कार घालतो असें नाहीं; पण तेंही करण्यास समाज तयार

नाहीं. मग असें ढळढळीत आपणांस दिसत असून वेगळी ज़ात केल्यानें हा अन्याय दुर होईल असें आपण कसें मानावे ? हजारों वर्षांच्या संवयीनें आमचीं मनें या गोष्टीसंबंधानें इतकीं घट्ट होऊन गेलीं आहेत कीं, त्यांच्यावर कितीही आघात केले तरी त्यांस कांहींही होत नाहीं. ' बोलणें फार झालें ' ही हाकाटी ' जो उठला तो इंग्रजी शिकतो ' या हाकाटीप्रमाणेच भ्रामक आहे. या गोष्टींतील अन्याय लोकांस कळून येऊन तो बंद करण्याकडे त्यांची साक्षात् प्रवृत्ति होण्यास झालें हें बोलणें व लिहिणें कांहींच नाहीं. प्रत्येक शहरांत, प्रत्येक गांवांत, खेड्यांत यासंबंधानें लोकमत तयार करण्यास झटलें पाहिजे. प्रत्येक सभागृहांत, बाजारांत, चव्हाट्यावर, व्यासपीठावर, कीर्तनांत, पुस्तकगृहांत जिकडे तिकडे याविषयीं एकसारखी चर्चा चालू झाली पाहिजे, व अशी चळवळ करणाऱ्या सुधारक मिशनरींची जात होईपर्यंत वेगळी जात करण्यापासून फलप्राप्ती होण्याचा संभव नाहीं.

हिच्या नांवानेंही तीच रड : : ३३

आमच्या वाचकांच्या पारतंत्र्याविरुद्ध, अज्ञानाविरुद्ध, ढिल्या पोषाखाविरुद्ध, तऱ्हेवाईक बहुमोली दागिन्यांविरुद्ध, किंवा आमच्या धर्मांतील कित्येक हास्यास्पद आचारांविरुद्ध कोणी कांहीं लिहिलें तर ज्यांचें माथें फिरून जातें, असे लोक व्यापारीय किंवा राजकीय विषयांच्या चर्चेचे मोठे चहाते असतील, व व्यापारीय आणि राजकीय खटपटींत आपलें मन घालून त्यासंबंधानें आपल्या पदरास कांहीं खार लावून घेत असतील, असें म्हणावें तर त्याची मोठी शंका आहे. कारण, धार्मिक व सामाजिक सुधारणेविषयीं आमच्या लोकांत जितकी अनास्था व विरोधबुद्धि दिसते, तितकी आस्था व कर्मोद्युक्तता व्यापारीय व राजकीय सुधारणेविषयीं दृष्टीस पडती तर आजमितीस सर्व देशभर येवढी अन्नान्नदशा आणि इतकी परवशता कां दृष्टीस पडतीं ? कोण काय पाहिजे तें म्हणो, आम्हांस तर अलीकडे असें वाटूं लागलें आहे कीं,

क्षुद्र स्वार्थसाधनाविषयीं पराङ्मुख होऊन, केवळ राष्ट्रीय किंवा केवळ सार्वजनिक हिताच्या कोणत्याही लहान किंवा थोर गोष्टींसाठीं निरपेक्षबुद्धीनें व निरलसतेनें झटणारा मनुष्य लाखांत एकसुद्धां आढळणार नाहीं ! आज ज्या राजकीय हक्कांचा उपभोग आम्ही घेत आहों, किंवा यांत्रिक शिक्षण आणि व्यापारवृद्धि यांविषयीं ज्या थोड्याबहुत सोई करण्यांत आल्या आहेत, त्यांपैकीं एक तरी आमच्या परिश्रमाचें फळ आहे, असें कोणी छातीवर हात ठेऊन म्हणूं शकेल काय ? आपल्या व परक्या राजापुढें आणि बादशहांपुढें, किंवा धर्मगुरूंपुढें जे आम्ही हजारों वर्षे डोकीं व गुडघे घाशीत आहों, व **राजा कालस्य कारणम्** हें परावलंबसूची राजकीय तत्त्व ज्या आमच्या हाडामासांत खिळून गेले आहे, त्या आम्ही कोणतीही सुधारणा स्वपराक्रमानें करण्याची व्यर्थ वल्गना कशासाठीं करावी ? ज्या जुन्या पद्धतींच्या लोकांना आपल्या गांवाबाहेर किंवा प्रांताबाहेर काय चाललें आहे याची नीट कल्पना नाहीं, अशांनीं जुन्या विचाराला मगरमिठी घालून बसून, त्यांविरुद्ध अलीकडील सुशिक्षितानें किंवा सरकारनें येवढेंसें कांहीं करावयाचें म्हटलें कीं गयावया करीत सुटावें, हें नीटच आहे. जुन्यापैकीं एखादा महामहोपाध्याय कांघ्याना ? तो म्हणजे तुमच्या राष्ट्रसभेस अनुकूल असेल, आणि संमतीचें वय वाढविण्यास मात्र प्रतिकूल असेल, असें सहसा व्हावयाचें नाहीं, हें निदान पुण्याच्या लोकांना तरी सांगावयास नको आहे. जितका सामाजिक विचारांचा तितकाच राजकीय अथवा व्यापारीय विचारांचा संस्कार त्यांच्या बुद्धीवर झालेला असतो ! अर्वाचीन कालांतील हरएक प्रकारची चळवळ आपल्या संकुचितदर्शनामुळें व अज्ञानामुळें त्यास विनाशक व भयप्रद वाटत असल्यामुळें, तो तिचा संसर्ग टाळण्यासाठीं तीपासून होईल तितका दूरदूर पळत असतो, आणि आपल्या भेकडपणावर आणि पुराणप्रियतेवर मिथ्या देशाभिमानाचें आणि लोकहितवादित्वाचें अवगुंठन घालीत असतो ! असें नसेल तर वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य, स्थानिक स्वराज्य, ज्यूरीची पद्धत किंवा अशाच प्रकारच्या इतर गोष्टींपैकीं अमुक एक गोष्ट संपादण्याविषयीं यानें खटपट केली व ती याच्या मेहनतीनें आम्हांस प्राप्त झाली, असें कोणी तरी सिद्ध करून दिलें पाहिजे. तात्पर्य, आमचे जुने व बडे

लोक जितके सामाजिक सुधारणेविषयीं तितकेच राजकीय व व्यापारीय सुधारणेविषयीं अज्ञान व उदासीन आहेत, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. **असें नसतें तर राष्ट्रसभेच्या नांवानेंहि पुनः पुनः तीच रड कां ऐकावी लागती!** पण या राजकीय परिषदेचें महत्त्व तरी कळतें आहे कोणाला! मांडलिकांना, छोटेखानी राजेरजवाड्यांना, व मोठमोठ्या जहागिरदारांना असें वाटत आहे कीं, ही सामान्य लोकांची सभा महाराणीसरकारची दुस्मानगिरी करणारी आहे, आणि म्हणून तीस आपली अनुकूलता आहे; असें दाखविणें, किंवा कोणत्याही प्रकारें तिला मदत करणें, हें पोलिटिकल अधिकाऱ्यास आपल्या राजनिष्ठेविषयीं अंदेशा येण्यास कारण होणार आहे. सबब, तीपासून आपणांस जितके अलिप्त राहवेल तितकें आपण राहिलों तरच आपल्या गाया व आपलें मुलूख कायम राहून, प्रजेच्या जिवावर आपली चैन चालणार आहे! हिंदुस्थानांत लहानमोठीं मिळून पांचशे संस्थानें तरी असतील. इतक्यांनीं राष्ट्रसभेस प्रतिवर्षी अगदीं स्वल्प मदत केली तरी तिची किती दगदग चुकणार आहे. पण जर या संस्थानिकांस असें वाटत असेल कीं, या सभेस आपण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें साहाय्य दिलें तर लाटसाहेब आपणास फांशीं देतील, अथवा आपला मुलूख खालसा करून आपल्या हातीं चौपदरी देतील. तर, राष्ट्रसभेच्या फंडांस एक रुपया तरी देण्याचीं त्यांची छाती कोठून होणार? या आमच्या लिहिण्यास मुळींच अपवाद नसेल, असें आमचें म्हणणें नाहीं. पण असला तरी तो इतका स्वल्प आहे कीं, त्यामुळें आमच्या सामान्य विधानास क्षीणता न येतां उलट त्याचें पुष्टीकरणच होतें. ही या धनाढ्य बड्या लोकांची दशा! आतां सरकारी नोकर! ते तर बोलूनचालून सरकारी नोकर! ते केवढेही पगारवाले व अक्कलवाले असले म्हणून राष्ट्रसभेच्या कामास उघडपणें मदत करतील कीं काय? करतील तर दुसरे दिवशीं आपल्या अधिकारास मुकतील व अन्नास मोताद होतील! आपला नोकर राष्ट्रसभेस अनुकूल झाला, आणि तिच्याप्रीत्यर्थ कांहीं हालचाल करूं लागला तर आपली धडगत होणार नाहीं, अशी सरकारास दहशत पडून, त्यानें म्युनिसिपॅलिट्या आणि लोकलबोर्डास यांतील गरीब मेंढरांच्या संबं-

धानेंही खरमरीत ठराव करुन सोडिले आहेत. राहतां राहिले शहाणेसुतें शेटसावकार. हे तुमच्या जुन्या लोकांप्रमाणेंच राष्ट्रसभेविषयीं गूढ अज्ञानांत आहेत. राष्ट्रसभेस मदत करण्यानें प्राप्तीवरील कर झट्दिशी कमी होता किंवा एखाद्या मोठ्या जिनसावरील जकात उठती तर त्यांनीं तुमच्या राष्ट्रसभेस रुपयामागें दमडीटोलीची मदत केली असती. पण तसें करून दाखविण्याचें सामर्थ्य या सभेच्या अंगांत नसल्यामुळें, हे लोक तीविषयीं अगदीं बेफिकीर आहेत, असें म्हटलें तरी चालेल. बाकी राहिलेल्या नांगऱ्यांचा तर विचार करण्याचीच गरज नाहीं. ते बोलून चालून नांगरे ! हवीं तितकीं राज्यांतरे व धर्मांतरे झाली तरी त्याचा संसर्ग त्यापर्यंत अद्यापि कधींच जाऊन न पोहोंचल्यामुळें ते वैदिक कालापासून आहेत त्या स्थितींत आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं येणेंप्रमाणें येथील अनेक प्रकारच्या वर्गांतील लोकांची हालहवाल असल्यामुळें इतर संस्थांप्रमाणें आमची राष्ट्रसभाही अशी तशीच चालली आहे, व दुर्दैवानें ह्यूम तिचें चिटणीसपण सोडतील तर ही आणखी दहापांच वर्षे चालेल किंवा नाहीं, याची शंका आहे ! तर मग आतां करावें तरी काय ? निरुपाय म्हणून स्वस्थ बसावें कीं कांहीं धडपड करून पहावी ? अर्थात् ज्याला अर्वाचीन सुशिक्षणाचा कांहीं संस्कार झाला असेल तो कांहीं धडपड करून पहावी असें म्हणेल हें उघड आहे. पण ही धडपड कोणी करावी ? आमच्या मतें ती करणें सद्यःस्थितींत आमच्या वकिलांचें व पत्रकर्त्यांचें कर्तव्य आहे. पैकीं पहिल्यांकडून तें थोडेंबहूत बजावले जातें; पण दुसऱ्यांकडून मात्र तें हवें तसें वठूं लागलें नाहीं. या आरोपांचा पुरावा पुढेंमागें दिला पाहिजे, नाहींतर बेअब्रूची फिर्याद करून घेण्यास तयार झाले पाहिजे, हें आम्ही जाणून आहों !

मूळ पाया चांगला पाहिजे : : ३४

सर्वसुधारणा, आचारसुधारणा, राजकीय सुधारणा वगैरे वर्ग केवळ व्यवस्थेकरितां केलेले आहेत. त्यांपैकीं अमुकास पहिला नंबर, अमुकास दुसरा नंबर, अमुकास तिसरा नंबर, असें कांहीं ठरविता येणार नाहीं. ते सर्व मनुष्यांच्या वेगळाल्या व्यवहारांचे व्यंजक होत व त्या सर्वांची एकसमयावच्छेदेंकरून सुधारणा होत जाणें, म्हणजेच मनुष्यांची किंवा त्यांनीं वसविलेल्या राष्ट्रांची सुधारणा झाली, असें म्हणतां येईल, हें आम्हीं वेळोवेळीं दाखविलेंच आहे. परंतु तें सर्वांस संमत नाहीं, असें भोंवतालच्या स्थितीवरून दिसतें. कित्येकांस वाटतें कीं, राजकीय सुधारणा सोपी आहे. सामाजिक सुधारणेविषयीं जशीं रणें पडतात, तशी या राजकीय सुधारणेची गोष्ट नाहीं. त्याविषयीं सर्व लोकांचें एकमत आहे. याकरितां सामाजिक सुधारणेविषयीं व्यर्थ खटपट करून, लोकांच्या शिव्याशापास पात्र होण्यापेक्षां, व आपसांत कलह माजवीत बसण्यापेक्षां, सर्वांनीं एकदिलानें राजकीय सुधारणेच्या मार्गे लागावें, हा उत्तम पक्ष होय. वरील उपदेश योग्य आहे, अशी आमची खात्री असूनही, लोकसमुदायास न रुचणाऱ्या गोष्टी आम्ही आग्रहानें पुढें आणीत असतों, तर त्यांत आमचाच दोष झाला असता. परंतु वरील उपदेश करणारांनीं नुसती वर वर नजर दिली आहे; त्यांनीं शांतपणानें खोल विचार केला असतां, त्यांचें मत खचित आमच्याप्रमाणें झाल्यावांचून राहणार नाहीं, व तें होईपर्यंत, ज्या राजकीय सुधारणेपासून आपले सर्व पुरुषार्थ आपणांस प्राप्त होतील अशी कित्येकांची समजूत आहे, ती राजकीय सुधारणाही होणें शक्य नाहीं, हें आम्ही दाखविणार आहों.

राजकीय सुधारणा आम्हांस पाहिजे, असें आम्ही कां म्हणतों ? तर त्यापासून नफा होईल असें आम्हांस वाटतें म्हणून. सामाजिक सुधारणा आम्हांस कां नको ? त्यापासून आमचें नुकसान होईल असें आम्हांस वाटतें म्हणून. तात्पर्य कोणती गोष्ट इष्ट आहे, व कोणती गोष्ट इष्ट नाहीं, हें आपण केवळ नफ्यातोट्यांच्या तारतम्यावरूनच ठरवितों व येथेंच चूक होते. हें आमचें म्हणणें सकृत्दर्शनीं चमत्कारिकसें भासेल, व तें तसें भासावें

यांतही नवल नाहीं. कारण कीं आजपर्यंतचे जगाचे सर्व व्यवहार नफा-तोट्यावर दृष्टि देऊनच झाले आहेत, हल्लींही होत आहेत, व पुढेंही होत राहतील, याविषयीं आम्हांसही शंका नाहीं. मग असें असून, येथेंच चूक होते, असें आम्ही कसें म्हणतों, अशी पृच्छा सहज होणारी आहे, व त्याचें उत्तर देण्याच्या ऐवजीं आम्हीही वाचकांस कांहीं उलट प्रश्न करतों, व त्याचें जें उत्तर तेंच वरील प्रश्नाचें उत्तर होय. धर्म या सदराखालीं ज्या शेंकडों बऱ्यावाईट गोष्टी आपण करतों, त्यांपैकीं बहुतेक कायद्याच्या दृष्टीनेंच आपण करतों. अमुक झाल्यास अमुक करीन, तमूक झाल्यास तमूक करीन अशा अटीवरच शेंकडा नव्याण्णव लोकांचे शेंकडा नव्याण्णव धर्माचार होत असतात हें आपणा सर्वांस माहीत आहेच. बायकांचें वपन कां करावें ? तर त्यांच्या कबरीबंधानें नवऱ्यास बांधलें जाऊं नये म्हणून. ऋतुप्राप्तीपूर्वीच कन्येचा विवाह कां केला पाहिजे ? तर आपल्या ४२ कुळ्या नरकांत जाऊं नयेत म्हणून, सती कां जावें ? तर तसें केल्यानें अनंत कालपर्यंत स्वर्गसुख मिळेल म्हणून. तात्पर्य, कांहीं ना कांहीं फायदा होईल अशी खरी किंवा खोटी समजूत झाल्यावांचून, तो तो मनुष्य तें तें धर्माचरण करीत नाहीं. परंतु असें असूनही निष्काम भक्तीचा महिमा अधिक कां वर्णिला जावा ? या प्रश्नाचें उत्तर ज्यास देतां येईल, त्यास आमच्याही म्हणण्याचा अर्थ समजेल. अमुक गोष्ट कां केली पाहिजे, तर तें माझें कर्तव्य आहे म्हणून, व अमुक गोष्ट कां केली पाहिजे, तर त्यापासून मला फायदा होतो म्हणून. या दोन गोष्टींत फारच मोठा भेद आहे. आपलें कर्तव्य समजून एखादी गोष्ट करणारा मनुष्य जसा नेटानें व निश्चयानें ती करतो, तसा फायद्यावरच नजर देणारा मनुष्य करूं शकणार नाहीं.

वरील गोष्टी आतां आपण लोकांस प्रिय असणाऱ्या राजकीय सुधारणे-सच लावून पाहूं. कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद असले पाहिजेत असें राष्ट्रीय सभेचे चालकही म्हणतात, व इतर सर्व लोकही म्हणतात. परंतु या दोघांची दृष्टि अगदीं वेगळी आहे. ज्या कायद्यांचा अम्मल अमुक एक लोकसमुदायावर होत असेल, ते कायदे करणें हा केवळ त्याच लोकसमु-दायाचा हक्क आहे; ते करण्याचा दुसऱ्या कोणासही अधिकार नाहीं, हें

प्रमेय पुढें ठेवून वर्तन करणें, व ज्याचे त्यानें कायदे केल्यास त्यापासून अधिक सुख होतें हा सिद्धान्त पुढें ठेवून वागणें यांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. पुराणांतरीं वर्णन केलेल्या रामचंद्रापेक्षांही अधिक न्यायी, अधिक प्रजाहितैषी असा राजा असून, त्यानें केलेल्या कायद्यापासून, प्रजेस कितीही सुख होत असलें तथापि ते करण्याचा त्यास अधिकार पोंचत नाहीं, या तत्त्वावर नजर देऊन फायद्याकडे दृष्टि न देतां आले गेलेले हक्क योग्य उपायांनीं मिळविण्याकरितां जे लोक, हें आपलें कर्तव्य समजून निश्चयानें यत्न करीत आहेत, ते सामाजिक सुधारणा नको व राजकीय सुधारणा पाहिजे, असा आग्रहही धरीत नाहींत.

इंग्रज गुन्हेगाराचा न्याय इंग्रज न्यायाधीशानेंच करावा, व नेटिव्ह गुन्हेगाराचा न्याय तेवढा वाटेल त्या न्यायाधीशानें करावा; असा पक्षपात कां ? गुन्हेगाराचा न्याय तोडणें हें कांहीं त्याच्या रंगावर अवलंबून नाहीं. काळ्या रंगाच्या मनुष्यानें एखादा गुन्हा केल्यास त्याचा न्याय करण्याची ज्यास योग्यता आहे, तोच न्यायाधीश, तोच गुन्हा करणाराचा रंग गोरा असला कीं, त्याचा न्याय करण्यास अपात्र कसा होतो ? हे प्रश्न सर्वांस सुचणें अवघड नाहीं. परंतु त्याचा योग्य निकाल होण्यास नुसतें त्या प्रश्नाचें शाब्दिक ज्ञान उपयोगी नाहीं. प्रश्न करणारांचे अंतःकरण व ओठ यांच्यांत विसंगतता असेल तर त्यानें कितीही आक्रोश केला तथापि व्यर्थ होय. परंतु त्या दोहोंमध्यें संगति असेल तर, विशेष आक्रोश करण्याची जरूर पडत नाहीं. अंतःकरण व ओठ यांच्यांत तारायंत्र सुरूं असेल, तर हळू उच्चारलेल्या शब्दांसही विलक्षण जोर येतो व त्यापुढें सर्वांस मान डोलवावी लागते. खऱ्या साध्वीच्या ईषत् वक्रदृष्टीनें मोठमोठ्या बलाढ्य कामांधांची गाळण उडून जाते. आपण स्वतां अन्यायाचें वर्तन करणारास दुसऱ्याच्या अन्यायाबद्दल बोलण्याचा अधिकार पोंचत नाहीं, तर उलट त्याची जीभ कचरूं लागते, त्याचा शब्द तोंडातल्या तोंडांत घोटाळू लागतो, व असें झालें म्हणजे सिंहाचें कातडें पांघरणाऱ्या गर्दभाच्या बाहेर डोकावूं पाहणाऱ्या लंबकर्णावरून, त्याची परिक्षा होते, व त्यास दुसरे भीत नाहींत. इतकेंच नाहीं, तर स्वतःची फाजिती उडण्याची मात्र उलट पाळी येते.

महाराची सावली पडली असतांही विटाळ मानणारे लोक कितीही लांब जिभा करून " आमचा रंग काळा असला व तुमचा रंग गोरा असला म्हणून काय झाले ? रंगावर कांहीं मनुष्याची पात्रापात्रता ठरत नाहीं." वगैरे गोष्टी प्रतिपादू लागले तथापि त्यांच्या शद्वास जोर येण्याचा संभव नाहीं, व त्याचा परिणामही होणें नाहीं. त्या शद्वांस जोर येऊन, इतरांनीं ते ऐकलेच पाहिजेत अशी खरोखर इच्छा असल्यास, ' ब्राह्मणोस्यमुखमासीत् " हें पक्षपाती शास्त्र झुगारून देऊन, आपल्या मांडीलामांडी भिडवून शाळांतून बसण्यास महारास मोकळीक दिली पाहिजे. पुरुषाची बायको मेल्यास त्यास जशी पुनर्विवाह करण्यास मोकळीक आहे, त्याप्रमाणें विधवांसही दुसरा नवरा करण्याची परवानगी पाहिजे. बायकांच्या केसांचा जर मेलेल्या नव-ऱ्याच्या गळयास फांस बसतो, तर पुरुषांच्या शेंडीचाहि मेलेल्या स्त्रीस कां फांस बसूं नये ? व एकास जर कोणी संन्यासीं करीत नाहीं तर दुसरीला मात्र न्हाव्यापुढें कां बसवावी ? पुरुषाला बायको आवडत नाहीं, येवढयाच शुष्क कारणावरून वस्तुतः काडी मोडून देण्याचा त्यास जर अधिकार आहे, व तसें करून तो जर धर्मबाह्य होत नाहीं, तर एखाद्या स्त्रीला नवरा आवडत नसल्यास, तिनेंही त्याला काडी मोडून दिली तर तिच्या नांवानें मात्र खडे कां फोडावेत ? अटकाव करणें असेल तर दोघांसंही करा, नसेल तर दोघां-सही मोकळीक द्या. महार आणि ब्राह्मण, विधवा आणि विधुर व स्त्री आणि पुरुष यांच्यामधील अन्यायमूलक व्यवहार बंद करणें आपल्या स्वतःच्या हातीं असून तें करण्याची ज्यांना नुसती वासनाही झाली नाहीं, अशा लोकांनीं जिंकणारे व जिंकलेले यांच्यातील भेद मोडून टाकण्याचा विचार मनांत तरी कशास आणावा ? व आणला तरी तो सिद्धीस कसा जावा ?

तात्पर्य, लोकांनीं आपल्याशीं जसें वागावे असें आपणास वाटतें, तसेंच आपणही दुसऱ्यांशीं वागण्यास तयार व्हावयाचें, त्यापासून हित असो वा अहित असो, त्याविषयीं विचार करीत बसावयाचें नाहीं. खरें बोलल्या-पासून नफा होवो, नुकसान होवो, परंतु तसें करणें हें आपलें कर्तव्य होय, म्हणून जसें खरें बोलावयाचें किंवा नीतीनें वागलें असतां तोटा होईल अशी भीति असूनही जसें नित्याचरण सोडावयांचें नाहीं, तसेंच कोणतीहि गोष्ट

असो, त्यापासून न्याय होत आहे, किंवा ती करणें आपलें कर्तव्य आहे, एवढ्या विचारावरच तिच्या मागें लागावयाचें, त्यापासून होणाऱ्या सुखदुः - खाची भवतिनभवति करीत बसावयाचें नाहीं. असा पूर्ण निश्चय करून जर लोक सुधारणेची कास धरतील तर ही सुधारणा पाहिजे व ती नको हा तंटा मिटणार आहे व सर्वच सुधारणा एकसमयावच्छेदेंकरून होऊं लागतील. हल्लीं राजकीय सुधारणेस सर्व लोक अनुकूल आहेत, असें जरी बाह्यात्कारें दिसलें, तथापि त्यांत जीव नाहीं. राष्ट्रीय सभेसंबंधानें अंतःकरणापासून ज्यांनीं श्रम केलें आहेत, व आपल्या पदरास ज्यांनीं खार लावून घेतला आहे, अशा सर्व इलाख्यांतील लोकांची याद केली असतां ते एकूण एक लोक जितके राजकीय सुधारणेचे चहाते आहेत तितकेच सामाजिक सुधारणेचे व धर्मसुधारणेचेही चहाते आहेत असें दिसून आल्यावांचून राहणार नाहीं; व सुधारक आमचे पुढारी नाहींत म्हणून कंठशोष करणारे लोक जसे सामाजिक सुधारणेच्या विरुद्ध आहेत, त्याप्रमाणेंच राजकीय सुधारणेंतही त्यांचें पाठबळ तितक्यापुरतेंच आहे, हेंही सिद्ध करून दाखविणें कठीण नाहीं. व यावरून पाहतां सामाजिकपरिषदेची उत्तरोत्तर भरभराट होणें हेंच राष्ट्रीय सभेच्या खऱ्या भरभराटाचें चिन्ह होय.

हे तुमचे पुढारी नव्हत : : ३५

जुन्या लोकांस आम्ही विनयपूर्वक व खात्रीपूर्वक असें कळवितों कीं, त्यांनीं **प्रो. जिन्सिवाले** व **प्रो. टिळक** अशा लोकांस आपलें पुढारी समजूं नये. ज्याप्रमाणें आमच्या मतांत व त्यांच्या मतांत थोडासा फरक असल्यामुळें, त्यांची सुधारकांत गणना करतां येत नाहीं, असें नाहीं, त्या— प्रमाणें जुन्या लोकांच्या आणि त्यांच्या मतांत जी अल्प साम्यता आहे, तीमुळें ते जुन्या लोकांचे अग्रणी होऊं शकत नाहींत. जर जुने लोक मिथ्या भ्रमानें अशांस आपले पुढारी समजून तदनुषंगानें वागूं लागतील तर अखे-

रीस गोत्यांत पडून पश्चात्ताप पावतील, याचा आम्हांस बिलकुल संशय नाहीं ! वेद पौरुष आहेत, असा प्रो. जिन्सिवाले यांचा आग्रह आहे. या मताचें ते आज कित्येक वर्षें उघडपणें प्रतिपादन करीत आहेत; व ज्याप्रमाणें गेल्या उन्हाळ्यांत त्यांनीं प्रतिपादिलेल्या विशिष्ट मतामुळें त्यांना आपल्या नौकरीचा राजीनामा द्यावा लागला तरी त्यांनीं त्याची पर्वा केली नाहीं, त्याप्रमाणें पूर्वपद्धतीच्या यच्चावत् ब्राह्मण लोकांनीं जर असा आग्रह धरिला कीं, तुम्ही वेद अपौरूष म्हणा, नाहीं तर आम्हीं तुम्हांस बाळींत टाकूं, तर प्रो. जिन्सिवाले सगळ्या आचारवान् ब्रह्मवृंदांस न जुमानतां, त्यांच्या मतानें वेदाच्या अस्तित्वाविषयीं जो ग्रह झाला आहे तो कधींही सोडणार नाहींत, अशाविषयीं आम्हीं पाहिजे तसली पैज मारण्यास तयार आहों ! प्रो. जिन्सिवाले थोडेसे कर्मठ आहेत एवढ्यामुळें जुन्या लोकांना त्यांच्या वेद-विषयक विलक्षण मताचा राग येत नाहीं याचा आम्हांस मोठा अचंबा वाटतो ! वेदांचें अपौरुषत्व काढून घेतल्यावर वैदिक धर्माचा पायाच नाहींसा झाला, हें त्या धर्माच्या कैवाऱ्यांच्या लक्षांत येऊं नये काय ? वेद हे मनुष्यकृत ग्रंथ आहेत, असें प्रतिपादणाऱ्या गृहस्थांस पाहिजे तर अजागळ पत्रकर्ते त्यांच्या बाह्याचरणास भुलून जाऊन ते हिंदुधर्माचे या युगांतील आधारस्तंभ आहेत असे त्यांचे पवाडे गावोत, व त्यांचा स्तुतिपाठ चांगला खुलण्यासाठीं आमच्या सारख्यांची हवी तितकी निंदा करोत पण जे विद्वान् शास्त्री किंवा आचारसंपन्न वैदिक आहेत, त्यांनीं श्रीधरपंतांच्या सारख्यांत आणि आमच्यांत विशेष भेद आहे, असें समजणें हा मोठा प्रमाद होय. कांहीं विशेष कारणामुळें आमच्या–त्यांच्यांत कितीही अंतर क्षणभर दृष्टीस पडलें, तरी त्यांचें–आमचें शिक्षण एकाच पद्धतीचें असल्यामुळें, सूक्ष्म विचाराअंतीं असें दिसून येईल कीं, एकंदरींत ते आम्हांस जितके जवळ आहेत तितके जुन्या लोकांस नाहींत ! प्रो. जिन्सिवाले यांचें असें म्हणणें आहे कीं, ज्याला अनुकूल असेल त्यानें आपल्या बायकोकडून बी. ए. च्या परीक्षेचा देखील अभ्यास करविण्यास हरकत नाहीं. एकदां खुद्द स्वतःच्या पत्नीस पहिली लेडी ग्रॅजुएट करण्याचा त्यांचा विचार होता. तसेंच यद्यपि शुद्ध

लोकविरुद्धं नाकरणीयं नाचरणीयं या पंथाचे ते, अनुयायी असल्यामुळें आपल्या बायकोस आपल्याबरोबर हिंडावयाला घेऊन जाणें ही गोष्ट जरी त्यांच्या हातून होण्यासारखी नाहीं, तरी ज्या बायकांस घरांतील काम करावें लागत नसल्यामुळें कोणत्याही प्रकारचा व्यायाम होत नाहीं, अशांनीं आपल्या नवऱ्यांबरोबर किंवा चाकरांबरोबर सकाळसंध्याकाळ उघड्या हवेंत सहल करण्यास जाण्यास हरकत नाहीं, असें त्यांनीं स्पष्ट म्हणून दाखविलें आहे. जुन्या पद्धतीच्या किती सुशिक्षित लोकांस प्रो. मजकुरांचीं हीं मतें मान्य होणार आहेत ? किंवा जर श्रीधरपंत आमच्याबरोबर उद्यां म्हणूं लागलें कीं, रामकृष्ण हे कांहीं देवावतार नाहींत; आधुनिक राजासारखे ते या भरतखंडांत पूर्वकालीं होऊन गेलेले राजे होत; महाभारत व रामायण हे केवळ इतिहासग्रंथ आहेत; भगवंतांनी अर्जुनास जी भगवद्गीता सांगितली ती प्लेटो किंवा ऑरिस्टॉटल यांच्या नीतिविषयक व वेदांतविषयक ग्रंथांप्रमाणें व्यासाच्या विचारांचें बाड आहे, दुसरें कांहीं नाहीं; एका हिंदु राजानें दक्षिणेकडील मूळच्या लोकांस जिंकून गोदेपासून कावेरीपर्यंत अथवा लंकेपर्यंत आर्य लोकांच्या ज्या वसाहती केल्या त्यांचा इतिहास हेंच रामायण होय, आणि वाल्मीकी हा त्यांचा कर्ता होय. अशा प्रकारचें अभिप्राय जर आमच्या पुराणाविषयीं ते देऊं लागले तर ते असेच देतील याविषयीं आम्हांस बिलकूल शंका नाहीं, तर आमचे शास्त्री व वैदिक त्यांस काय म्हणतिल ? तेव्हां या भोळ्या जुन्या लोकांस आम्हीं येवढेंच सांगतो कीं, दुर्दैवानें आम्हां नवीन पद्धतीच्या लोकांत सध्यां जो स्वल्प मतभेद झाला आहे तेवढ्यावरून प्रो. जिन्सिवाले किंवा त्यासारखेच इतर अर्वाचीन विद्वान् आपल्या पंथाचें आहेत, व त्यांस आपलें धुरीणत्व देण्यास हरकत नाहीं, अशा मोहांत त्यांनीं पडूं नये. हा इशारा त्यांनीं विशेषतः प्रो. टिळक यांच्या संबंधानें मनांत ठेवण्यासारखा आहे; कारण **रा. रा. बाळ गंगाधर टिळक** हे, प्रसंग पडल्यास, प्रों. जिन्सिवाले यांच्यापुढें जातील. इतकेंच नाहीं, तर जातिबाहुल्यामुळें अगोदरच जेरीस आलेल्या या हतभाग्य देशांत अधिक जाति होऊं नयेत, म्हणून कायद्यानें किंवा लोकमतानें जेवढ्या सुधारणा सान्या लोकांस ग्राह्य होतील अशाच करण्याचें हे दिवस आहेत, असें म्हणणाऱ्या

आमच्यासारख्यापुढेंही दोन पावलें जाण्यास हे डगणारे नाहींत. हें थोड्या दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या स्वदस्तूरच्या विनंतीपत्रावरून कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. या लेखकाच्या मतांत आणि रा. टिळक यांच्या मतांत, कांहीं लोक म्हणतात त्याप्रमाणें; जमीनअस्मानाचें अंतर असतें, तर नोकरीचा मार्ग सोडून सामान्य देशकार्यासाठीं आम्हीं एके ठिकाणीं कधींच आलों नसतो, व बऱ्यावाईट रीतीनें गेली दहा वर्षें आमच्या हातून एकत्र निघालीं नसती. पण वारंवार होतें काय कीं, जसजसें वय वाढत जातें, तसतसा मताभिमान आणि आग्रह वाढत जातो म्हणून म्हणा, किंवा कोणत्याही दोन व्यक्तींत केवढेंही मतसादृश्य असलें तरी तीं मतें अंमलांत आणण्यासाठीं ज्या उपायांची योजना करावयाची, त्यांविषयीं त्यांत जो मतभेद उत्पन्न होतो तो कधींकधीं मूळ मतांच्या सादृश्याहून प्रबलतर होऊन बसतो म्हणून म्हणा, जे एकदां सामान्य संकल्प करून, स्वार्थाचें किंवा परमार्थाचें कांहीं कृत्य हातीं घेतात त्यांचा पुढें बेबनाव होऊं लागतो, व शेवटीं त्यांची फुटाफूट होण्याचाही प्रसंग येतो! ज्या **केसरीसाठीं** या लेखकांस कारागृहवास सोसावा लागला, व जो त्यानें उदार महाराष्ट्रीयांच्या गुणग्राहित्वामुळें व समदुःखित्वामुळें आनंदानें साहिला, त्या पत्राचा आणि याचा वियोग होऊन, हा नवीन **सुधारक** अस्तित्वांत येण्यास किंवा येथें बऱ्याच प्रतिष्ठेस आलेल्या एका लोकोपयोगी संस्थेच्या मुख्य चालकांपैकीं दोघां गृहस्थांनीं विशेषतः रा. टिळकांनीं आपल्या कामाचा राजीनामा देण्यास, अशा प्रकारचा साधनसम्बन्धक मतभेद कारण झाला आहे, दुसरें कांहीं नाहीं. थोड्याच दिवसांत तुळशीबागेंतील सभेच्या बहूतेक पुरस्कर्त्यांस स्पष्टपणें असें दिसून येईल कीं, रा. टिळक हे एका गोष्टीशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें त्यांचे पुढारी होण्यासारखे नाहींत. ज्या सुधारणा आम्हीं कायद्यानें कराव्या, असें म्हणत आहों, त्या लोकांच्या लोकांनींच कराव्या, हें कायतें गरम व थंडया सुधारकांतील मतभेदाचें मूळ कारण आहे. स्त्रीशिक्षण, बालविवाहनिषेध, वपननिषेध, बालावृद्धविवाहप्रतिबंध, पुनर्विवाह, कन्याविक्रयनिषेध, मदिरापानविषेध, वगैरे सर्व सुधारणा जऱ्या एका पक्षास पाहिजे आहेत, तशा दुसऱ्यासही पाहिजे आहेत. असें असून सध्यां उभयतात जें रण माजलें

आहे तें त्या अंमलांत कोणत्या साधनांनीं आणाव्या, याविषयीं मतभेद असल्यामुळें माजलें आहे; कदाचित् कांहीं दिवसांनीं हे भेदकारण नाहींसें होऊन, सर्व सुधारकांची एकत्र फळी होण्याचा संभव आहे, आणि सुदैवानें असें झालें तर तुळशीबागेंतल्या सभेचे बहुतेक पुरस्कर्ते काय करतील? ज्या सुधारणांस रा. टिळक अत्यंत अनुकूल आहेत त्यांचा त्यांनीं कायदेबाल्या सुधारकांविरुद्ध खवळून गेलेल्या तुळशीबागेंतील श्रोतृसमुदायापुढें इष्ट हेतु साधण्यासाठीं बुद्धया बिलकूल उल्लेख केला नाहीं, व त्या समुदायास मान्य होईल अशा प्रकारची टीका **मि. मलबारी** व सुधारक यांवर केली. येवढ्यावरून त्या सभेच्या बहुतेक पुरस्कर्त्यांनीं असें समजूं नये कीं, सामाजिक सुधारणेच्या कामीं सरकारनें सर्व लोकास लागूं पडणारा कायदा करूं नये, यापलीकडे रा. टिळक यांच्या मतांत आणि आपल्या मतांत कोणत्याही प्रकारचें साम्य आहे. सोळा वर्षांच्या आंत मुलींची लग्नें होऊं नयेत, कोणी कोणास हुंडा देऊं नये, विधवांचें वपन करूं नये, चाळिसाव्या वर्षापुढें मुळींच लग्न करुं नये, किंवा, करणें झाल्यास विधवेशीं करावें, मद्याला स्पर्श करूं नये, प्राप्तीचा दहावा हिस्सा सार्वजनिक कामाकडे द्यावा, वगैरे गोष्टी ज्यांस मान्य असतील त्यांनीं एक मंडळी स्थापून, त्या तिनें अंमलांत आणण्याचा प्रयत्न करावा, व जो गृहस्थ एकदां अशा मंडळीचा सभासद होईल तो तींतून पुढें बाहेर पडण्याची इच्छा दाखवील, किंवा हे नियम मोडील तर त्याला सरकाराकडून कडक शिक्षा करवितां यावी, म्हणून अशी मंडळी रजिस्टर करावी—वगैरे रा. टिळक यांचे विचार तुळशीबागेंतील सभेसाठीं काढलेल्या निमंत्रणचिठ्ठीवर सह्या घालणाऱ्या गृहस्थांपैकीं कित्येकांस रुचणार आहेत कोण जाणे! अशा प्रकारची मंडळी स्थापण्याच्या प्रयत्नांत रा. टिळक खरोखरीच गुंतलें आहेत, असें आम्हीं ऐकतों, व ती स्थापण्यांत आल्यास ते तिचे सभासद होतील, आणि आतांच बारावें वर्ष लागलेल्या आपल्या मुलीचें लग्न तिच्यासोळाव्या वर्षापर्यंत करणार नाहींत, याविषयीं आम्हांस काडीयेवढा संशय नाहीं. कारण, रा. टिळकांच्या आणि त्यांच्या प्रतिपक्ष्यांच्या विचारांत व स्वभावांत केवढाही भेद असला, तरी त्यांना येवढें कबूल करणें,

भाग आहे कीं, जी गोष्ट एकदां टिळकांच्या मनास रास्त अशी वाटली तिचा ते, कितीही नुकसान झालें किंवा केवढाही लोकापवाद आला, तरी प्रत्यादेश करणार नाहींत, हा त्यांचे अंगीं प्रशंसा करण्यासारखा गुण आहे. तेव्हां जुन्या पद्धतीच्या लोकांस आम्हीं असें विचारतों कीं, टिळकांचे वर निर्दिष्ट केलेले सुधारणाविषयक विचार आणि ते अंमलांत आणण्यासाठीं त्यांनीं चालविलेले प्रयत्न तुळशीबागेंतील 'प्रचंड' श्रोतृसमुदायापैकीं किती इसमांस अभिमत आहेत, व रजोदर्शनोत्तरही आपल्या मुलींस अविवाहित ठेवणाऱ्या मंडळीचे सभासद किंवा पुढारी टिळक झाले तर त्या समुदायापैकीं किती वजनदार शास्त्री, किती वैदिक, किती जहागीरदार, नोकरीवर असलेले किंवा पेनशनदार, किती रावबहादुर व किती सामान्य लोक त्यांस आपल्या सभांचे चिटणीस करण्यास किंवा त्यांवर समाजाचें पुढारीपण सोंपविण्यास तयार आहेत? आम्हांस तर असें वाटतें कीं, ज्यांना आपला पूर्वापार चालत आलेला धर्म, आपल्या रीतीभाती आणि आपले आचार निर्दोष वाटत आहेत, व त्यांत सरकारानें किंवा सुधारकांनीं फेरफार करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे त्यांचे ठायीं वैरूप्यता आणून देशाचें नुकसान करणें असें वाटत आहे, त्यांनीं वेळींच जागें होऊन, असें समजूं लागावें कीं, प्रोफेसर जिन्सिवाले, प्रो. टिळक, रा. रा. म. चि. आपटे यांसारख्या अर्वाचीन विद्वान् गृहस्थांनीं प्रसंगविशेषीं विशेष कारणासाठीं एखाद्या बाबींत जुन्या लोकांच्या छंदाप्रमाणें वर्तन केलें, किंवा जुन्या लोकांच्या एखाद्या मतास आपली अनुकूलता दाखवली, तर तेवढ्यावरून ते आपले पुढारी होण्यास व अर्वाचीन सुधारणांविरुद्ध आपली सेना नेण्यास योग्य असे हे गृहस्थ खचित नाहींत. जर या गोष्टीचा जुने लोक शांतपणें विचार न करतील, व अशा गृहस्थांकडून मिळणाऱ्या क्षणिक मदतीस भुलून जाऊन त्यांची ते कास धरतील, तर अखेरीस ठार बुडतील असें आम्हांस वाटतें!

तर मग जुन्यांचे पुढारी असावे तरी कसे ? : : ३६

अर्थात् ज्यांत जुन्या पद्धतीचे सद्गुण पूर्णपणें भरले आहेत व जुन्या लोकांनीं निषिद्ध मानलेल्या गोष्टींपासून जे अत्यंत अलिप्त आहेत, अशा गृहस्थांनींच त्यांचें पुढारीपण पत्करल्यास जुन्या मतांस व जुन्या आचारांस कांहीं वर्षें टिकाव धरतां येणार आहे. 'कांहीं वर्षें' असें आम्हीं जाणून-बुजून म्हणतों. कारण, जुन्या लोकांनीं आपले भीष्माचार्यांसारखे योद्धे जरी पुढें घातले तरी अगोदरच मन्वंतर इतकें बदलून गेलें आहे, व इतउत्तर ते इतक्या झपाट्यानें बदलून जाणार आहे कीं, त्यापुढें भीष्मद्रोणकृपादिकांसारख्या पूर्वपद्धतीच्या योद्ध्यांचें कांहींएक चालेनासें होऊन त्यांचा शस्त्रसंपात निष्फल होईल, व कांहींवर तर प्रत्यक्ष डोळ्यासमोर प्रतिपक्ष्यांनीं हस्तगत केलेली विजयश्री पाहण्याची पाळी येऊन, निराशेनें या जगद्रणांगणांतून खेद करीत परलोकास जाण्याचा प्रसंग गुदरेल. असा प्रसंग बराच टाळतां येण्यास एकच उपाय आहे, तो हा कीं, पुढारी निवडतांना फार चांगली खबरदारी घेणें. यांत चुकी झाली कीं निवडणारे लोक जुने असोत किंवा नवे असोत, ते उपहास्यतेस पात्र होणारच. समाजाग्रणींत कोणत्याही प्रकारचा दुर्गुण असतां कामा नये. इतकेंच नाहीं, तर त्यांचे अंगीं प्रशंसनीय सद्गुणांचा संकर असला पाहिजे. कित्येक लोकांची अशी समजूत असते कीं, ज्यांच्या अंगीं एक दोन चांगले गुण आहेत त्यांच्या अंगीं पांच-चार वाईट गुण असले तरी त्याला समाजाचें पुढारीपण देण्यास कांहीं हरकत नाहीं. पण आमच्या मतें ही समजूत फार गैर आहे. ज्यांचें सारें आयुष्य द्रव्यार्जनांत किंवा वरिष्ठांची हांजीहांजी करण्यांत गेलें; जो स्वहितासाठीं लोकांचें हवेंतितकें नुकसान करण्यास भीत नाहीं; बाटलाबाई ज्यांची सखी झाली आहे; ज्यांच्या कामुकतेला कशाचाही निर्बंध नाहीं; खोटें बोलण्यांत कांहीं दोष आहे असें ज्यास वाटत नाहीं; जो सत्कृत्यासाठीं उदार हात कधीहीं पुढें करीत नाहीं, ज्ञान संपादण्याचा ज्याला

पराकाष्ठेचा तिटकारा आहे; खोटी मिजास व खोटी प्रतिष्ठा हीं ज्यास अत्यंत प्रिय आहेत; शुष्क वाचाळता करण्यांत ज्यांस पराकाष्ठेचा आनंद वाटतो; आपल्या थोड्या फायद्यासाठीं गांवाचें किंवा राष्ट्राचें नुकसान करण्यास जो तयार असतों; ज्याला दुसऱ्याचें बोलणे ऐकून घ्यावेसें वाटत नाहीं, दुष्कर्मांनीं संपादिलेल्या द्रव्यापासून उत्पन्न झालेल्या पापाचें क्षालन ब्राह्मण-भोजनें घालून, देवालये बांधून, किंवा व्रतवैकल्यें अथवा यात्रा करून होतें, असें जों समजतो; न्याय, सत्य, शांति अनुकंपा वगैरे गुण ज्यांच्या अंतः-करणांत वसत नाहींत-सारांश, ज्यांचें नांव ऐकल्याबरोबर किंवा मूर्ति पाहिल्याबरोबर श्रोत्यांच्या किंवा प्रेक्षकांच्या मनांत भीति, प्रेम व पूज्यबुद्धि उत्पन्न होत नाहींत-असा मनुष्य लोकाग्रणी होण्यास अगदीं उपयोगी नाहीं. जुन्या लोकांचा पक्ष पडता आहे. तेव्हां निदान त्यांनीं तरी अशा प्रकारच्या दुर्गुणांपासून जो अत्यंत अलिप्त असेल त्यासच आपला पुढारी नेमण्याबद्दल फार काळजी घेतली पाहिजे.

आम्हांला 'हलकट' कां म्हटलें? : : ३७

गेल्या लेखांत तुळशीबागेंतील सभेची हकीकत देत असतां, एक ठिकाणीं कांहीं कारणानिमित्त दोनतीन विशेषणें योजण्यांत आलीं आहेत, त्यांपैकीं 'हलकट' या विशेषणानें बऱ्याच लोकांचें पित्त खवळून गेलें असावें, असें दिसतें. त्यासंबंधानें आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, त्या सभेचें पुरस्कर्ते फक्त बेकायदेवाल्यांचीच सभा भरविते, आणि कायदेवाल्यांस किंवा 'कायदेबाजास' आपण होऊन बोलावून आणून त्यांचा उपमर्द न करते, तर तें विशेषण योजण्याविषयीं काय, पण त्या सभेविषयीं कोणत्याही प्रकारचा उल्लेख करण्याचीही गरज न पडती. शिवाय रा. टिळक यांचें सुधारकांच्या संबंधानें उपहासपर भाषण चाललें असतां, ज्यांनीं आनंदप्रदर्शक टाळ्या पिटल्या तेवढ्यांसच आमचीं विशेषणें लागूं असतां तुळशी-

बागेंत जेवढे लोक जमले होतें तेवढ्या साऱ्यांस उद्देशून आम्ही तीं विशेषणें योजिलीं असावीं, असा तर्क करून पोकळ रागाचें अवडंबर घालण्यांत काय अर्थ आहे ? तुळशीबागेंत ज्याप्रमाणें रामशास्त्र्यांसारखी एका प्रकारची मंडळी होती त्याप्रमाणेंच आ. रा. ब. नूलकर, आ. रा. ब. रानडे, व डॉ. भांडारकर यांसारखी दुसऱ्या प्रकारचीहि मंडळी होती. या मंडळीस आमच्याकडून कालत्रयींही असली विशेषणें लागण्याचा संभव नाहीं, हें उघडच आहे. तेव्हां तुळशीबागेंतील समग्र श्रोतृजनांस ती विशेषणें लावण्याचा इरादा नव्हता हेंही उघड आहे; तथापि गांवभर ढोलगीं वाजवून गोळा केलेल्या येवढ्या मोठ्या समाजांतील व्यक्तीनव्यक्ती ज्याअर्थीं या सभेच्या पुरस्कर्त्यांस सभ्य किंवा 'हलकटाचा' प्रतिभावी दिसत असावा, असें त्यांच्या मताचा प्रतिध्वनि काढणाऱ्या कित्येक स्थानिक पत्रांतील लेखांवरून व आम्हांकडे आलेल्या पत्रांवरून अनुमान करण्यास जागा होत आहे, त्याअर्थी त्यांच्या सभ्यतेची व्याख्या आमच्या सभ्यतेच्या व्याख्येहून फार निराळी असावी, असें वाटतें. तथापि जर या पत्रांत त्यांच्या संबंधानें अशा तीव्र विशेषणांची योजना न व्हावी अशी त्यांची इच्छा असेल, तर त्यांनीं सुधारकांच्या संबंधानें कोठेंही बोलतांना किंवा लिहितांना तोंड आटोपून बोलत जावें म्हणजे झालें ! जोंपर्यंत त्यांचेंकडून असें होणार नाहीं तोंपर्यंत क्रियाप्रतिक्रियेचें नियमास खळ पडेल असें आम्हांस वाटत नाहीं ! अशा संबंधानें बेअब्रूच्या फिर्यादीचा बागुलबोवा आम्हांस दाखविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यास आम्ही पक्कें जाणून आहों ! उभ्या वर्गातील कांहीं इसमांस उद्देशून अशी भाषा सकारण लिहिण्याबद्दल शेंडीजानवें टाकून देण्याचा प्रसंग ज्यावेळेस आम्हांवर येईल, त्यावेळेस निदान चारदोन वृद्धतरुण पत्रकर्त्यांस तरी येरवड्याच्या आनंदगृहांत सामाजिक विषयांची मनमुराद चर्चा करण्याकरितां आम्हीं आपल्याबरोबर घेऊन जाऊं, अशी आमची पक्की खातरी आहे ! कोठेंहि असलेल्या चांगलेपणास दुखविण्याची आमची इच्छा नाहीं. पण वाईटाला वाईट म्हणण्यास असल्या दटावण्यानें सुधारक केव्हांही भिईल, असें दिसत नाहीं !

बोलके सुधारक, वागते सुधारक व सुधारणानिंदक : : ३८

हे लोकांचे तीन वर्ग सुधारणापंथास लागलेल्या प्रत्येक देशांत केव्हांही दृष्टीस पडतात. ज्याअर्थी मनुष्यास चांगल्यावाईटाची निवडानिवड करण्याची बुद्धि, व जें वाईट असेल त्याचा त्याग आणि चांगल्याचें संपादन करण्याचें मानसिक व शारीरिक सामर्थ्य आहे, त्याअर्थी पशूप्रमाणें त्याची स्थिति स्थिर न राहतां, कालमानाप्रमाणें तींत कमी अधिक बदल होत जाणें स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणें कालाचा क्रम थांबविणें अशक्य आहे, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या स्थित्यंतरास खळ पाडणें अशक्य आहे. तथापि हें सत्य अज्ञ लोकांच्या लक्षांत नीट न येत असल्यामुळें, व आपण ज्या स्थितींत आहों तीच स्थिति अत्युत्तम असें अप्रबुद्ध जनावरांप्रमाणें त्यांस वाटत असल्यामुळें, कोणत्याही रीतीनें त्या स्थितींत बदल करूं पाहणारांचा ते द्वेष करतात, आणि त्यांचे श्रम निष्फळ होण्याचा आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करतात. अशा नित्य कलहामुळें समाजांतील अवयवांचे प्रथम दोन स्थूल विभाग होतात; एक पुराणप्रियांचा व दुसरा सुधारकांचा. पुढें दुसऱ्याचे दोन पोटभेद होतात; एक बोलक्या सुधारकांचा व दुसरा वागत्या सुधारकांचा. ज्या वेळेस कांहीं केलें तरी समाजांतील बहुतेक लोक चांगल्या गोष्टीचा विचार करावयाचे नाहींत--इतकेंच नाहीं, तर जो ती करण्यास प्रवृत्त होईल त्याचा ते छळ करण्यासही सोडीत नाहींत, अशी स्थिति असते, त्यावेळेस बहुधा अनेक प्रकारचे हाल व जाचणुकी सोसून व गरज पडल्यास निराळी जात करून घेण्यास किंवा मरण्यासही तयार होऊन, आपल्या विचाराप्रमाणें आचरण करण्यास प्रवृत्त होणारे मताभिमानी सुधारक फार निघतात. आजपर्यंत नवीन धर्मपंथाचे जे स्थापक झाले आहेत, त्यांचा इतिहास बहुधा अशा प्रकारचा आहे. साक्रेतीस, बुद्ध, महंमद, ख्रिस्त, ल्यूथर, राममोहन किंवा दयानंद यांपैकीं लहानमोठ्या प्राचीन किंवा अर्वाचीन पाहिजे त्या महत्पुरुषाचें चरित्र घ्या, त्यावरून असें दिसून येईल कीं, ज्या सुधारणा झाल्याच पाहिजेत असा त्यांच्या मनाचा दृढ ग्रह झाला होता, त्या सुधारणांस तत्कालीन बहुजनसमाज अत्यंत प्रतिकूल

असल्यामुळें, एक तर आपलें हेका आपण सोडावा, किंवा लोक जेवढा त्रास देतील तेवढा सहन करण्यास तयार होऊन आपला हेका आपण चालवावा--याशिवाय त्यांना दुसरा मार्गच नव्हता. अशा स्थितींत लोकांच्या निष्ठुर दुराग्रहामुळें सुधारकांच्या अंतःकरणांत पेटलेली ज्वाला लोकांच्या उपरोधक फुंकरांनीं न विझतां अधिक जोरानें भडकूं लागते, आणि ती त्या सुधारकांस मनाप्रमाणें आचरण करूं लागल्याशिवाय चैन पडूं देत नाहीं. मनाची अशी अवस्था झाली असतां, विचाराप्रमाणें न वागण्यापेक्षां लोकांनीं केलेला छळ सोसणें, हेंच अधिक सह्य व सुखावह वाटतें, आणि म्हणून अशा काळांत वागते किंवा करते सुधारक निपजतात.

परंतु ज्या वेळेस ज्ञानप्रसारामुळें किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळें लोकांची दुराग्रहबुद्धि किंचित् शिथिल झालेली असते, व चर्चा केल्यानें, समजुतीच्या दोन गोष्टी बरेच दिवस सांगत राहिल्यानें, आणि अशाच प्रकारचे सामोपचाराचे दुसरे उपाय केल्यानें ते आपणांस हळूं हळूं हवें तसें वागूं देतील इतकेंच नाहीं, तर आपलें अनुकरणही करूं लागतील, अशीं चिन्हें दिसत असतात, त्यावेळेस लोकांपासून तुटून निघून किंवा त्यांचे यथेच्छ 'छी थू' करून घेऊन, आपली जात निराळी करण्यास किंवा लोकांशीं रक्तस्रावाचें रण माजविण्यास प्रवृत्त होणारे सुधारक निघत नाहींत. तात्पर्य, अशा दोन प्रकारच्या सुधारकांचे दोन वर्ग निघण्याच्या विशिष्ट वेळा आहेत. सध्यां आमच्या देशांत विशेषतः बोलके सुधारकच निघण्याची वेळ आहे; म्हणून जे बोलके सुधारक आहेत त्यांस सुधारणानिंदकांनीं किंवा वागत्या किंवा करत्या सुधारकपणाची फुकट ऐट मिरविणारांनीं "तुम्ही करून किंवा वागून कां दाखवीत नाहीं? स्वतंत्र जात कां करीत नाहीं?" असले अडाणीपणाचें प्रश्न विचारूं नयेत! फार कशाला? तुमच्या वागत्या किंवा करत्या **टिळकसुधारकाचेंच** उदाहरण घ्या. ज्यानें उपप्रतिसूचनेंत १६ वर्षांच्या आंत मुलीचें लग्न करूं नये, व प्राप्तीचा एक दशांश सार्वजनिक कामाकडे द्यावा, अशीं कलमें घातलीं त्यालाच त्यासंबंधानें साक्षात् कांहीं करण्याच्या हेतूनें लोकांपुढें येण्याची बुद्धि झाली, तेव्हां सोळाचा आंकडा चौदावर, व एक दशांशाचा एक विसांशावर आणून ठेवणें जरूर आहे, असें

वाटलें किंवा नाहीं तें पहा ? तसेंच, अशा रीतीनें स्थापलेल्या मंडळीपैकीं कोणत्याही इसमानें प्रतिज्ञाभंग केला असता त्याला दंडण्याकरितां सरकारी मदत घेणें अवश्य आहे, असें वाटलें किंवा नाहीं तेही पहा ! तात्पर्य, या वागत्या किंवा करत्या सुधारकांस प्रत्यक्ष क्रियेचा विचार मनांत आणिल्याबरोबर जर इतकी पीछेहाट करावी लागली, व "विधि, विकल्प, आणि निषेध" या त्रयींचें रडगाणें गावें लागलें, तर यासंबंधानें खरोखरीच कांहीं करून दाखविण्याचा प्रसंग आला असतां, बोलक्या सुधारकांप्रमाणें हे दहा-सोळा किंवा अकरा-सतरा तरी कबूल करतील किंवा नाहीं, याची मोठी शंका आहे ! व अशी शंका येण्यास थोडासा आधारही झाला आहे. कारण चौदा म्हणजे संपूर्ण तेरा असा अर्थ आधींच निघूं लागला आहे, असें ऐकतों ! तेव्हां या कालांत बोलक्या सुधारकांची आणि पोकळ डौलाखातर स्वतः वागते सुधारक म्हणवून घेणारांची वास्तविक स्थिति एकच आहे, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

आतां सुधारणानिंदकांकडे किंचित् वळूं. यांची गतही पहिल्या दोघांप्रमाणेंच आहे. हे आपल्या बोलण्याच्या ऐटींत आपण समाजाचे स्थिरस्थाणू आहों, समाजास कल्याणकारक गोष्टी कोणत्या त्या आपणांसच समजतात, व त्यांचे संरक्षणकर्ते आपणच आहों, अशी आपल्या मनांतल्या मनांत व उघडपणें फुशारकी मिरवीत असतात. पण ज्याप्रमाणें पंचक्षरानें भारलेलें मत त्याच्या पाठीमागें, आरडाओरड करीत कां होईना, पण कसें तरी जातच असतें, व त्याला वाटेल त्याप्रमाणें वागत असते, त्याप्रमाणें इंग्रजांसारख्या परक्या लोकांचा अंमल; सुधारणाविषयक त्यांचे विचार; त्यांकडून आम्हांस मिळत असलेलें शिक्षण; कामाधामाच्या निमित्तानें प्रत्येक दिवशीं त्यांशीं होत असलेला व्यवहार; त्यांनीं आपल्याबरोबर इकडे आणिलेल्या नाना प्रकारच्या यांत्रिक सुधारणा आणि स्थानांतराचीं साधनें–वगैरे गोष्टींनीं पंचाक्षऱ्याच्या मंत्राप्रमाणें भारून टाकलेला आमचा सुधारणानिंदकगण डॉक्टरांची औषधें निःशंकपणें घेऊन अप्रत्यक्ष रीतीनें मदिरा सेवन करीत आहे, आगगाडींत व आगबोटींत प्रवास करतांना हव्या त्या जातीच्या लोकांशीं चिकटून बसून जातीचे पाश शिथिल करीत आहे, साहेब लोकांशीं नित्य 'शेक हॅन्ड'

करून किंवा त्यांच्या टेबलापाशी खरडे घांशीत बसून पाहिजे तसला विटाळ प्रतिदिवशीं घरीं आणीत आहे, आगगाड्यांच्या किंवा आगबोटींच्या वेळा साधण्यासाठीं आणि लांबीचे प्रवास झपाट्यासरशी उरकून घेण्यासाठीं स्नानसंध्येचा प्रत्याहार करीत आहे किंवा तीस कधीं कधीं मुळींच फांटा देत आहे, वर्तमानपत्रांत किंवा इतर ठिकाणीं होत असलेल्या चर्चेमुळें न कळत लग्नाचें वय हळूं हळूं वाढवीत आहे, स्त्रीस अधिकाधिक स्वातंत्र्य देऊं लागला आहे, स्वेच्छेविरुद्ध धर्मविनाशक शाळांत आपलीं मुलें पाठवीत आहे, कामकाजाच्या संबंधाने हव्या त्या जातीच्या लोकांशीं स्नेह व व्यवहार करीत आहे, श्राद्धश्रावण्यादि धर्मकर्मांपासून कांहीं तरी प्राप्ति व्हावी, येवढ्यासाठीं सुधारकांच्या तव्यतीप्रमाणें हव्या त्या कलावर नेत आहे, व कधीं कधीं त्यांचेकडून कांहीं कामें करून घेण्यासाठीं आपले हेके सोडीत आहे, हें त्याचे लक्षांत न यावें, व जे लोक जाणूनबुजून अमुक सुधारणा केल्याच पाहिजेत असें उघडपणें प्रतिपादीत आहेत, किंवा त्या स्वशक्तीप्रमाणें अमलांत आणीत आहेत, त्यांची थट्टा करण्यांत त्यानें प्रवृत्त व्हावें हें आश्चर्य नव्हे काय? अथवा यांत तरी कसलें? अंतर्दृष्टि करून न पाहणाऱ्या अज्ञ जनांनीं असें वागणें व बोलणें हेंच त्यांस उचित आहे. त्यांच्या स्थितींत जें अंतर पडत आहे तें त्यांना न समजतां घडत असल्यामुळें आपली स्थिति कायमच आहे, असें यांस वाटणें, हें फार स्वाभाविक आहे! पण हा त्यांचा भ्रम आहे, हें कोणाही समंजस पुरुषाच्या लक्षांत सहज येण्यासारखें आहे. या सुधारणानिंदकांचा आणखी एक असा भ्रम आहे कीं, बोलके सुधारक कायते अलीकडेच दृष्टीस पडूं लागले आहेत. पण खरी गोष्ट तशी नाहीं. सुधारकांची ही जात पूर्वीपासून आहे! उदाहरणार्थ, आपले पुराणिक, हरिदास, भिक्षुक, कर्मठ शास्त्री, जोशी किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्याही वर्गांतील लोक घ्या. लोकांस धर्मोपदेश करावा, त्यास नीति पढवावी, व स्वत:च्या पवित्र व शुद्ध आचरणानें लोकांस उदाहरण घालून द्यावें—हें या पूर्वपद्धतीच्या सुधारकांचें कर्तव्य होय. पण हें कर्तव्य नीट बजावणारे असले किती सुधारक निघतील बरें? स्त्रियांस मंत्रोपदेश करण्याच्या निमित्तानें त्यांस व्यभिचारपंकांत गूढ गोंवून टाकणारे,

पोथीपुढें ठेवलेल्या तांदुळांचें गाठोडें बाजारी अंमलबजावणीच्या घरीं नेऊन सोडणारे, लोकांस नीतीच्या व निर्लोभाच्या गोष्टी सांगून घरांतल्या घरांत किंवा परक्याच्या घरीं हवा तसला अनाचार करणारे, किंवा पैशासाठीं प्राण सोडणारे, अथवा भस्माचे लांबलचक पट्टे, मुद्रांचें छाप, दर्भाच्या मुष्टी, शालजोड्यांचे लपेट, रेशीमकांठीं धोतरांच्या निऱ्या, रुद्राक्षाच्या व स्फटिकांच्या माळा, टाळ व करताल इत्यादि वाद्यें, नाना प्रकारचीं भजनें व नाच व गीत, व जीवात्मा आणि परमात्मा यांतील भेदाभेदाविषयीं कधीं कधीं समजणारी व कधीं न समजणारी चर्चा इत्यादि धार्मिकपणाच्या दिखाऊ साधनांनीं बायाबापड्यांस व अज्ञ पुरुषांस बुचाडणारे. पहिल्या चालीचे दुर्वृत्त दांभिक सुधारक काय थोडे आहेत! पण त्यांना शेणमार करण्याची, अपंक्त करण्याची, किंवा अलीकडील बोलक्या सुधारकांवर जी वाक्यशरांची वृष्टि होत असते तशा प्रकारची वृष्टि त्यांवर करण्याची इच्छा कधीं कोणास झाली आहे काय! कधीं नाहीं. कारण चांगली गोष्ट हातून प्रत्यक्षपणें न घडली तरी ती सांगत फिरणें हा कांहीं दोष नाहीं, असा मनुष्यांचा पक्का समज होऊन गेला आहे, असें त्यांच्या अशा प्रकारच्या आचरणावरून उघड होतें. तेव्हां सुधारणानिंदकांनीं सध्यांच्याच बोलक्या सुधारकावर इतकें तुटून पडणें शुद्ध वेडेपण होय. वाद करतां करतां ज्या चांगल्या गोष्टी ठरतील त्यांचा अंगीकार त्यांच्याकडूनच काय, खुद्द सुधारणानिंदकांकडूनही हळूं हळूं होत जाईल, अशी आमची खात्री आहे!

मि. अशबरनर आणि हिंदु विधवा : : ३९

मि. अशबरनर यांची आमच्या वाचकांस बहुधा बरीच चांगली ओळख असेल, तथापि न्याशनल रिव्ह्यू नांवाच्या मासिक पुस्तकांत त्यांनीं नुकताच जो लेख लिहिला आहे, त्यांत आमच्या हतभाग्य हिंदु विधवांवर

त्यांनीं जे असभ्य, खोडसाळ व असत्यप्रचुर आरोप लादले आहेत, ते लादण्याइतक्या नीचतरपदावर साहेबमजकूर घसरतील, असें कोणासही वाटलें नसेल! नेटिव्ह लोकांच्या अलीकडील चळवळीपासून आपल्यावर मोठा अनर्थ कोसळेल, म्हणून वेडावून जाऊन, नेटिव्हावर अद्वातद्वा आरोप आणणारे इंग्रजबहादूर आमच्या पुष्कळ पाहण्यांत आहेत. परंतु या द्वेषामुळें नेटिव्ह स्त्रियांची, विशेषेंकरून निराश्रित असलेल्या हिंदु विधवांची विटंबना करण्यास ते प्रवृत्त झालेले फारसे कोठें पाहण्यांत येत नाहीं, इल्बर्ट बिलाच्या वेळीं प्रसिद्धिस आलेले वक्तृत्वाशिरोमणी ब्रानसन् हेही इतप्रया पल्ल्यापर्यंत पोहोंचले नव्हतें. तेव्हां स्त्रीदाक्षिण्याविषयीं ज्यांची योग्य प्रकारें जगभर ख्याति आहे, अशा इंग्रजांपैकीं मि. अशबरनरंसारख्या अकलवंत, हुशार व नाणावलेल्या साहेबबहादुरांनी आपल्या पेनाच्या शिंतोड्यांनीं आमच्या अनाथ गतभर्तृकांच्या अब्रूस डाग लावण्यास उद्युक्त व्हावें, व न्याशनल रिव्ह्यूच्या प्रकाशकारासारख्यांनीं, त्याजविषयीं एक अक्षरही न लिहितां, असल्या घाणेरड्या लेखांस प्रसिद्धि द्यावी, हें पाहून कोणास आश्चर्य व खेद वाटणार नाहीं! 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या स्मृतिवाक्याचा अंमल ज्या देशांत जारीनें सुरूं आहे, तेथील लोकांनीं, इंग्रज स्त्रियांस पुरुषांसमवेत सहल करतांना, पुरुषसमुदायांतून बसतां उठतांना व परपुरुषांशीं निःशंकपणें भाषण करतांना पाहून, व अडाणी व हलकट लोकांच्या मनोरंजनार्थ लिहिलेल्या घाणेरड्या कादंबऱ्या वाचून, प्रत्यक्ष इंग्लंडचा प्रवास तर दूरच राहिला, परंतु येथील इंग्रज अधिकाऱ्याच्या गर्विष्ठपणामुळें, त्यांच्या बंगल्याच्या आंतही पाऊल घालण्याची मारामार पडत असल्यामुळें, त्यांच्या नोकरचाकरापासून निघणाऱ्या कंड्या ऐकूनच, इंग्रज स्त्रियांच्या पातिव्रत्याविषयीं भलभलत्या कल्पना केल्या, तर त्यांत विशेष नवल वाटण्यासारखें कांहीं आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु अशा लोकांनींही इंग्रज स्त्रियांविषयीं कोठें प्रसिद्धपणें जरा हूं कां चूं केलें कीं इंग्रज लोक कसें खवळून जातात हें कोणास माहित नाहीं? मग आपल्या स्त्रीवर्गाच्या अब्रूची ज्यांना इतकी आस्था, त्याच इंग्रज लोकांनीं हिंदु विधवांविषयीं आपण वाटेल तसे प्रलाप केलें असतां त्यापासून हिंदूंच्या अंतःकरणासही तसेंच दुःख होईल, ही गोष्ट

त्यांनीं लक्षांत वागवू नये काय ? किंवा 'पद्भ्यां शूद्रोऽजायत' या श्रुतीच्या जोरावर ब्राह्मणादि उच्चवर्णांची सेवा करण्याकरितांच ईश्वरानें शूद्रांस निर्मिले आहे, म्हणून जशीं आमचीं शास्त्रें मानतात; अथवा अग्निहोत्रास खळ पडेल, या मिषानें आपली अनिवार कामेच्छा तृप्त करण्याकारितां; मृत स्त्रीस जाळून आल्याबर लागलीच पांढऱ्या केसाच्याही पुरुषांनीं पुनर्विवाह करावा, परंतु विधवेनें आपल्या तरुणपणींही, " मृतं भर्तारमादाय ब्राह्मणी वन्हिमाविशेत्। जीवन्ति चेत् त्यक्तकेशा तपसा शोधयेद्वपुः "। म्हणून जसा आमच्या पुरुष शास्त्रकारांनीं निर्णय ठरविला आहे; अथवा गुलामांचा व्यापार सुरू ठेवण्याविषयीं आस्था बाळगणाऱ्या कांहीं इंग्रज मुत्सद्यांनीं, काळ्या कातड्याचे लोक गोऱ्यांच्या सेवेकरतांच इश्वरानें सृजिले आहेत, म्हणून जसें एक महातत्त्व शोधून काढलें होतें, त्याप्रमाणेंच काळ्या कातड्यांच्या आंतील अंतःकरणें अपमानबधिर असतात, किंवा सुधारलेल्या गोऱ्या लोकांच्या थट्टेकरितांच ईश्वरानें हिंदू स्त्रियांस वैधव्य आणिलें आहे, असें एखादें अपूर्व तत्त्व, एखाद्या हिंदुद्वेष्ट्या अपूर्व तत्त्वज्ञान्यानें नवीन शोधून तर काढलें नाहींना ? असें नसतें तर " हिंदु विधवांस बाटेल तसा अनाचार करण्यास हिंदुसमाजानें पूर्ण सनद दिली आहे, तिच्या पापाचरणाकडे समाज जाणूनबुजून दुर्लक्ष करितो, तेव्हां अशी अत्यंत स्पृहणीय, व अप्रतिबंध अशी स्वच्छंदीपणाची आयती मिळालेली वृत्ति सोडून देऊन, त्यांच्या कल्याणार्थ केलेल्या कायद्याचा आश्रय घेऊन, त्या आपल्या स्वेच्छाचारविहारास अडचण काय म्हणून आणतील ?" असे शब्द साहेब बहादुरांच्या पेनांतून खचित निघाले नसते. किंवा असें तर नसेल ना, कीं आपला पुरुषार्थ गाजविण्यास दुसरीकडचे सर्व मार्ग बंद झाले असल्यामुळें ज्यांच्याविषयीं स्वतांचे देशबंधुही अनुकंपा व्यक्त करीत नाहींत, अशा निराश्रित हिंदु विधवांवर आपण आपली तिरंदाजी चालविली असतां आपणांस जयश्री खचित वरील असा साहेबबहादुरांनीं तर्क केला असावा ! व असें असेल तर मात्र साहेबमजकुरांचा तर्क खोटा नाहीं, असें आम्हांस कबूल केलें पाहिजे. कारण कीं उन्नतावस्थापन्न इंग्रज स्त्रिया आपल्या अब्रूस धक्का पोंचवणारा नेटिव्ह वक्ता किंवा पत्रकर्ता, यांची त्रेधा उडवून दिल्याशिवाय जशा

आपल्या पुरुषवर्गास स्वस्थ बसूं द्यावयाच्या नाहींत, तशी ती योग्यता आमच्या बिचाऱ्या विधवांच्या आंगीं नाही, व त्यांची बाजू घेऊन भांडणारा पुरुषवर्गही नियमितच आहे. तेव्हां साहेबमजकुरांचा तर्क खरा ठरून त्यांनीं अर्जिक्यपत्र मिळविलें, याविषयीं आम्हांस संशय नाहीं. परंतु समंजस लोक या विजयाबद्दल त्यांचें अभिनंदन करून त्यांची पाठ थोपटण्याऐवजीं त्यांस लज्जेनें खालीं मानच घालण्यास लावतील यांतही शंका नाहीं.

असो. 'असंमत वैधव्य' या एका शब्दापासून ध्वनित होणाऱ्या असंख्य क्लेशाच्या दडपणानें आधींच चूर होऊन गेलेल्या हिंदु विधवांच्याविषयीं कोणीं अनुदार प्रलाप केल्यास तो जर आमच्या अंतःकरणास दुःसह होणें साहजिक आहे, तर मग त्या स्वेच्छाचारी आहेत असा निरर्गल आरोप मि. अशबरनर यांनीं हिंदु विधवावर्गावर आणलेला पाहून आमचें अंतःकरण क्षुब्ध व्हावें, व 'जल तुंबतां तडागीं फोडावा लागतो जसा पाट' या न्यायानें मनाच्या शांतवनार्थ आम्हीं आपल्या क्षुब्ध मनोवृत्तीस कांहींसा अनियंत्रित संचार करूं द्यावा, यांत विशेष नवल नाहीं. बाकी एकंदर इंग्लिश राष्ट्र अजूनपर्यंत स्त्रीदाक्षिण्यभ्रष्ट झालें नाहीं, इतकेंच नाहीं, तर ते त्यांचें स्त्रीदाक्षिण्य इतकें समर्थ आहे कीं, ते लोक जेथें जेथें जातील तेथें तेथें त्याचा प्रादुर्भाव झाल्यावांचून खचित राहणार नाहीं, असा आम्हांस पक्का भरंवसा आहे; व मि. दादाभाई नवरोजींस 'काळा' म्हणणाराची ज्यांनीं फटफजिती उडवून दिली ते उदार इंग्रज अशा खोडसाळ लेखाची योग्य तीच किंमत करतील, व अनेक शतकेंपर्यंत मागासलेल्या आमच्या लोकांची अनुदारपणें विटंबना न करितां सर्व दिशांनीं उन्नति होण्याकरितां आपली मनापासूनची कळकळ, हितप्रद असा उपदेश, व प्रसंगविशेषीं हातीं असलेला अधिकार यांचा उपयोग करण्यास मोठ्या आनंदानें प्रयत्न करितील, याविषयीं आम्हांस तिळमात्र संदेह नाहीं.

मि. अशबरनर यांनीं आणलेला आरोप सर्वथैव मिथ्या आहे हें विशेष खुलासेवार सिद्ध करण्याची आम्हांस विशेष आवश्यकता भासत नाहीं. तथापि ज्या देशांत पतिव्रतापदप्राप्त्यर्थ लक्षावधि तरुण स्त्रियांनीं पतिचितेवर आपणांस जिवंत जाळून घेण्याचें लोकोत्तर धैर्य दाखविलें, व त्याच्या अभावींही 'विवर्णा-

दीनवदना देहसंस्कारवर्जिता ' होऊन संन्यास वृत्तीचें अवलंबन करून, उपासा-तापासांनीं देह वाळविण्याचें व्रत अनेक युगें चालविलें, त्या देशांतील स्त्रियांस chartered libertines (सनदी स्वेच्छाचारिणी) हा किताब देणारानें आपण काय म्हणतों याचा त्रिवार विचार करावयास पाहिजे होता. ' स्त्रीणां पतिरेव दैवतम् ' या सूत्राचा वाटेल त्या स्थितींत अवलंब करणें चुकीचें असेल, सती जाणें हें अमानुष कृत्य असेल; व असंमत वैधव्यही अन्यायाचें असेल; परंतु या सर्व संस्थांपासून स्त्रीजातीवर जसा जुलूम झाला आहे, त्याप्रमाणेंच त्यांची पातिव्रत्यासक्ति इतर राष्ट्रांहून दृढतर झाली आहे, हेंहीं प्रत्येक विचारी मनुष्यास कबूल केलें पाहिजे. ज्या इंग्रज लोकांनीं हिंदु स्त्रियांच्या चालचलणुकीबद्दल विशेष माहिती मिळविण्याची खटपट केली होती, त्यांचे तरी विचार साहेब मजकुरांनीं प्रकृत लेख लिहितांना मनांत आणावयाचे होते. कर्नेल मंनरो हे आमच्या स्त्रियांविषयीं असें म्हणतात कीं, ' It would be no slight praise to the women of any nation, even to the ladies of England, to have it said that the correctness of their conduct was not inferior to that of Brahmin women and the Hindu women of the higher classes. ' (कोणत्याहि देशांतील स्त्रियांस, व इंग्लंडच्याही स्त्रियांस, त्यांचें वर्तन ब्राह्मणी किंवा वरिष्ठ हिंदु स्त्रियांहून कमी शुद्ध नाहीं, असा दाखला मिळणें म्हणजे आपली मोठी वाखाणणी झाली, असें मानण्यास हरकत नाहीं.) आणि दुष्ट लोकांच्या भुलथापीनें किंवा प्रसंग विशेषीं मनोनिग्रह न झाल्यानें वैधव्यव्रतापासून भ्रष्ट झालेल्या कांहीं विधवा असतील, हें जरी खरें आहे, तथापि एकंदर विधवांच्या वर्गाविषयीं विचार करितां त्यांचें आचरण एकंदरींत वर निर्दिष्ट केलेल्या सामान्य स्त्रीवर्गाप्रमाणें शुद्ध व स्तुत्यर्हच आहे, हें त्यांच्या शत्रूंसही कबूल करावें लागेल.

परंतु या संबंधानें विशेष चमत्काराची गोष्ट ही कीं, वर सांगितल्याप्रमाणें आमच्या एकंदर समाजाची व विधवांची विटंबना करणाऱ्या साहेबबहादुरास आमचेच कांहीं व्यवसायबंधु आपले मित्र समजतात, व पहा " अशबरनरसाहेब

देखील कायद्याच्या विरुद्ध आहेत " असें विधान करून आपला पक्ष सबळ करूं पाहतात. त्यास ही गोष्ट कळून येत नाहीं कीं, विधवांनीं पुन्हां लग्न करण्यास हरकत नाहीं, किंवा त्यांनीं विवाह करण्यास त्यांस अमुक उत्तेजन मिळावें वगैरे कायदे मागणें जर वाईट, तर मग त्यांनीं फिरून लग्न करूं नये किंवा त्या तें करितील या भीतीनें त्यांचें मुंडन करविणें याविषयीं तेवढा कायदा कां पाहिजे ? व या कायद्याचा तर आजमित्तीस प्रत्यक्ष अंमल होत आहे. मि. अशबरनर म्हणतात तसा जर खरोखर प्रकार असता तर नुसतें उत्तेजन काय, परंतु सक्ति करूनही त्यांच्याकडून पुनर्विवाह केला पाहिजे, असें एक वेळ एखाद्या नीतिभक्तास म्हणतां आलें असतें. परंतु तशी मुळींच गोष्ट नाहीं. हिंदु विधवा अगदीं अनाचारांत गढून गेल्या आहेत, म्हणून त्यांस पुनर्विवाहाची मोकळिक पाहिजे असें कोणी प्रतिपादन करीत नाहीं. एखाद्या मनुष्यास सक्तीनें सद्गुणी करण्यांत अर्थ नाहीं, व त्या सद्गुणाचें विशेष मोलही नाहीं. पतिमरणोत्तर वैधव्यव्रताचें आचरण करण्याइतकी ज्यांची मनोनिग्रहशक्ति नाहीं, त्यांस मारून मुटकून संन्यासी करण्यापेक्षां व त्यापासून संभवणाऱ्या पापाचरणास कारणीभूत होण्यापेक्षां त्यास विवाह करण्याची परवानगी दिली असतां पापाचरणाचीं मुळींच भीति राहणार नाहीं, व खऱ्या सद्गुणांचें योग्य मोल लोकांस कळूं लागेल. असो; यासंबंधानें आम्ही वेळोवेळ अनेक प्रकारें लिहिले आहे, तेव्हां त्याविषयीं सध्यांच विशेष विस्तार करण्याचें कारण दिसत नाहीं.

आणखी एक शहाण्याचा कांदा : : ४०

मागील लेखांत मि. अशबर्नर यांनीं आमच्या गतभर्तृकांविषयीं ठोकून दिलेल्या अभिप्रायाविषयीं जे चार शब्द लिहिले आहेत, ते वाचकांच्या ध्यानांत असतीलच. हा गृहस्थ या इलाख्यांतील मुलकी खात्यांत तीस वर्षांहून अधिक वर्षें नोकरीस होता. असिस्टंट कलेक्टरच्या जागेपासून कौन्सिल-

दाराच्या जागेपर्यंत ज्यानें लहानमोठया साऱ्या हुद्यांचीं कामें केलीं, व त्या कामाच्या निमित्तानें नेटिव्ह लोकांशीं ज्याचें संघटन नित्य घडत असे, त्यानें आपल्या तीस वर्षांच्या अनुभवावरून व माहितीवरून "हिंदु विधवा सनदी स्वेच्छाचारिणी असतात," असें आपलें मत स्पष्टपणें ठोकून दिलें आहे! तेव्हां ज्यानें इतकी वर्षें येथें काढलेलीं नाहींत, ज्याला आपल्या विशेष तऱ्हेच्या कर्तव्यामुळें हिंदु लोकांच्या भेटी वारंवार घेतां आल्या नाहींत, व ज्याला वाचण्याचा किंवा लिहिण्याचा विशेष नाद असण्याचा संभव नाहीं, अशा एखाद्या लष्करी लढवय्यानें जर असा अभिप्राय दिला कीं, बहुतेक हिंदु स्त्रिया पातिव्रत्यपराङ्मुख आहेत. तर त्याबद्दल त्याला काय म्हणावें? दुसरें काय म्हणावयाचें? अशा बृहस्पतीच्या तोंडांतून पडलेल्या शब्दकुसुमांचा दुर्गंध दुःसह झाल्यास, तीं तिरस्काराच्या उकिरड्यावर फेंकून द्यावीं, आणि स्वस्थ बसावें, हेंच योग्य आहे! पण जरा त्या ठिकाणाहूनही त्यांचा किळस आणणारा दर्प घरांत भरूं लागला तर तो नाहींसा करण्यासाठीं ज्याप्रमाणें व्याख्याची सांथ आली असतां शहरसफाई ठेवणारे म्युनिसिपॅलिट्यांचें अधिकारी रस्तोरस्तीं रोगविनाशक तांबडी पूड टाकीत जाऊन तीवर संसर्गप्रतिरोधक अशा एका प्रवाही द्रव्याचें प्रोक्षण करितात, त्याप्रमाणें त्यावर टीकारूप दुर्गंधविध्वंसक द्रव्याचें सिंचन केलें पाहिजे; दुसरा उपाय नाहीं!

लॉर्ड वुइलियम बेंटिंग याचे कारकीर्दीत कॅप्टन ऑगस्टस कइर्लर्ड म्हणून एक उत्तर हिंदुस्थानांत लष्करी अधिकारी होता. याच्या ग्रंथावरून त्याला गाण्याचा शोक फार असावा असें दिसतें. यानें आमच्या गायनशास्त्राविषयीं जो अभिप्राय दिला आहे त्यावरून त्याची शोकबुद्धि व्यक्त होते इतकेंच नाहीं, तर त्याला आपल्या गाण्याचें मर्महीं बरेंच समजलें होतें असें दिसतें. यानें आमच्या गायकांविषयीं वाद्यांविषयीं व संगीतकलेविषयीं जें लिहिलें आहे तें वाचून त्याविषयीं आपल्या अंतःकरणांत कृतज्ञता उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहीं. पण तो येवढेंच करून स्वस्थ बसला नाहीं, हें फार वाईट झालें. 'हिंदुस्थानचें संगीत' या नांवाच्या ग्रंथांत त्याला आमच्या गाण्याविषयीं जें लिहावेसें वाटलें तें लिहून गेल्यावर, अनेक संगी-

ताच्या भाषांतरापासून आमच्या जुन्या चालीरीती कशा प्रकारच्या असाव्या, याचें अनुमान करण्याचा प्रयत्न त्यानें केला आहे व त्यांत तो अगदीं फसला आहे. कोणत्याही देशांतील लोकांच्या काव्यावरून किंवा तालसुरांत बसविलेल्या पद्यांवरून त्या लोकांच्या नीतिविषयीं, विशेषतः लिंगविषयक नीतिविषयीं, अभिप्राय देणें मोठें साहस होय, असें आम्हांस वाटतें. कारण 'शृंगार' हा काव्याचा प्रधान विषय असल्यामुळें, आणि अतिशयोक्ति हा काव्यरसात्मा होऊन बसल्यामुळें, काव्यांतर्गत स्त्रीपुरुषांच्या उद्‌गारांवरून कोणत्याही लोकांच्या नीतिमत्तेविषयीं अटकळ करूं गेल्यास तींत प्रमाद होण्याचा फार संभव असतो. 'मिस्टरीज ऑफ धी कोर्ट ऑफ लंडन' या रेनॉल्डकृत ग्रंथमालिकेवरून इंग्लिश लोकांच्या नीतिविषयीं मत देणें न्याय्य होईल काय? संभवित इंग्लिश लोक उघडपणें ही कादंबरी वाचीत नाहींत, व लोकांच्या दृष्टीस पडतील अशा ठिकाणीं तिचीं 'व्हाल्मे' ठेवीत नाहींत; कारण बीभत्स शृंगार त्यांत ओतप्रोत भरला आहे, असें सांगतात! तेव्हां ज्याप्रमाणें मिस्टरींचीं पुस्तकें आंग्ल नीतिवर निबंध लिहिण्यास बसले असतां आधारभूत मानितां येणार नाहींत, त्याप्रमाणेंच उत्तर हिंदुस्थानांतील हिंदु व मुसलमान गवय्ये आणि नायकीणी त्या चिजा गातात किंवा वाजवितात त्यावरून हिंदू लोकांच्या नीतिचें प्रमाण बांधिता येणार नाहीं पण असें करण्याचें धाडस आमच्या आजच्या निबंधाच्या नायकानें केलें आहे, व तें आमच्या मतें अगदीं चुकलें असल्यामुळें या निबंधाच्या शिरोभागीं आम्हीं त्यास आणखी एक शहाण्याचा कांदा असें म्हणून अशबर्नरसाहेबांच्या पंक्तीस त्यास बसविलें आहे. आमच्या संगीत शास्त्रांतील स्वररचनेविषयीं व स्वरमेळाविषयीं जें म्हणावयाचें होतें तें म्हटल्यावर, या ग्रंथकर्त्यानें आपलें मन गीतांच्या किंवा चिजांच्या अर्थांत घातलें, व तसें केल्याबरोबर त्याच्या लेखणीस स्फुरण येण्यासारखा नवीन विषय त्याचे हातीं लागला! अनेक चिजांच्या अर्थाचें मंथन केल्यावर आमच्या संगीतांत बहुधा ज्या गोष्टीचा अंतर्भाव केलेला असतो असें त्याच्या नजरेस आलें, त्या ह्या होत—

१ अनुकूल होण्याविषयीं वल्लभाचीं प्रार्थना.

२ वल्लभाच्या विरहामुळें कामिनीस होणारा शोक.

३ प्रतिस्पर्धिनी कामिनीविषयीं द्वेषोद्गार.

४ सासू, नणंदा, किंवा जावा यांचा डोळा चुकवून प्राणेशाची मुलाखत घेण्याची पंचाईत, व मेखलांतील क्षुद्रघंटांच्या आवाजामुळें कोणास समजूं न देतां घरांतून बाहेर पडण्याची, किंवा रस्त्यांतून जाण्यायेण्याची अडचण.

५ दयितावर ठेवलेल्या प्रेमास सासू व नणंदा यांकडून होणाऱ्या प्रत्यूहाच्या संबंधानें कामिनींचे दुःखोद्गार.

६ सखीपाशीं हितगुजाच्या गोष्टींचें कथन, आणि इष्ट मनोरथ पूर्ण करण्याच्या कामीं तिनें साहाय्य करावें यासाठीं तिची विनवणी.

७ संकेत चुकूं न देण्याविषयीं व प्रेमबंध शिथिल न होऊं देण्याविषयीं सख्यांचा उपदेश.

हें आमच्या संगीतपयाच्या मंथनापासून वुइलर्ड साहेबांनीं काढलेलें सार किंवा नवनीत! कदाचित् हें त्यांस स्वल्प आयासानें काढितां आलें असेल, असें वाचकांस वाटण्याचा संभव आहे. पण तसें बिलकूल झालेलें नाहीं. तें काढतांना त्यांस भगीरथ प्रयत्न करावा लागला. हिंदु लोकांच्या गाण्यांतच असे विषय येतात, किंवा आशिया खंडांतील इतर लोकांच्या गाण्यांतही अशाच विषयाचा भरणा आहे, अशी शंका त्यांस उत्पन्न होऊन, अरबी व फारशी चिजांकडे त्यांनीं आपली नजर फेंकली, व त्यांवरून त्यांस असें दिसून आलें कीं, हिंदुस्थानांतील स्त्रियांप्रमाणें अरबी स्त्रियांवर मदनाच्या बाणांचा प्रहार होणार नसल्यामुळें, त्यांना वश करण्यासाठीं अरबी पुरुष नेहमी उत्कंठ झालेले असतात, व म्हणून अरबी काव्यांत जागोजाग पुरुष स्त्रियांची विनवणी करीत आहेत असें दिसून येतें! फारशी किंवा परशिअन काव्यांत भलताच प्रकार दिसून येतो. त्यांत स्त्रीपुरुषांतील प्रेमास दुय्यम स्थान देऊन, जेथें तेथें पुरुषाभिलाषाचाच उल्लेख केलेला आढळतो. या अमानुष अनुच्चारणीय पापाची आसक्ति या लोकांस कशी लागली असेल ती असो; हें खरें आहे कीं, यांच्या काव्यांत या दुष्ट व्यसनानाच आद्यपद दिलें आहे! हिंदूच्या कवितेंत अरबी कवितेचा व्युत्क्रम आढळतो. हिंदूंच्या संगीत पद्यांवरून हिंदु स्त्रिया अत्यंत कामातुर आहेत व इष्ट पुरुषास वश

करण्याच्या इराद्यानें त्या नाना प्रकारचे उपाय योजीत आहेत, असें दिसून येतें !

याप्रमाणें हिंदुस्थानांतील नायकिणीच्या तोंडीं असलेल्या चिजांच्या अर्थावरून आमच्या बायकांस कामातुर ठरविल्यावर त्या इतक्या कामातुर कशामुळें होतात, याचा छडा काढण्याकडे वुइलर्ड साहेब वळले, व त्या कामित्वाचीं त्यांनीं जीं तीन कारणें शोधून काढली तीं हीः– १ हिंदुस्थानांतील पूर्वीची अनवस्था; २ अनेक बायका करण्याची चाल; व ३ हिंदु स्त्रियांचें अज्ञान. या तीन कारणांमुळें पूर्वी हिंदु स्त्रिया कामातुर होऊन व्यभिचार करण्यास प्रवृत्त होत, असें वुइलर्ड साहेबांचें म्हणणें आहे !

हिंदुस्थानच्या सांप्रत स्थितीवरून त्यांच्या पूर्वस्थितीचें अनुमान करणें फार चुकीचें होणार आहे, असें या गृहस्थाचें म्हणणें आहे. ती पूर्वस्थिती बरोबर लक्षांत येण्यास सध्यां डोळ्यांपुढें ज्या गोष्टी दिसतात त्या अगदीं विसरून गेलें पाहिजे व इतिहासापासून, काव्यापासून, व इतर ग्रंथापासून जी माहिती मिळते तीवरून, तत्कालीन स्थितीचें चित्र काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे; जे कोणी अशा प्रकारचा प्रयत्न करतील त्यांस असें दिसून येईल कीं, त्या वेळची हिंदुस्थानची स्थिति फारच शोचनीय होती. आतांप्रमाणें तेव्हां कोठेंही शांतता दृष्टीस पडत नसे; एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पायवाटांनीं जावें लागे; साऱ्या देशांत चार दोन देखील मोठ्या सडका नव्हत्या; मार्गांत चोराचें भय मोठें असे; रस्ते सांपडण्याची मारामार पडे; वाटेंत भेटेल त्यास रस्ता विचारून पुढें चालूं लागावें तर कदाचित् त्याच्या सांगण्यावरून चोराच्या हातांत आपण होऊन पडूं कीं काय, अशी दहशत वाटत असे; जिकडे तिकडे दाट झाड्या, ओसाड रानें किंवा चिखलाच्या दलदली असत, व त्यांत भयंकर श्वापदें संचार करीत असत; त्यामुळें कोणालाही आपला गांव सोडून एकट्या दुकट्यानें फार लांब जाववत नसे. रात्री प्रवास करणें बहुधा अशक्यच असे; ज्याप्रमाणें जमिनीवरचा त्याप्रमाणें पाण्यावरचा प्रवासही अत्यंत संकटावह असे; अशा स्थितींत दूरचा प्रवास करावयाचा म्हटला म्हणजे त्याचे बेत

पूर्वी वर्ष दोन वर्ष चालत; व तो करण्याकरितां निघण्याचा प्रसंग येऊन ठेपला म्हणजे कुटंबांतील माणसांत, विशेषतः ज्या तरुणीचे पति प्रवासास निघालेले असत, त्यांच्या अंतःकरणांत दुःखाचा अनिर्वाच्य कल्होळ होत असे.

अशा रीतीनें प्रवास करण्यासाठीं घर सोडून गेलेल्या तरुणांच्या तरुण पत्न्या चिंतेनें व विरहव्यथेनें व्याकुळ होत्साल्या मोठ्या कष्टानें आपले दिवस कंठीत. त्यांच्या नणंदा व जावा सकाळीं उठून वेणीफणी करीत आहेत, दागदागिने घालीत आहेत, व एकमेकींचा विनोद करीत आहेत हे पाहून या विरहव्यथेनें पीडलेल्या तरुणींना फार खेद होत असे. तथापि बऱ्या-वाईटानें आपला दिवसाचा वेळ कसा तरी काढीत, पण रात्र येऊन जिकडे तिकडे सामसूम झालें व त्या आपल्या आंथरुणांवर पडल्या म्हणजे पति-चिंतेंत त्या इतक्या व्यग्र होऊन जात कीं, उभ्या रात्रींत त्यांचा डोळा लागत नसे. अशा स्थितींत उन्हाळा गेल्यावर पावसाळ्याच्या आरंभास तरी आपले पति परत येतील, आणि आपली त्यांची गांठ पडून आपणांस आनंदाचा दिवस दिसेल, अशा आशेवर त्या वसंत व ग्रीष्म ऋतूंतील अत्यंत प्रखर दिवस व रमणीय रात्रीं मोठ्या कष्टानें लोटीत असत. हे ऋतु निघून जाऊन पावसाळ्याच्या आरंभास त्यांचे पति परत आले तर सारें ठीकच असे पण दुर्दैवानें जर तसें घडलें नाहीं, तर मात्र त्यांच्या दुःखास व चिंतेस पारावार नसे. याप्रमाणें अनेक वर्षें वाट पाहिल्यावर, पति परत येत नाहींत, असें पाहून कामाग्नीनें करपून गेलेल्या या तरुणींची काय अवस्था होत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. अशा संकटात सांपडलेल्या तरुण कन्यका अखेरीस निराश होऊन वांकडे पाऊल टाकण्यास तयार होत, आणि सखीच्या साह्यानें संकेतस्थानी पाहिजे तसलें धाडस करून वल्लभांच्या गांठीं घेत आणि अप्रशस्त रीतीनें आपले मनोरथ पूर्ण करीतं. व अशी स्थिति अनेक कुटुंबांत दृष्टिगोचार होत असल्यामुळें तिचें प्रतिबिंब तत्कालीन काव्यांत व संगीतांत पडलें आहे, असें **वुइलर्ड** साहेबांचें म्हणणें आहे.

याशिवाय आम्हांत रूढ असलेले बहूपत्नकित्व हें आमच्या स्त्रिया व्यभिचारी असण्याचें दुसरें कारण आहे, असें या गृहस्थाचें मत आहे, व ते कांहीं खोटें नाहीं. **एका पुरुषा दोघी नारी।**

पाप वसे ज्याचें घरीं ॥ ही तुकारामोक्ति जर आमच्या लोकांस मान्य असेल तर एकाच पुरुषानें तीन किंवा चार बायका करण्याची चाल ज्या वेळीं रूढ असेल त्या वेळेस प्रत्येक स्त्री आपल्या पतीचें सारें प्रेम आपणावर असावें म्हणून खटपट करीत असल्यामुळें, सापत्नमत्सर विकोपास जाऊन कुटुंबांतील शांततेचा नाश होत असेल इतकेंच नाहीं, तर ज्या दुर्दैवी तरुणी आपल्या पतींच्या नजरेतून उतरल्या जात असतील त्यांचे मन त्यांच्या संसाराकडे न लागतां बाह्यसुखाकडे जाऊं पाहत असेल, असे मानण्यास काय हरकत आहे ?

व्यभिचाराचें तिसरें कारण आमच्या स्त्रियांचें अज्ञान होय, असें हे साहेब म्हणतात, व त्याविषयीं आम्हांस थोडी शंका आहे. ज्ञान आणि सद्गुण यांचा अन्योन्य संबंध कितपत आहे, हें अद्यापि चांगलेसें ठरलेलें नाहीं. ज्ञानाचा प्रसार झाल्यानें खून, दरवडे, मारामाऱ्या वगैरे मोठमोठ्या गुन्ह्यांची संख्या कमी होते, असें पुष्कळ विचारी लोक कबूल करतात. पण खोटें बोलणें, बनावट कागद करणें, खोट्या साक्षी देणें, चतुराईनें दुसऱ्यास फसविणें, लांच खाणें, व्यभिचार करणें, खोट्या शपथा घेणें वगैरे कमी दुष्टपणाचे गुन्हे वाढतात किंवा कमी होतात याविषयीं जितका संशय ॲरिस्टॉटल यांस होता तितकाच हर्बर्ट स्पेन्सर यासही आहे. तेव्हां अज्ञानामुळें आमच्या स्त्रिया विशेष व्यभिचारी होत्या, व आतां त्यांस थोडेबहुत लिहितां वाचतां येऊं लागलें आहे, म्हणून आमच्यांतील व्यभिचार कमी होऊं लागला असला पाहिजे, असें जर कोणी इंग्रज आम्हांस सांगू लागेल तर त्यांचें आम्हांस हंसू आल्यावांचून राहणार नाहीं ! कोणत्याही देशांतील लोकांनीं दुसऱ्या देशांतील लोकांस व्यभिचारी ठरविण्याचें धाडस करूं नये, म्हणून आम्हीं इंग्लिश लोकांच्या व्यभिचाराविषयीं कांहीं एक म्हणत नाहीं; तथापि जर ते आपण होऊन तो दोष आमच्या स्त्रियांवर अविचारानें आणूं लागतील, तर तुमच्या मडमांनीं आमच्या स्त्रियांचें तीर्थ घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावें इतक्या त्या पवित्र आहेत, असें म्हणण्यास आम्हीं कधींही सोडचार नाहीं ! हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या पातिव्रत्याइतकें शुद्ध पातिव्रत्य बहुधा दुसऱ्या कोणत्याही देशांत सांपडणार नाहीं.

संमतीचें वय आणि जुन्या लोकांचा खोटेपणा : : ४१

संमतीचें वय सरकारानें वाढवूं नये, म्हणून जुन्या लोकांनीं जी ओरड चालविली आहे तींतील खोटेपणा पाहून कोणत्याही सत्यशील मनुष्यास जुन्या लोकांचा आणि सुशिक्षित म्हणविणाऱ्या त्यांच्या पुढाऱ्यांचा तिरस्कार व संताप आल्यावांचून राहणार नाहीं. त्यांची पहिली लबाडी ही आहे कीं, संमतीचें वय बारा वर्षांपर्यंत वाढविलें असतां सरकारानें हिंदुधर्मांत लोकांच्या मर्जीविरुद्ध हात घातला असें होईल. १८८५ सालच्या जाहीरनाम्यांत सरकारनें असें फर्माविले आहे कीं, आम्ही आमच्या हिंदु प्रजेच्या धर्मांत कोणत्याही प्रकारें हात घालणार नाहीं; नवऱ्यानें आपल्या बायकोस तेरावें वर्ष लागण्यापूर्वी तिच्याकडे जाऊं नये, असा निर्बंध केला असतां, या लोकांच्या म्हणण्याप्रमाणें सरकारनें धर्मांत हात घालण्यासारखा होतो, तेव्हां जर हा कायदा पसार झाला तर सरकारनें वचनभंग केला, असें होणार, अशी त्यांच्या वाचाळ पुढाऱ्यांनीं बडबड चालविली आहे. विवाहित स्त्रीचा संभोग तिच्या नवऱ्यानें तिला तेरावें वर्ष लागेतोंपर्यंत घेऊं नये, घेतल्यास तो संभोग दंड्य होईल, असें कलम पीनल कोडांत घातलें असतां जर हिंदुधर्मांत सरकारानें हात घातला असें होत असेल तर त्या वयाचे पूर्वी नवऱ्यानें बायकोकडे जावें, अशा अनुज्ञा हिंदुधर्मशास्त्रांत असल्या पाहिजेत. पण त्या आम्हांस तर कोठें आढळल्या नाहींत, व हिंदुधर्मशास्त्रांचीं पानें रात्रंदिवस चाळणाऱ्या जुन्या लोकांच्या पुढाऱ्यांनींही त्या पुढें आणिलेल्या नाहींत. तेव्हां या निर्बंधामुळें सरकारानें हिंदुधर्मांत हात घातला असें होतें, असें गागणारांची ही शुद्ध लबाडीची ओरड आहे असें म्हणणें भाग आहे. यावर कोणी असें प्रत्युत्तर देतील कीं, तेराव्या वर्षापूर्वी नवऱ्यानें बायकोकडे जावें अशी जरी स्पष्ट शास्त्राज्ञा नाहीं, तरी कन्या ऋतुमती झाल्याबरोबर तिचें गर्भादान करावें अशी शास्त्राज्ञा आहे, व ज्याअर्थी कित्येक मुली बाराव्या वर्षी ऋतुमती होतात असें दिसून आलें आहे, त्याअर्थी या कायद्याचें उल्लंघन न करणें म्हणजे ज्या मुलीस बाराव्या वर्षी ऋतु प्राप्त होईल त्यांच्या गर्भाधानाची स्थिति कांहीं अंतरावर टाकून पाल्य धर्माज्ञेचें

उल्लंघन करणें, व बेचाळीस पिढ्या अधोगतीस जाण्यासारखें वर्तन करणें होय ! यावर आम्ही असा प्रश्न विचारतों कीं, मुलगी कोणत्याही स्थितींत असो, किंवा ती कोणत्याही वयाची असो, तिला ऋतु प्राप्त झाला कीं, सोळा दिवसांच्या आंत नवऱ्याला गर्भादान करण्याकरितां तिच्याकडे पाठविलेंच पाहिजे, अशी शास्त्राज्ञा कोठें आहे ती या धर्माभिमान्यांनीं आम्हांस दाखवावी, आणि तिचें पालन सर्व ठिकाणीं सर्वांकडून चाललें आहे कीं काय, हें आम्हांस सांगावें; तसेंच, सोळा दिवसांच्या आंत गर्भाधान ज्यांनीं उरकून घेतलें नाहीं त्यांस वाळींत टाकण्याचा किंवा त्यांना जबरदस्त प्रायश्चित्त देण्याचा परिपाठ आहे कीं काय, याविषयींही जो खरा प्रकार असेल तो या लोकांनीं या वेळीं प्रसिद्ध करणें आवश्यक आहे. बरेंवाईट न पाहतां प्रतिपक्ष्यांचा पाडाव करण्यासाठीं हवें तें बहकत सुटणें; ज्या गोष्टी धर्माशीं विसंगत तर नाहींतच पण उलट धर्मसाहाय्यकारी आहेत अशा गोष्टी धर्मविरोधक आहेत, अशी खोटी ओरड करून आपल्या प्रतिपक्ष्यांवर व सरकारावर तुटून पडणें, हें धर्मशील म्हणविणाऱ्या लोकांस अत्यंत लज्जास्पद आहे. स्त्री ऋतुस्नात असो किंवा नसो, तिला तेरावें वर्ष लागण्यापूर्वी तिच्याशीं समागम करणें हा मोठा अन्याय होय, अशा आमच्या धर्मशास्त्राच्या व वैद्यकशास्त्राच्या स्पष्ट आज्ञा आहेत; पण त्यांचा आमच्याकडून व्हावा तसा प्रतिपाल होत नसल्यामुळें कित्येक कन्यकांवर भयंकर प्रसंग गुदरत आहेत. तेव्हां संमतीचें वय बारा वर्षेपर्यंत वाढविण्याच्या हेतूनें ऑ. मि. स्कोबल यांनीं जें बिल मुख्य का. कौंसिलापुढें आणिलें आहे, ते पसार झाल्यास ज्या राक्षसी कामुकांच्या कामवासना अनावर होतील त्यांस कडक शिक्षा देण्यास सांपडेल इतकेंच नाहीं, तर हिंदुधर्मशास्त्रांत अल्पवयस्क कन्यकांवर त्यांच्या उतावीळ नवऱ्यांकडून जुलूम न होण्याबद्दल जे प्रतिबंध सांगितले आहेत ते ब्रिटिश सरकारानें सक्त अमलांत आणिल्यासारखें होणार आहे.

या नवीन होणाऱ्या प्रतिबंधाविरुद्ध व सुधारकांविरुद्ध अज्ञान लोकांचीं मनें क्षुब्ध करण्यासाठीं जुन्या लोकांचे सत्यपराङ्मुख पुढारी त्यांस असें सांगत फिरतात कीं, असा प्रतिबंध करणें म्हणजे कायद्याने

विवाहकालाची मर्यादा वाढविण्यासारखेंच होय! व विवाहसंबंध तर धर्मांतर्गत विधि आहे; तेव्हां संभोगकालाची मर्यादा वाढविणें हें हिंदु धर्मावर स्वारी करण्यासारखें आहे! असल्या भ्रामक कल्पना लोकांत पसरणारांस काय म्हणावें हें आम्हांस समजत नाहीं. असले खोटे लपंडाव करून सरकारा-विरुद्ध लोकांचीं मनें कलुषित करणारांस व खऱ्या धर्मापासून व सुधारणेपासून त्यांना फितूर करणारांस राजनिष्ठ व धर्मनिष्ठ म्हणण्यापेक्षां राजद्रोही, धर्मद्रोही, लोककल्याणशत्रु म्हणणें बरें दिसतें! तेराव्या वर्षापर्यंत संभोगाची मनाई केल्यानें जन्म झालेल्या मित्तीपासून बाराव्या वर्षाच्या अखेरच्या दिवसापर्यंत पाहिजे त्या वेळीं मुलीचें लग्न लावण्यास संमतीच्या या नवीन कायद्यानें कशी हरकत येते कोण जाणे! पण ज्यांना कांहीं तरी बडबड करून चांगल्या गोष्टीविरुद्ध लोकांची उठावणी करावयाची आहे, व आपल्याबरोबर इतरांनाही दुष्ट आचारांच्या चिखलांत लोळत पाडावयाचें आहे, त्यांना सत्यासत्य पाहाण्याची काय गरज आहे?

पुनः या लोकांचें असें एक तुणतुणें चांललेलें असतें कीं, बारा वर्षांच्या आंत स्त्रीपुरुषांचा समागम होणें जरी इष्ट नाहीं, तरी तो समागम एकाएकीं कायद्यानें बंद करणें बरें नाहीं. कारण त्याला लोकमत अनुकूल नाहीं. शिक्षणाचा प्रसार होऊन लोकमत सिद्ध झाल्याखेरीज अशा प्रतिबंधापासून फायदा न होतां उलट नुकसान होणार आहे. कारण कायदा करून ठेवल्यानें व मोठ्या शिक्षेची भीति घातल्यानें उल्लू मनुष्य आपली अनावर झालेली कामवासना तृप्त करण्यास मागेंपुढें पाहणारा नसतो; त्याच्या मनानें उचल खाल्ली कीं तो तुमचें हवे तसले कायदे गुंडाळून ठेवून पापाचरण करण्यास प्रवृत्त होतो; सबब अशी वासनाच त्याचे अंतःकरणांत उद्भवणार नाहीं, अशा प्रकारचें शिक्षण त्याला दिलें म्हणजे झालें! यावर आमचीं दोन उत्तरें आहेत. पहिलें; या कोटिक्रमांत बिलकूल अर्थ नाहीं; असेल तर खून करणारास फांशीं देण्याचा जो अधिकार ठेविला आहे तोही पीनल कोडांतून काढून टाकला पाहिजे! कारण उत्कट द्रव्यलोभानें किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें जो खून करण्यास निघतो, तो त्या अपराधास पीनल कोडांत काय शिक्षा सांगितली आहे, हें

पाहण्यांत गुंतणारा नसतो. सबब खून करणारांस देहांत शिक्षा देण्यापेक्षां ज्या शिक्षणानें त्याला खून करण्याची बुद्धिच होणार नाहीं, असें शिक्षण त्यास द्यावें म्हणजे झालें ! या विचारसरणीप्रमाणें आजच सारें पीनल कोड रद्द करण्यास सिद्ध झालें पाहिजे ! पण प्रस्तुत कायद्याचे शत्रू तसें करण्यास तयार असतील असे आम्हांस वाटत नाहीं. शिवाय **शिक्षण** म्हणजे तरी काय ? सदुपदेश करणें व श्रीमुखांत दोन चापट्या लगावणें यालाच शिक्षण कशासाठीं म्हणावें ? सक्त मजुरी करावयास लावणें, फटके मारणें, खोड्यांत घालणें, सुळी देणें, फांशीं चढवणें वगैरे शिक्षांसही शिक्षणाचे प्रकार कां मानू नये ? अपराधाच्या मानानें हें सुशिक्षिणाचेच प्रकार आहेत असें आम्हांस वाटतें. तेव्हां संमतीच्यासंबंधानें आज जो कायदा हिंदुस्थानसरकार करूं पहात आहे त्यापासून म्हणण्यासारखा तात्कालिक उपयोग न झाला तरी तो शिक्षणावह होईल, असें जें ऑ. मि. **स्कोबल** यांचें म्हणणें आहे, तें यथार्थ आहे.

आतां लोकमताच्या संबंधानें हे हट्टी जुने लोक जो आग्रह धरून बसूं लागले आहेत, त्याविषयीं मुळींच विचार करण्याची गरज नाहीं. कारण सुधारकांना आपल्या बाजूस जितकें लोकमत आहे, असें म्हणण्याचा अधिकार आहे, त्याहून फारच कमी अधिकार या लोकांना तें आपल्या बाजूस आहे, असें म्हणण्याचा आहे. या कायद्याशीं आपल्या स्त्रियांचा विशेष संबंध आहे व त्या त्याला प्रतिकूल आहेत, असें म्हणण्याची छाती या सत्यापलाप करणाऱ्या वाद्यांसही होणार नाहीं. तसेंच खालच्या जातींचे लाखो अज्ञान लोकही यांचे बाजूस आहेत असें नाहीं. कारण एकंदर असल्या संभोगाचा प्रकार त्यांच्यांत सहसा घडत नाहीं, व दुसरें ज्याप्रमाणें इतर गोष्टीविषयीं त्यांचा अभिप्राय कोणी घेत नाहीं, त्याप्रमाणें या गोष्टीतही त्यांचें मत कोणी विचारलेलें नाहीं. शिवाय, लोकमताचें आजच एवढें स्तोम माजविणाऱ्या जुन्या लोकांस आम्ही असें विचारतों कीं, हिंदु राजे व हिंदु शास्त्रकार लोकमतांची पर्वा करीत असत, किंवा आपणांस योग्य वाटतील ते निर्बंध त्या मताचा विचार मनांत न आणतां बेलाशक करीत असत ? तसें नसेल तर "**राजा कालस्य कारणम्**" ही म्हण कोठून आली ? ऑ. रा. ब. नूलकर

या कायद्यास प्रतिकूल आहेत म्हणून जी बातमी आली आहे ती खरी नसावी; कारण सुधारकांनीं येथून धाडलेल्या मेमोरियलावर (अर्जावर) त्यांची सही आहे. तथापि कौन्सिलांतील भाषणाचा कच्चा 'रपोट' येईपर्यंत त्यावर कोणत्याच प्रकारची टीका न करणें हेंच उचित आहे.

आतां मात्र खचित होणार : : ४२

काय ? संमतीचा कायदा ! !

आजपर्यंत ज्या गोष्टीची इतकी 'भवति न भवति' झाली ती आतां फलद्रूप होण्याचा समय येऊन ठेपला आहे; यासाठीं हिंदु धर्माचा वृथा अभिमान धरणाऱ्या आग्रही व सत्यापलाप करणाऱ्या लोकांनीं आपली असेल तेवढी पुण्याई खर्च करून त्या गोष्टीविरुद्ध आपल्या हातून जें होणें असेल तें करावें. बायकोस बारावें वर्ष लागण्यापूर्वी तिचा नवरा तिच्याकडे गेला तर त्यानें तिच्यावर 'रेप' केला, किंवा असंमत रत्युपभोग घेतला, असा कायदा करून जे कामी पुरुष त्याच्या तावडींत सांपडतील त्यांस जन्मठेपेची काळ्यापाण्याची शिक्षा देण्यास कांहीं हरकत नाहीं. पण असा कायदा केल्यानें अशा प्रकारच्या अपराधांची संख्या म्हणण्यासारखी कमी होण्याचा संभव नाहीं, असें आमचें मत पूर्वीपासून असल्यामुळें, आम्ही या कायद्याचा पक्ष घेऊन मोठ्या वीरश्रीच्या वादांत कधींच पडलों नाहीं. तेव्हां हा कायदा पसार झाल्यास (व होईल याविषयीं आतां आम्हांस मुळींच शंका राहिली नाहीं.) त्याबद्दल विशेष आनंद मानण्याचें किंवा फुशारकी मिरविण्याचें कारण विचारी सुधारकांस नाहीं असें आम्हांस वाटतें. तथापि या कायद्याचा मसुदा मुख्य कौन्सिलापुढें येऊं नये, व आल्यास त्याला कायदेपणा प्राप्त होऊं नये, म्हणून जुन्या पद्धतीच्या लोकांनीं सत्यपराङ्मुख होऊन हवी तसली बडबड चालविली आहे, व पोकळ दटावणीच्या गप्पा मांडल्या आहेत त्यांतील कपट व लबाडी बाहेर पडून त्यांचा मोड होणार हें पाहून आम्हांस सानंद

खेद होत आहे ! मागल्या लेखांत या बिलाविषयीं आम्ही विशेष चर्चा करण्याच्या भरींत पडलों नाहीं, कारण त्या वेळेस त्या संबंधानें आलेल्या तारांतील मजकुरांवरून लोकांचा गैरसमज होण्याचा संभव होता; व कित्येक पत्रांनीं तो करून सोडण्यास मागेंपुढें पाहिलेंही नाहीं. त्या तारांतील अस्पष्ट व त्रोटक माहितीवरून कित्येकांनीं असा अर्थ काढला कीं, ज्या ऑ. रा. ब. नूलकरांनीं येथील सुधारकांनीं धाडलेल्या अर्जावर आपली सही दिली ते नूलकरसुद्धां या संमतीच्या वयाचे बिलास, आयत्या वेळीं प्रतिकूल झाले ! या सहजगत्या उठलेल्या किंवा कोणीतरी बुद्धया उठविलेल्या अफवेवर आम्हीं त्या वेळेस बिलकुल विश्वास ठेविला नाहीं, आणि ठेवला असतां तर आमच्या हातून मोठा प्रमाद घडला असता, असें आतां हिंदुस्थान सरकारकडून प्रसिद्ध झालेल्या एक्स्ट्रॉऑर्डिनरी ग्याझेटांतील रिपोर्टावरून उघड होत आहे. या रिपोर्टापैकीं म्हणजे संमतीचें वय वाढविण्याविषयीं ऑ. सर ए. स्कोबल यांनीं कौन्सिलापुढें बिल आणिलें त्या वेळेस जीं भाषणें झालीं त्यापैकीं दोन भाषणें आम्हांस फार आवडलीं; एक खुद्द ऑ. ए. स्कोबल यांचें, दुसरें ऑ. रा. ब. नूलकर यांचें. लॉर्ड लॅन्सडौन यांचे भाषण आपलें सरासरीच होतें, पण सर रोमेशचंद्र यांच्या भाषणाच्या बाजूस तें मांडण्याची मुळींच सोय नाहीं, कारण इतक्या मोठ्या विद्वानाकडून झालेलें इतकें गचाळ भाषण आमच्या पाहण्यांत कधींच आलें नाहीं. पण एका प्रकारें हे पेनशन्दार हायकोर्ट जज्ज जसें बोलले तसें बोलणेंच त्यांस योग्य होतें. जॉन् स्टुअर्ट मिल्ल यांचें नेहमीं असें म्हणणे असें कीं, ज्याच्या अंगांत जो दुर्गुण विशेष असतो, तो दुर्गुण काढून टाकण्यास फार प्रतिकूल असतो. अडाणी लोकांस जबरीच्या शिक्षणाचा, वस्ताद दारू पिणारास दारू पिण्याच्या बंदीचा, अल्पवयांतच अपत्यांचे विवाह करणारांस बालविवाहनिषेधाचा व अप्राप्तयौवन कुमारिकांचा त्यांच्या संमतीविरुद्ध संभोग करणारांस संमतीचें वय वाढविण्याचा कायदा सहसा पसंत पडावयाचा नाहीं ! यावरून खुद्द सर रोमेशचंद्र यांनीं आपल्या तारुण्यांत तसें केलें असेल, किंवा आधुनिक तरुणांनीं तसें करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें त्यांचें म्हणणें असेल, असें आम्हांस प्रतिपादितां येणार नाहीं, हें आम्ही

कबूल करितों. त्यांनीं असलें पाप स्वतः केलें नसेल, व त्यांना तें नकोहि असेल, पण ज्या देशांत त्यांचा जन्म झाला आहे, व ज्या देशांत त्यांचें बहुतेक वय गेलें आहे, त्या देशांतील वैवाहिक आचारांचें अस्पष्ट प्रतिबिंब तरी त्यांच्या विचारसरणींत पडल्यांवाचून कसें राहणार ? मुली उपवर होण्यापूर्वी म्हणजे त्यांना ऋतु प्राप्त होण्यापूर्वी त्यांचें लहानमोठे नवरे कौतुकानें किंवा जबरीनें त्यांचेकडे पाठविणें, किंवा अस्नात मुलीस त्यांच्या नवऱ्याच्या खोल्यांत जबरदस्तीनें कोंडून घालणें हा प्रघात जितका बंगदेशांत रूढ आहे, तितका हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही भागांत नाहीं, असें अलीकडे बाहेर आलेल्या पुराव्यावरून निर्विवाद सिद्ध झालें आहे. हे बंगाली लोक पुर्वीपासूनच अत्यंत विषयासक्त असावे, असें दिसतें. पूर्वीच्या लोकांच्या गोष्टीत कधीं कधीं निघणारें स्त्रीराज्य कोठेंतरी बंगाल्यांत असावें, असा इकडील अडाणी लोकांचा अद्यापपावेतों समज आहे ! बंगवासी स्त्रियांस घराच्या बाहेर पडण्याची किंवा संनिकट आप्तावांचून कोणत्याही पुरुषाचें मुखावलोकन करण्याची सक्त मनाई असल्यामुळें, शेंकडों वर्षें गृहकारागृहांत खितपत व कुजत पडलेल्या त्या दुर्दैवी आर्यमहिलांस अनेक व्यासंगांच्या व करमणुकींच्या अभावामुळें, ज्या एका पुरुषाचें मुखावलोकन करण्याची व ज्या एका पुरुषाशीं संगति करण्याची साऱ्या जन्मांत सवड मिळणार त्या एका पुरुषाशीं आपलें होईल तितकें लौकर संघट्टन व्हावें, असें त्यांस वाटत असेल. तसेंच, या भयंकर गोषाच्या चालीचा साधारणपणें असलाच परिणाम तिकडील पुरुषांच्या मनावरही होत असेल, यांत संशय नाहीं. तेव्हां ज्या कायद्यानें नवराबायलें एकत्र होण्याचा काळ उभ्या दोन वर्षांनीं दुरावणार तो कायदा तिकडील बहुतेक लोकांस भीतिप्रद वाटावा, यांत कांहीं नवल नाहीं. बंगाल्यांतील बहुतेक पुढारी लोक आणि बहुतेक वर्तमानपत्रें या कायद्याविरुद्ध एकसारखा गिल्ला करीत आहेत; तेव्हां सर रोमेशचंद्र यांच्या विचारावरही त्याची थोडीशी झांक न पडती तर मात्र मोठें आश्चर्य करण्यासारखी गोष्ट होती. संमतीचें वय वाढविण्यांत कांहीं अर्थ नसून, त्यापासून लोकांत असंतोष मात्र निष्कारण उत्पन्न होणार आहे, असें जें त्यांनीं म्हटलें तेंच व्हावें तसें झालें ! कारण, मनुष्य कितीही शहाणा असो तो थोडाबहुत

तरी आपल्या उपजत स्वभावावर गेल्याशिवाय रहावयाचा नाहीं. पृथ्वीवरील पक्ष्यांनीं किंवा वैमानिकांनीं कितीही उंच भराऱ्या मारल्या तरी पृथ्वीचें आकर्षण ते कसें चुकविणार व पृथ्वीस वेष्टणाऱ्या वातावरणाच्या बाहेर कसे पडणार ?

या कायद्याविरुद्ध आजपर्यंत आणिलेल्या सर्व आक्षेपांस ऑ. ए. स्कोबल यांनीं फार थोडक्यांत पण खणखणीत उत्तेर दिली आहेत. या कायद्यानें नवीन अपराध अस्तित्वांत येत नाहीं, म्हणजे जें वर्तन पूर्वी सदोष मानलें जात नव्हतें, तें हा कायदा पास झाल्यावर सदोष होणार आहे असें नाहीं; मुलीस ऋतुप्राप्त होण्यापूर्वी तिचा विवाह करावा, अशा हिंदुशास्त्रांत आज्ञा आहेत, तरी त्या कालापूर्वी जे दुष्ट पुरुष त्यांच्याशीं संभोग करतील त्यांस कडक शासनें सांगितली आहेत; तेव्हां कन्येस तेरावें वर्ष लागण्यापूर्वी ज्याप्रमाणें परक्या पुरुषानें त्याप्रमाणेंच तिच्या नवऱ्यानेंही तिच्याकडे गमन केलें असतां तो असंमत रत्युपभोग होतो, असें समजून उभयतांसही सारखी शिक्षा देण्यास ज्याप्रमाणें आम्हांस हरकत वाटत नाहीं त्याप्रमाणें पूर्वीच्या ऋषींसही वाटली नसती; म्हणून जे लोक त्या ऋषींच्या आज्ञांचें उल्लंघन करण्याकरितां या कायद्यास धर्माची खोटी हरकत सांगत आहेत त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देण्याची गरज नाहीं. ज्यानें हा गुन्हा केला आहे, असा संशय आला असेल त्याला वॉरंटानें कैद करण्याचा अधिकार पोलिसास ठेवला नसल्यामुळें व जामीन घेऊन समानें काढून असल्या आरोपांची चौकशी करावी असें कलम घातलें असल्यामुळें, पोलिस लोक घरांत शिरून भल्या लोकांची अब्रू घेण्यास, धाक दाखवून पैसे खाण्यास, किंवा दांडगाई करून संभवित कुलांत एकच कल्होळ करून सोडण्यास प्रवृत्त होतील, अशी जी कित्येक लोकांस भीति पडली आहे ती निष्कारण आहे. इंग्लंडांतील मुलीस बहुधा तेराव्या वर्षी व येथील मुलीसही बहुधा तेराव्या वर्षी ऋतु प्राप्त होतो, तेव्हां संमतीच्या वयाची इयत्ता बारा वर्षांवर आणून ठेवण्यास यत्किंचित् हरकत नाहीं. तसेंच, जरी ह्या कायद्यानें हा अपराध करणाऱ्या एकूणएक गुन्हेगारांस कोर्टापुढें आणून शिक्षा ठोठावतां येईल व हें पाप निखालस निर्मूळ करतां येईल, असें म्हणतां येत नाहीं तरी ज्या थोड्या

अपराध्यांस कडक शिक्षा देतां येईल, त्यांच्या उदाहरणानें या अपराधाकडे प्रवृत्ति असलेल्या कामुकांस जबर दहशत पडेल, व सामान्य लोकांच्या मनावर त्याचा अत्यंत शिक्षणावह परिणाम होईल, याविषयीं अणुमात्र शंका नाहीं, असें ऑ. स्कोबल साहेब म्हणाले, व कोणत्याही निःपक्षपाती व विचारी मनुष्यास त्यांचे म्हणणें यथार्थ आहे, असें म्हटलें पाहिजे, असें आम्हांस वाटतें. ऑ. ए, स्कोबल यांचें भाषण झाल्यावर सर रोमेशचंद्र यांनीं या प्रश्नाची उलट बाजू आपणांकडून होईल तेवढ्या चतुराईनें फुगवून दाखविली. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, नवऱ्यांला बायकोकडे गेल्याबद्दल कोणत्याही देशांत शिक्षा करीत नाहींत. नवऱ्यानें स्वस्त्रीकडे जाणे हाच या विषयसुखाचा प्रशस्त मार्ग होय. असल्या सुखासाठीं नवऱ्याला दंड करणें हें अत्यंत विपरीत होय. ही विपरीतता फक्त हिंदुस्थानच्या पीनल कोडांत मात्र आढळते. हिंदुस्थानच्या पीनल कोडावर टीका करतांना या बड्या न्यायाधिशानें जी एक गोष्ट लपवून ठेविली ती त्यास उत्तर देतांना कोणीच पुढें आणिली नाहीं हा मोठा चमत्कार आहे. ज्या देशांत स्त्रीशीं अकालीं भोग केल्याबद्दल नवऱ्यास शिक्षा मिळत नाहीं, त्या देशांत कोणत्याही नवऱ्याला आपल्या स्त्रीशी अकाली संभोगच करतां येत नाहीं, म्हणून ती मिळत नाहीं. हा संभोग न करतां येण्याचें कारण असें आहे कीं, त्या देशांतील मुली बाराव्या वर्षापूर्वी कोणाच्या बायकाच होऊं शकत नाहींत; म्हणजे या वयाचे आंत मुलींचीं लग्नें करूं नयेत, असें त्या देशांत निर्बंध केलेलें आहेत. पाहिजे त्या वयास मुलींचीं लग्नें करण्याची चाल येथल्याप्रमाणें युरोपखंडांत रूढ असती तर बायकोस तेरावें वर्ष लागण्यापूर्वी नवऱ्यानें तिच्याकडे जाणे म्हणजे तिच्याशीं असंमत रत्युपभोग घेणें असें त्यांनीं केव्हांच ठरवून टाकून, असल्या राक्षसी नवऱ्यास जन्मठेपेची, काळ्या पाण्याची शिक्षा योजून ठेविली असती ! तात्पर्य, लग्नाची कमींत कमी इयत्ता घालून दिल्यानें जें काम होत आहे. तें येथें संमतीचें वय बारापर्यंत वाढवून साधण्याची खटपट चालली आहे, तेरावें वर्ष लागण्यापूर्वी कोणत्याही मुलीचें लग्न करूं नये, व तेरावें वर्ष लागण्यापूर्वी कोणत्याही बायकोकडे तिच्या नवऱ्यानें जाऊं नये, या दोन निर्बंधांपैकीं पहिला समाजास विशेष हितकारक आहे, हें उघड आहे.

तथापि ज्या अर्थी लग्नाच्या वयाची इयत्ता ठरविणें म्हणजे आमच्या धर्मांत हात घालणें, व लोकमताविरुद्ध जाणें अशी सरकारास आजमित्तीस भीति वाटत आहे, त्या अर्थी संमतीच्या वयांत तें आज जेवढा फेरफार करण्यास तयार झालें आहे तेवढ्यांतच समाधान मानून घेतलें पाहिजे. वस्तुतः लोकांनीं किंवा सरकारनें अमुक वर्षांपूर्वी मुलींचीं लग्नें होतांच कामा नयेत, असा ठराव करून तो पाहिजे त्या साधनांनीं अंमलांत आणिल्याखेरीज, उल्लू नवऱ्यांच्या उत्कट कामवासनांपासून बाल्यावस्थेंत असलेल्या कित्येक मुलींस होणाऱ्या घोर यमयातना सर्वथैव टळण्याचा संभव नाहीं. या वरील पोकळ मुद्द्याशिवाय प्रस्तुत बिलास रोमेशचंद्र यांनीं अशी हरकत घेतली कीं, कित्येक मुलींस बारावें वर्ष लागण्यापूर्वी नहाण येतें, नहाण आल्याबरोबर गर्भाधान-संस्कार केलाच पाहिजे, असा बंगाल्यांत परिपाठ आहे; तेव्हां हा संमतीचा कायदा पाळणें म्हणजे धर्मोल्लंघन करणें, व धर्माज्ञा पाळणें म्हणजे या कायद्याचें उल्लंघन करणें असा पेंच येऊन पडतो. म्हणून सरकारनें या कायद्याच्या भरीस पडूं नये. आम्ही तुमच्या धर्मांत हात घालणार नाहीं, असें १८८५ च्या जाहिरनाम्यांत सरकारचें अभिवचन आहे. पण त्या वचनास या कायद्यानें सरकार हरताळ लावूं पाहत आहे, हें वाईट आहे. यामुळें हिंदुस्थानच्या श्रद्धावान् लोकांत मोठा असंतोष उत्पन्न होणार आहे. यावर नूलकर यांनीं खूप सणसणीत उत्तर दिलें. ते असें म्हणाले कीं, मुलीस कोणत्याही वयांत ऋतु प्राप्त झाला तरी तिचें गर्भाधान ताबडतोब केलेंच पाहिजे, असा आचार सर्व हिंदुस्थानांत रूढ आहे असें नाहीं. शिवाय, या आचाराच्या संबंधानें धर्मशास्त्रकारांतही पुष्कळ मतभेद आहे. पण तो नाहीं असें वादाकरितां क्षणभर मानिलें तरी, जर आपल्या अंतःकरणांत कांहीं भूतदया असेल तर बारा वर्षांच्या आंतील मुलींस विषयकर्दमांत लोटून देण्यासाठीं जेवढें धर्मोल्लंघन करणें भाग पडेल, तेवढें करण्यास आपण तयार झालें पाहिजे. या स्पष्टोक्तीबद्दल रा. ब. नूलकर यांची तारीफ केल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं. नहाण आल्याबरोबर गर्भाधान करणें हा जर धर्म असेल तर, विषयोपभोगास तिचे अवयव योग्य झालेले नाहींत, अशा अल्पवयस्क मुलीचा उतावळ्या नवऱ्यास ह्वातसा छळ करूं न देणें हाही तितकाच मोठा किंवा

त्याहूनही मोठा आईचा, बापाचा व सासूसासऱ्यांचा धर्म नाहीं काय ? पण अमच्या आधुनिक नीच स्थितींत या गोष्टीचा शांतपणें विचार कोण करणार ? कामाच्या गुलामांना आणि त्यांच्या वकिलांना आम्ही असें विचारतों कीं, बारा वर्षांच्या आंत नहाण आलेल्या मुलींच्या गर्भाधानास उभे न राहणें हें मोठें पाप ? कीं उभें राहून तिच्या अवयवाची आणि शरीरसंपत्तीची राखरांगोळी करण्यास प्रवृत्त होणें, आणि तिच्या व आपल्या कुलास अक्षय्य कलंक लाऊन घेणें हें मोठें पाप ? जर तुमच्या डोक्यांत कांहीं विचारतंतू असतील तर या प्रश्नाचें तुमच्या मनास खाणार नाहीं व सज्जनांस अप्रशस्त वाटणार नाहीं, असें उत्तर द्या, आणि वरील दोन धर्मांपैकीं पाहिजे त्या धर्माचा प्रतिपाल करा, आणि वरील दोन पापांपैकीं पाहिजें तें पाप टाळा ! रा. ब. नूलकर आणखी असें म्हणालें कीं, (आणि त्यांच्या त्या म्हणण्यांत बराच तथ्यांश आहे) अलीकडील कांहीं सुधारक मंडळी ज्या त्या गोष्टीकरितां कायदा करून घ्यावा असें मोठ्या दिमाखानें वारंवार प्रपादूं लागल्यामुळें, जुन्या पद्धतीच्या लोकांचीं माथीं फिरून जाऊन कायदा म्हटला कीं त्याच्या अंगावर कांटा उभा राहूं लागला; व कित्येक गोष्टींत कायद्याचा चांगला उपयोग करून घेतां येतो, याचें भान त्यांस न राहून ते आपलें जें कांहीं सुधारक करावें असें म्हणतील त्यास विरोध करूं लागलें आहेत ! वस्तुतः तीस वर्षांपूर्वी हें संमतीचें वय बारा वर्षांवरच काय, पण चौदा वर्षांवर जरी नेऊन ठेविलें असतें, तरी, त्याविषयीं बहुधा कोणीं चकार शब्दही काढिला नसता.

रा. ब. नूलकर यांचें भाषण झाल्यावर **लॉर्ड लॅन्सडौन** यांचें शेवटचें भाषण झालें. या भाषणांत त्यांनी संमतीच्या बिलाविषयीं फारसा पाल्हाळ केला नाहीं. या बिलामुळें १८८५ च्या जाहीरनाम्याविरुद्ध सरकार जात आहे असें होत नाहीं. कारण धर्मांतर्गत लग्नसंस्काराशीं याचा कोणत्याही प्रकारें संबंध पोहोंचत नाहीं; शिवाय बारा वर्षांच्या अविवाहित कन्येकडे कोणी पुरुष जाईल तर त्याला कडक शिक्षा देण्यास कांहीं हरकत नाहीं; पण तेंच कर्म नवऱ्यानें स्वस्त्रीशीं केलें तर त्याला कोणतीही शिक्षा करूं नये, किंवा फक्त दुखापतीच्या गुन्ह्यास सांगितलेली शिक्षा देऊन सोडून द्यावें, हें अत्यंत अश्लाघ्य आहे, असें ते म्हणाले. त्यांच्या भाषणाचा विशेष कटाक्ष ज्या

सामाजिक सुधारणांसाठीं मि. मलबारी यांनीं इंग्लंडांत स्थापिलेल्या बड्या कमेटीनें सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या द्वारें हिंदुस्थान सरकारावर वजन व भीड घालण्यास आरंभ केला आहे त्यावर होता. पण प्रस्तुत विषयाशीं त्याचा निकट संबंध नसल्यामुळें व आजचें हें पुराण नित्याच्या मर्यादेबाहेर बरेंच गेलें असल्यामुळें, लेखणीस विश्रांति देऊन व्हाइसरॉयांच्या भाषणाच्या त्या भागाचा विचार आज तहकूब करणें भाग पडत आहे.

विवाहकाल व संभोगकाल : : ४३

संमतीचें वय वाढविण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें जें बिल काढलें आहे, त्याला अडथळा करणाऱ्या धर्मनिष्ठ लोकांचें असें म्हणणें आहे कीं, हें बिल पास झालें असतां, हिंदुस्थानसरकारनें हिंदु धर्मांत हात घातला असें होऊन, त्या बिलांतील कलमांचें उल्लंघन न करण्यासाठीं, त्यांस धर्मोल्लंघन करावें लागणार आहे. धर्माचे घोडें पुढें ढकलून आहितकारक रूढ आचारांचें मंडन करण्यांत प्रतिष्ठा मानणारे धर्मभीरु किंवा पापभीरू लोक खरा धर्म काय आहे हें नीट समजत असते किंवा निदान तो समजून घेण्यास जरी तयार असते तर बरें झालें असतें. पण ज्यांना अमुक गोष्ट रूढ आचाराच्या विरुद्ध आहे येवढ्यासाठींच तीवर तुटून पडावयाचें आहे ते त्या आचाराविषयीं खऱ्या धर्माज्ञा काय आहेत, हें कशाला पहावयाला बसले आहेत ? शिवाय, ज्याप्रमाणें आमच्या इतर गोष्टींत त्याचप्रमाणें आमच्या धर्मशास्त्रांतही इतकी बजबजपुरी माजली आहे कीं, पाहिजे त्या प्रकाराच्या अत्याचारास किंवा अनाचारास आधारभूत अशीं वाक्यें त्यांतून काढून घेतां येणार आहेत ! अमुक एक स्मृति किंवा अमुक एक ऋषि प्रधान मानून त्याच्या आज्ञेप्रमाणें आपले धर्माचार करावयाचे, असा नियम असतां, तर या संमतीच्या नवीन कायद्यास धर्माची नड सांगणें नीट झाले असतें. पण तसें करून आम्हांस मनसोक्त वर्तन करावयास कसें सांपडणार ? ज्या गोष्टीविषयीं ज्या ऋषीचें

किंवा ज्या स्मृतीचें मत अनुकूल असेल तो ऋषि आणि ती स्मृति त्या गोष्टीच्या संबंधानें आम्हीं प्रधान मानणार! व ज्या अर्थी हवी ती गोष्ट धर्मदृष्ट्या प्रशस्त आहे असें म्हणणारा धर्माचार्य किंवा शङ्कचलाखीनें ती तशी आहे असें भासविणारा टीकाकार कोणत्याही देशांत हव्या त्यावेळीं पैदा होण्यास कधींच पंचाईत पडत नाहीं, त्याअर्थी विवाहित स्त्रीशीं हव्या त्या वेळीं संभोग करण्यास कोणाचे तरी वचन आमच्या धर्मशास्त्रांतून काढून देतां येणार नाहीं, असें कसें होणार? लोकांत जो आचार रूढ असेल तदनुसार एखादा संस्कृत अनुष्टुभ् रचून तो जुन्या पोथीत घुसडून देणें, आणि त्यांतील आज्ञा अमक्या तमक्या ऋषीची, आचार्याची, किंवा भटाची आहे, असें सांगून तात्कालिक स्वार्थ साधणें, हें अगदीं सामान्य मनुष्याच्यानें होण्यासारखें काम आहे, हें कोणीही कबूल करील. आम्हांस तरी निदान असें वाटतें कीं, अशा प्रकारच्या लोकानुलंदी लेखकांच्या धार्मिक लबाड्यांमुळें आमच्या धर्मशास्त्राची गती नंदीबैलाच्या झुलीसारखी किंवा कुणब्याच्या वाकळी सारखी झाली आहे! तेव्हां ऑ. रा. ब. नूलकर यांनीं सुचविल्याप्रमाणें संमतीच्या बिलाविरुद्ध कांहीं शास्त्रकारांचीं मतें कोणी धर्माभिमान्यांनीं काढून दाखविलीं तर सरकारनें आपल्या स्तुत्य हेतुवर नजर देवून त्यांकडे दुर्लक्ष करावें, हेंच आम्हांस बरें वाटतें. तथापि आपण जें बिल लोकांपुढें आणिलें आहे तें त्यांच्या धर्माविरुद्ध नाहीं, असें सांगितल्यानें व सिद्ध करून दाखविल्यानें त्या बिलास अडथळा करणाऱ्या लोकांचें समाधान होईल, अशी सरकारास आशा असल्यास त्यांनीं तो प्रयत्नही करून पहावा. त्यापासून म्हणण्यासारखा फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. कारण आजमितीस ज्यांनीं सामान्य लोकांचें पुढारीपण घेतलें आहे त्यांचा असा निश्चय झालेला दिसतो कीं, सुधारक आणि सरकार यांनीं मनांत आणिलेली गोष्ट कितीहि सशास्त्र असली, किंवा देशाचें तीपासून केवढेंही हित होण्यासारखें असलें, तरी ती सुधारकांकडून व त्यांच्या मतासारखीच ज्यांची मतें आहेत अशा सरकाराकडून पुढें आली असेल तर शास्त्राशास्त्रतेचा, सत्यासत्याचा, किंवा हिताहिताचा विचार न करतां, हवी ती खटपट करून ती हाणून पाडलीच पाहिजे! असल्या वृथा

धर्माभिमानामुळें व मिथ्या देशाभिमानामुळें नव्या व जुन्या पिढ्यांतील कलह अधिकाधिक वाढत जाऊन, नवीन पिढ्यांतहि दोन तट होणार आहेत, व त्यापासून देशाचें अपरिमित नुकसान होणार आहे, हें या हट्टी लोकांच्या ध्यानांत कसें येत नाहीं कोण जाणे! तथापि या संमतीच्या कायद्यास आपल्या लोकांनीं पूज्य मानिलेल्या धर्मशास्त्रकारांची पूर्ण संमति आहे, असें सिद्ध करून दाखविल्यानें हा प्रस्तुत वाद मिटण्यासारखा असेल तर तेवढी कामगिरी आपले परमपूज्य धर्मनिष्ठ गुरु डॉक्टर भांडारकर यांनीं वेळीं बजाविली आहे. त्यांनीं या संबंधानें नुकताच लिहिलेला लेख त्यांच्या परवानगीनें सुधारकाच्या गेल्या अंकांत सार्थंत प्रसिद्ध केला आहे, व शिवाय पुस्तकरूपानें त्यांनीं तो निराळा छापविलाही आहे. जे कोणी हा निबंध निरभिमानानें लक्षपूर्वक वाचतील त्यांस स्पष्टपणें असें दिसून येईल कीं, विवाहकालाची व संभोगकालाची जीं मर्यादा अलीकडील समंजस व सुशिक्षित लोकांस प्रशस्त वाटूं लागली आहे तीच मर्यादा आमच्या पुरातन प्रमुख स्मृतींस व ऋषींस पूर्ण मानवली होती, इतकेंच नव्हे, तर त्या मर्यादेचें उल्लंघन करणें हें त्यांनीं मोठें पाप मानिलें होतें. तथापि या दोन गोष्टींच्या संबंधानें आम्ही जसजसे ढिले होत गेलों, तसतसें भ्रष्ट आचारांस धर्मशास्त्रांत गोंवून, त्यांस शास्त्राधार दाखविणारें लोकाराधनतत्पर धर्मलेखक निघाले, व त्यांच्या लेखामुळें आमच्या धर्माच्या बटव्यांत मोहर, पुतळ्या, होन, रुपये चवल्या, पावल्या, बिल्ली, खुर्दा व फद्दे, आणि कवड्या यांची एकच खिचडी होऊन गेली! या अनवस्थेचा आजमितीस असा परिणाम झाला आहे कीं, ज्याच्या हातीं जें लागेल त्यास तो उत्तम नाणें समजून, त्याच्या जिवावर सुधारकापुढें आणि सरकारापुढें "अहो अनाचार! अहो धर्मातिक्रमण! अहो अधःपात!" असा आक्रोश करून त्यास होईल तेवढा विरोध करूं लागला आहे! तथापि येवढ्या थोरल्या जनसमुदायांत खरोखरींच कांहीं भाविक व धर्मभोळे लोक असतील, व सुनेला किंवा कन्येला ऋतु प्राप्त झाला असून तिचें गर्भाधान केलें नाहीं तर आपल्या हातून मोठें पाप घडेल, असें त्यांस वाटतही असेल. अशा लोकांपैकीं जे वयातीत झाले असतील, व ज्यांना फार

वर्षांच्या प्रमाणप्रणीत वर्तनामुळें स्वतः विचार करून तदनुसार वागण्याची अशक्यता झाली असेल त्यांच्या समाधानासाठीं डॉक्टर भांडारकर यांच्या पुस्तकांतून कांहीं वचनें येथें उतरून घेऊन त्यांचें भाषांतर देतों. या वचनांवरून त्यांची अशी खात्री होईल कीं, पूर्वीच्या प्रमुख ऋषींनीं व स्मृतिकारांनीं स्त्रीसंभोगाची जी इयत्ता घातली आहे तीच हिंदुस्थानसरकार घालूं पहात आहे. इतकेंच नाहीं, तर त्यांनीं विवाहकालाची मर्यादा सांगितली आहे तिचें उल्लंघन न केल्यास, सध्यां सुधारकांत व सुधारणानिंदकांत जो वाद चालला आहे, तो देखील नाहींसा होणार आहे. मात्र एखाद्या भिकार ग्रंथकारानें रूढीस जुळण्यासारखें दिलेले मतच आम्हांस ग्राह्य आहे असा असमंजसपणाचा हट्ट त्यांनीं धरून बसतां कामा नये. डॉ. भांडारकर हे अनेक उद्योगांत व्यापृत असून त्यांनीं या ऐन गर्दीच्या प्रसंगास वेळांत वेळ करून हे अनेक शास्त्राधार गोळा केले, व त्यांच्या वाचनानें धर्मनिष्ठ लोकांचा गैरसमज दूर व्हावा, या हेतूनें त्यांचा लहानशा पुस्तकांत संग्रह करून तें स्वतःच्या खर्चानें प्रसिद्ध केलें याबद्दल साऱ्या सुधारणेच्छूनींचसे काय, खुद्द हिंदुस्थानसरकारनेंही त्यांचे आभार मानिले पाहिजे. कारण, त्यांच्या व्यासंगाइतका गीर्वाणवाणीचा व इतर भाषाचा व्यासंग निदान या इलाख्यांत तरी दुसऱ्या कोणी गृहस्थानें केला आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. तसेंच यथार्थ धर्मनिष्ठा, सत्यप्रीति व स्वदेशोन्नतीविषयीं खरी कळकळ इत्यादि गुणांत यांहून श्रेष्ठ असा दुसरा गृहस्थ या प्रांतांत आम्हांस दिसंत नाहीं, म्हणून अशा वादग्रस्त विषयाविषयीं अभिप्राय देण्यास यांच्याइतका दुसऱ्या कोणास अधिकार नाहीं, असें आम्हांस वाटतें. ज्यांना आमच्या या लिहिण्याचा प्रत्यय घ्यावयाचा असेल त्यांनीं येथील दुसऱ्या एका पत्रांत प्रसिद्ध केलेलीं एकदेशीय वचनें आणि प्रसिद्ध करणाराचें त्यावरील व्याख्यान पहावें, म्हणजे त्यांची खात्री होणार आहे.

कामममामरणात्तिष्ठेद् गृहे कन्यर्तुमत्यपि ।
न चैवेनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥

—मनु. अ. ९ श्लो. ८९

अर्थः—ऋतु प्राप्त झाला असूनही कन्या बापाच्या घरीं राहिली

तरी हरकत नाहीं; पण गुणहीन अशा वराला त्यानें ती कधींही समर्पू नये.

या मनुवचनावर मेधातिथि नांवाच्या सर्वांत जुन्या टीकाकारानें अशी टीका केली आहेः—

प्रागृतोः कन्याया न दानम्। ऋतुदर्शनेपि
न दद्याद्यावद् गुणवान् वरो न प्राप्तः॥

अर्थः—नहाण येण्यापूर्वी मुलीचें लग्न करूं नये, व तें आल्यावरही चांगला वर मिळेतोंपर्यंत करूं नये.

त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती।
ऊर्ध्वं तु कालादेतस्माद्विन्देत सदृशं पतिम्॥

—मनु. अ. ९ श्लो. ९०

अर्थः—ऋतु प्राप्त झाल्यावर मुलीनें तीन वर्षें वाट पहावी; त्यानंतर आपला आपण योग्य वर पाहून त्याशीं तिनें विवाह करावा.

त्रीणि वर्षाण्यृतुमती काङ्क्षेत पितृशासनम्।
ततश्चतुर्थे वर्षे तु विन्देत सदृशं पतिम्॥

—बौधायन ४. १. १४

अर्थः—ऋतु प्राप्त झाल्यावर तीन वर्षेंपर्यंत मुलीनें बापाच्या आज्ञेची वाट पहावी; नंतर चौथे वर्षीं तिनें आपण होऊन योग्य वराशीं विवाह करावा.

वसिष्ठसूत्रांतही अशा अर्थाचेच श्लोक आहेत.

नग्निकां तु वदेत्कन्यां यावन्नर्तुमती भवेत्॥
ऋतुमती त्वनग्निका तां प्रयच्छेत्त्वनग्निकाम्॥

—गोभीलीय गृह्यसूत्र, बि. इं. पा. ८३९

अर्थः—मुलीला ऋतु प्राप्त झाला नाहीं तोंपर्यंत तिला नग्निका म्हणतात; त्यानंतर अनग्निका म्हणतात. मुलगी अनग्निका झाल्यावर म्हणजे तिला ऋतु प्राप्त झाल्यावर (बापानें) तिचें लग्न करावें.

त्रिंशद्वर्षो वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीम्

—मनु. अ. ९ श्लोक ९४

अर्थ : – तीस वर्षांच्या मनुष्यानें त्यास पसंत अशा बारा वर्षांच्या कन्येशीं विवाह करावा.

या सर्व वचनांवरून मुलीस ऋतु प्राप्त होईतोंपर्यंत किंवा बारावें वर्ष लागेतोंपर्यंत अविवाहित ठेवण्यांत कांहीं दोष नाहीं. इतकेंच नाहीं, तर तसें करणेंच प्रशस्त आहे, असें होत नाहीं काय? बारावें वर्ष उलटून गेलें व ऋतुदर्शन होऊन तीन वर्षें लोटलीं तरी देखील मुलींच्या अविवाहित राहण्यानें धर्मोल्लंघन होतें असें ज्यांस वाटत नाहीं अशा धर्मकर्त्यांच्या वचनांप्रमाणें आम्ही वागत असतों तर सुधारकदुर्धारकांतलें रण कशाला माजलें असतें? व ऑ. ए. स्कोबलसाहेबांस संमतीच्या वयाचें बिल सुप्रीम कौन्सिलापुढें आणावें लागून त्याबद्दल सर्व हिंदुस्थानभर इतकी वाटाघाट व बाचाबाची कशाला झाली असती? अगदीं "मी मी" म्हणणाऱ्या सुधारकासही या ऋषिवचनापलीकडे जाण्याची इच्छा नाहीं. ऋतु प्राप्त झाल्यावर तीन वर्षेंपर्यंत अविवाहित राहण्याची व त्यानंतर स्वतःस पसंत पडेल असा वर वरण्याची परवानगी मुलींना देण्यांत येईल तर यासंबंधानें सुधारकांना सुधारणेसाठीं कज्जा करीत बसण्यास म्हणण्यासारखें कांहींएक कारण नाहीं, हें उघड आहे! पण कलियुगाच्या प्रभावामुळें विषयलंपट, अविचारी व नामर्द झालेल्या आम्हा भारतीय आर्यांस हा उत्साहजनक, हा विषयसुखवर्धक, हा संतानसामर्थ्यदायक, हा पुण्य स्वयंवरपंथ कोठून रुचणार!

अशा रीतीनें म्हणजे ऋतु प्राप्त झालेली कन्या विवाह होऊन भर्तृगृहीं गेली असतां, शास्त्रोल्लंघन न करतां पतिसमागम केल्याशिवाय तिला किती दिवस राहतां येईल, यासंबंधानें डॉ. भांडारकर यांनीं जीं वचनें काढिलीं आहेत त्यांवरून हा समागम तिला तीन दिवसांपासून तीन वर्षेंपर्यंत तहकूब करण्याचा अधिकार शास्त्रानें दिला आहे. तेव्हां मुलीला ऋतुदर्शन झाल्यापासून सोळा दिवसांच्या आंत तिचा गर्भाधानविधि केलाच पाहिजे, असें जे कित्येकांचें म्हणणें आहे, तें बरोबर दिसत नाहीं. पण सर रोमेशचंद्रांचा रघुनंदन असें म्हणतो कीं, तसें झालेंच पाहिजे, नाहींतर ब्रह्महत्येचें किंवा भ्रूणहत्येचें महापातक नवऱ्याच्या बोकांडीस बसणार! पण असें सांगण्यास

रघुनंदनच कशाला पाहिजे ? मन्वादि ऋषींच्या युगांत लोकांच्या अंगांत असलेल्या पौरुषाचा लोप झाल्यावर, रघुनंदनासारखे निःसत्त्व धर्मकर्ते बंगाल्याप्रमाणें इकडेही झाले आहेत, व त्यांनीं हवा तसा बाष्कळपणा केला आहे. भेद इतकाच कीं, ज्याप्रमाणें स्त्रीमत्सरी व स्त्रीपारतंत्र्येच्छु बंगवासी लोक अगदीं स्त्रैण होऊन जाऊन रघुनंदनाच्या आज्ञेचें अतिक्रमण करण्यास असमर्थ झाले आहेत, तशींच केवळ आम्हां महाराष्ट्रीयांची स्थिति नाहीं. या गोष्टीचा विशेष खुलासा करण्यासाठीं या विषयाकडे आणखी एक वेळ वळणें जरूर आहे, म्हणून आज येथेंच मुक्काम करतों.

संमति बिलास धर्मशास्त्र बाधक नाहीं : : ४४

संमतीचें बिल कौन्सिलपुढें आणितांना **सर ऑ. स्कोबल** यांनीं असें म्हटलें आहे कीं, या बिलास हिंदु धर्मशास्त्र प्रतिकूल नाहीं. या त्यांच्या स्वल्प उल्लेखामुळें आमच्या वृथा धर्मवाद्यांस शब्दजाल पसरण्यास उत्तम सवड सांपडून त्यांनीं त्याच मुद्यावर आतां आपला प्राण ठेविला आहे ! बी. ए. च्या परीक्षेला लागणाऱ्या पांचचार संस्कृत पुस्तकांपलीकडे ज्यांचें संस्कृताचें अध्ययन गेलेलें नाहीं, असे लोक आपणांस पट्टीचे शास्त्री समजून, डॉक्टर भांडारकरांसारख्या विद्वानास श्रुतींचा व स्मृतींचा अर्थ बरोबर करतां येत नाहीं, किंवा त्यांनीं तो बुद्धया केला नाहीं, अशी बडबड करीत आहेत, आणि जुने शास्त्री त्यांस 'धर्मरक्षक' समजून, त्यांच्या अज्ञानमय वादास आपली संमति देत आहेत ! पण अशा प्रकारची ढिलाई करण्याबद्दल या जुन्या शास्त्रीमंडळीस विशेष दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण एक तर अलीकडे निव्वळ संस्कृत विद्येचा अभ्यास फायदेशीर होईनासा झाल्यामुळें, आजमित्तीस नांव घेण्यासारखा एकही शास्त्री या इलाख्यांत सांपडावयाचा नाहीं. असल्या शास्त्र्यांनीं शास्त्रार्थ देण्यांत व बाकीच्यांनीं तो पत्करण्यांत

मुळींच अर्थ नाहीं. शिवाय, प्रसंग पडेल त्याप्रमाणें ओढून ताणून हवा तो अर्थ काढण्याची या शास्त्र्यांची पूर्वापार चाल आहे; तेव्हां ते या वेळींच त्या आपल्या जुन्या शीलास अनुसरणार नाहींत, असें कोठून होणार ? ब्राह्मणांनीं वस्तरा हातीं घेऊन न्हाव्यांची रग जिरविण्यास कांहीं हरकत नाहीं, असा शास्त्रार्थ थोड्या वर्षांपूर्वी ज्यांनीं या पुणें शहरांत साफ ठोकून दिला, त्यांना पहिल्या ऋतूंतच गर्भाधान केलें पाहिजे, असें धर्मशास्त्रांचें स्पष्ट म्हणणें आहे, असा आग्रह धरण्यास कोठून शंका येणार ? पाश्चिमात्य शिक्षणाच्या वाढत जाणाऱ्या प्रसारामुळें आमच्या शास्त्रीवैदिकांचा धंदा अगदीं उठवणीस आला आहे व ते अन्नास मोताद झाले आहेत, तेव्हां अशा संकटावस्थेंत दोन पैसे मिळणारे संस्कार त्यांनीं आपल्या हातून जाऊं न देण्याविषयीं धडपड करावी, व कधीं न मिळालेली प्रतिष्ठा भोगून घ्यावी, हें अगदीं स्वाभाविक आहे. पण अशा आपत्कालीं देखील त्यांनीं इतकें पाखंडवादी व्हावें, हें त्यांच्या जुन्या विद्येस सुद्धां चांगलेसें शोभत नाहीं, असें आम्हांस वाटतें. बाकी संमतीचें बिल पास होणें किंवा न होणें हें या शास्त्रार्थावर थोडेंच अवलंबून आहे ! हें बिल पास करण्यांत ब्रिटिश सरकारास अमुक एक स्वहित साधावयाचें आहे, असें या वाग्पटु शास्त्र्यांसहि म्हणतां येणार नाहीं; तसेंच हजारपांचशें सुधारकांस खुष करण्यासाठीं कोट्यवधि लोकांस नाखुष करण्यांतही कांहीं अर्थ नाहीं, हेंहि तें सरकार पक्कें समजून आहे. तथापि त्या सरकारास हेंही पक्कें ठाऊक आहे कीं, हिंदुस्थानांतील बरेच लोक आपल्या बायका वयांत येण्यापूर्वी त्यांवर जुलूम करीत असल्यामुळें, त्यांस आज कित्येक शतकें अनिर्वचनीय यातना भोगाव्या लागत आहेत; त्यांच्या यातनांच्या उपशमनार्थ होईल तितका प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे; या कर्तव्यास हिंदुधर्माची अनुकूलता किंवा संमति नसली तरी प्रत्येक सदय, समंजस व विचारी मनुष्याच्या अंतःकरणांत वास करणारा जो साऱ्या धर्मांचा धर्म त्याची पूर्ण संमति आहे, इतकेंच नाहीं, तर तें कर्तव्य इतकीं वर्षें न बजावल्याबद्दल त्यानें एकसारखी टोंचणी लाविली आहे; तेव्हां अडाणी, अविचारी, वृथाधर्माभिमानी व आपमतलबी हिंदूंनीं केवढाही गवगवा केला तरी दहा अकरा वर्षांच्या मुग्ध कन्या अधीर

भर्त्याच्या अतिशय भडकलेल्या कामकुंडांत आहुति पडून जळून खाक होणार नाहींत अशाबद्दल कांहींतरी उपाय केलाच पाहिजे. असें त्यांनीं हें संमति बिल हातीं घेतलें आहे; तेव्हां आम्हीं आपल्या आक्रोशांनीं जरी ब्रम्हांड हालवून सोडिलें तरी हें बिल पास करण्यास हिंदुस्थानसरकार अणुमात्रहि भिणार नाहीं, अशी आमची बालंबाल खात्री झाली आहे. तथापि ज्या रोग्यांना जें औषध द्यावयाचें तें त्यांचें नाक धरून व त्यांना पायावर उताणें पाडून, बोंडल्यानें त्यांच्या घशांत घालण्यापेक्षां, त्या औषधाचे गुण त्यांस समजाऊन देऊन, तें ते आपण होऊन आपल्या हातानें पितील, तर बरें होणार आहे, असें वाटून हिंदुस्थानसरकारनें आपल्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें त्याची चर्चा चालूं दिली आहे, व ज्याला जीं वाटतील तीं साधकबाधक प्रमाणें त्यानें खुशाल दाखवावीं, अशी नोटीस दिली आहे ! या नोटिशीचा फायदा घेऊन कांहीं " नाकाडोळ्याचे नाडीपरीक्षक " वैदू हें औषध तुम्हांस सुखावह होणार नाहीं, अशी भीति भाबड्या लोकांस घालीत आहेत, ही केवढ्या शरमेची गोष्ट आहे बरें ? हे झोळीवाले " रसशेंदूरमात्रा वैद्य " अज्ञान लोकांस असें सांगत फिरत आहेत कीं, हें बिल पास झाल्यास, बारा वर्षांच्या आंत जितक्या मुलींस ऋतुदर्शन होईल तितक्यांचें गर्भाधान ताबडतोब न करण्यास सांपडल्यामुळें त्यांच्या व त्यांच्या नवऱ्यांच्या कपाळीं भ्रूणहत्या येणार आहे ! तेव्हां त्या पापांत हीं नवराबायलें खरोखरीच पडतात कीं काय, हें थोडक्यांत पाहूं.

स्त्रीस नहाण आल्याशिवाय तिच्याकडे तिच्या नवऱ्यानें जाऊं नये, अशी आमच्या धर्मशास्त्राची सक्त ताकीद आहे. तेव्हां बारावें वर्ष लोटल्यावर ज्या मुली ऋतुमती होतील, त्यांना व त्यांच्या नवऱ्यांना हें बिल लागूं पडत नाहीं, हें उघडच आहे. नहाण न आलेल्या तेरा वर्षांच्या मुलीकडे तिचा नवरा गेल्यास आमचें धर्मशास्त्र त्यास काय शिक्षा करीत असेल किंवा करूं शकेल ती खरी; संमतीच्या बिलामुळें त्याला कोणत्याही प्रकारें उपसर्ग लागणार नाहीं. बारा वर्षांच्या आंत फार झालें तर शेंकडा चार मुली ऋतुमती होतात, असें दिसून आलें आहे. तेव्हां संमतीच्या बिलामुळें गर्भाधान थोड्याशा लांबणीवर टाकावें लागलें तर तें या चार मुलींकरितां टाकावें लागणार व पंचवीस मुलींपैकीं एका मुलीच्यासंबंधानें हें बिल आमच्या धर्मास बाधक झालें असें

होणार. पण ही गोष्ट कबूल करण्यापूर्वी पहिला ऋतु प्राप्त झाल्याबरोबर गर्भाधान केलेंच पाहिजे, असा शास्त्राधार दाखविण्यांत आला पाहिजे. इतकेंच नाहीं, तर तें न केलें असतां, जे दंड सांगितले आहेत त्यांची मातब्बरी आणि तें न करण्यापासून होणारे फायदे यांचा शांतपणें विचार करून, शास्त्रकर्त्यांस कोणता मार्ग विशेष संमत आहे, हें निःपक्षपातानें ठरविलें पाहिजे. जो कोणी इतकी खटपट प्रामाणिकपणें करील त्याला आमचें वेडेंवाकडें धर्मशास्त्र देखील संमति बिलाचे तत्त्वास बिलकुल प्रतिकूल नाहीं, असें खचित दिसून येणार आहे. कारण, पहिल्या ऋतूंतच गर्भाधान केलें पाहिजे, अशा अर्थाचें फक्त एक वाक्य अहे, व तें कोणी तरी अलीकडे धर्मशास्त्रांत घुसडून दिलें असावें, असें स्पष्ट दाखवितां येत आहे. कसें तें पहा.

आश्वलायनाच्या नांवावर विकणाऱ्या स्मृतींत पुढील वाक्य आढळतें:—

गर्भाधानं द्विजः कुर्यादतौ प्रथम एवहि ।
चतुर्थदिवसादूर्ध्वं पुत्रार्थी दिवसे समे ॥

अर्थः—'प्रथम ऋतुदर्शन होऊन ४ दिवस लोटल्यावर, ब्राह्मणानें गर्भाधान करावें, पुत्र पाहिजे असल्यास सम दिवशीं करावें.' अनंतदेवानें 'आश्वलायनाचें म्हणून' हें वाक्य आपल्या ग्रंथांत उतरून घेतलें आहे. अनंतदेवाखेरीज इतर अनेक निबंधकारांनीं यासंबंधानें व इतर संबंधानें आश्वलायन स्मृतींतील अनेक उतारे घेतले आहेत; पण त्यांपैकीं एकाच्या ग्रंथांतही हें वाक्य उतरून घेण्यांत आलेलें नाहीं. इतकेंच नाहीं, तर ज्या आश्वलायन स्मृतींत अनंतदेवानें उतरून घेतलेलीं दुसरीं वाक्यें सांपडतात, त्या आश्वलायन स्मृतींत अनंतदेवाखेरीज इतर निबंधकारांनीं आश्वलायनाचीं म्हणून आपल्या ग्रंथांत उतरून घेतलेलीं वाक्येंही सांपडत नाहींत ! तेव्हां अनंतदेवाची आश्वलायनस्मृति आणि इतर निबंधकारांची आश्वलायनस्मृति हे भिन्न ग्रंथ असले पाहिजेत, हें सिद्ध होतें. या भानगडीवरून निदान आमचा तरी असा तर्क होत आहे कीं, ही अनंतदेवास सांपडलेली आश्वलायनस्मृति त्याच्याच डोक्यांतून निघाली असावी, व कांहीं विशेष हेतु साधण्यासाठीं त्यानें हें पुण्यछद्म ऊर्फ धर्मकपट केलें असावें ! या खोट्या अथवा बनावट आश्वलायनस्मृतीची एक प्रत डॉ. भांडारकर यांचे जवळ आहे. अनंतदेवाखेरीज

दुसरे सात आठ निबंधकार ज्या आश्वलायनस्मृतीचा उल्लेख करतात तिच्याशीं ही ताडून पाहिली असतां, उभयतांत कांहींच साम्य दृष्टीस पडत नाहीं. तेव्हां बाकीच्या निबंधकारांचा **आश्वलायन खरा** आणि अनंतदेवाचा **आश्वलायन तोतया** असें समजणें भाग आहे ! आमच्या समजुतीनें डॉ. भांडारकर यांची ही विचारशैली निरुत्तर आहे, व टिळक वगैरे जे लोक आश्वलायनाच्या स्मृतीवर म्हणजे या अविश्वसनीय साक्षीदाराच्या बनावट ग्रंथावर आपल्या पक्षाचा व्यूह रचीत आहेत, ते जाणून बुजून किंवा चिवट मूर्खपणामुळें असत्यपंथास लागले आहेत, असें वाटतें. सामर्थ्य असेल तर त्यांनीं ही आश्वलायनस्मृति खरी आहे, हें अगोदर सिद्ध करून द्यावें, आणि मग वादास उभें रहावें.

या एका बनावट स्मृतीशिवाय दुसऱ्या कोणत्याही सर्वमान्य स्मृतींत किंवा प्रसिद्ध निबंधकारांच्या ग्रंथांत गर्भाधान पहिल्या ऋतूंत केलेंच पाहिजे, असे धर्मवादी सिद्ध करून दाखवतील तर त्यांचा आग्रह किंचित् विचारणीय होणार आहे.

अगदीं अलीकडील ग्रंथांत आणखी असें एक वाक्य सांपडते कीं, **'प्रत्येक ऋतूस नवऱ्यानें आपल्या बायकोकडे जावें.'** नवऱ्याला बायकोकडे जावयाचें असल्यास त्यानें ऋतुकाली जावे अशी जी सामान्य धर्माज्ञा होती तिचा टीकाकारांनीं पुढें असा अर्थ काढला कीं, प्रत्येक ऋतूस आपल्या स्त्रीकडे गेलेंच पाहिजे; न गेल्यास भ्रूणहत्येचें पातक त्याच्या कपाळी येतें ! अर्थात् साऱ्याच ऋतूविषयीं हें विधान करून टाकल्यामुळें, पहिल्या ऋतूंत स्त्रीगमन न करणाराही गर्भघातक होतो, हे उघडच आहे. तेव्हां जुन्या लोकांच्या समजुतीप्रमाणें पहिल्या ऋतूंतच गर्भाधान केलें पाहिजे, व न करील त्याला भ्रूणहत्या गांठणार, हें निर्विवाद झालें ! पण हें संकट केवळ अपरिहार्य नाहीं. गर्भाधानसंस्काराचीं दोन अंगें आहेत. एक **प्राजापत्य** म्हणजे होम वगैरे; दुसरें, खरें गर्भाधान म्हणजे रात्रीं ऋतुमती स्त्रीकडे तिच्या नवऱ्यानें जाणें. ज्याला धर्माप्रमाणें सर्व संस्कार करावयाचे असतील त्यानें पहिल्या ऋतूस अनुकूल दिवस पाहून तेवढा प्राजापत्य होम तरी उरकून घेतला पाहिजे. गर्भाधान पुढल्या कोणत्याही पाळीस अनुकूल रजनी पाहून

करण्यास हरकत नाहीं, अशी स्पष्ट शास्त्राज्ञा आहे. पण प्रस्तुत वादांतील टिळकप्रभृति हट्टी लोकांस हा शास्त्राधार फारच बाधक असल्यामुळें, हे दोन्ही विधी एकेच दिवशीं उरकले पाहिजेत, असें निराधार प्रतिपादन करीत आहेत. त्यांच्या प्रतिपादनास कांही आधार असल्यास तो चालू संप्रदायाचा आहे; शास्त्राचा नाहीं. शास्त्रांत प्राजापत्य आणि गर्भाधान हे पृथक् विधि समजून ते पृथक दिवशीं करावे, असें स्पष्ट सांगितलें आहे **अथर्तुमत्यः प्राजापत्यमृतौ प्रथमेऽनुकूलेऽहनि** असें म्हणून पुढें **अथगर्भलभनमृतौ अनुकूलायां निशि** असें म्हटलें आहे. हें **आश्वलायन गृह्याच्या** नारायण भट्टकृत परिशिष्टांतील वाक्य आहे. नारायणभट्टानें गर्भाधानसंस्काराचे दोन भाग कल्पून पहिल्यास **प्राजापत्य** व दुसऱ्यास **गर्भलभन** अशीं नांवें दिलीं आहेत, आणि नंतर त्या विधींचें वर्णन केलें आहे. तें करतांना आतां "प्राजापत्याविषयीः—हा विधि पहिला ऋतु प्राप्त झाला असतां अनुकूल दिवस पाहून...करावा" याप्रमाणें याचें वर्णन झाल्यावर "आतां गर्भलभनाविषयीः-हा विधि अनुकूल रात्र पाहून करावा" असें म्हटलें आहे. यावरून प्राजापत्यहोम पहिल्या ऋतूस योग्य मुहूर्तावर केला पाहिजे; गर्भाधान म्हणजेच स्त्रीपुरुषांचा संयोग कोणत्याही पाळीस सवडीप्रमाणें करण्यास हरकत नाहीं, असा उत्तान अर्थ असून टिळक वगैरे लोकांनीं व्याकरणाकडे, वाक्यरचनेकडे, किंवा वाचनाच्या ओघाकडे लक्ष न देतां, चालू सांप्रदायाशीं त्याची संगति जुळवून देण्यासाठीं ओढून ताणून त्याचा असा अर्थ केला आहे कीं, ज्या दिवशीं प्राजापत्य करावयाचें, त्याच दिवशीं **गर्भाधान** झालें पाहिजे. या वचनाचा असा अर्थ असता तर 'अथ' व 'अनुकूल' या शब्दांचा पुनरुच्चार करावयाला नको होता; तसेंच "ऋतु" शब्द मुळींच घालायाला नको होता, किंवा त्याच्यापाठीमागें "प्रथम" हें विशेषण तरी फिरून घालायाला पाहिजे होतें. हें दोनही विधि चालू सांप्रदायाप्रमाणें एकेच दिवशीं झाले पाहिजेत, असें लिहिण्याचा नारायणभट्टाचा आशय असता, तर "योग्य दिवस पाहून" व "योग्य रात्र पाहून" अशी द्विरुक्ति त्याने केली नसती; हे किंवा दोनही विधि एकेच दिवशीं व्हावे अशी त्याची इच्छा असती तर 'योग्य दिवस' आणि 'योग्य रात्र' असा भेद तो

कशाला करता ? आपण असा भेद सध्यांच्या प्रचारांत मुळींच करीत नाहीं. अमुक मुहूर्त गर्भाधानाला चांगला आहे, असें ठरविलें म्हणजे तो दोनही विधि उरकण्यास ठीक आहे असें आपण समजतों. म्हणतांना 'चांगला दिवस पहा' येवढेंच म्हणतों; व होमाला जो दिवस प्रशस्त असेल त्याचीच रात्र गर्भाधानाला प्रशस्त असें समजून फक्त 'दिवस' हुडकण्याबद्दल पंचांग चाळतों. त्याच दिवसाची 'रात्र' गर्भाधानास अनुकूल असेल किंवा नाहीं, अशी शंकाही आमच्या मनांत येत नाहीं, म्हणून आम्ही रात्रींविषयीं कधींच उल्लेख करीत नाहीं. पण नारायणभट्टाचें तसें म्हणणें नाहीं. त्यावर लोकसांप्रदायाची थोडीथोडी छाया पडूं लागली होती, पण तो आमच्या इतका त्याचा बंदा गुलाम होऊन गेला नव्हता. सुश्रुत, वाग्भटादि शारीरकोविदांचीं वाक्यें त्याच्या डोळ्यांपुढें उभीं असल्यामुळें, सुपुत्रेच्छु पुरुषांनीं पहिल्याच ऋतुकालीं गर्भाधानासाठीं रतिगृहात संगत व्हावें, हें त्यांस बरें वाटलें नसावें, व म्हणूनच त्याने होमविधि प्रथम ऋतूस चांगल्या दिवशीं उरकून टाकून पुढें योग्य वाटेल त्या पाळीस स्त्रीपुरुषांनीं चांगली रात्र पाहून रत्युपभोगासाठीं संगत व्हावें, असा शास्त्रार्थ दिला असावा, हें उघड आहे. असें केल्यानें धर्मशास्त्राचें उल्लंघन न करतां शारीरशास्त्राच्या आज्ञा पाळण्याची सवडही त्यानें करून ठेविली. असें डॉक्टर भांडारकर यांचें जें म्हणणें, त्यावर धर्मशास्त्रदृष्ट्या किंवा व्याकरणदृष्ट्या प्रतिकूल कोटिक्रम करणें अशक्य आहे. पण ज्यांना खोट्या धर्माभिमानानें पक्कें घेरलें आहे, किंवा ज्यांना चालू संप्रदायास शास्त्राधार आहे असें दाखवून, अडाणी लोकांस सरकाराविरुद्ध क्षुब्ध करावयाचें आहे त्यांना व्याकरणाशीं, संगतीशीं, किंवा शास्त्रार्थाशीं हवें तसें बागडणारांच्या पदरीं अप्रामाणिकपणा किंवा मूर्खपणा येतो, हें कसें समजणार व समजलें तरी तें आपली चुकी कोठून कबूल करणार ?

यावरून पहिल्या पाळीसच गर्भाधान केलें पाहिजे, किंवा होम आणि गर्भाधान हे विधि पृथक् खालीं करतां येणारच नाहींत, असें नाहीं, हें उघड होतें. पण आमच्या प्रतिपक्ष्यांस ती गोष्ट कोठून रुचणार ? त्यांना बारा वर्षांच्या आंतील वयाचे मुलीस नहाण आलें असलें तरी पहिल्याच खेपेस तिचें गर्भाधान केलें पाहिजे, न केल्यास शास्त्रोल्लंघन होतें, असें स्थापण्याची

आवश्यकता आहे; तसें केल्याखेरीज सरकारानें आमच्या धर्मांत हात घातला अशी ओरड त्यांस करतां येत नाहीं. तेव्हां त्यांनीं कित्येक लोकांत व प्रांतांत पहिल्या पाळीसच होम व गर्भाधान करण्याची जी चाल पडली आहे तींच पूर्णपणें शास्त्रसंमत आहे; व त्या चालीच्या विरुद्ध जाणें हें केवळ अशास्त्र नसलें तरी गौण आहे आणि आपत्कालाखेरीज तसें करणें उचित नाहीं, व जेव्हां निरुपायास्तव तसें करणें भाग पडेल तेव्हां प्रायश्चित्ताशिवाय मुक्ति नाहीं, असें दाखविण्याची खटपट चाललेली आहे. आमच्या मतें या प्रकरणांत शास्त्र व रूढि यांची उत्कृष्ट संगति कोणासहि घालून देतां येणार नाहीं. संमतीच्या बिलास रूढीपेक्षां शास्त्र विशेष अनुकूल आहे. तरी रूढीही सर्वांशीं प्रतिकूल नाहीं. कारण पुष्कळ लोकांत गर्भाधानविधि मुळींच करीत नाहींत. किंवा तो पाहिजे तेव्हां करतात. असें असून त्यांस कोणी वाळीत टाकीत नाहीं किंवा प्रायश्चित्त घेण्यास लावीत नाहीं. पण हा सर्व खरा प्रकार धर्माच्या नांवावर गिल्ला करून अडाणी लोकांस सरकारविरुद्ध चिथविणाऱ्या भोंदू धर्मनिष्ठांस कोठून मानवणार ? कोणाच्याहि हातून वेळच्यावेळीं गर्भाधान न घडल्यास जें पाप होतें त्याचें क्षालन पांचचार आण्यांनीं किंवा शेंपन्नास प्राणायामांनीं करतां येण्याची ज्यांनीं सवड ठेविली आहे त्यांच्या दृष्टीनें तें पाप किती दर्जाचें असेल, हें का या भोंदूस समजण्याची अक्कल नाहीं ? हवी तितकी आहे; पण त्यांना कोठें खरें समजण्याची गरज आहे ? शास्त्रांतून हुसकून लाविलें म्हणजे रूढीच्या आड दडावें, व रूढीच्या मैदानांत चोप बसला कीं शास्त्राच्या पाठीमागें दडी द्यावी, असा यांनीं पळापळीचा व लपंडावीचा प्रकार चालविला आहे एवढें सुज्ञ वाचकांच्या नजरेस आलें असेल तर या संबंधानें आम्हीं आपलें कर्तव्य बजावलें, असें आम्हांस वाटणार आहे. यापलीकडे या धर्मवादांत पडण्याची आमची इच्छा नाहीं; कारण, संमतीच्या बिलाचें लीलेनें मंडन करतां येण्यासारखे आमच्या भात्यांत याहून खाशा नेमाचे दुसरे पुष्कळ बाण आहेत !

महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र : : ४५

प्रिय देशबांधवहो, संमतीच्या बिलाच्या संबंधानें सुधारकींत अलीकडे आलेल्या कांहीं निबंधांतील भाषेची तीव्रता पाहून, तुम्हांपैकीं कित्येकांचीं मनें त्यावर रुष्ट झालीं असतील यांत संशय नाहीं. न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज वगैरे लोकोपयोगी संस्थांची स्थापना व उत्कर्ष, त्याचप्रमाणें मराठा आणि केसरी पत्रांचा अवतार, प्रसार, आणि करवीरप्रकरण वगैरे गोष्टींशीं या पत्राच्या नम्र लेखकाचा व रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांचा असलेला संबंध ज्यांना ठाऊक आहे, व हे दोघे इसम बरींच वर्षें एकमेकांशीं कसें वागत होते हें ज्यांनीं पाहिलें आहे, त्यांना सुधारकासारख्या नवीन पत्राचें जनन, रा. टिळक व पाटणकर यांचा पहिल्या तीन संस्थांशीं नुकताच घडून आलेला विश्लेष व प्रस्तुत वादांत सुधारक व केसरी पत्रांच्या चालकांनीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें एकमेकांवर चालविलेला भडीमार पाहून या उभयतांच्या बेबनावास व फुटाफुटीस झालेलीं कारणें त्यांस ठाऊक नसल्यामुळें विषाद वाटणें हें फार स्वाभाविक आहे. पण रा. टिळकांस तीं कारणें अवगत असतां, ज्या पत्राचें आधिपत्य त्यांचेकडे आहे त्याच्या गेल्या अंकांत "ज्यांना वादांत स्वपक्षाची उणीव झांकण्यासाठीं परपक्षावर, आणि विशेशतः त्यांतील एकदोन व्यक्तींवर, अपशब्दरूपी गोळीबार करणें हीनपणाचें वाटत नाहीं त्यांची कानउघाडणी करण्याच्या नादास लागणेंही व्यर्थ होय. सार्वजनिक विषयावर वादविवाद करण्याच्या मिषानें खासगी द्वेषाचें उट्टें काढण्याची अमूल्य संधि क्वचितच मिळतें" अशीं दोन वाक्यें आहेत. हीं वाक्यें जेव्हां आमच्या नजरेस पडलीं तेव्हां मात्र आम्हांस मोठा विस्मय वाटला! टिळक आणि आगरकर यांचा खाजगी द्वेष! आणि तो कशासाठीं? टिळक आगरकरांचें किंवा आगरकर टिळकांचें कांहीं एक लागत नाहींत, आणि म्हणून एकाला दुसऱ्याचा 'खासगी द्वेष' करण्याचें कारण आजपर्यंत झालेलें नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यांपैकीं निदान एकाच्या मतानें तरी तें केव्हांच होण्याचा संभव नाहीं. त्या दोघांचा बेबनाव व फुटाफूट होण्यास ज्या समाईक संस्थांचे ते दोन सेवक होते, त्या

संस्था चालविण्याच्या पद्धतीविषयीं व त्यांच्या उत्कर्षाच्या साधनांविषयीं कोणत्याही रीतीनें एकवाक्यता न होणारा त्यांचा मतभेद कारण झाला, व याच मतभेदामुळें, प्रस्तुत वादांत ते एकमेकांची मुर्वत न ठेवतां, आपापल्या मतांचा आणि पक्षांचा विजय होण्यासाठीं अन्योन्यांवर तुटून पडत आहेत; दुसरें कांहीं नाहीं ! अशा रीतीनें आपापल्या देशविषयक विचारांचें प्राबल्य स्थापण्यासाठीं अंतःकरणपूर्वक झुंझणाऱ्या लढवय्यांचें संग्रामचातुर्य पाहत राहून वं कौतुक करावयाचें विसरून जाऊन, अशा युद्धप्रसंगीं केवळ कर्णकटु टणत्कारांच्या श्रवणावरूनच प्रेक्षकांनीं 'एकाला दुसऱ्याचा मत्सर उत्पन्न झाला आहे,' किंवा कोणी कोणाचें 'खाजगी द्वेषाचें उट्टे काढून घेत आहे,' असा कुतर्क करणें अत्यंत अनुदार होय ! एका जननीच्या उदरांतून अवतरलेल्या सहोदरांत देखील जर भांडण किंवा मतभेद झाल्याशिवाय रहात नाहीं, तर ज्यांचा एकमेकांशीं कोणत्याही प्रकारचा कुलसंबंध नाहीं, व ज्यांनीं राजसेवेचा सामान्य मार्ग सोडून देऊन आपापल्या मनास प्रशस्त वाटेल त्या रीतीनें आपल्या हयातींत आपल्या हातून होईल तेवढें देशकार्य करण्याचा निश्चय केला आहे, त्यांचे विचार सर्वांशीं न जुळणें व ज्याला त्याला प्रसंगविशेषीं आपापल्या विचारांचा पराकाष्ठेचा अभिमान उत्पन्न होऊन, एकदां उभयतांनीं आरंभिलेल्या सामान्य गोष्टींस आमरण चिकटून राहणें स्वतःस किंवा इतरांस सुखास्पद व कल्याणप्रद होणारें नाहीं, अशी खात्री झाल्यामुळें ज्याच्या मनास जी दिशा अत्यंत आक्रमणीय वाटेल त्यानें ती धरणें, यांत नवल वाटण्यासारखें काय आहे, हें आम्हांस समजत नाहीं ! बांधवहो, विचारकलहाला तुम्ही इतके कशासाठीं भितां ? दुष्ट आचाराचें निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धि, सत्यसंशोधन व भूतदयेचा विचार इत्यादि मनुष्यांच्या सुखाची वृद्धि करणाऱ्या गोष्टी विचारकलहाखेरीज होत नाहींत. आजपर्यंत या देशांत हा कलह माजावा तितका कधींच न माजल्यामुळें, व बहुधा आमचे लोक 'गतानुगतिक'च असल्यामुळें, हें भरतखंड इतकीं शतकें अनेक प्रकारच्या विपत्तींत खितपत पडलें आहे ! हा विचारकलह दुष्ट विकोपास जाऊं न देण्याविषयीं मात्र खबरदारी ठेविली पाहिजे. नाहींतर त्याप्रासून पुढें खऱ्या लढाया आणि

रक्तस्राव होण्याचा संभव असतो. सुधारक आणि दुर्धारक, चपल सुधारक आणि मंद सुधारक, थंडे सुधारक आणि गरम सुधारक अथवा नाना प्रकारच्या मतांचे नवे आणि जुने लोक यांमध्यें सांप्रत कालीं जी दुही माजून राहिली आहे, ती पाहून घाबरून जाण्याचें बिलकूल कारण नाहीं ! पाश्चिमात्य शिक्षणामुळें ज्या दिवशीं या वादास आरंभ झाला तो दिवस हिंदुस्थानच्या भावी इतिहासांत महोत्सव करण्यासारखा होईल. त्या दिवशीं अनेक शतकें गाढ निद्रेंत घोरत पडलेला हिंदुस्थान देश किंचित् जागा होऊन चावळू लागला, किंवा प्रेतावस्थ झालेल्या त्याच्या विस्तीर्ण देहांत ईशकृपेनें पुनः एकवार चैतन्यावतार झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या दिवशीं त्याचें स्थाणुत्व नाहींसें होऊन त्याला जी यत्किंचित् गति मिळाली ती प्रतिवर्षी अगदीं यव प्रमाणांत कां होईना, पण सारखी वाढत आहे, व जों जों हा विचारकलह निकराचा होऊं लागेल तों तों झपाट्यानें होऊं लागणार आहे. आतां किती झालें तरी कलह तो कलह ! तो कशाही प्रकारचा आणि कितीही सौम्य असला तरी त्यांत अप्रिय असें कांहींच नाहीं, असें कोठून होणार ? ज्या दोन मनुष्यांचा परस्परांशीं संबंध आहे, त्यांपैकीं एक दुसऱ्याच्या विरुद्ध जाऊं लागला म्हणजे कधीं त्या दोघांस एकमेकांशीं वर्दळीस यावें लागेल; कधीं एकमेकांवर शब्दप्रहार करावे लागतील; कधीं उभयतांनीं आरंभिलेल्या कामांतून अंग-काढून घेऊन विलग व्हावें लागेल; कधीं पदराला बराच खार लाऊन घ्यावा लागेल किंवा जिवाकडे न पाहतां अहोरात्र मानसिक शारीरिक कष्ट करावे लागतील, पण जोंपर्यंत आपण आपल्या विचाराच्या विजयासाठीं प्रसारासाठीं भांडत आहों, असें प्रत्येकाच्या मनांत वागत राहील तोंपर्यंत न्यायसभेत पक्षकाराचें भांडण भांडणाऱ्या वकिलाच्या दिखाऊ वैराच्या फार पलीकडे अशा दोन व्यक्तींचें वैर जाईल असें आम्हांस वाटत नाहीं, व आगरकर आणि टिळक यांच्या वैराचें स्वरूप याहून भयंकर नाहीं असें निदान त्यांपैकीं एकाला तरी वाटत आहे. तसेंच या वैरामुळें या दोघांच्या व्यासंगांत जें अंतर पडलें आहे तें कमी न होतां कदाचित् अधिकच होत जाण्याचा जरी संभव आहे तरी जेव्हां खुद्द आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळ्यांस पाणी येण्या-

सारखी कांहीं अनिष्ट गोष्ट घडेल तेव्हां इतरांपेक्षां टिळकांस व जेव्हां टिळकाचे घरीं तसा अनिष्ट प्रकार घडेल, तेव्हां आगरकरांस, विशेष वाईट वाटून डोळ्यांस पाणी येईल, व मतभेदामुळें उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणांत विसर पडून, एक दुसऱ्याला मदत करण्यास सहज प्रवृत्त होईल!

धर्म, राज्य व समाज यासंबंधानें अलीकडे जे औपपत्तिक सिद्धांत सर्वमान्य होऊन बसले आहेत त्यांविषयीं आम्हां उभयतांत म्हणण्यासारखा मतभेद नाहीं. मनुष्याच्या बुद्धीचे व्यापार इंद्रियाधीन असल्यामुळें या बुद्धीचें ब्रह्मांडाच्या आदिकारणाचें किंवा परमेश्वराचें यथार्थ ज्ञान होण्याचा संभव नाहीं, हें धर्मतत्त्व मनांत बाळगून धर्मकल्पनांत किंवा धर्माचारांत जे फेरफार करावयाचें ते करीत गेले पाहिजे; राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणत्याही देशांत ऐहिक सुखाची परमावधि व्हावयाची नाहीं; पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार आणि इंग्लिश लोकांचें साहाय्य असल्याशिवाय आमचें डोकें वर निघण्याचा संभव नाहीं, याकरितां राजनिष्ठा यत्किंचित् ढळूं न देतां, राजकीय हक्क संपादण्यासाठीं जें करणें असेल तें आम्हीं केलें पाहिजे; नीतिप्रसार, संपत्त्युत्पादन, आरोग्यरक्षण वगैरे अनेक महत्त्वाच्या गोष्टी ज्ञानाधीन असल्यामुळें लोकशिक्षणाचें काम जितक्या झपाट्यानें चालवेल तितक्या झपाट्यानें चालविलें पाहिजे; जातिभेद नाहींसा झाला पाहिजे, स्त्रीपुरुषांच्या ज्ञानांत व स्वातंत्र्यांत जेवढें अंतर राहूं देणें अपरिहार्य असेल तेवढ्याहून अधिक राहिल्यास पूर्ण संसारसुख प्राप्त होण्याचा संभव नाहीं, म्हणून स्त्रियांची उन्नति करण्याबद्दल रात्रंदिवस झटलें पाहिजे वगैरे धार्मिक, राजकीय व सामाजिक विषयासंबंधानें स्थूल औपपत्तिक सिद्धांत जसे एकाला तसे दुसऱ्यालाही संमत आहेत. दोघांत जो मतभेद पडतो तो आज तारखेस हे सिद्धांत अमलांत आणण्यासाठीं काय करतां येईल व तें कोणत्या साधनानें करतां येईल, यासंबंधानें पडतो. या घटकेस साध्य असलेल्या सुधारणेची इयत्ता आणि तिचीं साधनें यांविषयीं टिळकांचें बहुतेक विचार सामान्य लोकांस मान्य होण्यासारखे असल्यामुळें, किंवा त्यांस मान्य असलेल्या विचाराबाहेर जाण्यास टिळक तयार नसल्यामुळें, त्यांचें वर्तन भवभूतीनें रामचंद्राकडून वदविलेल्या—

स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि
आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥

अर्थः—स्नेह, दया, सौख्य, फार तर काय लोकांच्या संतोषासाठीं मला जानकीचा देखील त्याग करावा लागला तरी त्याबद्दल खेद वाटणार नाहीं ! या श्लोकार्थाप्रमाणें होत आहे, व या क्षणीं ते अत्यंत लोकप्रिय झाले असून, प्रत्येकाच्या तोंडांतून त्यांचें नांव निघत आहे. पण लोकांना आज ज्या गोष्टी प्रिय आहेत त्या या हतभाग्य लेखकास पसंत नसल्यामुळें, लोकछंदानुवर्तन त्याला अशक्य झालें आहे इतकेंच नाहीं, तर लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्या मर्जीविरुद्ध पुनः पुनः त्यांचेपुढें आणणें हेंच आपलें कर्तव्य व जीविताचें सार्थक अशी त्याची दृढ कल्पना झाली असल्यामुळें, धार्मिक व सामाजिक गोष्टींत आपलें ज्ञान विकटोपर्यंत जाऊन पोहोंचलें आहे, व तत्संबंधक आचारांत सुधारणा करण्यास म्हणण्यासारखी जागा राहिलेली नाहीं, निदान त्या कामांत सरकाराचें किंवा कायद्याचें साहाय्य घेतलें असतां सर्वथैव नुकसान होणार आहे असें समजणाऱ्या श्रद्धालू पंडितमन्य व देशाभिमानी म्हणवून घेणाऱ्या जनसमूहाच्या उपहासाचें आणि रोषाचें स्थान त्यानें आपणांस करून घेतलें आहे. तथापि त्याला असा भरंवसा आहे कीं, म्हणण्यासारखी द्रव्यानुकूलता नसतां, श्री. शिवाजीराव महाराज होळकरांनीं देऊं केलेली दरमहा पाचशें रुपयांची नोकरी ज्यानें 'मला नको' म्हणून सांगितलें; विशेष बुद्धिसामर्थ्य किंवा शरीरसामर्थ्य नसतां, आज दहा अकरा वर्षें जो उत्साहपूर्वक शिक्षकाचा आणि लेखकाचा धंदा करीत आहे; कवडीची किफायत नसतां, ज्यानें सात आठ वर्षें सर्वत्र प्रसिद्ध केसरीपत्राचे बऱ्या वाईट रीतीनें 'रकाने' भरून काढले, इतकेंच नाहीं तर एका दुर्दैवी संस्थानिकास सुदशा यावी, येवढ्याच बुद्धीनें लिहिलेले लेख न्यायाधीशास अप्रशस्त वाटल्यामुळें त्यांनीं दिलेली शिक्षा त्यानें आनंदानें साहिली; हातीं असलेल्या पत्राचे मालक शुद्ध वाटेल तें लिहूं देत नाहींत असें दिसून आल्याबरोबर त्यांच्या धमकावण्यांकडे बिलकुल लक्ष न देतां समान शीलाच्या व विचारांच्या मित्राचें प्रोत्साहन व

साहाय्य मिळतांच, सर्वतोमुखी निंदा होत असलेल्या सुधारणेचा आणि सुधारकांचा पक्ष लोकांस वाटत असल्याप्रमाणें दुर्बल नाहीं, इतकेंच नाहीं तर त्याचेंच अखेरीस सर्वत्र साम्राज्य होणार आहे असें युक्तिवादानें सिद्ध करून देण्यासाठीं कोणत्याही गोष्टीची अनुकूलता नसतां, व लोकमत धडधडीत विरुद्ध असतां नवीन पत्राच्या नसत्या उठाठेवींत जो जाणूनबुजून पडला; रूढ धर्माचारांतील आणि लोकाचारांतील व्यंगाचें निर्भयपणें आविष्करण करण्याचें भयंकर पाप हातून घडत असल्यामुळें, देशाभिमानी व धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्रांकडून होत असलेला शिव्यांचा व शापांचा प्रचंड भडिमार ज्याला व ज्याच्या निरपराधी स्त्रीला एकसारखा सोसावा लागत आहे; स्वमताचें मंडन व तदनुसार होईल तेवढें वर्तन करण्यासाठीं आपल्या फार दिवसांच्या मित्रांचाचसा काय, तर रात्रंदिवस काळजी वाहून आणि कडेवर खांद्यावर खेळवून, ज्यांनीं लहानाचें थोर केलें अशा अत्यंत ममताळू व पूज्य आप्तांचाही दीर्घ रोष ज्यानें आपणांवर करून घेतला आहे–अशा मनुष्याच्या लेखांत कितीही प्रमाद होत असले व केवढीही कटुता असली तरी ते समंजस मनुष्याच्या स्वल्प आदरास, निदान थोड्याशा अनुकंपेस तरी पात्र झाले पाहिजेत. " हा वेडापीर इतके हाल, संकटें व लोकापवाद सोसून ज्या अर्थी इतकी धडपड करीत आहे त्या अर्थी ती लोकांस अंतीं हितावह होईल अशी निदान याच्या मनाची तरी खात्री झाली असावी, " असा विचार त्यांच्या मनांत येऊन, त्यांनीं त्याच्या दोषांबद्दल त्यास क्षमा केली पाहिजे. त्यांनीं तसें केलें तर ठीकच आहे; पण नाहीं केलें तरी त्यास विशेषसें वाईट वाटण्याचा संभव नाहीं; कारण, सारें जग त्यावर उलटलें तरी पुढील कविवाक्याचें स्मरण करून त्याला आपलें समाधान करून घेतां येतें.

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञाम ।
जानन्ति ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा ।
कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

अर्थः—खरोखरीच जे या गोष्टींत आमची निर्भर्त्सना करतात, त्यांना कांहींच समजत नाहीं व त्यांच्याकरितां हा आमचा प्रयत्नही नाहीं. माझ्या शिलाचा एखादा इसम कोठें तरी असेल किंवा निपजेल; पृथ्वी अफाट आहे व काल अनंत आहे !

माहितीच्या टीपा

पृष्ठ १. लोकशिक्षणावरचा खर्च सरकारनेंच केला पाहिजे हें तत्त्व आगरकरांच्या वेळीं म्हणजे पन्नास वर्षांपूर्वीच युरप व अमेरिका या देशांत मान्य झालेलें होतें. हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें मात्र या तत्त्वाप्रमाणें आचरण करीत नव्हती. आगरकरांच्या मृत्यूनंतर पंधरा सोळा वर्षांनीं नामदार गोखले यांनीं या तत्त्वानुसार हिंदुस्थान सरकारनें वागावें यासाठीं वरिष्ठ कायदे कौन्सिलांत प्राथमिक शिक्षणाचें बिल आणून आटोकाट प्रयत्न केला पण तो सरकारनें हाणून पाडला. सरकारी उत्पन्नाचा बराच मोठा भाग लोकशिक्षणासाठीं खर्च झाला पाहिजे हा राजशास्त्राचा सर्वमान्य सिद्धांत आहे; व या सिद्धांताच्या विरुद्ध वागणारीं सरकारें आपल्या कर्तव्याला जागत नाहींत असें समजलें पाहिजे. हीच गोष्ट प्रस्तुत लेखांत आगरकरांनीं स्पष्ट केली आहे.

पृष्ठ ३. इन्कम टॅक्स म्हणजे उत्पन्नावरील कर. कांहीं कमींत कमी वार्षिक उत्पन्नाच्या रकमेला हा कर आकारीत नाहींत. सध्यां वर्षाचें दोन हजाराखालीं रुपये उत्पन्न आहे त्यांना हा कर द्यावा लागत नाहीं. त्याहून अधिक उत्पन्न असणाऱ्यांना तो द्यावा लागतो.

पृष्ठ ४. व्याज पोहोचविण्याचा पत्कर. हिंदुस्थानांत आगगाड्या वगैरे मोठमोठालीं कामें उठविण्यासाठीं विलायतेंत कर्ज उभें केलेलें आहे व या कर्जावर कांहीं ठराविक व्याज दरसाल मिळे अशी हमी हिंदुस्थान सरकारनें घेतलेली आहे. हीं कर्जे काढून उभारलेल्या कामांत तोटा होत असला तरीसुद्धां ही हमी घेतल्यामुळें हिंदुस्थान सरकारला हें व्याज द्यावेंच लागतें. अर्थात् तें सरकारच्या दुसऱ्या उत्पन्नांतून द्यावें लागतें म्हणजे तें देण्याचा बोजा कसलेही कर देणाऱ्या या देशांतील लोकांवर पडतो.

पृष्ठ ५. **काँग्रेस.** राष्ट्रीय सभा. हिची पहिली बैठक मुंबई येथें १८८५ सालीं भरली. हिंदुस्थानच्या लोकांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठीं या मोठ्या संस्थेचा जन्म झाला.

पृष्ठ ९. **प्रिन्सिपल्स ऑफ् सोशिआलाजी.** सोशिआलाजी म्हणजे समाजशास्त्र, हर्बर्ट स्पेन्सर या प्रख्यात तत्त्वशोधकानें या विषयावर मोठा ग्रंथ लिहिलेला आहे. गेल्या पन्नास वर्षांत या शास्त्रांत पुष्कळच नवीन भर पडली आहे. आगरकर, टिळकांच्या वेळीं सुशिक्षित लोकांवर स्पेन्सरच्या ग्रंथांनीं पुष्कळ पगडा बसविला होता.

पृष्ठ १२. **द्विप्रकारक उपासनाक्रम** म्हणजे सगुण भक्ति व निर्गुण भक्ति या दोहों प्रकारची उपासना.

पृष्ठ १४. **सर इझ्याक न्यूटन** हा नामांकित शास्त्रज्ञ विलायतेंत अठराव्या शतकांत होऊन गेला. गुरुत्वाकर्षणाचा नियम यानें शोधून काढला असें म्हणतात. शास्त्रीय प्रगतींत ज्यांचीं नांवें अमर झालीं आहेत त्यांत न्यूटनचें नांव प्रमुख आहे.

पृष्ठ २३. **धनगरावस्था, कृषीवलावस्था** इत्यादि. सामाजिक उत्क्रांतींत मनुष्याच्या चार वृत्ति किंवा अवस्था होतात असें त्या वेळच्या समाजशास्त्रज्ञांचें मत होतें. त्या वृत्ति अनुक्रमानें पारधी, धनगर, कृषीवल आणि व्यापारी या होत.

पृष्ठ ३१. **तप्त मुद्रा.** वैष्णव पंथांत त्या पंथाचे आचार्य किंवा जगद्गुरु हे आपल्या अनुयायांना तापलेल्या मुद्रांनीं भाजतात. त्या योगानें विशेष शुद्धता येते असें पंथांत मानतात.

पृष्ठ ४०. **आथेल्लो नाटक.** हें शेक्सपीयरनें लिहिलेलें एक नामांकित शोकपर्यवसायी नाटक आहे. यांत आथेल्लो हा शूर पण संशयी व हलक्या कानाचा नवरा, डेस्डीमोना ही सुंदर पण गरीब पत्नी आणि आयगो हा उलट्या काळजाचा बदमाष अशीं प्रमुख पात्रें आहेत व आयगोच्या सांगण्यावर विश्वास ठेवून आथेल्लो डेस्डीमोनेच्या पातिव्रत्याबद्दल संशय घेऊन तिचा खून करतो व नंतर ती निरपराध असल्याचे त्याला पटतें, व तो स्वतःला मारून घेतो, असें या नाटकाचे कथानक आहे.

पृष्ठ ४२. लॉर्ड लिटन. हे हिंदुस्थानचे (१८७६–८०) गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय होते. यांच्या कारकीर्दीत वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करणारा कायदा पास झाला.

लॉर्ड रॉबर्ट्स् हे पुष्कळ दिवस हिंदुस्थानांतील सैन्याचे सर सेनापति-(कम्यांडर-इन-चीफ) होते. अफगाणिस्थान वगैरे ठिकाणीं युद्धें करून यांनीं लौकिक मिळविला.

पृष्ठ ४४. लॉर्ड रे हे मुंबईचे गव्हर्नर आगरकरांच्या वेळीं होते. यांना उदारमतवादी समजतात.

पृष्ठ ४७. राजकीय जमाबंदी म्हणजे राजाचें किंवा सरकारचें उत्पन्न. हें कसकसें निर्माण होतें तें या निबंधांत सांगितलें आहे.

पृष्ठ ४९. ग्लाडस्टन हे विलायतेंतील लिबरल पक्षाचे अध्वर्यु, तीन वेळां मुख्य प्रधान होते. आयर्लंडला होमरूल देण्याचा यांनीं आटोकाटीचा प्रयत्न केला व त्यांत त्यांच्या पक्षांत दुफळी होऊन लिबरल पक्षाच्या हातून राजसत्ता कित्येक वर्षें गेलीं.

पृष्ठ ५०. लेव्ही. गव्हर्नरसाहेबांकडे सर्व अंमलदारांना व प्रमुख शहर-वासीयांना भेटण्यासाठीं बोलावतात तो समारंभ.

पृष्ठ ५५. कृष्णशास्त्री चिपळूणकर. हे अलौकिक बुद्धिवान् पंडित, नामांकित मराठी ग्रंथकार व कवि होऊन गेले. यांची ग्रंथरचना विविध प्रकारची आहे **विष्णुशास्त्री** चिपळूणकर हे यांचे ज्येष्ठ चिरंजीव. विष्णुशास्त्री हे वडिलांसारखे जरी प्रखर बुद्धीचे नव्हते तरी निबंधमालेच्या द्वारां सुंदर व जोरदार मराठी निबंध लिहून त्यांनीं मोठा लौकिक कमाविला व पुण्यांत शाळा, छापखाना, वर्तमानपत्रें वगैरे संस्था त्यांनीं काढल्या.

केरूनाना म्हणजे प्रो. केरो लक्ष्मण छत्रे. हे मरहूम डेक्कन कॉलेजांत गणितशास्त्राचे अध्यापक होते. ते जसें उत्तम विद्वान् म्हणून प्रसिद्ध होते तसेच विद्यार्थ्यांमध्यें अत्यंत प्रिय म्हणून त्यांचा लौकिक होता.

माधवराव कुंटे–माधव मोरेश्वर कुंटे हे विद्वान् गृहस्थ पुणें हायस्कूलचे हेडमास्तर होते. यांनीं इंग्रजींत एक मोठा निबंध लिहिला आहे व " राजा शिवाजी " म्हणून एक दणदणीत मराठी काव्य लिहिलें आहे. विक्षिप्त

पणाबद्दलही यांची फार प्रसिद्धी होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे यांच्या हाताखालीं असिस्टंट मास्तर होते व त्यावेळीं अनुभवास आलेल्या कुंठ्यांच्या वागणुकीमुळें किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळें शास्त्रीबोवांचें आणि यांचें सूत नव्हतें.

पृष्ठ ५५. मि. केन. हिंदुस्थानच्या हिताची काळजी घेणारे जुन्या पिढींतील एक इंग्रज गृहस्थ. दादाभाई नौरोजी या परमपूज्य हिंदी देश भक्ताला निरलसपणें साहाय्य करणारांत हे होते.

पृष्ठ ५६. पंडिता रमाबाई ही विदुषी ब्राह्मण स्त्री पुढें ख्रिस्ती झाली. या बाईचें विस्तृत चरित्र विल्सन कॉलेजांतील अध्यापक डॉ. हिवाळे यांनीं लिहिलेलें आहे. शारदासदन म्हणून स्त्रीशिक्षणाची संस्था इनें काढली. पुढें ही संस्था फक्त ख्रिस्ती स्त्रियांची झाली.

पृष्ठ ५७. ज्ञानप्रकाश हें पुण्यांतील सर्वांत जुनें वृत्तपत्र. आगरकरांच्या वेळीं जे निरनिराळे पक्ष होते त्यांत हें मध्यस्थ वृत्तीचें पत्र समजत असत व बरेच वेळां न्यायमूर्ति रानडे यांच्या धोरणाचा यांत पुरस्कार असे. पण त्या वेळच्या ज्ञानप्रकाशाला केसरी किंवा सुधारक याप्रमाणें निश्चित तत्त्वें होतीं असें दिसत नाहीं. हें पत्र तीस वर्षांपूर्वी नामदार गोखले यांनीं घेतलें व तेव्हांपासून आजतागायत सर्व्हेंटस् ऑफ इंडिया सोसायटीचें तें मुखपत्र आहे. सध्यां तें दैनिक पत्र आहे हें प्रसिद्धच आहे.

पृष्ठ ५९. ग्याझेटांत नांव दाखल होणें. पदवी किंवा नोकरी मिळून मुंबई सरकारच्या ग्याझेटांत नांव येणें. सरकारी ग्याझेटांत वरच्या वर्गाच्या नोकरांच्या नेमणुका वगैरे दर आठवड्याला येतात. मुंबई सरकारचें ग्याझेट दर गुरुवारीं सकाळीं प्रसिद्ध होतें.

पृष्ठ ६०. तरणा रावसाहेब मुन्सफ, मामलतदार अथवा डेप्युटी कलेक्टर या जागा मिळणाऱ्यांना रावसाहेब म्हणण्याची पद्धत असे व आहे. शिकून झाल्यावर यांपैकीं एखादी जागा मिळावी ही बहुतेकांची इच्छा असे व मिळाल्यावर बहुतेक रावसाहेब आयुष्य कसें घालवीत याचें वर्णन येथें केलेलें आहे.

पृष्ठ ६०. क्राफर्ड प्रकरण मि. क्राफर्ड हे मुंबईचे म्युनिसिपल कमिशनर होते व मुंबईचें क्राफर्ड मार्केट हें त्यांचेंच स्मारक आहे. हे रेव्हेन्यू कामिशनर पण होते व त्या हुद्यावर असतांना लाच खाऊन ते मोठाल्या नोकऱ्या देत असा गवगवा झाला होता. पुढें त्यासंबधीं चौकशी होऊन त्यांनीं नोकऱ्या दिलेले बहुतेक मामलतदार बडतर्फ झाले व पुढें त्यांना कांहीं पेन्शन मिळालें. या सर्व प्रकरणाला " क्राफर्ड प्रकरण " हें नांव आहे.

पृष्ठ ७०. स्वयंवर. पुराणांतरी वर्णन केलेल्या स्वयंवरांत पण वगैरे लावीत. त्यामुळें मुलीला स्वतःच्या इच्छेप्रमाणें वर पसंत करतां येत होता असें म्हणतां येत नाहीं. म्हणून स्वयंवर या शब्दाचा यौगिक अर्थ आणि पुराणांत असलेला रूढ अर्थ यांचा एकमेकांशीं मेळ नाहीं. पण तो मेळ आहेच अशी समजूत या व या विषयावरच्या इतर निबंधांत आगरकरांनीं करून घेतलेली दिसते. ही समजूत अर्थात् बरोबर नाहीं.

पृष्ठ ७३. संकुचितदर्शनाचे शास्त्री वैदिक—म्हणजे ज्यांची दृष्टि विस्तृत नाहीं असे. इंग्रजींतील Short-Sighted किंवा of a limited vision या शब्दाचा अर्थ आणण्यासाठीं हा मराठींत प्रतिशब्द आगरकरांनीं योजिलेला आहे हे उघड आहे.

पृष्ठ ७४. सामाजिक सुधारणा परिषद् किंवा सामाजिक परिषद् ही राष्ट्रीय सभा सुरू झाल्यानंतर थोड्या वर्षांनीं न्यायमूर्ति रानडे यांनीं काढली व पुष्कळ वर्षें राष्ट्रीय सभेबरोबरच भरत असे ज्यांना राजकीय सभांना जातां येत नसे अशा बरीच मंडळी या परिषदेस जात. अर्थात् राष्ट्रीय सभेचे त्या वेळेचे पुष्कळसे पुढारी या परिषदेंतही होते. पुण्याला राष्ट्रीय सभा १८९५ सालीं झाली त्या वेळीं आगरकरांचा मृत्यु होऊन सहा महिने झाले होते. रा. टिळक यांनीं सामाजिक परिषद् तेव्हां राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरूं दिली नाहीं. (रा. केळकरकृत टिळकचरित्र, भाग पहिला पहा.) अलीकडे कित्येक वर्षें ही परिषद जवळ जवळ नामशेष झाली आहे. पण तिनें पुरस्कारलेलीं बहुतेक तत्त्वेंही आतां पुष्कळांना मान्य झालेली आहेत.

पृष्ठ ८६. मि. ब्राडला हे विलायतच्या पार्लमेंटचे सभासद. हे हिंदुस्थानाचे मोठे मित्र होते. हे पक्के नास्तिक आणि दीनदुबळ्यांचे कैवारी होते. १८९२ सालीं राष्ट्रीय सभेला हे हजर होते. मिसेस् आनी बेझंट या सुरवातीला मि. ब्राडला यांच्या अनुयायी होत्या. पुढें त्या थिआसफिस्ट झाल्या व नास्तिकपणाच्या ऐवजीं सर्व धर्मांच्या एकीकरणाचा उद्योग त्यांनीं केला; पण मि. ब्राडला यांच्या हयातींत त्या पूर्ण नास्तिक होत्या.

पृष्ठ ९२. सर रिचर्ड टेंपल, सर जेम्स फर्ग्युसन आणि लॉर्ड रे हे तिघेहि मुंबईचे गव्हर्नर होऊन गेले. फर्ग्युसन कॉलेजला मिळालेले नांव सर जेम्स फर्ग्युसन यांचें आहे.

व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूट ही औद्योगिक शिक्षणाची मोठी संस्था मुंबईत (आतां) माटुंगा येथें आहे. हिची स्थापना १८८८ सालीं झाली.

पृष्ठ ९३. डॉ. मॉकिकन हे मुंबईच्या विल्सन कॉलेजचे चाळीस वर्षांवर प्रिन्सिपल होते व मुंबई युनिव्हर्सिटीचे दोन वेळां व्हाइस-चॅन्सलर होते. मुंबईत शास्त्रीय अभ्यासाची सोय व्हावी म्हणून यांनीं पुष्कळ प्रयत्न केले.

सनदी व बिनसनदी नोकर. Covenanted Services and un-Covenanted Services यांसाठीं हे शब्द घातले आहेत. हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी आणि अंमलदार यांच्यांत करारनामा होतो त्याला Covenant असे म्हणतात व असा करारनामा होऊन ज्याला नोकरी मिळाली तो सनदी नोकर; बाकीचे बिनसनदी. हिंदुस्थानांत I. C. S. आणि I. M. S. वगैरे सर्व सनदी नोकर आहेत.

पृष्ठ १३१. प्रो. मॅक्समुल्लर–हे विद्वान् जर्मन गृहस्थ ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटींत संस्कृत वगैरे प्राच्य भाषांचे अध्यापक होते. यांनीं ऋग्वेद व कित्येक उपनिषदें यांची इंग्रजींत भाषांतरें केली आहेत व भाषातुलना शास्त्रासंबंधीं बरेंच कार्य केलें. आर्यांच्या संस्कृतीबद्दल यांना फार आदर होता.

पृष्ठ १३३. रा. ब. पंडितांचा वेदार्थयत्न–रा. ब. शंकर पांडुरंग पंडित हे त्या वेळचे एक नामांकित संस्कृत पंडित होऊन गेले. हे पुणें हायस्कूलचें

हेडमास्तर होते व ऋग्वेदाचें मराठींत भाषांतर देण्यासाठीं त्यांनीं 'वेदार्थयत्न' हें मासिक कांहीं वर्षें चालविलें.

पृष्ठ १४७. राजा सर टी. माधवराव–हे गृहस्थ त्रावणकोर, बडोदा, वगैरे ठिकाणीं दिवाण होते व मराठींत कविताही करीत. यांची त्या काळच्या मुत्सद्दीमंडळींत गणना होती.

पृष्ठ १६४. खोटे दागिने घालावेत. ही आगरकरांनीं कांहींशी विनोदानें पन्नास वर्षांपूर्वी केलेली सूचना आजकाल फारच मोठ्या प्रमाणांत लोकांच्या-विशेषतः स्त्रियांच्या आचरणांत आलेली दिसते.

पृष्ठ १७२. Reactionists म्हणजे ज्यांची विचारसरणी प्रतिगामी स्वरूपाची, प्रगतीला विरुद्ध आहे असे लोक. अलीकडे Reactionary हा शब्द विशेष प्रचारांत आहे.

पृष्ठ १८२. मि. ए ओ. ह्यूम यांचा उल्लेख येथें ह्यूमसाहेब असा केलेला आहे. राष्ट्रीय सभेला यांचा मोठा पाठिंबा होता व कित्येकांच्या समजुतीप्रमाणें राष्ट्रीय सभा यांनींच काढली. हिंदुस्थानचे हे निरलस कैवारी होते व राष्ट्रीय सभेला चांगली स्थिति येण्यास यांचेच श्रम सुरवातीला निःसंशय कारणीभूत झाले.

पृष्ठ १८७. प्रो. जिन्सीवाले–हे मुंबईच्या विल्सन कॉलेजांत संस्कृतचे अध्यापक होते. हे फार नामांकित वक्ते म्हणून त्या काळीं प्रसिद्ध होते व अतिशय कर्मठ ब्राह्मण होते. पण वेद हे पौरुषेय आहेत म्हणजे परमेश्वरानें उत्पन्न केलेले नसून माणसांनीं (ऋषींनीं) केलेले आहेत असें त्यांचें ठाम मत होतें व तें मत जुन्या लोकांना पसंत नव्हतें.

प्रो. टिळक. लोकमान्य बाल गंगाधर टिळक. टिळक, आगरकर आपटे वगैरे मंडळींनीं फर्ग्युसन कॉलेज काढलें. पुढें मतभेद होऊन टिळकांनीं कॉलेज सोडलें, तरी त्यांना पुष्कळ दिवस प्रोफेसर टिळक साहाजिकपणें म्हणत. पुढें टिळक मुंबई कायदेकौन्सिलचे सभासद झाले, तेव्हां त्यांना नामदार टिळक म्हणूं लागले व पुढें त्यांना लोकमान्य हें नांव लोकांनीं प्रेमानें दिलें.

पृष्ठ १९०. केसरीसाठीं कारागृहवास–केसरीची सुरुवात झाल्यापासून त्याचे पहिले संपादक आगरकर होते व 'मराठा' या इंग्रजी पत्राचे संपादक टिळक होते. १८८२ सालीं कोल्हापूरचें दिवाण रा. ब. बर्वे यांनीं केसरी व मराठा पत्राच्या संपादकांवर अब्रूनुकसानीची फिर्याद केली व त्या बाबतींत टिळक व आगरकर यांना शंभर दिवसांची कैद झाली, त्याचा हा उल्लेख आहे. (विशेष माहितीसाठीं ग. केळकरकृत टिळक–चरित्र भाग १ ला किंवा प्रो अळतेकरकृत आगरकर–चरित्रात्मक निबंध, पहा.)

पृष्ठ १९१. मि. मलबारी–हे एक पारशी वृत्तपत्रकार होऊन गेले. स्त्रियांच्या संमतीचें वय वाढविण्यासाठीं जें बिल आलें होतें. त्यासंबंधीं यांनीं पुष्कळ खटपट केली होती. यांचें नांव संमतिवयाच्या वादांत वरचेवर येतें तें त्यामुळें.

पृष्ठ १९२. म. चि. आपटे–महादेव चिमणाजी आपटे. हे पुणें येथें नामांकित वकील होऊन गेले. सुप्रसिद्ध मराठी कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांचे हे चुलते. यांनीं जवळचा बहूतेक सर्व पैसा "आनंदाश्रम" या संस्थेला दिला. आनंदाश्रमानें शेंकडो संस्कृत ग्रंथ योग्य प्रकारें संस्करण करून प्रसिद्ध केले आहेत.

पृष्ठ १९५. रा. ब. नूलकर–हे पुण्याचे त्या वेळचे एक प्रसिद्ध नागरिक वरिष्ट कायदे कौन्सिलचे सभासद होतें.

रानडे म्हणजे न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे. भांडारकर म्हणजे प्रख्यात विद्वद्रत्न डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर.

पृष्ठ २०१. इलबर्ट बिल–फौजदारी गुन्ह्यांच्या बाबतींत न्यायदान करतांना हिंदी व युरोपियन हा भेद असूं नये अशा धोरणाचें हें बिल लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दीत मि. इलबर्ट, व्हाइसरॉयांच्या कौन्सिलचे सभासद यांनीं आणलें. त्याविरुद्ध त्यावेळीं युरोपियन लोकांनीं फार ओरडा केला. त्यामुळें हें बिल मुळ स्वरूपांत मंजूर झालें नाहीं. या बिलामुळें लॉर्ड रिपन युरोपियन लोकांत फार अप्रिय व हिंदी जनतेंत अत्यंत प्रिय झाले. सध्यां युरो-

पियन लोकांवर हिंदी जज्जापुढें खटला भरतां येतो, पण त्यांना ज्यूरींत सर्व लोक आपले जातभाई असावेत असें मागण्याचा अधिकार आहे.

पृष्ठ २०३. मि. दादाभाई नवरोजींस " काळा " म्हणणाराची फजिती. हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीचे परमपूज्य पितामह दादाभाई नौरोजी हे कांहीं दिवस पार्लमेंटचें सभासद होते. त्या वेळीं अनेक वेळां मुख्य प्रधान असणारे लॉर्ड साल्सबरी यांनीं त्यांच्याविषयीं बोलतांना " काळा आदमी " असे पोरकटपणाचे प्रलाप काढले होतें. या मूर्खपणाबद्दल लॉर्ड-साहेबांच्या अनेक देशबंधूंनीं त्यांचे कान पिरगळले.

पृष्ठ २०६. लॉर्ड विल्यम बेंटिंग हें १८२८ ते १८३७ हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल होतें, यांच्याच कारकीर्दींत सतीचा कायदा होऊन यांचें नांव हिंदुस्थानच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहासांत अजरामर झालें. ठग म्हणून लोक होते त्यांचाहि बंदोबस्त यांनीं केला. हिंदुस्थानांतील इंग्रजी शिक्षणाचा म्हणजे नव्या युगाचा पाया लॉर्ड बेंटिंक यांच्याच कारकीर्दींत घालण्यांत आला. इतरहि अनेक राजकीय सुधारणा यांनीं केल्या व हिंदी लोकांचा नागरिक म्हणून दर्जा यांच्याच कारकीर्दींत योग्य प्रकारें प्रस्थापित झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पृष्ठ २१५. 'राजा कालस्य कारणम्, ना विष्णुः पृथिवीपतिः' वगैरे जुन्या संस्कृत म्हणी आहेत. त्यांवरून लोकसत्तेला त्या काळीं किती कमी मान होता हें दिसून येतें.

पृष्ठ २२२. लॉर्ड लॅन्सडाऊन हे १८८८-९४ हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल होते; म्हणजे आगरकरांचा सुधारक चालू असतांना बहुतेक वेळ हेच गव्हर्नर जनरल होतें. यांच्या कारकीर्दींत सरहद्दीवर बरींच युद्धें झालीं, एक नवीन कौन्सिल ॲक्ट पसार होऊन अर्धवट निवडणुकीचें तत्त्व अंमलांत आलें व चांदीच्या भावांत एकदम उतार होऊन चांदीच्या टांकसाळी बंद करण्यांत आल्या.

पृष्ठ २३७. टिळक व आगरकर हा लेख आगरकरांचा स्वभाव व वृत्ति फार उत्कृष्टपणें दाखवितो व टिळकांकडे पाहण्याची त्यांची दृष्टि काय होती हें स्पष्ट करतो.

पृष्ठ २४१. कविवाक्याचें स्मरण. हा श्लोक प्रख्यात संस्कृत नाटककार भवभूति याचा आहे. भवभूति हा आगरकरांचा विशेष लाडका कवि होता.